# १

# इतिहासपूर्व भारतीय समाजाचे स्वरूप

**घटक रचना**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ पाषाणकालीन किंवा अश्मयुगीन संस्कृती

१.३ पुराश्मयुगीन भारतीय समाजचे स्वरूप

१.४ मध्य अश्मयुगीन भारतीय समाजाचे स्वरूप

१.५ भीमबेटकाचे महत्व

१.६ नवाश्युगीन भारतीय समाजाचे महत्व

१.७ सारांश

१.८ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१.९ संदर्भ – ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

- प्रागैतिहासिक संस्कृतीचा अभ्यास करणे.
- पाषाणयुगीन संस्कृतीचा आढावा घेणे.
- मध्यपाषणयुगीन समाजाच्या स्थितीचा अभ्यास करणे.
- नवपाषाणयुगीन समाजाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना

मानवी संस्कृतीच्या इतिहासाची सुरवात ही मनुष्याच्या सुधारित व सुसंस्कृत अवस्थेपासून झाली. साधारणपणे इतिहासाचे प्रागैतिहासिक, पूर्व ऐतिहासिक काळ व ऐतिहासिक काळ असे विभाजन केले जाते. प्रागैतिहासिक कालखंड म्हणजे ज्या काळात लिपी व लेखन कलेचा विकास न झालेला कालखंड. या कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला फक्त पुरातात्विक साधनांवर अवलंबून राहावे लागते. अशमयुगीन संस्कृतीचा समावेश या कालखंडात केला जातो. पूर्व ऐतिहासिक कालखंड म्हणजे, ज्या कालखंडात पुरातात्विक व साहित्यिक दोन्हीं साधनांचा उपयोग हा इतिहासलेखनसाठी केला जातो. हडप्पा व वैदिक संस्कृतीचा समावेश या कालखंडात होतो. परंतु हडप्पा संस्कृतीची लिपी वाचण्यात अजून यश आले नसल्याने या काळासाठी फक्त पुरातात्विक साधनांवर अवलंबून राहावे लागते. ज्या कालखंडात अभ्यासासाठी ऐतिहासिक, पुरातात्विक व परकीय ही

munotes.in

तिन्ही साधने उपलब्ध आहेत. त्या कालखंडाला ऐतिहासिक कालखंड म्हणतात. (थापर रोमिला, पूर्वकालीन भारत , पृ. क्र. ९९)


आधुनिक संशोधनानुसार, सूर्याची उत्पत्ती ही ५०० कोटी वर्षांपूर्वी झाली तर पृथ्वीची उत्पत्ती ही ४५० - ४०० कोटी वर्षांपूर्वी झाली. जगातील पहिल्या सजीवाचा जन्म (अमिबा - स्पंज) १०० कोटी वर्षांपूर्वी झाला आणि आधुनिक मानवाचा जन्म ३०,००० वर्षांपूर्वी झाला. मनुष्याला रानटी अवस्थेपासून प्रगत अवस्थेपर्यंत पोहचण्यासाठी लक्षावधी वर्षाचा (इ.स.पू .५००००० - ५००) कालावधी लागला. (जोशी पी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. ३२) या काळात मानवाने जीवन जगण्यासाठी जी उत्पादनाची साधने वापरली त्या साधनांच्या आधारे संशोधकांनी या कालखण्डाचे विभाजन केलेले दिसून येते. मानवाच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये मानवी हत्यारे व औजारे ही मुख्यतः लाकूड, प्राण्यांची हाडे व दगडापासून बनवलेली असत. त्यामुळे या कालखंडास ' अश्मयुग ' असे नाव दिले गेले.

## १.२ पाषाणकालीन किंवा अश्ययुगीन संस्कृती

भारतात अश्मयुगीन संस्कृतीचे सर्वात पहिले भौतिक अवशेष रॉबर्ट ब्रूस फूट यांनी इ.स. १८६३ मध्ये मद्रास जवळील पल्ल्वरम येथे शोधले. तिथे त्यांना एक पूर्व अश्मयुगीन औजार सापडले. त्यानंतर विल्यम किंग, ब्राऊन कालबर्न, सी.एल. कार्लाइल इ. विद्वानांनी भारतातील विविध ठिकाणी संशोधन करून भारतातील अश्मयुगीन संस्कृतीची माहिती उजेडात आणली. याकाळातील मनुष्याने विविध हत्यारे व औजारे वापरली. तसेच या संपूर्ण कालखंडात मानवी जीवनाचा विकास हा उत्पादनाच्या साधनातील बदलांमुळे विविध टप्प्यातून झालेला दिसतो. उत्पादनांच्या साधनांमध्ये जसा बदल होत गेला तसे मानवाचे सामाजिक जीवन बदलत गेले. या काळातील मानवाने मोठ्या प्रमाणावर अश्म किंवा पाषाणाचा प्रयोग केला, त्यामुळे या संस्कृतीला ‘ अश्मयुगीन संस्कृती ’ असे म्हटले जाते. त्या काळातील मानवाने अश्मापासून बनविलेल्या उत्पादनांच्या साधनांमध्ये काळानुसार वेळोवेळी अनेक बदल केले, अशा बदलांना विद्वानांनी अभ्यासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या कालखंडात विभाजित केले. ते म्हणजे,

- पुराश्मयुग
- मध्यपाषाण युग
- नवपाषाण युग

munotes.in




**( भारतातील पाषणयुगीन स्थळांची माहिती, स्रोत :** https://www.tutorialspoint.com/ancient_indian_history/images/palaeolithic_sites.jpg )


## १.३ पुराश्मयुग काळातील भारतीय समाजाचे स्वरूप

पुराश्मयुगाची सुरवात ही आफ्रिकेमध्ये सामान्यतः २० लाख वर्षांपूर्वी झाली. परंतु भारतीय उपखंडात ही संस्कृती ६ लाख वर्षांपेक्षा अधिक जुनी नाही. साधारणपणे भारतात या संस्कृतीचा कालखंड हा इ.स. पूर्व ५०,००० - २०,००० पर्यंत मनाला जातो. ( जोशी. पी.सी ., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र.३२ ) या काळातील मानवी जीवन हे शिकारी अवस्थेमध्ये असल्यामुळे ते भटकंती स्वरूपाचे होते. या काळातील मानव हा गुहेत, झाडांवर किंवा दगडाची घरे बांधून राहत होता. तसेच तो शिकार करून कच्चे मांस खात होता. त्याच्या आहारात कंदमुळे, फळे व मारलेल्या किंवा मेलेल्या प्राण्यांचे

munotes.in

मांस यांचा समावेश होता. ही माणसे बहुधा नग्नावस्थेमध्ये राहत. याकाळातील मानवी जीवन हे पशुतुल्य होते. या काळातील मानव शिकारीसाठी ओबड - धोबड दगडी हत्यारे वापरत. या हत्यारांमध्ये दगडी कुऱ्हाडी, दगडी भाले, कठीण वाळलेले लाकूड तसेच बकरी, गायी, म्हशी इ. विविध प्राण्यांच्या हाडांचा  हत्यारे म्हणून वापर करीत. काळाच्या ओघात हाडांची व लाकडांची हत्यारे ही  नष्ट झाली आहेत परंतु मध्यप्रदेशमधील भीमबेटका येथील चित्रांवरून त्या औजारांची  बरिच माहिती मिळते.

या संस्कृतीचे अवशेष हे आजच्या पाकीस्तानमधील सोहन नदीचा परिसर, उत्तरप्रदेश मधील बेलन, मिर्झापूर मध्यप्रदेशमधील भीमबेटका, छोटा नागपूर परिसर, महाराष्ट्रातील प्रवरा नदी, नेवासा, बोरी आंध्रप्रदेशामधील गिदलूर, करीममुंडी, रेणीगुंटा, पल्लवराम, बेल्लारी गुजरातमधील हिरपूरा, साबरमती कर्नाटकमधील शोरपूर, विजापूर व तामिळनाडूमधील वाडमदुरै, अतिरम, पक्कम व मानजकारण इ. ठिकाणी आढळले आहेत.



munotes.in

**( अशमयुगीन हत्यारे )**

**आपली प्रगती तपासा :**


१) भारतात अश्मयुगीन संस्कृतीचे भौतिक अवशेष कोणाला, कधी आणि कोठे सापडले त्याचा मागोवा घ्या.

२) भारतात पुराश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष कुठे सापडले आहे? त्याची चर्चा करा.

## १.४ मध्याश्मयुगीन काळातील भारतीय समाजाचे स्वरूप

भारतात मध्याश्मयुगीन संस्कृतीची सर्वप्रथम माहिती ई.स. पूर्व १८६७ मध्ये झाली. सी. एल. कार्लाईल यांनी विंध्या परिसरात अनेक लहान दगडी औजारे शोधून काढली. या संस्कृतीमधील मनुष्य हा सूक्ष्म औज़रे वापरीत असे. ज्यामध्ये शल्क, तत्क्षणी, खुरचानी, अर्धचंद्र, सुई, पत्ती इ. औजारांचा समावेश होता. या संस्कृतीचा कालखंड हा साधारणपणे इ. स. पूर्व २०,००० - ५००० मानला जातो. या काळातील मानवाला अग्नीचा शोध लागल्याने त्याचा वापर माहिती होता. हे लोक मोठी - मोठी दगडी घरे बांधून राहत. त्याकाळातील लोकांनां सामूहिक जीवनाचे महत्व कळाले होते. ते भाषा बोलण्याचा देखील प्रत्यत्न करू लागले. काही प्राण्यांनां माणसाळवून त्यांनी पशुपालनास प्रारंभ केला होता.

munotes.in




**(मध्यषाषाणयुगीन स्थळ, स्रोत: Mishra, V.N., 2002. The Mesolithic Age in India. Indian archaeology in retrospect, 1, pp.111- 126)**

भारतात मध्यपाषाण संस्कृतीचे अवशेष हे राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, आन्ध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, मध्यप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल व उत्तर प्रदेश इ. ठिकाणी सापडले आहे. राजस्थान मधील बागोर येथून त्यांच्या दफन क्रियेची माहिती आढळते. येथे दफन केलेल्या मृत्य व्यक्तीच्या कबरीमध्ये लघुपाषाण, शंख व हस्तिदंताचे ताबीज ठेवलेले आढळतात. मध्यप्रदेशातील आजमगढ व राजस्थान मधील बागोर येथे मध्य अशमयुगातील पशुपालन व्यवसायाचे प्राचीन पुरावे आढळतात. मध्य प्रदेशातील भीमबेटकाच्या विंध्य पर्वतात मध्यपाषाणयुगीन शेकडो चित्रे आढळली आहे. या चिंत्रामध्ये मोठया प्रमाणावर पक्षी, प्राणी आणि मानवी जीवनाच्या विविध कृतीसंबधीचे चित्रे आढळतात. या चित्रांमधून तत्कालीन समाज जीवनाची माहिती आढळते.

**आपली प्रगती तपासा :**

१. मध्याश्मयुगीन काळातील भारतीय समाजाचे वैशिष्ट्ये सांगा ?

२. मध्याश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष भारतातील कोणकोणत्या राज्यात सापडले आहेत.

## १.५ भीमबेटकाचे महत्व

मध्य प्रदेशातील रायसेन जिल्यामध्ये (भोपाळ पासून ४० कि. मी. अंतरावर) भीमबेटका हे पुरापाषाण व मध्यपाषाण युगीन स्थळ आढळते. हे स्थळ विंध्यपर्वतावर आहे, यामध्ये १० वर्ग किमी क्षेत्रामध्ये जवळपास ७०० गुहा आहेत, ज्यामध्ये ५०० पेक्षाही अधिक चित्रित गुहा आहेत. पुराश्मयुगीन व मध्यशमयुगीन मनुष्य आपल्या वास्त्यव्याच्या निवास्थानी जीवनातील विविध अनुभवांचे चित्र काढीत. भीमबेटका येथे अनेक प्रोगैतिहासिक कलाकृती आढळून आल्या आहेत. भीमबेटकामधील गुहा चित्रांमध्ये सामूहिक नृत्य, मानवाचे रेखांकित चित्र, शिकरीचे चित्र, युद्ध, मानवी जीवनाच्या विविध कृतिसंबधीचे चित्रे, विविध पक्षी व प्राणी यांचे चित्र चित्रित केले आहे. ही चित्रे रंगवण्यासाठी काही ठिकाणी रंगाचा देखील वापर करण्यात आला आहे. या रंगामध्ये केशरी, लाल, सफेद रंग तर काही ठिकाणी पिवळ्या व हिरव्या रंगाचा देखील प्रयोग केला गेला आहे.

आर. एस. शर्मा यांच्या मते, " भीमबेटका येथील गुहांमध्ये चित्रित केलेल्या चित्रांमध्ये अधिकांश असे प्राणी व पक्षी आहेत ज्यांची शिकार उदरनिर्वाहासाठी केली जात होती. धान्यावर जगणारे प्रचिंग पक्षी त्या प्रारंभिक चित्रांमध्ये दिसून येत नाही, कारण ही चित्रे नक्कीच शिकार करून अन्न मिळवण्याच्या अर्थव्यवस्थेशी संबधित असतील " ( शर्मा आर. एस. प्रांरभीक भारत का परिचय, पृ. क्र. ५५ )



(भीमबेटका येथील युद्धाचे चित्र, स्त्रोत
http://upload.wikimedia.org/wikipedia/commons/9/99/Bhimbetka1.JPG )



( भीमबेटका येथील शिकारीचे चित्र, स्रोत : https://akm-img-a-in. tosshub. com/ aajtak/images/story/201311/bhimbetka_650_113013040900.jpg?size= 1200:675 )

**आपली प्रगती तपासा:**


४. भीमबेटकाचे ऐतिहासिक महत्व सांगा ?

## १.६ नवाश्मयुगीन भारतीय समाजचे स्वरूप

भारतात नवाश्ययुगीन संस्कृतीचा कालखंड हा इ. स. पूर्व ७००० मानला जातो. या संस्कृतीचे सर्वप्रथम अवशेष हे मेहरगढ़ (पाकिस्तानमधील बलुचिस्तान जिल्हा) येथे सापडले आहे. नवाश्मयुगीन संस्कृतीचे खास वैशिष्ट्ये म्हणजे याकाळात मानवाने भटकंती जीवनाचा त्याग करून स्थिर जीवनाला सुरवात केली. हा काळ मानवी जीवनाच्या विकासातील क्रांतिकारक काळ ठरला. याच काळात मानवाने शेतीमधील प्रगत तंत्रज्ञान अवगत केले. या काळातील मानवी समाज हा जंगली तांदूळ, गहू व कापसाचे उत्पादन घेत. कुंभाराच्या चाकाचा शोध याच काळात लागल्याने भांड्यामधे सुबकता व नावीन्यपूर्णता दिसते. पुढील काळात या भांड्यांचा उपयोग विविध कारणांसाठी होऊ लागला. रोमिला थापर यांच्या मते,"मृदभांड्यांच्या वाढत्या वापराने अन्न साठवणे व शिजवणे या प्रक्रियेस चालना मिळाली. तसेच मृतांसोबत त्यांच्या वस्तूदेखील दफन केले जात असल्याने मृदपात्रांचा धार्मिक वस्तूंमध्ये समावेश झाला." (थापर रोमिला, पूर्वकालीन भारत, पृ. क्र. १०५ )

munotes.in

या काळातील समाज हा समूहाने राहत असल्याने कौटंबिक ग्रामीण जीवनाला प्रारंभ झाला. ज्या मुळे अनेक खेडी विकसित झाली. पशुपालन, कुटुंबसंस्था, धर्म कल्पना, कापडनिर्मिती, मातीची भांडी, अग्नीचा वापर, प्रगत आहार व ग्रामीण जीवनाचा उदय ही नवाश्मयुगीन समाजाची वैशिष्ट्ये होती. (जोशी पी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. ३३)




**(नवपाषाणकालीन स्थळ, स्रोत <u>https://www.objectiveias.in/wp-content/uploads/ 2019/12/neolithic-sites.jpg</u>** )

भारताच्या वेगवेगळ्या ठिकणी नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष सापडतात. भारतात नवाश्मयुगीन संस्कृतीच्या ८ वसाहती सापडल्या आहे. ज्यामध्ये कर्नाटक येथे ३, आन्ध्रप्रदेश २, तामिळनाडू १, बिहार १ व काश्मीर १ या वसाहती आहेत. त्यांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे :

**१. मेहरगढ़ :**

भारतीय उपखंडाच्या पश्चिमोत्तर भागामध्ये इ. स. पूर्व ७००० साली मेहरगढ येथे मानवी वस्ती आढळली आहे. मेहरगढ हे शहर पाकिस्तानमधील बलुचिस्तान येथील बेलन नदीच्या काठावर कोची मैदानामध्ये ही वस्ती वसलेली होती. मेहरगढ येथे नवाश्मयुगातील पहिली मानव वस्ती सापडलेली आहे. सुरवातीच्या काळात मेहरगढ येथील मानवी समाज हा पशुपालक होता. तो शेतीमधून गहू, जवस व कापसाचे उत्पादन घेत असे. तो कच्या विटांपासून बनलेल्या घरांमध्ये राहत होता. याकाळात अन्नधान्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असल्याने धान्य हे कच्च्या विटांपासून बनलेल्या धान्य कोठारामध्ये ठेवले जात.

munotes.in

**२) बूर्जहोम व गुफकराल ( काश्मीर ) :**

भारताच्या उत्तर - पश्चिम भागातील काश्मीर येथील बूर्जहोम व गुफकराल येथे नवाश्मयुगीन संस्कृतीचे वसाहती आढळल्या आहे. ही संस्कृती खडकातील घरे, मातीच्या भांड्याची विविधता, दगडी तसेच हाडांची विविध औजारे इ. वैशिष्ट्यांनी परिपूर्ण होती. येथे मानवी अस्तित्वाच्या दोन वसाहती सापडतात. पहिल्या वसाहतीचे लोक हाथ बनावटीच्या राखाडी व काळ्या रंगाच्या मातीची मडकी वापरीत. तसेच या वसाहतींच्या घरांमध्ये चुली देखील आढळून आल्या आहे. धारधार कुऱ्हाडी शिवाय त्यांच्याकडे हाडांच्या सुया, मत्स्यबाण इ. सारखी औजारे आढळली आहे.

दुसऱ्या वसाहतींमधील लोकांचे जीवन हे अधिक प्रगत होते. बूर्जहोम येथून त्यांच्या दफनक्रियेची वैशिष्ट्यपूर्ण माहिती सापडते. याठिकणी मानवाच्या सागंड्या शेजारी कुत्र्याचाही सांगाडा आढळून आलेला आहे. येथे मानवाबरोबर प्राण्याचेंही दफन करण्याची प्रथा असावी. तसेच येथे मृत शरीराला दंडाकृती खड्यात पुरले जाई. त्यांच्या कवटीला छिद्र पाडणे तसेच त्याला गेरूचा तांबडा रंग फासण्याची प्रथा होती.

**३) विंध्यप्रदेश ( अलाहाबाद ) :**

उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथील कोल्हीडावा, महागडा व पंचोह येथे नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष सापडले आहे. येथील कोल्हीडावा येथे नवाश्मयुगीन संस्कृतीबरोबरच ताम्र व लोह युगीन संस्कृतीचे देखील अवशेष सापडले आहे. तर महगोड व पंचोह येथे फक्त नवाश्ययुगीन संस्कृतीचे अवशेष आढळतात. येथील संस्कृतीमधून कुऱ्हाडी, छिन्न्या, हातोडी, वाळत ही हत्यारे सापडली. या वसाहतींमध्ये गोलाकार आकाराची घरे सापडली आहे. कोल्डिहावा याचे खास वैशिष्ट्ये म्हणजे येथे धान्याची (धान) शेती करण्याचे सर्वात प्राचीन उदाहरण आढळते. (इ. स. पूर्व ७००० - ६०००)
( श्रीवास्तव के. सि. प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती )

**४) चिरांद :**

मध्य गंगा नदीच्या मैदान क्षेत्रामध्ये चिरांद (बिहार) हे एक नवाश्मयुगीन स्थळ सापडले आहे. गंगा, सोन आणि घाघरा या चार नंद्यांच्या संगमस्थळाजवळ विरळ जंगलमुक्त जमीन असल्याने नवाश्मयुगीन मानवाला येथे शेती करणे सहज शक्य झाले. चिरांद येथील आद्य वसाहतींमध्ये नवाश्ययुगीन हत्यारे व काही घरांची औज़ारे आढळली आहे.

**५ ) दक्षिण भारतातील नवाश्मयुगीन संस्कृती :**

दक्षिण भारतात आंध्रप्रदेशातील ब्रम्हगिरी, नागार्जुनकोंडा, कर्नाटकमधील टेक्कलकोटा, हल्लूर, संगणकल्लू तर तामिळनाडूमधील पेयपल्ली व मंगलम इ. ठिकाणी नवाश्ययुगीन संस्कृतीचे अवशेष आढळतात. या संस्कृतीमधील लोक हे ग्रॅनाईट डोंगराच्या पठारावर राहत. ते दगडी कुऱ्हाडी व अनेक प्रकारच्या प्रस्तर फलकांचा उपयोग करत. या स्थळांमधील अवशेषांवरून दक्षिण भारतामध्ये नवाश्मयुगीन संस्कृती हि इ. स. पूर्व २३०० पासून ई. स. पूर्व १००० पर्यंत असावी असे कळते. कर्नाटकमधील पिकलिहल येथील नवाश्मयुगीन लोक पशुपालक होते. तसेच येथील लोक ऋतू नुसार येथे वस्ती करत असल्याचे दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

१. नवाश्मयुगीन संस्कृतीतील खालील शहरांचा आढावा घ्या ?

अ) मेहरगढ  ब ) चिरंद

## १.७ सारांश

इतिहसपूर्व भारतीय समाजाचे स्वरूप पाहत असतांना पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग याकाळातील समाजचे बदलते स्वरूप पाहावे लागते. सुरवातीच्या काळात मानवाला सभोवतालच्या भौतिक परिस्थीशी स्वसंरक्षणार्थ संघर्ष करावा लागला. घनदाट जंगले, विस्तीर्ण दलदलीचे प्रदेश, हिंस्त्र प्राणी या सर्वांमुळे मानवी जीवनाला सदैव धोका होता. याकाळात मानवाने आपल्या बुद्धीने हत्यारे व उपकरणे बनवून विविध निसर्ग शक्तींशी संघर्ष करून मानवी संस्कृती विकसित केली.

पुराश्मयुगीन काळातील भारतीय समाज हा भटक्या अवस्थेत होता. शिकार करून कच्चे मांस व कंदमुळे खाऊन तो आपला उदारनिर्वाह करत होता. बेल्लारी, एडक्कल, सिंघनपूर, मिरझापूर, घाटशील इ. ठिकाणातील गुहाचित्रांवरून त्यांच्या धर्मकल्पना, पिशाच्यवाद व जादुटोणा यावर आधारलेल्या सामाजिक कल्पनांची माहिती मिळते. मध्यश्मयुगीन मानवी समाजात बदल घडले. याकाळातील मानवी समाज हा संघटित राहू लागला. तसेच आपल्या भावना, विचार व जीवन तो चित्रांमार्फत प्रगट करू लागला. नावश्मयुगीन काळात मानवी जीवन हे स्थिर झाले. याच काळात कौटुंबिक ग्रामीण जीवनाला सुरवात  होऊन ग्रामीण खेड्यांचा उदय झाला.

## १.८ स्वाध्यायावर  आधारित प्रश्न

१) पाषाणकालीन किंवा अश्मयुगीन संस्कृतीचा आढावा घ्या.

२) पुराश्मयुगीन भारतीय समाजचे स्वरूप स्पष्ट करा.

३) मध्य अश्मयुगीन भारतीय समाजाचे स्वरूप सांगा.

४) भीमबेटकाचे ऐतिहासिक महत्व सांगा.

५) नवाश्युगीन भारतीय समाजाचा आढावा घ्या.

६) नवाश्मयुगीन संस्कृतीच्या विविध स्थळांचा आढावा घ्या.

## १.९ संदर्भ - ग्रंथ


१) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती (प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत), विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

२) जोशी पी. जी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१३

3) श्रीवास्तव के.सि. - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, युनायटेड बुक डेपो, इलाहाबाद, ग्यारावी आवृत्ती २००९.

४) कदम सतेश, डॉ. सोनावणे गौतम, - प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी, प्रथम आवृत्ती,

५) शर्मा रामशरण, प्रारंभिक भारत का परिचय, ओरियंट ब्लॅकस्वान, नई दिल्ली.

६) गायधनी र. ना. प्राचीन भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिकेशन हाऊस, पुणे. दुसरी आवृत्ती, २००६

७) Thapar Romila, The Penguin history of Early India : From the origins to AD 1300, Penguin Publication, First Edition, 2003

८) Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.


❖❖❖❖

munotes.in

# २

# जन ते वर्ण आणि पशुपालनापासून स्थिरावलेला भारतीय समाज

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ जन ते वर्ण संक्रमण प्रक्रियेतील समाज

२.३ जन - उत्तर वैदिक काळ

२.४ वर्ण

२.५ पशुपालक ते स्थिर समाज

२.६ पशुपालक समाज

२.७ स्थिर समाज

२.८ लोखंडाचा वापर व स्थिर शेतीचा वापर

२.९ सारांश

२.१० स्वाध्यायावर आधारित प्रश्न

२.११ संदर्भ - ग्रंथ

munotes.in

## २.० उद्दिष्टे

- जन ते वर्ण या संक्रमण प्रक्रियेतील समाजाचा अभ्यास करणे.
- वर्णव्यवस्थेच्या स्वरूपाचा आढावा घेणे.
- प्रारंभीक पशुपालक समाजाचे विश्लेषण करणे.
- प्राचीन स्थिर समाजाच्या विकासाचा आढावा घेणे.
- स्थिर शेतीच्या विकासात लोखंडाचे महत्व अधोरेखित करणे.

## २.१ प्रस्तावना

भारतात हडप्पा संस्कृतीच्या विकास आणि प्रसारा नंतर आर्य संस्कृतीचा प्रभाव वाढत होता. हडप्पा संस्कृती ही कृषिप्रधान, व्यापारप्रधान, ग्रामीण व नागरी अवस्थेपर्यंत पोहचलेली व भौतिक विकासामध्ये उच्च पातळीवर पोहचलेली संस्कृती होती. पुढील काळात आर्यांनी भारतावर आक्रमण करून ह्या संस्कृतीवर विजय मिळवला. पुरातात्विक

साधने व साहित्यिक साधनांच्या आधारे हे स्पष्ट झाले आहे कि, काही नैर्सगिक बदलांमुळे आर्यांच्या मूळ भूमीवर सतत दुष्काळ पडत गेले, त्यामुळे त्यांना अन्नाच्या व चाऱ्याच्या शोधात इतरत्र स्थलांतरित व्हावे लागले. आर्यांच्या काही टोळ्या ह्या युरोप खंडात, व काही सप्तसिंधू प्रदेशात स्थिरावल्या. सर्वसाधारणपणे ई. स. पूर्व १५०० - ५०० हा आर्य किंवा वैदिक संस्कृतीचा कालखंड मानला जातो.

## २.२ जन ते वर्ण या संक्रमण प्रक्रियेतील समाज

**अ) जन - ऋग्वेदिक काळ**

**१) पूर्व वैदिक काळातील जीवन :**

पूर्व वैदिक काळात आर्यांचे राजकीय जीवन पशुचरण अवस्थेतील व टोळीसमूहाचे असल्याने ते अस्थिर स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. "जन" ही आदिम जनजातीच्या संदर्भात वापरली जाणारी संज्ञा आहे. ती समूहवाचकही आहे. ऋग्वेदमध्ये अनेक जनपदांचे उल्लेख आढळतात. ही जनपदे विशच्या समूहाची बनलेले असत. या काळात सयुंक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती व त्यास 'कुळ' असे म्हटले जात. अनेक कुळ किंवा कुटुंबाचे मिळून ग्राम तयार होत. व अनेक ग्रामाचे मिळून विश बनत. पूर्व वैदिक काळात अशा व्यवस्थेमधून जनचे स्वरूप बनले होते. व त्यामध्ये लोक संघटित झालेले दिसून येतात. अशा अनेक जनपदांची वर्णने ऋगवेदामध्ये आढळतात. त्याकाळातील लोकवस्त्यांचे अवशेष सप्तसैन्धव प्रदेश व गंगा यमुनेच्या प्रदेशात आढळून आलेले आहे. पुरातात्वीक अवशेषांवरून या काळातील लोक गेरू रंगाची, चित्रित भुऱ्या रंगाची तसेच लाल व काळ्या मातीच्या भांड्यांचा वापर करीत होती असे दिसते.

सुरवातीच्या काळात अनेक टोळीसदृश जन मध्ये वास्तव्य करीत असलेले लोक परस्परांमध्ये व अनार्यांबरोबर सतत संघर्षमय जीवन जगत असल्याचे दिसून येतात. या काळात जनांमधील संघर्ष हा जमिनीच्या मालकीवरून न होता तो पशुचोरीच्या कारणांवरून जास्त होत असल्याचे दिसून येते. याकाळात जमिनीला फारसे महत्व प्राप्त झालेले नव्हते. जमिनीचा वापर हा खाजगी संपत्ती म्हणुन न होता केवळ पशूंना चरण्यासाठी, शेती कसण्यासाठी व निवास करण्यासाठी केला जात असे. अशा संघर्षमय परिस्थितीमधे या काळातील लोकांनां शक्तिशाली नेतृत्वाची गरज भासल्याने त्यांनी लोक जनमधे संघटित होऊन सुव्यवस्थित राज्यवस्थेची स्थापना केली असावी.

**२) जन मधील राजकीय जीवन :**

ऋग्वेदिक आर्यांच्या राजकीय व्यवस्था ह्या टोळ्यांवर आधारित होत्या. सप्तसिंधू व आसपासच्या प्रदेशात आर्यांच्या ह्या टोळ्या विखुरलेल्या होत्या. या काळातील अर्थव्यवस्था ही पशुपालनावर आधारित असल्याने स्थिर व विशाल भूप्रदेशावर आधारित राज्य उदयास आलेले नव्हते. टोळी प्रमुखाला 'राजन' म्हटले जात. राजाची निवड ही कुळ, विश व जनपद यांच्या विचार विनिमयातून होत असत. ऋग्वेदमध्ये सभा समिती व विदथ चा उल्लेख आढळतो. या काळातील प्रशासन व्यवस्थेमध्ये 'सभेला' विशेष महत्व होते. सभेमध्ये केवळ वयोवृद्ध लोक सहभागी होत. न्यायदान करणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य होते. राजावर नियंत्रण ठेवणारी सभा ही एक महत्वपूर्ण संघटना होती. 'समिती' ही

सर्वसामान्य लोकांची राजकीय संस्था होती. ही संस्था राजाची निवड करणे, दुराचारी राजाला पदावरून दूर करणे इत्यादी कार्य करीत. ' विदथ ' या संस्थेमध्ये धार्मिक व लष्करी विषयांवर चर्चा होत.

ऋग्वेदिक काळाच्या मध्यवर्ती काळात राजाचे महत्व वाढल्याने जन मधील लोक त्याला स्वेच्छेने गायी, फळे व अन्नसामुग्री भेट म्हणून देऊ लागले. प्रत्येक सामाजिक समारोहामध्ये त्याची उपस्थिती महत्वाची मानली जाऊ लागली. त्यामधूनच सभा, समिती व विदथचे राजकीय महत्व कमी होत गेले. रोमिला थापर यांच्या मते, " राजाची निवड विश किंवा कुळाद्वारे होण्याची प्रक्रिया नंतरच्या काळात कमजोर होत गेली. याचा अर्थ असा की हळूहळू कुळ व विश राज्याच्या वर्चस्वाखाली येऊ लागले होते व राजा त्यांच्याकडून बली (कर) स्वीकारू लागला होता. " (थापर रोमिला, पूर्वकालीन भारत, पृ. क्र. १५७)

ऋग्वेदिक काळाच्या शेवटी जनमधील राज्यव्यवस्था सदृढ बनल्याने राजा, पुरोहित, ज्योतिष, सेनानी, सारथी, कोषाध्यक्ष, भंडारी आणि धुताध्यक्ष अशी श्रेणीबद्ध रचना राजा व त्यांच्या सहकाऱ्यांची तयार होऊन या प्रकारची राज्यव्यवस्था विकसित झाल्याचे दिसते.

**३) आर्थिक जीवन :**

ऋग्वेदिक काळाच्या उत्तरार्धातील लोक अनार्यांच्या संपर्कातून शेती व्यवसायाशी संलग्न झालेले दिसून येतात. सप्त सिंधूच्या परिसरात अनार्यांच्या संपर्काने आर्य संस्कृती वाढल्याने या काळात शेतीला महत्वाचे स्थान मिळाले. शेतीमुळे आर्यांचे भटके जीवन संपुष्टात येऊन ते स्थिर जीवन जगू लागले. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमुळे व ग्रामीण संस्कृतीमुळे पशुपालनाला महत्व आले. याच काळात पुरोहितांचे महत्व वाढत गेले. या पुरोहितांना त्यांच्या पौराहित्याबद्ल मोठी दक्षिणा मिळत असे.

**आपली प्रगती तपासा :**

१. ऋग्वेदिक काळातील जन मधील राजकीय व्यवस्थेचा आढावा घ्या.

## २.३ जन - उत्तर वैदिक काळ

उत्तर वैदिक काळामध्ये सप्त सिंधूच्या प्रदेशामध्ये टोळी राज्याचा दबाव वाढत गेल्याने व पाळीव प्राण्यांना आवश्यक असणारी कुरणे अपुरी पडू लागल्याने या काळात नवीन प्रदेशात स्थलांतरित होऊन वसाहती निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. या काळात आर्यांचा राज्यविस्तार संपूर्ण भारतात झालेला दिसून येतो. यामध्ये वायव्य भारताला सप्त सिंधू, उत्तर पश्चिम प्रदेशाला ( दुवाब प्रांत ) 'ब्रम्हर्षी' किंवा ' ब्रह्मावर्त' आणि सर्व उत्तर भारताला 'आर्यावत' म्हणत. याच काळात लागलेल्या लोखंडाच्या शोधामुळे सर्वच क्षेत्रात क्रांतिकारी बदल झालेले दिसून येतात. उत्तर वैदिक काळात राजकीय जीवनाला प्रारंभ होऊन सामाजिक जीवन स्थिर झाले.

**जनपद :**

उत्तर वैदिक काळात राजकीय जीवन स्थिर झाल्याने आर्यांचा अनार्य टोळ्यांमधील संघर्ष हा कमी झालेला दिसून येतो. लहान-लहान टोळी राज्यांचे अनेक वर्षांच्या संघर्षातून या राज्यांचे मोठ्या जनपद राज्यांमध्ये रूपांतर झालेले दिसून येते. या काळातील अनेक ग्रंथामधून कुरु, पांचाळ, मस्त्य, विदेह, मथुरा, कोसल, मगध, अभीर, इत्यादी. राज्यांचा उल्लेख येतो. याकाळात या राज्यांना जनपद असे म्हटले जात. या राज्यांशिवाय आर्यावर्तात इतर दुय्यम राज्यांचा उदय झालेला दिसून येतो. यामध्ये अफगाणिस्थानमध्ये गांधार, काश्मीर, पंजाबच्या परिसरात उत्तर भद्र व कैकेय, राजस्थानात मल्लय, उत्तर मध्य प्रदेशात चेदी, वश, कुशीनगर, बंगाल, बिहार व ओरिसाच्या प्रदेशात अंग, वंज, पुंड्र, कालीन आणि दक्षिण भारतात विदर्भ, आंध्र, पुलिंद, निषाद ही राज्य निर्माण झाली.

**२) राजपद :**

उत्तर वैदिक काळामध्ये देखील पाळीव प्राण्यांच्या चोरीवरून व जमीन क्षेत्रावरील अधिकारावरून प्रत्येक जनपद राज्य आपापसात संघर्ष करत असल्याचे दिसून येते. अशा या सततच्या संघर्षामुळे राज्याच्या आणि जनतेच्या रक्षणासाठी शक्तिशाली राजाची गरज प्रत्येक जनपदातील लोकांना वाटू लागली. पूर्वीच्या अस्थिर राजा ऐवजी स्थिर राजेपदाला महत्व प्राप्त झाले. डी. डी .कोसंबी यांच्या मते, " सततच्या युद्धांमुळे राजाचे अधिकार वाढत गेले. व राजपदाला एका परिवारामध्येच मर्यादित ठेवण्याची प्रवृत्ती वाढत गेली." राजाला दैवीगुणयुक्त मानून त्याचे सामाजिक महत्व वाढवण्यासाठी अनेक अनुष्ठीय यज्ञाची प्रथा जनपदामध्ये या काळात वाढीस लागली. इतर राज्यांवर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी अश्वमेध, राजसूर्य, वाजपेयी असे यज्ञ राजा करू लागला. यामुळे राजाचे पद हे हळू-हळू अनुवांशिक बनू लागले.

**३) मंत्रिमंडळ :**

उत्तर वैदिक काळात जनपदाचा आकार वाढत गेल्याने राजा व त्याच्या प्रशासनाची जबाबदारी वाढल्याने राजाच्या मंत्रिमंडळात वाढ झाली. मंत्री मंडळाला 'रत्नींन 'म्हटले जात. या मंत्र्यांमध्ये कर वसूल करणारा भागदूध, राजाचा रथ चालवणारा सूत, धर्माचे कार्य पाहणारा पुरोहित, सैन्याचा प्रमुख सेनानी, गावाचा प्रमुख ग्रामिणी, राजाचा खजिना सांभाळणारा संग्रहित व जुगाराला आळा घालणार अश्वप असे विविध मंत्री होते.

**४) सभा व समिती :**

राजकीय संघटनेतील सभा व समिती या दोन संस्था कायम असल्यातरी उत्तर वैदिक काळात त्यांचे महत्व कमी झाले. सभेकडे न्याय दानाचे कार्य होते पण राजा हा सर्वोच्य न्यायधीश होता. गावातील न्यायव्यवस्था ही स्वतंत्र होती. याकाळात समितीचेही कामकाज चालत असे पण राजाच्या वाढत्या सामर्थ्यासमोर समितीचे अधिकार कमी पडत गेले.

**आपली प्रगती तपासा :**

1. सभा व समिती यांच्या कार्याचा आढावा घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.४ वर्ण

आर्यांची समाजरचना काही वैशिष्ट्यपूर्ण अशा सामाजिक समूहांनी बनलेली होती. या सामाजिक समूहांना ' वर्ण ' असे संबोधले गेले. वर्ण हे सुरवातीस त्या त्या समूहाच्या विशिष्ट्य कार्यावरून पडले होते. ऋग्वेदिक काळाच्या शेवटी आर्यांची सामाजिक व्यवस्था वर्ण विभाजनामध्ये संघटित झालेली दिसून येते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील 'पुरुषसुक्त' मध्ये सर्वप्रथम चार वर्णांचा स्पष्ट उल्लेख आढळतो ज्यात एका दिव्य पुरुषाचे किंवा प्रजापतीच्या मुख म्हणजे ब्राह्मण, हात किंवा बाहू म्हणजे क्षत्रिय, उदर म्हणजे वैश्य, पाय म्हणजे शूद्र असे समाजाचे वर्णन आढळते. ऋग्वेदिक काळात लोकांना त्यांच्या आवडीनुसार व अंगभूत गुणांनुसार व्यवसाय निवडण्याचे अधिकार होते म्हणजेच त्यांना वर्ण बदलण्याचा अधिकर होता. परंतु उत्तर वैदिक काळात यामध्ये कठोरता येऊन वर्णव्यवस्था जटिल बनली. या चार वर्णांमध्ये संख्येने कमी असलेले ब्राह्मण व क्षत्रिय समाजाचे प्रतिनिधित्व करतांना दिसतात. वैश्य जे व्यापार व शेती व्यवसायाशी संबंधित होते ते श्रीमंत अनार्य होते, त्यांच्या उपोयोगीतेवरून त्यांना आर्यांनी आपल्या समाजामध्ये समाविष्ट करून घेतले. अनार्य लोकांमधील ज्या लोकांनी आर्य समाजाबरोबर दीर्घकालीन संघर्ष केला त्यांना शूद्र वर्णात ठेवल्याचे दिसून येते. या चार वर्णांपैकी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांनाच उपनयन संस्काराचा व यज्ञ करण्याचा अधिकार होता.

munotes.in

**अ) वर्णव्यवस्था :**

**१) ब्राह्मण :**

आर्यांची सत्ता सप्तसिंधूच्या प्रदेशात स्थिर झाल्यानंतर त्यांच्या धार्मिक कार्यात यज्ञाला विशेष महत्व प्राप्त झाले. आर्यांचे सांस्कृतिक धन टिकवण्यासाठी वेद वाङमय पठन करून जतन करण्याचे काम ब्राह्मण वर्णाकडे सोपवले गेले. त्यामुळे अध्यापनाचे व यज्ञ करण्याचे काम ब्राह्मण वर्णाकडे आले. या काळातील ब्राह्मण वर्णातील लोक राजांचे सल्लागार, यज्ञाचे पौरोहित्य करणे, मंत्रपठण, अध्यापनाचे कार्य इत्यादी कार्य करीत.

**२) क्षत्रिय :**

क्षत्रिय वर्ण हा राज्य करणारा, लढाऊ वृत्तीचा, व आपल्या जनमधील लोकांचे रक्षण करणारा वर्ण होता. समाजचे रक्षण करणे, त्यासाठी शस्त्र धारण करणे, शस्त्रविद्या जोपासणे ही क्षत्रियांची कर्तव्य ठरली होती. राज्य करतांना मिळणारे विविध कर व युद्धातील लूट ही त्यांनाच मिळत. कठीण प्रसंगी शेती व पशुपालन करण्याचा त्यांना अधिकार होता.

**३) वैश्य :**

समाजातील एक मोठा गट जो शेती, व्यापार, उद्योग यामध्ये गुंतलेला होता त्यांना वैश्य म्हणून ओळखले जाऊ लागले. आर्यांना या लोकांच्या ज्ञानाचा व उत्पन्नाचा उपयोग आपले भौतिक जीवन समृद्ध होण्यासाठी झाल्याने त्यांना आर्यांनी समाजातील बरेच हक्क व अधिकार दिले.

**४) शूद्र :**

आर्य - अनार्य यांच्या संघर्षातून पराभूत अनार्यांना आर्यांनी दास म्हणजे गुलाम बनवले. पुढील काळात ज्या लोकांनी आर्य संस्कृतीचा स्वीकार केला त्यांना तिन्ही वर्णात सामावून घेतले गेले व जे आपल्या एतदेशीय जुन्याच आचार - विचारांशी एकनिष्ठ राहिले त्यांना शूद्र ठरवले गेले. व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तिन्ही वर्णांची सेवा करणे हे या शुद्रांवर बंधनकारक केले गेले.

अशाप्रकारे ऋग्वेदकाळात ब्राहमण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आपल्या व्यावसायीक कर्तव्यासह विकसित झाले. या वर्णभेदाचा मुख्य आधार हा जन्म नसून कर्म होता. कोणीही आपल्या गुणांनुसार कोणताही वर्ण स्वीकारू शकत होता. परंतु उत्तर वैदिक काळात यामध्ये जटिलता येऊन वर्णाचा आधार हा जन्म बनला.

**ब) वर्णव्यवस्थाचे स्वरूप :**

ऋग्वेदिक काळाच्या शेवटी आर्य - अनार्यांच्या समन्वय प्रक्रियेतून अनेक व्यवसायांची प्रगती झाल्याचे दिसून येते. व्यवसाय हा या काळात निर्माण झालेल्या चातुर्वर्ण व्यवस्थेचा पाया होता. या काळातील लोकांना त्यांच्या आवडीनिवडीनुसार व अंगभूत गुणांनुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य होते. ऋग्वेदाच्या सुरवातीच्या मंडला मध्ये आर्य व दस्यु, ब्राह्मण व राज्यन्य अशी वर्णने आढळतात. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळामध्ये वैश्य व शूद्र वर्णांचा स्पष्ट उल्लेख आढळतो. यावरून असे म्हणता येते की, दीर्घकाळच्या संघर्षाला कंटाळून आर्य - अनार्यांमध्ये सम्मिलीकरणाची प्रक्रिया वाढली असावी. यामध्ये व्यापार व शेती करणाऱ्या हडप्पा संस्कृतीतील अनार्यांना, आर्य संस्कृतीमधील सामाजिक

munotes.in

व्यवस्थेमध्ये समाविष्ट केले असावे. व ज्या अनार्यांनी आर्य संस्कृतीत समाविष्ट होण्यास नकार दिला त्यांना शूद्र संबोधले गेले.

उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्था कठोर होत गेली. या काळाच्या उत्तरार्धामधे वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था जन्माच्या आधारावर करण्यासाठी अनेक नियम बनवल्याचे दिसून येतात. या काळात रोटी - बेटी व्यवहार बंद झाले, आंतरवर्णीय विवाह प्रक्रिया बंद झाली. या नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांना समाजातून बहिष्कृत करण्यात आले.

**आपली प्रगती तपासा :**

१. वर्णव्यवस्थेमधील चार वर्णांचा आढावा घ्या.

___

___

___

___

___

## २.५ पशुपालक ते स्थिर समाज

ऋग्वेदिक काळातील लोक अर्धभटक्या व पशुपालक अवस्थेतील होते. शेतीपेक्षा पशुपालक हे त्यांच्या उदर निर्वाहाचे मुख्य साधन होते. सामाजिक व राजकीय संघटनेवर देखील पशुपालनाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. ऋग्वेदिक लोकांनी सामाजिक रचनेमध्ये जनकुलीय जीवनाचे वर्चस्व जन व विश या ऋग्वेदिक शब्दावरून दिसून येते. ऋग्वेद या ग्रंथावरून सुरवातीच्या काळातील आर्यांच्या सामाजिक जीवनावर प्रकाश पडतो. या सुरवातीच्या काळातील आर्य समाज हा पशुपालक, भटका व टोळी - टोळीने आपले जीवन जगत असे. उत्तर वैदिक काळात आर्य साम्राजाचा झालेला विस्तार, लोखंडाचा शेतीसाठी व औजारांसाठी झालेला वापर व मोठ्या जनपदांचा उदय या विविध कारणांमुळे हा अस्थिर समाज स्थिर झाल्याचे अनेक पुरावे आढळतात.

## २.६ पशुपालक समाज

**१) प्रारंभिक आर्य समाज :**

सुरवातीच्या काळात बाहेरून आलेला आर्य समाज हा अस्थिर असल्याने व येथील स्थानिक अनार्यांशी त्यांना नेहमी संघर्ष करावा लागत होता, त्यामुळे त्यांच्यात टोळी अंतर्गत समानता व एकता दिसून येते. आर्यांनी येथील अनार्यांशी प्रदीर्घ काळ संघर्ष केला व त्यांना पराभूत वा अंकित करून दास किंवा दसु म्हटले जाऊ लागले. आर्यांची गतिशीलता, प्रगत शस्त्र इ. कारणांमुळे त्यांनी स्थिर जीवन जगणाऱ्या संस्कृतीवर विजय मिळवला. सुरवातीच्या काळात आर्य लोक हडप्पा संस्कृतीच्या प्रदेशात स्थिरावलेले दिसतात. परंतु या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने व स्थानिक लोकांकडून

आर्यांच्या गायीचे चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने आर्य समाज हा सप्तसैन्धव प्रदेशातून उत्तरेकडे स्थलांतरित झाल्याचे दिसून येते.

या प्रदेशात स्थिरावलेल्या आर्यांना पशुचोरीवरून सतत स्थानिक लोकांबरोबर व आर्यांच्या टोळ्यांबरोबर संघर्ष करावा लागत होता. याकाळातील संघर्षाचे मुख्य कारण हे जमीन किंवा इतर कारणांपेक्षा पशुचोरी हे मुख्य कारण होते. आर्यांच्या पाळीव प्राण्यांमध्ये गाय, बैल, घोडे, शेळ्या - मेंढ्या, गाढव व कुत्रे इ. समावेश होता. पण या प्राण्यांमध्ये गायीला एकंदरीत तिच्या उपयोगीतेमुळे विशेष महत्व प्राप्त झाले. गायींच्या चोरीमुळे संघर्ष होत असल्याचे अनेक उदाहरण ऋग्वेदामध्ये आढळतात.

**२) कुटुंबसंस्था :**

ऋग्वेदिक काळातील सामाजिक जीवनात कुटुंबसंस्थेला विशेष महत्व होते. कुळ म्हणजे कुटुंब. एका कुटुंबात तीन पिढ्या एकत्र राहत असल्याचे उल्लेख ऋग्वेदामध्ये आढळतात. पशुपालन, शिकार व सरंक्षण इ. कारणांमुळे एकत्र कुटुंब पद्धती आर्यांना आवश्यक वाटली असावी. या कुटुंबसंस्थेमध्ये कुटुंबातील जेष्ठ व्यक्ती कुटुंबप्रमुख होता ज्याला 'गृह्पती' किंवा ‘दंपती’ म्हटले जात. सर्व कुटुंब हे त्याच्या देखरेखेखाली आपले व्यवहार करीत. ऋग्वेदामध्ये पुत्रप्राप्तीसाठी अनेक मंत्रांची रचना केलेली दिसून येते. कारण सततच्या संघर्षमय परिस्थितीमुळे जास्तीत जास्त मुलग्यांची आवश्यक्यता या काळात पडली असावी. व त्यातून हा समाज पुरुषप्रधानतेकडे वाटचाल करता झाला असावा.

याकाळात सामाजिक व्यवस्था ही पितृसत्तामक असली तरी सामाजिक व धार्मिक कार्यात स्त्रियांना विशेष स्थान होते. ऋग्वेदिक काळात स्त्रियांना वेदाध्ययनाचा व शिक्षण घेण्याचा अधिकार होता. याकाळात आपाला, घोषा, मैत्रीयी, इंद्राणी इ. विद्वान स्त्रियांची माहिती आढळते. जनक राजाच्या सभेत ब्रह्मवादिनी स्त्रियांचे एक दल होते ज्याची गार्गी ही प्रमुख स्त्री होती. ऋग्वेदमधील अनेक सूक्तांची रचना ही स्त्रियांनीही केलेली दिसून येते.

**३) मिश्र अर्थव्यवस्था :**

आर्यांचा सुरवातीचा प्रमुख उद्योग हा लढाया हाच होता. या लढायांमध्ये मोठ्या प्रमाणावर ते पशुधनाची लूट मिळवीत. या काळात दोन्हीं समाज (आर्य व अनार्य) एकमेकांशी काळानुसार कधी संघर्षात्मक तर कधी सहकार्यात्मक जीवन जगत असल्याचे दिसून येतात. आर्य लोक अनार्यांच्या संपर्कातून शेतीव्यवसायाकडे आकर्षित झाले. हळू - हळू आर्य संस्कृती वाढल्याने शेतीला महत्वाचे स्थान मिळाले. ग्रामीण अर्थव्यवस्थेमुळे पशूपालनाला महत्व आले व ते पशुपालक बनले. वैदिक काळातील व्यापाराची माहिती ही वैदिक ग्रंथात आढळते. त्याकाळातील भूमार्गे व जलमार्गे होणाऱ्या व्यापाराची माहिती मिळते. परंतु हे व्यापारी मार्ग फारसे सुरक्षित नव्हते. अशी एक मिश्र अर्थव्यवस्था या काळात विकसित झाल्याची दिसून येते.

**४) विवाह :**

याकाळात विवाह हा एक पवित्र धार्मिक संस्कार समजला जाई. याकाळात मुलां-मुलींना आपले जीवनसाथी निवडण्याचा पूर्ण अधिकार होता. परंतु बहुतेक विवाह हे गृहपतीच्या संमतीने होत. समाजात एकपत्नित्व प्रथा असली तरी श्रीमंत व राजघराण्यात



munotes.in

बहुपत्नीत्वाची प्रथा होती. विवाहात ' कन्यादानाला ' विशेष महत्व होते. याकाळात पैशाचं, राक्षस, गांधर्व, ब्राह्म असे विवाहाचे वेगवेगळे प्रकार होते. आर्य - अनार्य यांच्यातील आपापसातील विवाहाची अनेक उदाहरणे दिसून येतात. यामधून उदयास आलेल्या पिढीस आर्यानी दास म्हणण्यास सुरवात केली.

**आपली प्रगती तपासा :**

१. प्रारंभिक पशुपालक मानवी जीवनाचा आढावा घ्या.

## २.७ स्थिर समाज

**१) शेतीचे महत्व :**

उत्तर वैदिक काळात आर्यांच्या प्रदेशात वाढ झाल्याने शेतीचे महत्व वाढले. या काळात लोकांची भटकंतीची अवस्था संपून ते स्थिर ग्रामीण वस्त्यांमध्ये राहू लागले. स्थिर जीवनामुळे त्यांचे भौतिक जीवन सुधारले. शेती हा याकाळातील लोकांचा प्रमुख व्यवसाय बनला. लोखंडाचा शोध आणि वापर हा येथील आर्थिक विकासासाठी महत्वाचा घटक ठरला. लोखंडाची हत्यारे बनवून घनदाट जंगल तोडून शेतीचा विस्तार करणे व तेथील काळी कसदार जमीन लोखंडाच्या नांगराने कसून ती जमीन शेतीयोग्य बनवली गेली. शतपथ ब्राह्मण ग्रंथामध्ये, चार, आठ, बारा व चोवीस बैलांनी ओढलेल्या नांगरांचा उल्लेख येतो. तर तैत्तरीय सहिंतेमध्ये कोणत्या वेळेस कोणती पिके घेतली जावी याची माहिती आढळते. पिकांच्या वाढीसाठी खतांचा उपयोग केला जाऊ लागला. गहू, तांदूळ, जव, तीळ, मूग, मसूर, वाटणे, कापूस, ऊस, विविध फळे व भाज्या यांची पिके घेतली जाऊ लागली.

**२) पशुपालनाचे महत्व :**

उत्तर वैदिक काळातील लोकांनी शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी पाळीव प्राण्यांचा वेगवेगळ्या माध्यमातून उपयोग केला. पाळीव प्राण्यांच्या मलमूत्राचा खत म्हणून वापर केल्याने शेतीतील उत्पादन वाढते याचा अनुभव त्यांना आला. सामाजिक व्यवस्थेमध्ये सुद्धा ज्यांच्याकडे जास्त गायी असतील तो जास्त श्रीमंत समजण्याची प्रथा या काळात रूढ झाली. गायींसाठी अनेक युद्ध झाल्याची माहिती तत्कालीन ग्रंथामधून आढळते. शेतीचा विस्तार झाल्याने शेती विस्तारासाठी बैलांचे महत्व वाढले. शतपथ ग्रंथामध्ये सुरवातीला आतिथ्याना गोमांस खाऊ घालण्याच्या प्रथेचा उल्लेख आढळतो. परंतु पुढील काळात गायींचा शेतीच्या अर्थव्यवस्थेशी संबंध आल्याने गायींची हत्या ही निषेध मानण्यात आली. व तिला दैवी संकल्पनेशी जोडले गेले.

विदेहाचा राजा जनक याने राज्यातील विद्वानांचा सत्कार करण्यासाठी एक हजार गायी भेट देण्याचा उल्लेख आहे. या काळातील ग्रंथामध्ये पाळीव प्राण्यांमध्ये शेळ्या, मेंढ्या, कुत्रे यांचा देखील उल्लेख आढळतो. याकाळात घोड्यांचा व हत्तींचा वापर देखील वाढला होता.

**३) व्यवसाय :**

उत्तर वैदिक काळात लोकांचे जीवन स्थिर झाल्याने शेती व पशुपालन या व्यवसायांशी निगडित व्यवसायांची संख्या देखील वाढत होती. यजुर्वेदामध्ये अयोगु (धातुकाम करणारा), रथकार, तक्षा (सुतार), कुलाल (कुंभार), कर्मार (लोहार), माणिकर (जवाहिऱ्या), इशुकार, रज्जुसर्प (दोरखंड विकणारा), कुत्रांच्या साहाय्याने शिकार करणारा (श्वनी), क्षत्ता (सारथी), सुवर्णकार, कोळी, सोनार इ. व्यावसायिकांचे उल्लेख येतात. सुरवातीला हे व्यवसाय आवडीनुसार व कौशल्यानुसार स्वैच्छिक होते, परंतु नंतर ते जन्मधीष्टीत करून अनेक जातींमध्ये विभाजित झाले.

याकाळातील व्यापार हा वाणिक लोकांच्या हातात होता. वाजसनेयी ब्राह्मण ग्रंथात, समुद्र व शंभर वल्ह्यांची नावांचा उल्लेख आहे. स्थलमार्गावरील व्यापार हा बैलगाड्यांच्या मार्फत होत होता. रोमिला थापर यांच्या मते, " जेव्हा गंगेच्या मैदानी भागामध्ये नद्यांच्या किनाऱ्यानी वस्त्यांचा विस्तार पूर्वेकडे होऊ लागला, तेव्हा नद्या नैसर्गिक मुख्य मार्ग बनल्या व त्यामधूनच सुरवातीच्या व्यापाराची सुरवात झाली." (थापर रोमिला, पूर्वकालीन भारत, पृ. क्र. २०५ )

**४) जातिव्यवस्थेची सुरवात :**

उत्तर वैदिक काळात लोकांचे जीवन जस - जसे स्थिर झाले तशी वर्ण व्यवस्था ही दृढ बनत गेली. या काळात वर्णव्यवस्थेमधून जाती व्यवस्थेने मूळ धरून हळू - हळू तिचा विकास होऊ लागला. याकाळात कर्तृत्व म्हणजे कर्माचे महत्व कमी होऊन जन्माला महत्व आले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णामधून अनेक जाती निर्माण झाल्या. वर्णव्यवस्थेमध्ये पहिल्या तीन वर्णांत परस्पर रोटी - बेटी व्यवहार चालत असे.पण शूद्रांच्या स्थितीमध्ये कुठलाही बदल झाला नाही. शूद्र वर्णांत अस्पृश्यता सारखी भयंकर विद्वेशी प्रथेची सुरवात याच काळात झालेली दिसून येते. या चार प्रमुख वर्णांव्यतिरिक्त लोहार, चर्मकार, सुवर्णकार, रंगारी असे व्यावसायीक पोटभेदही तत्कालीन समाजात पडलेले होते.

**५) विविध संस्कार :**

उत्तर वैदिक काळामध्ये लोकांचे जीवन स्थिर झाल्यामुळे समाजामध्ये अनेक बदल झाले. याकाळात मानवी जीवन उन्नत बनवण्यासाठी विविध विधी व संस्कार पद्धतीचा विकास झालेला दिसून येतो. मनुष्याच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध संस्कार पद्धती याकाळात सुरु झाल्या. गर्भधारणेपासून ते श्राद्ध पर्यंत एकूण १६ संस्कार महत्वाचे मानले गेले. ज्यामध्ये विवाह या संस्काराला विशेष महत्व प्राप्त झाले. विवाहाचे एकूण आठ प्रकार होते, ज्यामध्ये ब्रह्मविवाह, दैवविवाह, प्रजापत्यविवाह, आर्ष विवाह, गांधर्व विवाह, राक्षस विवाह, पैशाचं विवाह, आसुरविवाह इ. होते. यामधील पहिले चार विवाहाला समाजाची मान्यता होती तर बाकीचे चार निषिद्ध होते. समाज व व्यक्ती यांचा अविरोध विकास व्हावा या हेतून चार पुरुषार्थची मांडणी करण्यात आली. जात धर्म, अर्थ, काम व मोक्ष ही मानवी जीवनाची कर्तव्ये मानली गेली.

मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती आहे असे मानून, मानवी आयुष्याचे चार भाग करून आश्रम व्यवस्था विकसित केली गेली. या आश्रम व्यवस्थेमध्ये ब्रह्मचर्य आश्रम, गृहस्थ आश्रम, वानप्रस्थ आश्रम व संन्यासी आश्रम हे चार आश्रम होते, ज्यामध्ये त्या - त्या आश्रमामध्ये कोणते कर्म करावे हे सांगितले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

४. उत्तर वैदिक या कालखण्डातील अर्थव्यवस्थेचा आढावा घ्या.

## २.८ लोखंडाचा वापर व स्थिर शेतीचा वापर

वैदिक काळातील आर्यांचे टोळीसमूह, भटकंती व पशुपालक जीवन उत्तर वैदिक काळात बदलू लागले. उत्तर वैदिक काळात झालेल्या य बदलासाठी अनेक कारणे होती. या काळात आर्य-अनार्य संघर्ष कमी होऊन समन्वयात्मक जीवन पद्धती सुरु झाल्याचे दिसते. अनार्यांच्या संपर्कातून आर्य लोक शेतीकडे आकर्षित झालेले दिसून येतात. हे परिवर्तन फक्त अनार्यांच्या संपर्कातून न होता या काळात लोखंडाचा लागलेला शोध व वापर हे देखील महत्वाचे करण होते. अनार्यांची शेती करण्याची पद्धत स्थलांतरित स्वरूपाची होती, या मध्ये जंगलांना आग लावून ती जमीन शेतीयोग्य बनविणे व कालांतराने याच पद्धतीचा वापर करून दुसऱ्या ठिकाणी शेतीयोग्य जमीन बनविणे या पद्धतीचा प्रयोग केला जात असे. या प्रयोगाद्वारे गंगा- यमुनेच्या नद्यांच्या दरम्यान आलेल्या मोठ्या बुंद्याच्या घनदाट जंगलात शेतीचा विस्तार करणे अशक्य होते. परंतु या काळात लागलेल्या लोखंडाच्या शोधामुळे जमिनीचे क्षेत्र वाढविणे शक्य झाले. गंगा - यमुनेच्या नद्यांच्या दोवाबात जंगलांना सर्वप्रथम आग लावून नंतर लोखंडाचं कुऱ्हाडीचा साहाय्याने घनदाट जंगल तोडणे व लोखंडाच्या नांगराचा फाळ बनवून त्या काळातील काळी कसदार जमीन नांगरणे सहज शक्य झाले. या लोखंडाच्या वापरामुळेच मानवी जीवनात स्थैर्यीकरणाला सुरवात झाली.

उत्तर वैदिक काळात जमिनीचे क्षेत्र वाढू लागल्याने बहुसंख्य लोक हे शेती करू लागले. व शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे मानवी जीवन हे स्थिर व सुखकर होऊ लागले. या काळात जमिनीचे महत्व वाढू लागल्याने जमिनीच्या क्षेत्रवाढीसाठी युद्धे होऊ लागली. या संदर्भात महाभारतातील दुर्योधनाने जमिनीच्या मुद्या वरून घेतलेली कठोर भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. तो पांडवांना जमिनीचा तुकडा देण्यास तयार न झाल्याने संपूर्ण आर्यव्रतातील राजे महाभारत युद्धात ओढली गेली. पुढील काळात आर्य व अनार्यांच्या राज्यांचा विस्तार हा सप्तसिंधू प्रदेशातून गंगा - यमुना नद्यांच्या दोआबात व

नंतर बंगाल पर्यंत झालेला दिसून येतो, या साम्राज्य विस्तारामध्ये लोहक्रांतीची भूमिका ही महत्वाची ठरते. उत्खननांमधून हस्तिनापूर, आलमगीरपूर, नोह, अंतरंजीखेडा, बटेसर इ. ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोखंडाच्या वस्तू सापडल्या आहे. या लोखंडाच्या वस्तूंमध्ये शेती - औजारांपेक्षा युद्धासाठी व शिकारीसाठी लागणाऱ्या शस्त्रांची संख्या जास्त आहे. या संदर्भात रामशरण शर्मा लिहतात, " लोखंडाचा उपयोग सुरवातीला शस्त्रांच्या निर्मितीसाठी केलेला दिसतो व नंतर तो शेती व इतर आर्थिक हालचालींसाठी झाला असावा " (कदम सतेश, प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, पृ. क्र. १०२) परंतु साहित्यिक व पुरातत्वीय साधनांच्या आधारे असे आढळते की, लोखंडाच्या धातुक्रांतीने शेतिविस्तार, राज्यविस्तार व इतर हालचालीने विकास एकाच काळात कमी - अधिक प्रमाणात वेगवेगळ्या राज्यात झालेला दिसतो.

उत्तर वैदिक काळातील मानवी जीवन हे कृषिप्रधान अर्थव्यवस्थेकडे मोठया प्रमाणावर झुकलेले दिसते. या काळातील शतपथ ब्राह्मण ग्रंथामधून चार ते चोवीस बैलांद्वारे ओढल्या जाणाऱ्या नांगराचा उल्लेख आढळतो. तसेच पीक लावणी, कापणी, मळणी इ. शेती व्यवसायांसाठी संबंधित कामांचे उल्लेख शतपथ ग्रंथात आहेत. त्यामुळे या काळातील लोक वस्ती करून जीवन जगू लागले व कालांतराने प्रत्येक कार्याची विभागणी वर्ण व्यवस्थेमध्ये होऊन टोळी समूह जीवनाचा ह्रास झाला. लोहक्रांतीमुळे शेतीतून अतिरिक्त उत्पन्न मिळू लागले व त्यातून स्थिर ग्रामीण जीवनाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. शेतीच्या स्थेर्यीकरनातं लोखंडाच्या उपयोगाचा आढावा घ्या.

## २.९ सारांश

ऋग्वेदकालीन लोकांचे सामाजिक जीवन अर्धभटक्या व पशुपालक अवस्थेतील होते. याकाळात लोकांचे जीवन निर्वाहाचे मुख्य साधन पशुपालन हेच होते. अर्धवट भटक्या जीवनामुळे व सततच्या युद्धामुळे त्यांना स्थैर्य असलेले राज्य निर्माण करता आले नाही. अशा परिस्थिती येथे छोटी छोटी जनपद वाढीस लागली. ऋग्वेदिक काळ ते उत्तर वैदिक काळ या संक्रमन काळात आर्यांच्या सामाजिक जीवनात अनेक बदल घडून आले. वर्णव्यवस्थेचा उदय व विकास आणि त्याचा परिणाम म्हणजे भारतीय समाजात जाती प्रथेचा झालेला उदय ही या काळातील सामाजिक जीवनाची मुख्य वैशिष्ट्ये होती.

उत्तर वैदिक काळात आर्यांचा झालेला साम्राज्यविस्तार, शेतीवर आधारित अर्थव्यवस्था, लोखंडाचा वापर, व्यापारातील वाढ इ. कारणांमुळे त्यांच्या जीवनात स्थिरता आली. त्यामुळे अनेक नवीन जन ( राज्य ) ही उदयास आली व पुढील काळात मोठमोठ्या राज्यांच्या उदयामुळे प्रादेशिक भावना बळावून जनकुल ऐवजी जनपदाची निर्माती झाली.

## २.१० स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१) जन ते वर्ण या संक्रमण प्रक्रियेतील भारतीय समाजाच्या विकासाचा आढावा घ्या.

२) जन ते वर्ण या संक्रमण प्रक्रियेतील भारतातातील राजकीय परिस्थितीचा आढावा घ्या.

३) वर्णव्यवस्थेच्या विकासाचा आढावा घ्या.

४) पशुपालक ते स्थिर समाज या प्रक्रियेतील भारतीय समाजाच्या विकासाचा आढावा घ्या.

५) स्थिर समाज जीवनाच्या विकासात लोखंडाच्या वापराचे महत्व स्पष्ट करा.

## २.११ संदर्भ - ग्रंथ


❖ डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती ( प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत ), विद्या बुक प्रकाशन , औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

❖ थापर रोमिला, पूर्वकालीन भारत, ( प्रारंभ से १३०० ई. ताक ), हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

❖ कदम सतेश, डॉ. सोनावणे गौतम, - प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी, प्रथम आवृत्ती, २०१७.

❖ प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत - प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, चौथा संस्करण, २०१७

❖ शर्मा रामशरण, प्रारंभिक भारत का परिचय, ओरियंट ब्लॅकस्वान, नई दिल्ली.

❖ गायधनी र. ना. प्राचीन भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिकेशन हाऊस, पुणे. दुसरी आवृत्ती, २००६

❖ Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.


❖❖❖❖

# ३

# जात व अस्पृश्यतेचा उगम आणि विकास

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ जातिप्रथा
३.३ जातिव्यवस्थेचा उदय व व्याख्या
३.४ जातिव्यवस्थेच्या उदयाची कारणे
३.५ अस्पृश्यतेचा उगम व विकास
३.६ अस्पृश्यता
३.७ अस्पृश्य समाजावरील बंधने
३.८ सारांश
३.९ स्वाध्यावर आधारित प्रश्न
३.१० संदर्भ - ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

- भारतातील जातिप्रथेच्या उत्पत्तीचा अभ्यास करणे.
- जातिव्यस्थेच्या विकासाचा आढावा घेणे.
- अस्पृश्यतेचा उगम व विकास यांचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रस्तावना

आर्य संस्कृतीपासून भारतात वर्ण व जातीवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवथा निर्माण झाली होती. हजारो वर्षांपासून ही जातीव्यवस्था भारतीय सामाजिक व्यवस्थेचा अविभाज्य अंग बनून राहिली आहे. वर्ण व जाती प्रथेचा मुख्य उद्देश भारतातल्या सामाजिक व्यवस्था व संघटनांना स्थायित्व प्रदान करणे हा होता. ज्या मुळे समाजाची आर्थिक प्रगती घडून येईल. प्राचीन भारतीय सामाजिक व्यवस्थेमध्ये जातीव्यवस्था ही कधी व कशी उदयास आली? याबद्दल विविध इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडली आहे. सर्वसाधारणपणे भारतात आर्यांच्या आगमनानंतर आर्यांनी निर्माण केलेल्या वर्णव्यवस्थेमधून जाती व्यवस्थेची निर्माती झाली असावी असे मानले जाते. परंतु

munotes.in

वर्णव्यवस्थेच्या अगोदरपासूनच भारतात वेगवेगळ्या जातींचे समूह येथे कार्यरत असावे असे दिसून येते.

## ३.२ जातिप्रथा

जातीव्यवस्था हा भारतीय समाजाचा मुख्य पाया मनाला जातो. 'जात' या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून इंग्रजी मध्ये कास्ट (Cast) हा शब्द वापरला जातो. परंतु कास्ट (Cast) हा शब्द लॅटिन भाषेतील कॅस्टा (Casta) या शब्दापासून बनलेला आहे. Casta या शब्दाचा अर्थ 'प्रजाती' किंवा 'जन्मभेद' असा होतो. म्हणून जात ही जन्मव्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली व्यवस्था होय असे म्हणता येईल. भारतात जाती व्यवस्थेची सुरवात ही वर्णव्यवस्थेच्या आधाराने झाली, तरी वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था या दोन परस्पर भिन्न व स्वतंत्र व्यवस्था होत्या. जाती हा शब्द संस्कृतमधील जन या शब्दापासून बनलेला आहे ज्याचा अर्थ ' जन्म घेणे ' असा होतो. तर वर्ण हा शब्द रंगाशी जोडला गेला आहे. वर्ण हा शब्द संस्कृत मधील ' वृ ' या शब्दापासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ निवड करणे असा होतो. ऋग्वेदिक काळात वर्ण या शब्दाचा प्रयोग आर्य व अनार्य यांच्यातील अंतर स्पष्ट करण्यासाठी वापरला गेला, परंतु उत्तर वैदिक काळात त्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्ण बनले. नंतरच्या काळात या वर्णव्यवस्थेमधूनच जाती व्यवस्था ही उदयास आली. मनूने, चार वर्ण व ५७ जातींचा उल्लेख केला आहे. (प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत, प्राचीन भारत का सामाजिक एवं आर्थिक इतिहास, पृ. क्र. ३०) समाजशास्त्रज्ञ डॉ. केतकरांनी देखील चार वर्ण व ३००० जातींचा उल्लेख केला आहे. (जोशी पी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. १९५) भारतात जातिव्यवस्थेच्या निर्मितीसाठी वर्णव्यवस्था, वर्णसंकर, परकीय आक्रमणे व विविध व्यवसाय कारणीभूत ठरले.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'जाती' या शब्दाच्या विकासाचा आढावा घ्या.

## ३.३ जातिव्यवस्थेचा उदय व व्याख्या

जातीव्यवस्था हा भारतीय सामाजिक व्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे. भारतात उत्तर वैदिक काळापासून जाती व उपजाती प्रकट झाल्याच्या दिसून येतात. जातीची उत्पत्ती ही क्रियेवरून ( कामावरून ) ठरवता येते. जाती म्हणजे सतत होणाऱ्या विभाजनाची क्रिया होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, " जातीव्यवस्था ही नुसतीच

श्रमविभागणी नव्हे तर श्रमिकांची विभागणी होय."  जातिव्यवस्थेच्या उदयासंबंधी विविध इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडली आहे ती पुढीलप्रमाणे :

**१) जॅन नेसफिल्ड :**

"भारतात जाती व्यवस्थेच्या उदयाचे मुख्य कारण विविध व्यवसाय हे वंशगत बनणे हे होय. "

**२) इमील सेनार्ट :**

" भारतातील जातिव्यवस्थेचा उदय हा विविध व्यवसायाच्या आधारे झाला आहे. "

**३) चार्ल्स कुले :**

" जेंव्हा वर्ग अनुवंशकतेच्या तत्वावर आधारलेला असतो, तेव्हा आपण त्याला जात म्हणू शकतो."

**४) मॅक आयव्हर व पेज :**

" जेंव्हा व्यक्तीचा दर्जा पूर्णपणे निर्धारित असतो आणि दैवाने मिळालेल्या या दर्जात कोणतेही बदल करण्याची कोणतीही अशा नसते. तेव्हा वर्गाने धारण केलेल्या पराकोटीच्या ताठर समूहाला जाती म्हणतात. "

**५) हर्बट रिस्ले :**

" जात म्हणजे कुटुंबाचा समूह होय. "

**६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

" बहिर्गत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे म्हणजे जातीची निर्मिती होय. जात ही एक बंद झालेला वर्ग होय. "

**७) डॉ. एस. व्ही. केतकर :**

" जात हा एक सामाजिक समूह असून त्याची दोन वैशिष्ट्ये आहे, एक- ज्यांचे पूर्वज ज्या गटाचे सदस्य होते त्यांना त्याच जातीचे सदस्य  प्राप्त होते. दोन-सदस्यांना समूहाच्या बाहेर विवाह करण्यास परवानगी नसते. "

**८) इरावर्ती कर्वे :**

" जात म्हणजे एक विस्तारित कुटुंब होय. "

**आपली प्रगती तपासा :**

१. जाती व्यवस्थेच्या विविध व्याख्या सांगा.

## ३.४ जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीची कारणे

भारतात जातिप्रथेच्या विकासाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, अनेक घटक व विविध प्रकारची परिस्थिती कारणीभूत असल्याचे दिसून येते. ती कारणे पुढील प्रमाणे :

**वैदिक काळातील सामाजिक रचना :**

वैदिक काळात भारतात वर्ण व्यवस्थेचा उदय झाला. या वर्णव्यवस्थेमध्ये चार वर्ण होते. या वर्णव्यवस्थेमध्ये प्रत्येक वर्णाचे काम हे निश्चित केले गेले. ब्राह्मण या वर्णाला अध्ययन व अध्यापनाचे तसेच यज्ञ करण्याचे अधिकार प्राप्त झाले. क्षत्रिय हा वर्ण राज्याचे रक्षक म्हणजेच राजा झाला. वैश्य वर्ण हा व्यापार व व्यवसाय करू लागला तर शूद्र वर्ण वरील तिन्ही वर्णाची सेवा करत होता. पूर्व वैदिक काळात एक वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक व्यवस्था म्हणून आर्यांनी तिचा स्वीकार केला. पूर्व वैदिक काळात वर्ण बदलण्याचे अधिकार हे तत्कालीन सामाजिक व्यवस्थेमध्ये होते. एकाच कुटुंबात वेदनिर्माता, वैश्य व सेवक राहत असल्याचा उल्लेख आहे. ब्राह्मण परशुराम हा क्षत्रिय होता. वशिष्ठ-वैश्यापुत्र, पराशर-चांडालपुत्र, व्यास-धीवर पुत्र व क्षत्रिय शंतनू देवापी हा ब्राह्मण होता. (जोशी पी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. १९६) प्रांरभीक ही वर्णव्यवस्था ही उच्चप्रतीच्या गुण कर्मावर आधारित होती व श्रमविभाजांचे तत्व त्यांनी स्वीकार केले होते. परंतु उत्तर वैदिक काळात तिचे रूपांतर दोषात्मक जातिव्यस्थेमध्ये झाले.

उत्तर वैदिक काळात उच्च – कनिष्ठतेची वृत्ती वाढली परिणामी वर्णसंकर सुरु झाला. अनुलोप - प्रतिलोप विवाहांमुळे अनेक संकर जातींचा उदय या काळात झाला. पुढील काळात या चार वर्णांच्या परस्परद्वेषांमुळे त्यांच्यामध्येच अनेक जाती निर्माण झाल्या.

**२) विविध व्यावसायिकांचा उदय :**

प्रारंभिक वर्णव्यवस्थेनुसार व्यवसाय करण्याचा अधिकार फक्त वैश्य वर्णालाच होता. परंतु पुढील काळात भारतात विविध उदयोगांचा विकास झाला. यामध्ये सुतार, लोहार, कुंभार, चर्मकार, सोनार, माळी, विणकर, शिकारी, गोवंडी, इ. व्यावसायिकांची भर पडली. पुढे या व्यावसायींकामध्ये आठरा पगड जाती निर्माण झाल्या. या सर्वांचा समावेश शूद्र वर्णात करण्यात आला. या व्यावसायिक जातींची संख्या मोठी होती व वंश व्यवसायावरून आणि जन्मावरुन त्यांची जात ही निश्चित होऊ लागली.

**३) नवीन धर्म व पंथाचा झालेला उदय :**

इ. स. पूर्व सहाव्या शतकात भारतात अनेक नवीन विचार धारणेचा आणि तदनुषंतिक नव्या धर्मांचा उदय झाला ज्यामध्ये बौद्ध, जैन व आजीवक संप्रदाय प्रमुख होते. पुढील काळात या धर्मांमध्ये सौर, शाक्त, शैव, वैष्णव, हीनयान, महायान, दिगंबर, श्वेतांबर, इ. उपपंथाचा उदय झाला आणि त्या धर्माच्या भिक्षु, उपासक, श्रमण, श्रावक, शैव, वैष्णव, शाक्त, हिंदू अनुयायांना विविध वर्ग व जातींचा दर्जा प्राप्त झाला. तत्कालीन समाजात धार्मिक जातींचा हा दुसरा मोठा वर्ग होता.

munotes.in

**४) परकीय आक्रमण :**

इ. स. पूर्व चौथ्या शतकापासून भारतावर इराणी, ग्रीक, शक, कुशाण, हूण व नंतरच्या काळात मुस्लिम आक्रमणे झाली. बहुसंख्य परकीय आक्रमणकारी हे भारतात स्थायिक झाले. त्यांनी भारतीय चालीरीती व भारतीय संस्कृतीचा स्वीकार करून येथील समाजव्यवस्थेशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला. परकीय आक्रमणांचा परिणाम म्हणून त्यांनी भारतीयांशी रोटी - बेटी व्यवहार सुरु झाला व त्यामधून अनेक आंतरदेशीय संकर जाती जन्माला आल्या.

**५) मिश्र विवाह व वर्णसंकर :**

वैदिक काळात आर्यांनी अनार्यांचा पराभव करून त्यांना तत्कालीन समाजात समाविष्ट करून त्यांना शूद्र असे संबोधले. पुढील काळात त्यांच्यामध्ये मिश्र विवाह होऊ लागले. आर्य व्यक्तीचा शूद्र कन्येशी झालेला विवाह (अनुलोप विवाह) याला समाजात मान्यता होती, अशा विवाहामधून जन्माला आलेल्यास 'द्विज ' असे म्हटले जात. तर शूद्र पुरुषाचा आर्य कन्येशी झालेल्या विवाहामधून (प्रतिलोम विवाह) जन्माला आलेल्यास ' चांडाळ ' असे म्हटले गेले. परकीय आक्रमणे, आर्यसंस्कृतीचा विस्तार व वर्णव्यवस्थेच्या कठोर निर्बंधामुळे वर्णसंकर व मिश्रविवाहाचे प्रमाण वाढले. यामधून वास्त्य. मागध, पराशर, सूत, सारथी, अम्बष्ट्य, उग्र, करण, गोलक, कुंड, कानीन व साहोड अशा संकर जातीचा उदय झाला. पुढील काळात या संकर जातींमध्ये असंख्य पोटजाती निर्माण झाल्या. या सर्वांचा समावेश हा शूद्र वर्णात करण्यात आला.

**६) प्रशासनात झालेला बदल :**

मौर्यकाळापासून भारतात सुसंघटित प्रशासनव्यवस्थेची निर्मिती झाल्यामुळे मंत्री, सचिव, अध्यक्ष, कारकून, शासनाधिकारी व कर्मचारी इ. वर्ग समाजात निर्माण झाले. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये ब्राह्मण, श्रमण, कृषक, गोपाल, भट (क्षत्रिय योद्धे), वैदेहक (कारागीर), प्रतिवेदक (हेर), मंत्री व आमात्य ह्या वर्गांची माहिती दिली आहे. अशोकाच्या काळात असंख्य शासकीय अधिकारपदाची निर्मिती झाली होती, त्याच्या काही शिलालेखांमध्ये ब्राह्मण, भटमाय, ईभ्या व दासभटक या चार वर्गांचा उल्लेख आढळतो.

मौर्य, गुप्त व गुप्तोत्तर काळात प्रशासनात अनेक प्रकारचे मंत्री, अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते. नंतरच्या काळात यापैकी अनेक पदे ही वंशपरंपरागत बनल्यानंतर त्यांचे स्वतंत्र वर्ग व जाती निर्माण झाल्या. पुरोहित, मंत्री, सचिव, आमात्य, भोज, महाभोज, राठीक, कायस्थ ह्या प्रकारचे अनेक वर्ग समाजात निर्माण झाले.

**७) आर्यांचा संस्कृती विस्तार :**

आर्यांनी आपला संस्कृती व राज्यविस्तार करतांना अनेक प्रकारच्या अनार्य, द्रविड, आदिवासी व विविध प्रादेशिक समूहांना आपल्या समाजव्यवस्थेमध्ये समाहून घेण्याचा प्रयत्न केला. कालांतराने त्यामधून राठीक, महारट्ठ (आर्य जाती), भिल्ल, पुलिंद, निषाद, पुंड, आंध्र चेर, अभीर, दस्यु, पणी (अनार्य), यवन, म्लेंछ (परकीय) इ. जातींचा उदय झाला.

munotes.in

**८) शूद्र वर्णातील सामाजिक बदल :**

मौर्य कालखंडानंतर वर्णसंकर व व्यवसायांमुळे शूद्र जातींची संख्या वाढून त्यांच्यामध्ये शूद्र व अतिशूद्र असे उच्च - कनिष्ठ दोन प्रकार पडले. त्यापैकी अतिशुद्रांना 'अंत्यज' किंवा 'चांडाळ ' म्हटले गेले. ह्यांना अस्पृश्य जाती मानल्या गेल्याने त्यांच्या वस्त्या नगराबाहेर ठेवण्यात आल्या. शिकारी, खाटीक, कोळी, पारधी, चांभार, डोम व तस्कर ह्या अतिशूद्र जातींमध्ये मोडल्या जात. याचकाळात भारतात दास प्रथेचा विकास झाल्याने समाजात त्यांच्या देखील अनेक जाती निर्माण झाल्या, ज्यामध्ये ध्वजाहत, क्रितीदास, स्व - विक्रियीदास, अहिंतिक व इतर अनेक कारणांनी समाजात दासांची संख्या ही वाढत गेली.

**९) विशिष्ट प्रादेशिक जाती :**

विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या प्रादेशिक जातींच्या संख्या देखील या काळात वाढत होती. यापैकी काही जातींचे नाव हे त्या विशिष्ट प्रदेशामुळें पडले. उदा. मागध वैदेहक इ. ब्राह्मणांमधील कन्नोजिया या जातीची उत्पत्ती कन्नोज या प्रदेशातून, मैथिल मिथिला मधून, श्रीमाली ची श्रीमल, सारस्वत ची सरस्वती नदी, वैश्य वर्णामध्ये अग्रवाल अग्रोहा या प्रदेशमधून तर खंडेलवाल खंडेला, बघरेवाल बाशोरा, ओसवाल ओसीया या प्रदेशावरून ह्या जाती निर्माण झाल्या.

**१०) विविध पोटजाती :**

चार वर्ण, परकीय, शूद्र, अस्पृश्य, दास व दार्शनिक या वर्गांमध्ये पुढील काळात अनेक पोटजाती निर्माण झाल्या. वर्णसंकर, मिश्रविवाह व विवाहबाह्य संबंधामुळे असंख्य उपजाती निर्माण होत गेल्या. ब्राह्मण वर्णांमध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी, वाजपेयी, त्रिपाठी, चतुर्वेदी, पुरोहित जाती निर्माण झाल्या. क्षत्रिय वर्णांमध्ये सोमवंशी, सूर्यवंशी, रघुवंशी, परमार, गुहिलोत, सोळंकी, सेन, वर्मन जाती निर्माण झाल्या.वैश्य वर्णांमध्ये श्रेष्टीन, सार्थवाह, वैश्य, पणी जाती निर्माण झाल्या. तर शूद्र वर्णांमध्ये सुतार, लोहार, कुंभार, सोनार, चर्मकार, विणकर, तेली, शेतकरी, मजूर, अनुचर या पोटजाती निर्माण झाल्या.

अशाप्रकारे भारतात विविध भौतिक कारणांनी जातिप्रथेचा उदय विकास झालेला दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. जाती व्यवस्थेच्या उदयाची कारणे सांगा.

## ३.५ अस्पृश्यतेचा उगम व विकास :

प्राचीन भारतातील सामाजिक व्यवस्थेमध्ये अस्पृश्यतेचा झालेला उदय हा तत्कालीन जाती व्यवस्था व वर्णव्यवस्थेशी संबंधित होता. आर्यानी अनार्यांचा पराभव करून त्यांना तत्कालीन सामाजिक व्यवस्थेमध्ये खालचे स्थान देऊन त्यास ' शूद्र ' असे संबोधले. पुढील काळात विविध व्यावसायिक जाती, संकर जाती, व परकीय जातींची भर पडत गेली. गुप्तकाळापर्यंत शूद्र वर्णात असंख्य पोटजाती निर्माण झाल्या. त्यापैकी काही व्यवसायांना खालच्या दर्जाचा व्यवसाय मानून त्यांना गलीच्छ व्यवसाय करणाऱ्या मूढ, संस्कारहीन ठरविले तर शूद्रांना 'अंत्यज ' किंवा ' चांडाळ ' ठरवून त्यांना अस्पृश्य गट मानून त्यांच्यावर अनेक बंधने लादण्यात आली. चांडाळ समजण्यात आलेला हा अस्पृश्य समाज गाव व नगराबाहेरील स्मशानामध्ये आपले जीवन जगू लागले व स्मशानाशी संबधित कार्य करू लागले. या अस्पृश्य किंवा चांडाळ समाजाचे वर्णन भारतीय साहित्या बरोबर चिनी प्रवाशी फाहियान व युआंग - शवांग यांच्या देखील ग्रंथात आढळते. सुरवातीस चांडाळ या समाजास अस्पृश्य मानले गेले परंतु पुढील काळात ४२९ जातींना अस्पृश्य ठरवले गेले. (कदम सतेश / सोनावणे गौतम - प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, पृ. क्र. ९३)

पुढील काळात शूद्र वर्गातही उच्च व कनिष्ठ असे दोन प्रकार निर्माण झाले. कनिष्ठ चांडाळ व अंत्यज शूद्रांना अस्पृश्य ठरवण्यात आले. गावांच्या गावकुसाबाहेर राहणाऱ्या अशा अनेक जातींना अंत्य - अंत्यज म्हटले जाऊ लागले. अंत्य किंवा अंत्यज म्हणजे गावाच्या शेवटच्या टोकावर राहणार समाज होय. या वर्गात शिकारी, पारधी, खाटीक, कोळी, ढोर, चांभार, तस्कर इ. जातींचा समावेश होता. मौर्यत्त्तर काळात अनेक परकीयांनी भारतावर आक्रमण केले. त्यांना यवन, म्लेंच्छ अशी संज्ञा देऊन त्यांना अस्पृश्य ठरवले. अस्पृश्य जातीमध्ये अंत्यज, संकर व यवन ह्या तीन शूद्र वर्णाचा समावेश करण्यात आला. तसेच स्त्री रजोदर्शन, मृताचे सुतक, प्रसूतीकाळातील वृद्धी, व्यभिचारी स्त्री यांना देखील अस्पृश्य समजण्यात आले. धर्म व जातींमध्ये बहिष्कृत केलेल्या व्यक्तींनाही अस्पृश्याची वागणूक मिळत असे.

अस्पृश्यता ही फक्त जातीवरूनच ठरवली गेली नाही तर समाजात ज्यांनी दुष्कर्म केली किंवा ज्यांनी भयंकर पाप केले अशा व्यक्तींना समाजातून बहिष्कृत करून त्यांना जातींमधून बाहेर काढले जात व अस्पृश्य मानून तशी वागणून दिली जात. मनुस्मृतीच्या मते, (९.२३४-२३९) ब्राह्मणाची हत्या करणारा, ब्राह्मणांच्या सोन्याची चोरी करणारा, मद्यपान करणाऱ्या व्यक्तीला जाती मधून बाहेर केले जावे. अशा लोकांसोबत कोणीही जेवू नये, त्यांना स्पर्श करू नये, त्यांच्या सोबत कुठलेही विवाह संबंध ठेवू नये तसेच त्यांचे धार्मिक कार्य करू नये. अशा व्यक्तींना देखील अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असे.

थोडक्यात, महापातकी, दरोडेखोर, तस्कर, खुनी, संस्कारहीन, धर्मबाह्य, विभस्त हीन धर्माचरण करणाऱ्या वर्गांना अस्पृश्य मानण्यात आले.

**आपली प्रगती तपासा :**

१. अस्पृश्यतेच्या विकासाचा आढावा घ्या.

## ३.६ अस्पृश्यता

प्राचीन भारतात अस्पृश्यतेचा झालेला उदय हा प्रत्यक्ष्य किंवा अप्रत्यक्ष रित्या वर्णव्यवस्था व जातिप्रथेशी संबंधित होता. वैदिक काळात भारतात वर्णव्यवस्था निर्माण झाली व पुढील काळात या वर्णव्यवस्थेमधून अनेक जाती निर्माण झाल्या. प्राचीन भारतीय सामाजिक व्यवस्थेत शूद्र वर्णाला सर्व अधिकारांपासून वंचित ठेवून त्यांना सामाजिक व्यवस्थेत हीन दर्जाची वागणूक दिली. नंतरच्या काळात या शूद्र वर्णात विविध व्यावसायिक जाती, संकर जाती व परकीय जातींची भर पडत गेली. या जातींमध्ये गलीच्छ व्यवसाय करणारे, संस्कारहीन शूद्रांना अंत्यज किंवा चांडाळ ठरवून अस्पृश्य मानण्यात आले. व त्यांच्यावर अनेक बंधने लादण्यात आली. पुढील काळात शेती व्यवसाय करणारे वैश्य वर्णांचाही शूद्र वर्णात समावेश झाला. शूद्र वर्णातही सामाजिक भेद निर्माण होऊन त्यांच्यात देखील दोन वर्ण उच्च व कनिष्ठ वर्ण निर्माण झाले व कनिष्ठ चांडाळ व अंत्यज शूद्रांना अस्पृश्य ठरवण्यात आले. ह्या वर्णात शिकारी, पारधी, खाटीक, कोळी, ढोर, चांभार, तस्कर इ. जातींचा समावेश होता. पुढील काळात भारतीय सामाजिक व्यवस्थेत वर्ण - वंश शुद्धीकरणावर भर दिल्यामुळे काही वर्ण संकर जातींनाही शूद्र व अस्पृश्य ठरवण्यात आले. मौर्यकाळानंतर भारतात अनेक परकीय सत्तांचा भारतीय समाजात समावेश झाला. त्यांची संस्कृती भारतीय संस्कृतीपेक्षा भिन्न असल्यामुळे तत्कालीन सामाजिक व्यवस्थाकारानी त्यांना यवन - म्लेंछय अशी संज्ञा देऊन त्यांना देखील अस्पृश्य ठरवले. अस्पृश्य जातीत अंत्यज, संकर, यवन ह्या तीन वर्गांचा देखील समावेश झाला. स्त्री रजोदर्शन, मृतांचे सुतक, प्रसूती काळातील वृद्धी व त्यांच्याशी संबंधित सर्व व्यक्ती, व्यभिचारी स्त्री, धर्म व जातीने बहिष्कृत केलेले व्यक्ती यांचा अस्पृश्य वर्गात समावेश झाला.

थोडक्यात, धर्मबाह्य, संस्कारहीन, बिभीस्त, हीन धर्माचरण करणारा, दरोडेखोर, तस्कर, खुनी इ. वर्गाना अस्पृश्य मानले गेले.

**आपली प्रगती तपासा :**

१. अस्पृश्यता स्पष्ट करा.

## ३.७ अस्पृश्य समाजावरील बंधने

प्राचीन भारतीय समाजात अस्पृश्यतेसंबंधी जे नियम होते ते कोणत्याही एका विशिष्ट जातीच्या विरुद्ध नव्हते. धर्म शास्त्रकारकांनी अस्पृश्यता पाळण्यामागे शुद्धाशुद्धतेचा विचार केलेला होता. जे मोक्ष प्राप्त करण्यासाठी आवश्यक मानले गेले होते. मोक्ष प्राप्त करण्यासाठी शरीर व मन पवित्र व स्वच्छ असणे आवश्यक होते. (प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत, प्राचीन भारत का सामाजिक एवं आर्थिक इतिहास, पृ. क्र. ६८) इ.स.पू.दुसऱ्या शतकापासून अनेक स्मृती ग्रंथात याचे पुरावे मिळतात. भारतीय अस्पृश्यांवर पुढील बंधने धर्मशास्त्राने लादलेली होती.

१) अस्पृश्यांची वस्ती ही गावाबाहेर असावी व नगरात प्रवेश करत असतांना त्यांनी काठी आदळून सूचना द्यावी. उच्च वर्णीय व्यक्ती ह्या रस्त्याने जात असल्यास त्याला रस्ता द्यावा. (मनुस्मृती १०.३६ व ५१)

२) उच्च वर्गाची कनिष्ठ कामे करून अस्पृश्यांनी आपला उदरनिर्वाह करावा. त्यांनी संपत्ती बाळगू नये, धर्मविधी, संस्कार करू नये किंवा सार्वजनिक समारंभात सहभागी होऊ नये.

३) उच्च वर्णीय जातींनी अस्पृश्यांना स्पर्श करू नये व तसे केल्यास प्रायश्चित म्हणून स्नान करावे. (आपस्तंभ २.१.२.८-९)

४) अस्पृश्याकडील पाणी व अन्नाचा स्वीकर करू नये. तसेच अस्पृश्य स्त्रीशी संभोग करू नये. पण असे झाल्यास त्यांना शुद्धी व प्रायश्चिताची व्यवस्था ही धर्मग्रंथामध्ये होती. (प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत, प्राचीन भारत का सामाजिक एवं आर्थिक इतिहास, पृ. क्र. ७०)

५) अस्पृश्यांनी जर उच्च तिन्ही वर्णातील (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य) लोकांना स्पर्श केला तर त्यांना मारण्याचे किंवा दंडित करण्याचे अधिकार तिन्ही वर्णाला होते. (विष्णूधर्मसूत्र ५.१०४)

अशा प्रकारे अस्पृश्य वर्णासाठी काही बंधने घातली गेली होती. ही सर्व बंधने हीन प्रतीची होती. एका मनुष्य जातीला दिलेली ही पशुतुल्य वागणूक निंदनीयच होती.

**आपली प्रगती तपासा :**

१. प्राचीन भारतात अस्पृश्य समजावर असलेल्या बंधनाचा आढावा घ्या.

## ३.८ सारांश

प्राचीन भारतातील समाजव्यवस्था ही वर्ण, जाती, आश्रम यासारख्या उच्च गुणांवर आधारित असल्याने ती दोषमुक्त होती. सुरवातीस ही वर्णव्यवस्था गुणकर्मावर व श्रमविभाजनच्या उच्च तत्वावर आधारलेली होती. याकाळात वर्ण बदलण्याचे पूर्ण स्वतंत्र होते. परंतु पुढे त्यामध्ये अनेक दोष दिसू लागले. याच वर्णव्यस्थेमधून पुढील काळात जाती व्यवस्थेचा उदय व विकास झाला. याच वर्ण व जाती व्यवस्थेमधून शूद्र जातीचा व अस्पृश्यतेचा उदय झाला. प्रत्येक जातिवर्णाने बंधने कठोर केल्याने रोटी - बेटी व्यवहार बंद पडले. प्रत्यक्ष्य व अप्रत्यक्षरीत्या अस्पृश्यतेचा उदय हा वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेशी आहे. प्राचीन भारतीय समाजात अस्पृश्यांची संख्या जरी तुलनेने कमी असली तरी त्यांना देण्यात आलेली हीन दर्जाची वागणूक निश्चितच निंदनीय होती.

## ३.९ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१) प्राचीन भारतातील जाती व्यवस्थेच्या व्याख्या सांगून तीच्या उदयाची करणे सांगा.

२) प्राचीन भारतातील अस्पृश्यतेच्या विकासाचा आढावा घ्या.

३) प्राचीन भारतातील अस्पृश्यता स्पष्ट करा.

munotes.in

## ३.१० संदर्भ - ग्रंथ


- ❖ जोशी पी. जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१३
- ❖ मिश्र जयशंकर, प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, बिहार, हिंदी ग्रंथ आकदमी, पटना, २०१३
- ❖ कदम सतेश, डॉ. सोनावणे गौतम, - प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी, प्रथम आवृत्ती, २०१७
- ❖ प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत - प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, चौथा संस्करण, २०१७
- ❖ Thapar Romila, The Penguin history of Early India: From the origins to AD 1300, Penguin Publication, First Edition, 2003
- ❖ Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.


❖❖❖❖

munotes.in

# ४

# वर्णाश्रम - धर्मव्यवस्था

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ वर्णव्यवस्थेचा उदय

४.३ वर्णव्यवस्थेच्या उत्पत्ती संबंधित सिद्धांत

४.४ वर्णव्यवस्था

४.५ आश्रम व्यवस्था

४.६ आश्रम व्यवस्थेचा विकास

४.७ सारांश

४.८ स्वाध्यावर आधारित प्रश्न

४.९ संदर्भ - ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

- वर्ण व्यवस्थेचा आढावा घेणे.
- आश्रम व्यवस्थेचा अभ्यास करणे.
- वर्णाश्रम धर्मव्यवस्था अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना

प्राचीन भारतात सुसंघटित व सर्वोत्तम समाज जीवनाचा विकास झालेला दिसून येतो. आर्य संस्कृतीपासून अनेक सामाजिक संस्था या भारतात दृढमल झाल्या. या संस्थामध्ये कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, आश्रम व्यवस्था, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था या संस्था प्रभावशाली होत्या. प्राचीन भारतात धर्मसंस्था प्रभावी असल्याने धर्माशिवाय येथील सामाजिक जीवनाचा विचार करणे अशक्य आहे. प्राचीन भारतात वर्णाश्रम धर्म हे सामाजिक जीवनाचे महत्वाचे अंग होते. वर्ण व आश्रम हे दोन्हींही एक - दुसऱ्यांशी संबंधित होते. तसेच या दोन्ही संस्थांचा संबंध हा व्यक्ती व समाजाशी होता. आश्रमव्यवस्था ही व्यक्तीचे आचरण किंवा व्यावहारिक जीवनातील त्याचे वागणे तसेच वर्णव्यवस्था ही समाजाशी अर्थातच जिथे व्यक्ती राहत होता त्याच्याशी संबंधित होती. आश्रमव्यवस्थेमध्ये मानवी जीवनातील प्रत्येक टप्प्यावर मनुष्याला योग्य आचरणाचे प्रशिक्षण दिले जात, तर वर्ण व्यवस्थेमध्ये गुण व क्षमतेच्या आधारे समाजामधील त्याचे स्थान निर्धारित केले जात.

## ४.२ वर्ण व्यवस्थेचा उदय

आर्य संस्कृतीपासून भारतात वर्ण व जातीवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था निर्माण झाली व तिचा प्रभाव विसाव्या शतकापर्यंत कायम होता. वेद, ब्राह्मण्यके, आरण्यके, सूत्रे, स्मृती या धर्मशात्रीय ग्रंथामधून प्राचीन वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था व समाजरचनेची माहिती मिळते. 'वर्ण' शब्दाची उत्पत्ती ही संस्कृतमधील 'वरी' या शब्दापासून झाली आहे. ज्याचा शब्दकोशीय अर्थ 'निवड करणे' किंवा 'धारण करणे' असा होतो. प्राचीन भारतात 'वर्ण' या शब्दाचा अर्थ 'व्यवसायाची निवड करणे' या अर्थाने वापरला जातो. पूर्व वैदिक काळात फक्त दोन वर्णांचा उल्लेख आढळतो. एक आर्य वर्ण व दुसरा दास किंवा शूद्र वर्ण. असे मानले जाते की, आर्यांनी अनार्यांवर आक्रमण करून त्यांना पराभूत केले व त्यांना गुलाम बनविले. पुढील काळात त्यांचा सामाजिक व्यवस्थेमध्ये समावेश करून त्यांना दास किंवा शूद्र संबोधले. उत्तर वैदिक काळात हे सामाजिक विभाजन आणखी कठोर झाले व समाजात कार्य-कर्म व्यवस्थेच्या आधारे चार वर्णांचा उद्या व विकास झाला. हे चार वर्ण म्हणजेच १) ब्राह्मण २) क्षत्रिय ३) वैश्य ४) शूद्र हे होय. या चार वर्णांचा सर्वप्रथम उल्लेख हा ऋग्वेदमधल्या दहाव्या मंडलातील 'पुरुषसुक्त' या प्रकरणात आढळतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. वर्णव्यवस्था कशी विकसित झाली ते सांगा.

## ४.३ वर्णव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधीचे सिद्धांत

प्राचीन हिंदू ग्रंथामधून आपणास वर्णव्यवस्थेचे उत्पत्ती व विकासाची माहिती मिळते. वर्णव्यवस्थेचा विकास हा ऐतिहासिक घटनांशी संबंधित आहे, ही वर्ण व्यवस्था विविध कारणांनी भारतीय समाजाचा अविभाज्य घटक बनल्याचे दिसून येते. वर्णव्यवस्थेच्या उत्पत्ती संबधी अनेक सिद्धांत मांडले आहे ते पुढील प्रमाणे :

**१) दैवी सिद्धांत :**

वर्णव्यवस्थेच्या उत्पत्ती संबधी सर्वात प्राचीन सिद्धांत हा दैवी सिद्धांत आहे. ऋग्वेदमध्ये एका विराट पुरुषाच्या मुख व इतर शारीरिक अवयवांमधून वर्णव्यवस्थेच्या उत्पत्तीची कथा आढळते. ऋग्वेदमधील पुरुषसुक्त मध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्णाची उत्पत्ती ही एका विराट पुरुषाच्या मुख, बाहू (हात), उदर व पायापासून झाल्याची कथा आढळते. मानवी शरीरामध्ये ज्या पद्धतीने प्रत्येक अवयवाचे एक निश्चित स्थान आहे व प्रत्येक अवयवाचे एक निश्चित कार्य आहे. तीच भूमिका ही वर्णव्यवस्थेमध्ये मांडली आहे.

munotes.in

ज्या पद्धतीने मानवी शरीरातील अवयवांमध्ये तोंडाचे (मुखाचे) स्थान हे सर्वोच आहे व त्याचे कार्य बोलणे आहे, त्याचप्रमाणे सामाजिक व्यवस्थेमध्ये ब्राह्मणांना सर्वोच स्थान देऊन त्यांचे कार्य शिक्षण देणे व यज्ञ करणे मानले आहे. मुखानंतर मानवी शरीरात हाताचे स्थान आहे ज्याचे कार्य शक्ती दाखवणे व शरीराचे रक्षण करणे आहे तसेच कार्य हे क्षत्रियांचे असून समाजाचे व राज्याचे रक्षण करणे ही त्यांची जबाबदारी आहे. हातानंतर महत्वाचे स्थान हे उदराचे असते पण येथे पोट या प्रतीकात्मक अर्थाने हा शब्द वापरला आहे. पोटाचे मुख्य कार्य हे पचनक्रियेशी असून त्याद्वारे संपूर्ण शरीराला पोषित करणे हे त्याचे कर्तव्य आहे तीच भूमिका वैश्य वर्णाची असून कृषी, व्यापार व पशुपालानाद्वारे संपूर्ण समाजाच्या आर्थिक गती चालवण्याची जबाबदारी ही त्यांच्यावर आहे. पायाचे कार्य हे इतर शारीरिक अवयवांमध्ये वेगेळे आहे ते कुठलीही ईर्षा न करता अवरितपणे शरीराची सेवा करत असते. तसेच शूद्रांचे कार्य हे निश्चित केले गेले.

या दैवी सिद्धांताचा उल्लेख हा महाभारतामधील शांती पर्व व मनुस्मृती मध्ये आढळतो.

**२) गुण सिद्धांत :**

वर्णव्यवस्थेचे उत्पत्ती ही गुणात्मक सिद्धांताद्वारे देखील मांडली जाते. मनूने, तीन प्रकारच्या गुणांची चर्चा केली आहे जे समाजाला चार भागात विभागतात. ज्याला गुणधर्म म्हटले गेले. यामध्ये सत्व, रज व तम् हे गुणधर्म मानले गेले. सत्वगुण हा ब्राम्हण धर्म तर रज गुण हा क्षत्रिय व तमोगुण अर्थ अर्थात वैश्य आणि शुद्र संबंधित आहे. हा गुण सिद्धांत तत्कालीन सामाजिक व्यवस्थेमध्ये चार वर्णांच्या रूपाने आढळतो.

**३) रंगाचा सिद्धांत :**

ऋग्वेदमध्ये अनेक ठिकाणी वर्णव्यवस्थेचे उत्पत्ती ही रंगाच्या आधारे झाल्याचे दिसते. कारण आर्य व अनार्य हा शब्द ऋग्वेद मध्ये याच अर्थाने वापरला गेला आहे. वर्णव्यवस्था ही रंगाच्या आधारे झाली असा देखील सिद्धांत मांडला जातो. महाभारतामधील शांतिपर्व मध्ये प्रत्येक वर्णासाठी वेगवेगळे रंग सांगितले आहे. ब्राह्मणांचा रंग सफेद (श्वेत), क्षत्रियांचा लाल, वैश्यांचा पिवळा तर शूद्रांचा काळा. महाभारतामधील भागू व भारद्वाज यांच्यातील संवादामध्ये वर्णव्यवस्थेच्या उत्पत्ती संबधी प्रकाश टाकला आहे. सफेद रंग हा ब्राह्मणांचा होता जे ज्ञानी व साहसी होते. युद्ध करून ज्यांचे शरीर लाल झाले ते क्षत्रिय होते. ज्यांनी शेती, पशुपालन व व्यापार करून अर्थव्यवस्था पुढे नेली ते पिवळे झाले, जे वैश्य मानले गेले. ज्यांनी सर्व निंदनीय कार्यांचा स्वीकार केला ते काळ्या रंगाचे झाले. हे चारही रंग गुण तत्वांचे देखील प्रतीक बनले. जसे सफेद रंग सत्वगुण, लाल रंग रजोगुण, पिवळा रंग रज व तामोची मिश्रित अवस्था व काळा रंग तमोगुण.

**४) कर्माचा सिद्धांत :**

प्राचीन भारतीय समाजात प्रत्येक वर्णाचे कार्य हे निश्चित केले होते. प्रत्येक वर्णाचे कार्य हे वेगवेगळे होते. कोणत्याही व्यक्तीच्या वर्णाला त्याच्या कर्मावरून ओळखले जात. द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा इ. कौरवच्या सैन्यात सेनापती होते. जन्माने हे सर्व ब्राह्मण असून सुद्धा कर्मानी हे क्षत्रिय म्हणून ओळखले गेले. मुद्गुल क्षत्रिय होते परंतु पुढील काळात मुद्गुल परिवार ब्राह्मण झाले. यावरून स्पष्ट होते की, सुरुवातीला वर्णाचा आधार कर्म होता.

**५) जन्माचा सिद्धांत :**

सुरवातीच्या काळात व्यक्तीचे वर्ण निश्चित करताना त्या व्यक्तीचे शील, त्याचे कार्य व त्याची प्रतिभा यावर वर्ण हा निश्चित होत असे, परंतु पुढील काळात वर्णाचा आधार जन्म झाला. त्या काळात वर्णव्यवस्थेसंबधी असे विधान केले गेले की, उच्च वर्णामध्ये जन्म घेतलेला व्यक्ती हा अज्ञानी जरी असला तरी तो श्रेष्ठ आहे. आपस्तंभ धर्मसूत्रनुसार, ' ब्राम्हण वर्णात जन्म घेतलेला व्यक्ती अयोग्य जरी असला तरी तो श्रेष्ठ व पुज्यनीय आहे. ' यावरून असे दिसते की , वर्ण व्यवस्थेचा मुख्य आधार हा जन्म होता.

उदा. द्रोणाचार्य यांचे कर्म हे क्षत्रियांचे होते. परंतु जन्माने ते ब्राह्मण असल्याने ते ब्राह्मण म्हणूनच ओळखले गेले. शुंग, कणव, सातवाहन व वाकाटक घराण्याचे संस्थपाक हे ब्राह्मण होते. परंतु क्षत्रियांचे काम करून सुद्धा ते ब्राह्मण म्हणूनच ओळखले गेले. सुरुवातीला सामाजिक स्थानात कर्म, कार्य, कर्तुत्व महत्वाचे होते. पुढे त्याने कोणाच्या पोटी जन्म घेतला हे महत्वाचे मानले जाऊ लागले. अशा प्रकारे वर्णव्यवस्थेच्या उत्पत्ती संबधी विविध मते मांडली जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१. वर्णव्यवस्थेच्या उत्पत्तीचे विविध सिद्धांत सांगा.

## ४.४ वर्णव्यवस्था

**१) ब्राह्मण:**

उत्तर वैदिक काळातील धर्मसूत्रामध्ये व स्मृतिग्रंथामध्ये चार वर्णांचे अधिकार व कर्तव्यांचे वर्णन आढळते. या वर्णव्यवस्थेमध्ये ब्राह्मण या पदाला श्रेष्ठ व पुज्यनीय स्थान होते. ब्राह्मणांची प्रमुख सहा कर्तव्य होती. ज्यात अध्ययन - अध्यापन करणे, यजन व याजन ( यजन म्हणजे स्वतः यज्ञ व धार्मिक विधी करणे, याजन म्हणजे इतर यजमानांचे पौरोहित्य स्वीकारून त्यांच्याकडून धार्मिक विधी करून घेणे), दान घेणे व दान देणे. त्या काळात ज्ञानी, त्यागी, सदाचरणी, पवित्र, चिंतनशील, नम्र, संयमी व बुद्धिमान असणारा हा ब्राह्मण समजला जाई. विविध विषयांचे ज्ञान मिळवणे, वेद व इतर ग्रंथांची रचना करणे, गुरुकुलमध्ये शिक्षण घेणे, मंत्र अभ्यास करणे ही जबाबदारी ब्राह्मण पदावरच होती. अनेक राज्यकर्त्यांचे पुरोहित ब्राह्मनच असल्याने राजकीय क्षेत्रात देखील त्यांचा दबदबा होता. उदा. वशिष्ठ, विश्वामित्र, जनक, याज्ञवल्क, चाणक्य, हेमाद्री व बिज्जल इ. याज्ञवल्क स्मृतीच्या आधारे, " वेद व धर्माच्या रक्षणासाठी देव व पितरांच्या संतोषासाठी परमेश्वराने ब्राह्मण निर्माण केले. " (जोशी पी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. १९०)

munotes.in

ब्राह्मणांचा सर्व वेळ हा अध्ययन, अध्यापन, यजन व याजन यामध्ये व्यथित होत असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाची सर्वस्व जबाबदारी समाजावर होती. त्यामुळे त्यांना गुरुदक्षिणा व दान घेण्याचा अधिकार होता. त्यास कायदेशीर व नैतिक अधिष्ठान होते. ब्राह्मणांना भूदेव मानण्यात आले. राजा व समाजाने ब्राह्मणांचा सन्मान राखावा असे अपेक्षित होते. सुरवातीस ब्राह्मणांना कनिष्ठ प्रतीचे व्यवसाय करण्याची मुभा नव्हती. परंतु कालांतराने त्यांना क्षत्रियांचा व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली. म्हणून पुढील काळात भारतीय इतिहासात अनेक ब्राह्मण राजघराणी अस्तित्वात आल्या. (सातवाहन, कदंब, पल्लव, राष्ट्रकूट) क्षत्रियांप्रमाणेच वैश्य वर्णांचा व्यवसाय अर्थात शेती व व्यापार करण्याची देखील मान्यता ब्राह्मणांना देण्यात आली.

थोडक्यात, आर्य वर्णव्यवस्थेत ब्राह्मण वर्गाला सर्वोच स्थान होते. व त्यांचा नैतिक दर्जा ही श्रेष्ठ प्रतीचा होता. परंतु पुढील काळात ब्राह्मण कर्तव्यच्युत व भ्रष्टाचारी बनले. क्षत्रिय राजवटी आल्याने त्यांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातही महत्व कमी झाले. फक्त धार्मिक जीवनात त्यांचे महत्व कायम राहिले.

**२) क्षत्रिय :**

वर्णव्यवस्थेमध्ये क्षत्रियांना दुसऱ्या क्रमांकाचा दर्जा होता. क्षेत्र म्हणजे रणांगण व रणभूमी आणि संकटे व युद्धापासून प्रजा, धर्म व राष्ट्राचे रक्षण करणारा क्षत्रिय अशी त्यांची व्याख्या होती. देश व समाजच्या रक्षणाची जबाबदारी क्षत्रियांवर होती. ऋग्वेदाच्या पुरुषसुक्त या मध्ये क्षत्रियांसाठी ' राजन्य ' हा शब्द वापरला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये क्षत्रियांचे प्रमुख कर्तव्य हे अध्ययन करणे, यज्ञ करणे, शस्त्र ग्रहण करणे व जमिनीचे रक्षण करणे हे सांगितले आहे. समाजचे नियमन व संरक्षण करणे हे क्षत्रियांचे प्रमुख कर्तव्य होते. अनेक राज्यकर्ते, सम्राट, मंत्री, प्रशासक व सैनिकांचा समावेश हा क्षत्रिय वर्गात केला जात होता. तत्कालीन सामाजिक व्यवस्थेमध्ये ब्राह्मण व क्षत्रिय वर्ण हा प्रभावी असल्याने बऱ्याचदा त्यांच्यात द्वेष, मत्सर, असूया व संघर्षाचे वातावरण असे.

प्राचीन भारतातील सामाजिक व्यवस्थेमध्ये क्षत्रिय वर्ण हा चार वर्गात विभागलेला दिसून येतो.

प्रथम वर्ग - हा क्षत्रिय वर्ग सूर्य व चंद्रवंशीय घराण्याशी संबंधित होता. जो आपल्या शौर्यांनी राजसत्तेवर विराजमान होता.

द्वितीय वर्ग - या वर्गात अनेक क्षत्रिय होते जे फक्त सैनिकी कार्य करत. परंतु राजसत्तेमध्ये त्यांचा कुठलाही अधिकार नव्हता.

तृतीय वर्ग - असा वर्ग जो शासनकर्ता व सैनिक नव्हता. आपल्या उदरनिर्वाहासाठी हा वर्ग व्यापार करत.

चतुर्थ वर्ग - या वर्गातील क्षत्रियांची सामाजिक स्थिती ही शूद्र वर्गासारखी होती.

munotes.in

**३) वैश्य :**

वर्णव्यवस्थेमध्ये ' वैश्य ' वर्णांचे तिसरे स्थान होते. पुरुषसुक्त मध्ये ' विश ' शब्दाचा उल्लेख आढळतो. ज्याचा अर्थ समूह असा होतो. पुढे विश या शब्दापासूनच वैश्य या वर्णाची निर्माती झाल्याचे विद्वान मानतात. हा वर्ण कृषी, पशुपालन, व्यापार व विविध व्यवसाय करून स्वतःच्या उदर्निर्वाहाबरोबरच, समाज व राष्ट्राच्या आर्थिक समृद्धीची जबाबदारी या वर्गावर होती. देशाची अर्थव्यवस्था सांभाळणारा हा महत्वाचा घटक होता. इतर दोन वर्णाप्रमाणेच वैश्य वर्णाला देखील उपनयन संस्कार, अध्ययन, अध्यापन, यजन, याजन व सर्व धार्मिक विधी करण्याचा अधिकार होता. मौर्य - गुप्तकाळात व्यापार - उद्योगांची भरभराट झाल्यामुळे समाजात ह्या वर्गाची प्रतिष्ठा वाढली. परवर्तित साहित्यामध्ये वैश्य वर्णासाठी श्रेष्टी, सार्थवाहक, वाणिक, वाणिज्यक, अर्थपती अशा शब्दांचा उल्लेख आढळतो. या वर्गाने सामाजिक जीवनात असंख्य लेण्या, देवालये, विहार, तलाव व शिक्षण संस्थांची निर्माती केली.

तत्कालीन सामाजिक जीवनामध्ये वैश्य वर्ण देखील चार वर्गांमध्ये विभागलेला दिसून येतो.

१) प्रथम वर्ग - या वर्गात श्रीमंत व्यापारी जे मोठ्या शहरांमध्ये व्यापार व निवास करीत अश्या लोकांचा समावेश होता. अशा सर्व व्यापाऱ्यांना समाजात उच्च स्थान होते.

२) द्वितीय वर्ग - असा वर्ग जो शेती व पशूपालनाचे कार्य करीत.

३) तृतीय वर्ग - असे शेतकरी जे वेतनाद्वारे दुसऱ्यांच्या शेतात, शेतकरी किंवा कामगार या अर्थाने काम करीत.

४) चतुर्थ वर्ग - हा वर्ग शास्त्रामध्ये निषिद्ध असलेल्या वस्तूंचा व्यापार करीत. या वस्तूंमध्ये सुरा, मांस, लाख, रस व तीळ इ. पदार्थ होते.

**४) शूद्र :**

वर्णव्यवस्थेमधील सर्वात शेवटचा वर्ण हा ' शूद्र ' वर्ण होता. भारतामध्ये शूद्र वर्णाची निर्माती कशी झाली यामध्ये इतिहासरांमध्ये एकमत नाही. आर्यांनी कृष्णवर्णीय अनार्यांना म्हणजे रंगाने काळे-सावळे असणाऱ्या एतदेशीयांना पराभूत करून त्यांना आपले दास बनवले. पुढे ह्याच दासांना चातुर्वर्ण्यव्यवस्थेमध्ये सामावून घेतल्यानंतर त्यांना ' शूद्र ' असे संबोधण्यात आले. डॉ. आर. एस . शर्मा यांच्या मते, " शूद्र वर्णामध्ये आर्य व अनार्य या दोन्ही वर्णांचा समावेश होता. आर्थिक व सामाजिक विषमतेमुळे दोन्ही वर्गामध्ये श्रमिक वर्गाचा उदय झाला. जो नंतरच्या काळात शूद्र वर्णामध्ये गणला जाऊ लागला. " ( शर्मा आर. एस. , शूद्रो का प्राचीन इतिहास, पृ. क्र. २१- २३ )

शूद्र वर्णांचे मुख्य कर्तव्य हे तिन्ही वर्णाची सेवा करणे हे होते. मनुस्मृतीच्या मते, "' शूद्रांचा एकमेव धर्म हा अन्य तीन वर्णांची सेवा करणे हा सांगितला आहे . " ( मनुस्मृती १.९१ ) या वर्गाला विवाह, शिक्षण, संस्कार, मालमत्ता असे कुठलेही अधिकार नव्हते. पुढील काळात या शुद्रांपासून चांडाळ व अस्पृश्य वर्गाची निर्मिती झाली आणि त्यांची स्थिती दिवंसेदिवस खालावत गेली.

**आपली प्रगती तपासा :**

१. प्राचीन भारतातील चार वर्णांची माहिती द्या.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ४.५ आश्रम व्यवस्था

प्राचीन भारतीय सामाजिक व्यवस्थेचे आश्रम व्यवस्था व वर्णव्यवस्था हे दोन मुख्य आधार होते. कुटुंबसंस्था व वर्णव्यवस्थेमुळे समाजाला स्थैर्य प्राप्त झाले तर आश्रम व्यवस्थेमुळे शिस्तबद्ध मानवी जीवनाची निर्मिती झाली. वर्णव्यस्था व आश्रमव्यवस्थेमध्ये व्यक्ती हा आपले सर्व कर्तव्य हे पूर्ण करून मोक्ष प्राप्त करत असे. आश्रम व्यवस्थेमध्ये जन्मापासून ते मृत्यूपर्यंत व्यक्तीने कोणत्या पद्धतीचे जीवन जगावे याचा आदर्श घलून दिलेला आहे. मनुष्य हा जीवन जगात असतांना त्याला काही ना काही उद्दिष्टे ही पूर्ण करायची असतात. (अन्न, वस्त्र, निवारा, कीर्ती, ज्ञान, संपत्ती) उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी तो नेहमीच धडपडत असतो. मात्र निसर्गनियमानुसार त्याला कोणतेही कर्म कोणत्याही काळात करता येत नाही. उदा. तारुण्यातील कृत्ये ही वृद्धपकाळात करणे श्यक्य नसते. त्यामुळेच प्राचीन आर्यांनी धर्म, अर्थ आणि मोक्ष हा मनुष्याची मूलभूत उद्दिष्ट्ये मानून ती पूर्ण करण्यासाठी आश्रमव्यवस्था अंमलात आणली.

## ४.६ आश्रम व्यवस्थेचा विकास

प्राचीन भारतात आर्यांनी मानवी जीवनातील ध्येयपूर्ती व शिस्तबद्ध जीवनाची आदर्श पद्धती ही आश्रम व्यवस्थेमध्ये सांगितली आहे. आश्रम हा शब्द संस्कृत भाषेतील 'श्रम' या शब्दापासून बनला आहे. श्रमूतपसि ज्याचा अर्थ प्रयत्न करणे किंवा परिश्रम करणे असा होतो. प्रत्येक आश्रम हा मानवी जीवनातील एक अवस्था आहे. ज्यामध्ये मनुष्य हा प्रशिक्षण घेऊन पुढील अवस्थेसाठी तो तयार होतो. डॉ. प्रभू यांच्या मते, 'आश्रम व्यवस्था ही एक प्रकारे मानवी जीवनात कर्म प्राप्त करण्यासाठी जे प्रमुख टप्पे आहे किंवा विश्राम स्थळ आहे. जेथे प्रत्येक व्यक्ती हा काही काळासाठी थांबतो (विश्राम करतो) व तिथे एक निश्चित कार्य केल्यानंतर तो पुढे जातो." (Prabhu P.N., Hindu Social Organizations, pg. 83 )

munotes.in

जाबालो उपनिषदामध्ये सर्वप्रथम आपणास चार आश्रमांची माहिती मिळते ती पुढील प्रमाणे :

**१) ब्रह्मचर्य आश्रम :**

ब्रह्मचर्य आश्रम हा मानवी जीवनाचा पाय घालणारा एक महत्वाचा आश्रम होता. 'ब्रह्मचर्य' हा शब्द 'ब्रह्म' म्हणजे 'महान' व 'चार्य' म्हणजे 'पालन करणे' किंवा विचरण करणे असा होतो. म्हणजेच ब्रह्मचर्याचा अर्थ' महान अश्या मार्गाने चालणे. जिथे मनुष्य हा शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक दृष्टिकोनातून महान बनेल. 'गृहसूत्राच्या मते, उपनयन संस्कारानंतर वेदविद्याच्या अभ्यासासाठी गुरुगृही आश्रमात पाठवत. १२ ते १५ वर्ष हा ब्रह्मचर्य आश्रमाचा कालखंड होता. शूद्रांना गुरुकुल मध्ये जाण्याची परवानगी नव्हती. या आश्रम व्यवस्थेमध्ये विदयार्थ्यांना कठोर शिस्तीचे व नियमांचे पालन करावे लागे. साधी राहणी व उच्च विचारसरणी हा त्यांचा दर्जा होता. वेदांचा अभ्यास हा ब्रह्मचर्य आश्रमाचा मुख्य गाभा होता. या आश्रमामध्ये वेद अध्ययना बरोबर विविध विषयांचे शिक्षण देखील दिले जात. सामान्यपणे चार वेद, सहा शास्त्रे, सहा वेदांगे, साहित्य, भाषा, व्याकरण, दंडनीती, अर्थशास्त्र, धनुर्विद्या, इतिहास, पुराणे, ज्योतिष, वैद्यक, खगोल. गणित, नीतिशास्त्र इ. अध्यापनाचा समावेश होता. अध्ययन पूर्ण झाल्यानंतर किंवा गुरुचे समाधान झाल्यानंतर सामावर्तन समारंभाने ब्रह्मचर्य आश्रमाची सांगता होत असे.

**२) गृहस्थाश्रम :**

चार आश्रमामध्ये गृहस्थ आश्रमाला सर्वश्रेष्ठ आश्रम मानले आहे. २५ ते ५० वर्ष हा गृहस्थ आश्रमाचा कालखंड होता. अनुरूप कन्येशी विवाह झाल्यानंतर व्यक्तीच्या वैवाहिक जीवनाला व गृहस्थाश्रमाला प्रारंभ होत असे. " जसे सर्व जीव वायूच्या आधारावर राहतात. त्याचप्रमाणे सर्व आश्रम हे गृहस्थाआश्रमच्या आधारावर राहतात. किंवा ज्याप्रमाणे सर्व नद्या समुद्राला जाऊन मिळतात. त्याचप्रमाणे सर्व आश्रमांचे लोक गृहस्थाकडे आश्रमासाठी जाऊन राहतात." या शब्दात मनूने गृहस्थाश्रमचे महत्व सांगितले आहे. (जोशी पी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. २५२)

या आश्रमामध्ये राहून व्यक्तीने सन्मार्गाने संपत्ती मिळवून तिचा योग्य उपयोग करणे, अध्ययन, अध्यापन व पंचमहायज्ञ धर्मकृत्यांचे शास्त्रोक्त पालन करणे, कुटुंबाचे पालन - पोषण करणे, अथितीचा आदर, सत्कार व दानधर्म करणे, स्त्री - सौख्याचा उपभोग करून वारसा व राष्ट्रस्वरक्षणासाठी (सैनिक) पुत्रोउत्पत्ती करणे. ही गृहस्थाआश्रमची प्रमुख कर्तव्य होती. सामाजिक व्यवस्थाकारांनी गृहस्थाश्रमामध्ये राहून मानवी कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक्य मानले होते. या कर्तव्यामध्ये पंच ऋणे यांना विशेष महत्व होते. ते पंच ऋणे पुढील प्रमाणे :

१) देव ऋण : यज्ञ अनुष्ठान करणे.
२) पितृ ऋण : पुत्र प्राप्ती करणे.
३) ऋषी ऋण : अध्ययन किंवा ज्ञान मिळवणे.
४) मनुष्य ऋण : पाहुण्यांची सेवा करणे.
५) भूत ऋण : इतर प्राण्यांची सेवा व रक्षण करणे.

**३) वानप्रस्थाश्रम :**

प्रपंचामधून हळूहळू अलिप्त होऊन आध्यात्मिक जीवनाकडे वळण्याची अवस्था म्हणजेच 'वानप्रस्थाश्रम' होय. मानवी जीवनातील ५० - ७५ हा या आश्रमाचा कालावधी होता. आयुष्याच्या या टप्प्यात मनुष्य हा तारुण्याकडून वृद्ध अवस्थेकडे झुकलेला असतो. व शारीरिक क्षमता ही या वयात कमी झालेली असते. त्यादृष्टीने प्रपंचाची जबाबदारी मुलांवर सोपवून संपत्ती व वासनेचा त्याग करून ईश्वर चिंतनात वेळ घालवण्याचा हा कालावधी होता. (जोशी पी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. २५८)

मनूच्या मते, "जो संसाराचा त्याग करून वनात राहतो, ज्याच्या शरीरावर सुरकुत्या पडतात, केस पांढरे होतात, ज्याने नातवंड पाहिलेली आहे, असा वृध्दावस्थेकडे झुकलेला मनुष्य वानप्रस्थी समजावा. "(मनुस्मृती ६.१-३२) वानप्रस्थ आश्रमामध्ये कठोर नियम व कर्तव्य सांगितली आहे. मनुस्मृतीच्या मते, " वानप्रस्थ आश्रमामध्ये मनुष्याने साधे जीवन जगावे. कंदमुळे, फळे व शाकाहारी भोजन घ्यावे. मांसाहार निषेध होता. शय्येसाठी दर्भ व कातड्याची साधने वापरावीत व जमिनीवर झोपावे. वेदांचा अभ्यास करावा." (मनुस्मृती ६.१-३२) वानप्रस्थाश्रम हा सयंमी व त्यागमय जीवनाचा आश्रम होता.

**४) संन्यास आश्रम -**

सर्वात शेवटचा आश्रम म्हणजे संन्यास आश्रम होय. वेद, धर्मशास्त्रे, महाकाव्ये व पुराणांमध्ये संन्यास आश्रमाचे महत्व सांगितले आहे. ७५ वर्षापर्यन्त वानप्रस्थ आश्रमामध्ये राहिल्यानंतर व्यक्ती हा संन्यासी आश्रमामध्ये प्रवेश करत असे. या दोन्ही आश्रमामध्ये खूप साधर्म्य असल्याने अनेक विद्वान हे दोन्ही आश्रम एकच मानतात. संन्याशाला यती, मुनी किंवा परिव्रजक देखील म्हणतात. तपाचरण, वैराग्यवृत्ती, आत्मसंयम, ईश्वर चिंतन, ब्रह्मज्ञान व मोक्षप्राप्ती ही सन्यास आश्रमाची उद्दिष्टे होती. संन्यास आश्रम हा धर्म व मोक्षप्राप्तीचा प्रभावी मार्ग होता. संन्यास आश्रमात व्यक्ती हा भौतिक जगापासून पूर्ण मुक्त असतो.

**संन्याश्यांचे काही प्रकार होते ज्यामध्ये**

१) कुटिचक्र : स्वतःच्या घराशेजारी झोपडी बांधून राहणारे.

२) बहुदक : कमंडलू, दंड, भिक्षापात्र व भगवी वस्त्रे धारण करणारे.

३) हंस - दंडभिक्षापात्र बाळगणारे व गावाबाहेर नदीतीरी, गुहेत किंवा वृक्षाखाली राहणारे.

४) विदेहावस्थी / ब्रह्मज्ञानी - परमहंस - वृक्ष, स्मशान किंवा ओसाड घरात नग्नपणे राहणारे.

५) तुरियातीत - जिवनमुक्त विदेहावस्थेत अन्न - वस्त्रांचे भान नसलेले व प्रेताप्रमाणे पडून राहणारे.

६) अवधूत - सर्वधर्माचार व वर्णबंधनाच्या पलीकडे गेलेले.

संन्याशाने माता, पिता, पत्नी, पुत्र, नातेवाईक व संपत्तीचा त्याग करून एकटे गावाबाहेर वास्तव्य करावे. पावसाळ्यात चार महिने तीर्थक्षेत्री, धर्मशाळेत किंवा गंगातीरी राहावे. ध्यान, धारणा, चिंतन व तापचरणाने मन शुद्धी, मन शांती राखावी. ही संन्याश्यांची प्रमुख कर्तव्य होती. संन्यासी आश्रमामध्ये वनप्रस्थ श्रमाप्रमाणेच संयमी, त्यागी व मुक्त जीवनाचा स्तुतिपाठ निर्माण केला.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१. प्राचीन भारतातील चार आश्रमांची माहिती द्या.

## ४.७ सारांश

प्राचीन भारतातील समाजव्यवस्था ही वर्ण, जाती, आश्रम यासारख्या उच्च गुणांवर आधारित असल्याने ती दोषमुक्त होती. सुरवातीस ही वर्णव्यवस्था गुणकर्मावर व श्रमविभाजनाच्या उच्च तत्वावर आधारलेली होती. याकाळात वर्ण बदलण्याचे पूर्ण स्वतंत्र होते. परंतु पुढे त्यामध्ये अनेक दोष दिसू लागले. याच वर्णव्यस्थेमधून पुढील काळात जाती व्यवस्थेचा उदय व विकास झाला. याच वर्ण व जाती व्यवस्थेमधून शूद्र जातीचा व अस्पृश्यतेचा उदय झाला. प्रत्येक जातिवर्णाने बंधने कठोर केल्याने रोटी - बेटी व्यवहार बंद पडले.

धर्मसूत्रकारांनी आदर्श आश्रम व्यवस्था निर्माण केली होती. सुरवातीच्या काळात ही व्यवस्था जरी उत्तम ठरली गेली असली तरी तिचे पालन करणे कठीण झाल्याने ही आदर्श आश्रम व्यवस्था मोडकळीस आली व पुढील काळात ती फक्त तत्वातच शिल्लक राहिली.

## ४.८ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१) प्राचीन भारतातील वर्णाश्रम - धर्मव्यवस्था स्पष्ट करा.
२) प्राचीन भारतातील वर्णव्यवस्थेचा आढावा घ्या.
३) प्राचीन भारतातील आश्रम व्यवस्था स्पष्ट करा.

## ४.९ संदर्भ - ग्रंथ


❖ जोशी पी. जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१३

❖ मिश्र जयशंकर, प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, बिहार हिंदी ग्रंथ आकदमी, पटना, २०१३

❖ कदम सतेश, डॉ. सोनावणे गौतम, - प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी, प्रथम आवृत्ती, २०१७

❖ प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत - प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, चौथा संस्करण, २०१७

❖ Thapar Romila, The Penguin history of Early India: From the origins to AD 1300, Penguin Publication, First Edition, 2003

❖ Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.

❖❖❖❖

munotes.in

# ५

# प्राचीन भारतातील राज्यसंस्थेचा उदय

**घटक रचना**


५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ प्राचीन राज्यसंस्था

५.३ प्राचीन भारतीय राज्यसंस्था

५.४ राज्य उत्पत्ती विषयक सिद्धांत

५.५ राज्यसंस्थेचा विकासक्रम

५.६ हडप्पा आणि सिंधू संस्कृतीतील राज्यसंस्था

५.७ ऋग्वेदिक कालखंडातील राज्याचे स्वरूप

५.८ उत्तर वैदिक कालखंडातील राज्यसंस्था

५.९ महाजानापदाच्या कालखंडातील राज्य

५.१० मौर्य कालखंडातील राज्य

५.११ सारांश

५.१२ स्वध्यायावर आधारित प्रश्न

५.१३ संदर्भ ग्रंथ


## ५.० उद्दिष्टे

- प्राचीन राज्यसंस्थेशी परिचित होणे.
- प्राचीन भारतीय राज्यसंस्थेच्या उदयाची माहिती करून घेणे.
- हडप्पा आणि सिंधू संस्कृतीतील राज्यसंस्थाची रचना समजून घेणे.
- ऋग्वेदिक कालखंडातील राज्याचे स्वरूप समजून घेणे.
- उत्तर वैदिक कालखंडातील राज्यसंस्था समजून घेणे.
- महाजनपदाच्या कालखंडातील राज्यसंस्था समजून घेणे.
- मौर्य कालखंडातील राज्यसंस्था समजून घेणे.

munotes.in

## ५.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून राज्य या शब्दाने भूप्रदेश, जनता आणि शासन यांचा उल्लेख केला जातो. म्हणजेच राज्यसंस्थेच्या उत्पत्तीमध्ये लोक, त्याचे संघटन, त्यांचे नियम, भूप्रदेश, त्याची सीमा या बाबी महत्वाच्या आहेत. शिवाय सार्वभौमत्वाचे अधिकार नसलेल्या भूप्रदेशातील मानवसमूहालादेखील राज्य म्हणण्याची प्रथा होती. वैध म्हणजे मान्य सत्तेचे वर्णन करण्यासाठी तसेच राजकीय तत्त्वज्ञानातील आदर्श समाजरचनेला अनुलक्षून राज्य हा शब्द वापरला जात असे. प्राचीन जगातील वा भारतातील राज्यसंस्था ह्या संकल्पनेच्या अर्थाविषयी, रचनेविषयी, स्वरूपाविषयी आणि कार्यक्षेत्र यांच्याविषयी मतभिन्नता आढळते. पण अलीकडच्या काळामध्ये राज्य ह्या संकल्पनेविषयी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण चिंतन झालेले आहे. प्राचीन धर्मसंस्थेपेक्षा राज्यसंस्था जुनी असल्याचे सिद्ध झाले आहे. प्राचीन राजकीय तत्त्वज्ज्ञाच्या चिंतनात आणि लेखनात राज्य म्हणजे काय, राज्याची आवश्यकता, आदर्श राज्याचे स्वरूप यांविषयी त्यांनी केलेला विचार आढळतो. अभ्यासाच्या आणि संकल्पना-व्यूहाच्या सोयीसाठी राज्यसंस्था हा महत्त्वाचा घटक मानून आकादामिक क्षेत्रात राजकीय प्रक्रियांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर राज्याचे कार्यक्षेत्र, राज्याच्या सत्तेचे उगमस्थान आणि तिची व्याप्ती समजून घेणे महत्वाचे आहे. व्यक्ती आणि राज्य यांचे संबंध, राज्यसंस्थेचे भवितव्य इ. मुद्दे राजकीय तत्त्वचर्चेच्या दृष्टीने अद्यापही महत्त्वपूर्ण आहेत.

राज्य वा राज्यासंस्थेच्या बाबत असे म्हणता येईल की, 'विशिष्ट भूप्रदेशावर कमी-अधिक संख्येत कायम वस्ती करून राहणारा, कोणत्याही परकीय सत्तेच्या नियंत्रणापासून संपूर्णपणे किंवा बहुतांश मुक्त असणारा, राहात असलेल्या भूप्रदेशातील शासनाच्या आज्ञा स्वाभाविकपणे पाळणारा मानव-समूह म्हणजे राज्य होय, प्राचीन काळापासून सर्व प्रजा आनंदित करतो; सर्व प्रजांना रंजवितो; तो 'राजा' या शब्दाने राजाचे वर्णन केलेले आढळते. भारतात 'रताश्च प्रजास्सर्वास्तेन राजेति शब्द्यते' अशी राजा (राजन्) या शब्दाची व्याख्या अनेकांनी केली आहे. 'राज्ञ: इदम्' राज्यम-राजाच्या अधिसत्तेखाली असणारा प्रदेश राज्य मानला जाई.

राज्य म्हणजे विशिष्ट अशा भौगोलिक प्रदेशातील राजकीय दृष्ट्या सुसंघटित समाज होय. एखाद्या राजाचे वा त्याच्या शासनसंस्थेचे एखाद्या भूप्रदेशावर बव्हंशी निर्विवाद वर्चस्व असणे, हे जसे राज्याचे वैशिष्ट्य होय. तसेच त्या प्रदेशातील लोकांमध्ये तेथील शासनाचे नियम पाळण्याची पद्धत असावी, त्याकरिता सर्व व्यक्ती आणि सामाजिक गट यांचे नियमन करण्यासाठी शासनाला पुरेशी दंडशक्ती असावी, तिचे आधिपत्य जनतेवर असावे, हा विचार राज्यसंस्था ह्या संकल्पनेमागे अभिप्रेत आहे. विशिष्ट भूप्रदेशातील जनतेवर तेथील शासनाचे असलेले नियंत्रण ही वस्तुस्थिती हे राजा आणि राज्यसंस्थेच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. शिवाय समाज आणि शासन यांच्या परस्पर संबंधांविषयीची मांडणी हा राजा व राज्यसंस्था ह्या शास्त्रीय संकल्पनेचा गाभा आहे.

प्राचीन भारतात राजा, राज्य, भूप्रदेश उत्क्रांत होत गेल्याचे दिसते. सिंधू संस्कृती, वैदिक संस्कृती आणि त्या नंतरचे मौर्य राज्य यात आपणाला राजा, राज्य, भूप्रदेश याच्या जडणघडणीविषयी जाणून घेणे अधिक उद्बोधक आहे. त्यांनी राष्ट्र, राज्य, राजा, समिती, विदथ, गण, सभा यासारखे शब्द आपणाला प्राचीन राज्याच्या उत्क्रांतीविषयी माहिती देतात.

## ५.२ प्राचीन राज्यसंस्था

राष्ट्र म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अस्तित्व असलेल्या आणि त्यायोगे आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या लोकांचा एक समुदाय हे आपण प्रस्तावनेत पहिलेच आहे. अशा समुदायातील एकात्मता ही एक मानसिक भावना असून ती संस्कृती, वंश, जात, धर्म, भाषा, इतिहास आदींच्या समानतेमुळे राष्ट्र जन्म घेते. राष्ट्र ही संज्ञा कधीकधी 'राज्य', 'राष्ट्र-राज्य' आणि 'देश' ह्या अर्थानेही वापरली जाते. भारतीय उपखंडात राहणाऱ्या नागरिकांसाठी राष्ट्र ही संकल्पना अनादी काळापासून रुजलेली आहे. राजा त्याची सत्ता, त्यांची शासनपद्धती व त्यांच्या आधिपत्याला सामावून घेत भारतीय राष्ट्र तयार झाले आहे.

राज्यात सांस्कृतिक दृष्ट्या भिन्न असे अल्पसंख्याक असू शकतात. एकाच संस्कृतीची माणसे भिन्न राज्यांचे नागरिक असू शकतात. एकाच राष्ट्रात ज्यांचा समावेश होऊ शकेल अशांची निरनिराळी राज्ये असू शकतात; तर निरनिराळी राष्ट्रके एकाच राज्याच्या सत्तेखाली नांदू शकतात. यामुळे राष्ट्र व राज्य या कल्पना भिन्न मानल्या पाहिजेत. राष्ट्र या शब्दाने सांस्कृतिक, भाषिक, वाङ्मयीन, ऐतिहासिक, पारंपरिक अथवा धार्मिक एकत्मतेबरोबर, राजकीय दृष्ट्या स्वयंशासनासाठी स्वयंनिर्णयाची कल्पना दर्शविली जाते. राज्य, वैधानिक आणि राजकीय सत्तेची एकात्मता दर्शविते. तथापि स्वयंनिर्णयाच्या तत्त्वामुळे आधुनिक काळात बहुतेक सर्व राष्ट्रांना आपले स्वतंत्र राज्य स्थापणे शक्य झाले असून राष्ट्र-राज्य हा प्रकार सर्वत्र रूढ झाला आहे. राष्ट्र-राज्य म्हणजे एका राष्ट्रीय समाजाचे स्वतंत्र राज्य होय.

राज्य या शब्दाने अनेकदा शासकीय संघटना दर्शविली जाते. त्यामुळे राज्य व शासन यांत निश्चित अशी भेदरेषा दाखविणे कठीण असते. अनिर्बंधित राजसत्तेच्या काळात असा प्रश्न उद्भवत नसे; कारण राजा म्हणजेच राज्य मानले जाई. परंतु आधुनिक काळात वैधानिक दृष्ट्या राज्य व शासन यांतील भेद महत्त्वाचा ठरतो. अनेक राजकीय अभ्यासकांनी, राज्य वैधानिक व्यक्ती मानून, राज्याला सार्वभौमसत्ताआणि शासनाला राज्याचे एक अंग मानले; पण राज्याला सामाजिक संघटना मानणाऱ्या विचारवंतांनी राज्य व शासन यांतील भेदाला महत्त्व न देता राज्यकारभाराच्या दृष्टीने राज्य म्हणजे शासनच असते, असा दृष्टिकोण मांडला.

munotes.in

## ५.३ प्राचीन भारतीय राज्यसंस्था

भारत हा देश मानवी इतिहासातील प्राचीन देशांमध्ये गणला जातो. येथील लिखित इतिहास २,५०० वर्षांपूर्वीचा असून इतर पुराव्यांनुसार भारतात ७०,००० वर्षांपूर्वीपासून मानवी अस्तित्त्व आणि इतिहास आहे. सुरुवातीला छोटे-कुटुंब, त्याचा विस्तार व त्यानंतर हे समूह जीवन जगण्याविषयीचे काही नियम बनवत राहिले. कोणी कोणते काम करावे, त्याचा मोबदला कसा द्यावा-घ्यावा, रक्षण-संरक्षण-शेती कसे आणि कोण करणार याचे नियम बनत गेले व राज्य संस्थेचा पाया घातला गेला. त्या काळात टोळ्यांचे राज्य असलेले दिसते. प्राचीन काळात सर्वात प्रभावी आणि सामर्थ्यशाली राज्य म्हणजे मौर्य साम्राज्य होय. मौर्य भारताच्या पहिले प्रभावी असे केंद्रीय शासन होते भारतामध्ये सत्ताही मोठ्या काळापर्यंत टिकून राहिली देशातील ती पहिली केंद्रीकृत अशी सत्ता होते या काळामध्ये राज्यकर्त्यांनी मोठा भूप्रदेश आपल्या अंमलाखाली आणला आणि प्रजा कल्याणकारी शासन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यात गणराज्य संस्था बरीच जुनी असलेली दिसते.

### ५.३.१ गणराज्य संस्था

कात्यायनाने गणाची व्याख्या कुलसमूह अशी केली आहे, त्यावरून एकंदरीत सत्ता कुलांवर आधारलेली असावी असे दिसते. वृष्णी गणराज्यात कुलप्रमुखाशिवाय भाऊ, मुले सर्वच सभेस हजर राहत. शाक्य गणराज्यात वयोवृद्ध व तरुण सर्वच सभासद असत. असे असले तरी सर्व वर्णांच्या लोकांना राज्याधिकार होता असे दिसत नाही. प्रामुख्याने सत्ता क्षत्रियांकडेच असे. डॉ.अ.स. अळतेकरांच्या मते सार्वभौम सत्ता ही फक्त राज्य संस्थापक कुलांतच असावी. त्यांना 'राजन्य' ही उपाधी लावण्यात येई. इतर क्षत्रियांना राजन् हे नामाभिधान लावण्यात येई.

भारतीय संदर्भात गणराज्य हा शब्द महत्वाचा आहे. गण म्हणजे समूह. प्राचीन भारतीय समाज हा गणात विभागाला गेला होता. या गणाचा प्रमुख वा अधिपती त्यालाच गणपती असे म्हंटल्याचे दिसते. साधारणतः राजाशिवाय चालविल्या जाणाऱ्या किंवा स्थूल अर्थाने जनमानसानुसार वा लोकनियंत्रणाखाली असणाऱ्या शासनपध्दतीस गणराज्य म्हणण्यात येते. प्राचीन भारतामधील गणराज्यांचा लोकसत्ताक राज्य असा निर्देश काही अभ्यासक करतात. येथे गणराज्य व लोकसत्ताक राज्य या दोन्हीही संज्ञा समान अर्थी म्हणून वापरल्या आहेत. राज्यातील सार्वभौम सत्ता ही वंशपरंपरागत राजांऐवजी लोकांत अधिष्ठित असावी, अशी यामागील कल्पना आहे. तेव्हा राजेपदाचा अभाव व जनतेच्या सहभागावर अथवा संमतीवर आधारलेले शासन, या दोन्ही अर्थांनी ही संकल्पना मांडली जाते.

प्राचीन काळात राज्यातील प्रमुख अधिकारी व ज्येष्ठ कुलप्रमुख यांच्याकडून राजा निवडला जात असे. कालांतराने या अधिकाऱ्यांच्या व राजाच्या सहकाऱ्यांच्या तुलनेने राजाचे अधिकार वाढले व राजेशाही वंशपरंपरागत झाली. परंतु काही ठिकाणी



munotes.in

कुलप्रमुखांचा अधिकार राज्यपद्धतीचा स्थायीभाव झाला व त्यांतून त्यांचे गणराज्यात रूपांतर झाले असावे.

मौर्य काळातील महत्वाचे साधन असलेल्या कौटिल्याच्या अर्थशास्त्रात वार्ताशस्त्रोपजीवीसंघ व राजशब्दोपजीवीसंघ अशा दोन प्रकारच्या संघाचा उल्लेख केला आहे. वृक, दामणि, यौधेय ही राज्य पहिल्या प्रकारचे तर भद्र, वृजी, अंधक-वृष्णी इत्यादी राज्य ही दुसऱ्या प्रकारचे संघ होत. वार्ताशस्त्रोपजीवी संघात सर्व नागरिक लढाऊ असत. राजशब्दोपजीवी संघात संघमुख्य नागरिकांस राजा ही उपाधी लावण्यात येई. अंधक-वृष्णी गणराज्यात अधिकार वासुदेव आणि उग्रसेन या दोन राजन्यांना दिला होता. बौद्ध साहित्यात उल्लेखिलेली शाक्य, कोलिय, लिच्छवी, विदेह, मल्ल, मोरिय इ. गणराज्येही याच काळात असावीत. शाक्य गणराज्यात ५०० नागरिकांची सभा व निर्वाचित राजा होता, तर वृजी हे आठ राज्यांचे संघराज्य होते. त्यांत ७,७०७ राजांकडे सत्ता होती. अध्यक्ष, सेनापती वगैरे अधिकारी त्यातूनच निवडले जात. त्रिगर्तषष्ठ, पंचगण, सप्तगण हीसुद्धा अशा प्रकारची संघराज्ये होती. पटल, अंबष्ठ, भागल इ. गणराज्येही या काळातच अस्तित्वात होती.

मौर्यकाल ते इ. स. ३५० पर्यंतच्या काळात यौधेय गणराज्य अस्तित्वात असावे. सम्राट अशोकाच्या शिलालेखात योन, कांबोज, राष्ट्रिक, गांधार, पेत्तनिक, अपरान्त इ. गणराज्यांचा उल्लेख सापडतो. अर्थशास्त्रात कुरू, पांचाल, मल्लक, वृज्विक, लिच्छवी, मद्रक, कुकुर इ. गणराज्यांचे निर्देश आहेत.

### ५.३.२ गणराज्य सभेची रचना

यौधेय गणराज्यात ५,००० तर लिच्छवी गणराज्यात ७,७०० सभासद होते. या कुलांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा जन्मसिद्ध अधिकार असल्याने प्रतिनिधी निवड पद्धतीने निवडण्याचा प्रघात नव्हता. काही गणराज्यांत मात्र सर्वच क्षत्रिय राजकीय अधिकारांत सहभागी होते. त्यांना 'राजक गण' असे संबोधिले जाई. इतर काही गणराज्यांत क्षत्रिय व वैश्य वर्णीयही सत्तास्थानी होते, असा प्राचीन ग्रंथात आणि अर्थशास्त्रात उल्लेख आहे. याशिवाय राज्यकारभारासाठी कार्यकारी मंडळेही असत. मल्ल गणराज्यात चारजणांचे, लिच्छवीत नऊजणांचे, तर लिच्छवि-विदेह संघराज्यात अठराजणांचे अशी कार्यकारी मंडळे होती. अधिकाऱ्यांची नियुक्ती सभेकडून होत असे. क्षुद्रक गणात अलेक्झांडरशी वाटाघाटी करण्याचा अधिकार १५० दूतांना दिला होता. महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा, गुप्तता राखण्यासाठी, सभेत न करता त्यासंबंधीचे निर्णय गणांच्या कार्यकारी मंडळाने घ्यावेत, असा सल्ला महाभारतात दिला आहे.

गौतम बुद्धाने स्थापिलेल्या बौद्ध संघाची कार्यपद्धती त्या काळच्या गणराज्याच्या सभेच्या कार्यप्रणालीच्या धर्तीवर आधारलेली आहे, असे मानण्यास वाव आहे. सभेसाठी सभासदांची किमान गणसंख्या आवश्यक असे. 'गणपूरक' नावाचा अधिकारी यासाठी नेमलेला असे. सभेच्या अध्यक्षास 'संघमुख्य' म्हणत. प्रस्ताव कोणत्याही सभासदाकडून



munotes.in

मांडण्यात येई व मग त्यावर चर्चा होई. ठरावावर मतदानही घेण्यात येई. मतदान गुप्तपद्धतीने (गुल्हक) अथवा उघडपणे (विवतकम्) घेण्यात येई. मतदान पद्धतीत मतपत्रिकांना शलाका ही संज्ञा असे आणि त्या मतपत्रिका शलाकाग्राहक नावाचा अधिकारी गोळा करीत असे. उघड मतदानात ठरावाच्या विरोधी असणारेच बोलत. गण सभेतील बहुतेक निर्णय बहुमताने घेण्यात येई.

### ५.३.३ प्राचीन काळातील राज्याचे स्वरूप

प्राचीन भारतीय राज्याच्या स्वरूपाविषयी राजकीय तत्त्वज्ञ आणि राज्यशास्त्रज्ञ यांच्यात एकवाक्यता नाही. छोटे कुटुंब, मोठे विस्तारित कुटुंब, टोळी, टोळीचे नियम, त्याचा प्रादेशिक विस्तार, यालाच प्राचीन काळात राज्य म्हटले जाई. त्यातील नियमांना शासन म्हटले जाई. शेती, औजारे, पाण्याची व्यवस्था, त्यासाठी कर, सैन्य, राज्यच्या सिमा रक्षण अशा यंत्रणा वाढत गेल्या व एका राज्ययंत्रणेचा जन्म झाला. राज्यांमुळे समाजजीवनाला शिस्त आणि स्थैर्य प्राप्त होते, राज्यसंस्था व्यक्तींच्या अधिकारांना कायद्याचे अधिष्ठान प्राप्त करून देते, म्हणून राज्यसंस्था आवश्यक आहे, असा युक्तिवाद केला जातो. ह्याउलट अराज्यवादी विचारवंतांनी राज्यसंस्था व्यक्तिविकासाला घातक असल्याचे प्रतिपादन केले आहे. राज्यसंस्था अनिष्ट असून ती नष्ट करणे आवश्यक आहे असे काहींनी सुचविले आहे. राज्यसंस्था अनिष्ट असली, तरी तिला पर्याय नाही, म्हणून ती स्वीकारावी असेही काहींनी म्हटले आहे. राज्यसंस्था हा शोषक वर्गाच्या वर्चस्वाचाच एक आविष्कार असून शोषणावर आधारित समाजांमध्ये राज्यसंस्था शोषक वर्गाच्या हस्तकाची भूमिका बजावते असे मार्क्सवादात मानले जाते. वर्गविहीन समाजात राज्यसंस्थेचे प्रयोजनच राहणार नाही आणि दमनयंत्रणा हे तिचे स्वरूप नष्ट झाल्याने राज्यसंस्थेचे अस्तित्वही संपुष्टात येईल, असे सांगितले आहे. राज्यसंस्था ही इतर सामाजिक संस्थांसारखीच एक संस्था असून तिला फाजील महत्त्व दिले जाऊ नये, असेही काहीना वाटते.

राज्य हा समाजातील शहाणपणाचा सर्वश्रेष्ठ आविष्कार असून एकेका व्यक्तीपेक्षा राज्य श्रेष्ठ आहे; राज्य ही सामूहिक बळाची अभिव्यक्ती आहे; राज्याची सेवा, बलवृद्धी ह्यातच व्यक्तीची इतिकर्तव्यता आहे, असा टोकाचा विचार मांडून फॅसिस्ट विचारसरणीने राज्य हेच साध्य बनविले. मानवी स्वातंत्र्यावर राज्यामुळे सारखे आघात होऊन व्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध येऊन मानवाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला अडथला येतो. असे मत काही राज्यशास्त्रज्ञ व्यक्त करतात; तर काहींना राज्य हे मानवाच्या अत्युत्तम प्रवृत्तींचा सर्वश्रेष्ठ आविष्कार वाटते.

### ५.३.४ राज्याचे कार्यक्षेत्र

प्राचीन काळापासून आतापर्यंत राज्याचे कार्यक्षेत्र सारखे बदलत जाऊन कधी संकुचित तर कधी अधिकाधिक व्यापक झाल्याचे आढळून येते. अंतर्गत सुरक्षितता राखणे, परचक्रापासून रक्षण करणे व समाजातील सर्व घटकांना एकत्रित ठेवणारी व्यवस्था निर्मिणे ही राज्याची विशिष्ट कार्ये उत्क्रांतीच्या टप्प्यात ठरली. जनतेला परस्परांशी शिष्टसंमत संबंध ठेवून जीवन व्यतीत करता येईल, जनतेचे हक्क व कर्तव्ये स्पष्ट होतील, अशा प्रकारची व राजकीय सत्तेच्या मर्यादा स्पष्ट करणारी अशी शासनव्यवस्था, समाजाच्या

रक्षणासाठी, जतनासाठी आणि विकासासाठी निर्माण करावी लागते. तिचे स्वरूप राज्याच्या ध्येयावर अवलंबून असते.

राज्याला फक्त रक्षक-राज्य असून भागत नाही. समाजाच्या न्यायाच्या व स्वातंत्र्याच्या अपेक्षा पूर्ण करणारी व्यवस्था निर्मिणे हे राज्याचे कर्तव्य असते. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत दुर्बळांचे प्रबळांपासून रक्षण, हा आजचा संरक्षणाचा अर्थ असल्यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक बनले आहे. सर्वांना किमान जीवनमान प्राप्त करून देणे, हा संरक्षणाचा एक (भाग) प्रकार होय. यातूनच जास्त व्यापक दृष्टिकोण निर्माण होतो. तो जतनाचा व वर्धनाचा म्हणजे विकासाचा. जीवन सुरक्षिततेने जगता येईल अशा व्यवस्थेनंतर जीवन चांगल्या रीतीने जगण्याची व्यवस्था करणे राज्याचे कर्तव्य ठरते. मानवी शक्तीचा व नैसर्गिक संपत्तीच्या जतनाचा आणि विकासाच्या दृष्टीने विचार करून प्रगतीची वाटचाल करणे राज्याचे कर्तव्य असते. याचा अर्थ राज्याला कल्याणकारी राज्य बनावे लागते. कल्याणात आर्थिक सुस्थिती आणि सुबत्ता, मानसिक व नैतिक मूल्यांची जोपासना, सभ्यतेविषयी आदर व सभ्येतीच्या विशिष्ट पद्धती यांचा समावेश होतो. त्यासाठी भौतिक साधनांच्या योग्य विभाजनाची, किमान जीवनमानाची व त्या पलीकडे जाऊन स्वतःच्या गुणवत्तेने प्रगती करण्याची संधी प्रत्येकाला मिळवून देण्याची जबाबदारी राज्यावर असते. त्यामुळे आर्थिक व्यवस्थेत हस्तक्षेप करावा लागतो. असा हस्तक्षेप, आर्थिक व्यवहार चालविण्यासाठी नसून, सामाजिक मूल्ये संरक्षिण्यासाठी, शोषणमुक्तीसाठी, अन्याय दूर करण्यासाठी, स्वार्थी आर्थिक हेतूंना पायबंद घालण्यासाठी असतो. पूर्वापार चालत आलेल्या कार्याबरोबर समाजकल्याणाची जबाबदारी स्वीकारल्यामुळे राज्याला, अर्थव्यवस्थेचे नियंत्रण व अनुषंगाने इतर क्षेत्रांचे नियंत्रण करावे लागते.

**आपली प्रगती तपासा.**

१. प्राचीन भारतीय राज्यसंस्थाची माहिती द्या.

## ५.४ उत्पत्ती विषयक सिद्धांत

राज्य कसे व का निर्माण झाले, याविषयी विद्वानात मतमतांतरे आहेत. या संदर्भात याविषयी ईश्वरी सिद्धांत, कुटुंबमूलसिद्धांत, शक्तिसिद्धांत, सामाजिक करार सिद्धांत (सामाजिक प्रसंविदा सिद्धांत) व क्रमविकास सिद्धांत (ऐतिहासिक अथवा विकासवादी) असे पाच सिद्धांत प्रचलित आहेत. राज्य नेमके केव्हा निर्माण झाले ते निश्चित ठरविता येत नसले, तरी मानवी जीवनाच्या सुरुवातीपासून मानवाला कोणत्या तरी बाह्य शक्तीच्या नियंत्रणाखाली रहावे लागले आहे. जीवनाच्या विविध गरजा भागविण्यासाठी राज्य



munotes.in

निर्माण झाले आणि जीवन सुखी व समृद्ध बनविण्यासाठी ते अस्तित्वात राहिले. राज्य व राजा या संकल्पने विषयी त्याच्या निर्मिती विषयी विविध सिद्धांत प्रचलित आहेत. त्याविषयी थोडक्यात पाहू.

### ५.४.१ ईश्वरी सिद्धांत

जगभरामध्ये आणि भारतीय राज्याविषयी ऐतिहासिक माहिती फारशी उपलब्ध नसताना राज्याच्या ईश्वरी उदयाचा सिद्धांत प्रसृत झाला. राज्य ईश्वराने निर्माण केले, अशा प्रकारचे उल्लेख सर्व प्राचीन संस्कृतीत आढळतात. राजा देवांच्या अंशांतून, त्यांचे गुण घेऊन निर्माण झाला असे प्राचीन भारतीयही मानीत. या सिद्धांताची आधारभूत गृहीत तत्त्वे सिद्ध करणे शक्य नसते; कारण ती बुद्धीवादावर आधारित नसून श्रद्धेवर आधारित असतात. शासितांचे कर्तव्य कोणते याचेच दिग्दर्शन केले जाते, त्यामुळे उत्पत्तीबाबतचा सिद्धांत मान्य होण्यासारखा नाही.

प्राथमिक अवस्थेतील समाजात, शासनाच्या आज्ञा धर्मामुळे आणि ईश्वरी कोपाच्या भीतीने पाळल्या जाऊन समाजाला तथाकथित ईश्वरी आज्ञापालनाची सवय लागली. त्या ईश्वरानिर्मित मानल्यामुळे ऐतिहासिक अशा राज्यसंस्थेला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. राज्याच्या उत्क्रांतीत धर्म महत्त्वाचा घटक होता, या गोष्टी ईश्वरी सिद्धांताने स्पष्ट होतात हे त्याचे महत्त्व होय.

### ५.४.२ शक्तीसिद्धांत

प्रबळाने स्वसामर्थ्याने दुर्बलांना जिंकून, दंडशक्तीच्या उपयोगाने इतरांवर स्वामित्व प्रस्थापित करून राज्य निर्माण केले असे शक्तिसिद्धांत प्रतिपादन करतो. शक्ती राज्याचे महत्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण लक्षण असते. दंडशक्ती समर्थनीय असते; कारण तिचे मूळ मानवी स्वभावातच असते. स्वत्त्व प्रस्थापित करून, सत्तासंपादनाच्या स्वाभाविक इच्छेमुळे माणूस आक्रमणवादी असतो, त्यामुळे सामर्थ्यवान माणसे इतरांना आपले दास बनवितात. आक्रमणवादी प्रवृत्तीमुळे मानवी गटात संघर्ष होऊन जित जेत्यांचे दास बनतात. एखाद्या विशिष्ट देशावर जेत्यांची सत्ता प्रस्थापित होऊन राज्य निर्माण होते.

शक्तिसिद्धांत अनैतिहासिक तर आहेच पण त्यांतून दुर्बलांनी प्रबळांच्या आज्ञा पाळाव्यात हे जे सूत्र ध्वनित होते, तेही फारसे उचित मानले जात नाही. बलप्रयोगांचे समर्थन ह्या सिद्धांताने होते पण राज्याची निर्मिती अथवा कार्य यावर त्यातून प्रकाश पडत नाही.

### ५.४.३ कुटुंबमूलसिद्धांत:-

कुटुंबसंस्थेतून राज्य निर्माण झाले असे काही समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. समाजाच्या सुरूवातीला कुटुंबसंस्था अस्तित्वात आली. अप्रगत मानवी समाजात बहुपतित्व असण्याची शक्यता असल्यामुळे मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात असावी. पशुपालनाच्या व्यवसाय पद्धतीनंतर पितृसत्ताक पद्धती, समाजाच्या प्रगत अवस्थेत निर्माण झाली असावी.

कुटुंबाचे रक्षण आणि पालनपोषण करणाऱ्या ज्येष्ठ कुटुंबप्रमुखाची सत्ता कुटुंबातील सर्वांवर चालत असे. कुटुंबप्रमुखाचे अधिकार अमर्याद असत. रक्तसंबंधाच्या नात्यामुळे एका लहान कुटुंबातून, कुटुंबाचा गट निर्माण होई, ज्येष्ठ कुटुंबप्रमुख गटांतील अधिकारी व्यक्ती मानली जाई, अनेक कुटुंबांचे कुल, अनेक कुलांचा गण आणि अनेक गणांचे राज्यात रूपांतर होई. राज्य म्हणजे कुटुंबांचे विशाल स्वरूप असे. प्राचीन संस्कृतींतील कुटुंबप्रमुखाची अमर्याद सत्ता राज्याच्या प्रमुखाला-राजाला-प्राप्त होई.

आद्य समाजातील कुटुंबसंस्था मातृसत्ताक अथवा पितृसत्ताक या दोनच पद्धतींची होती, आणखी कोणत्याही भिन्न प्रकारची होती याचा ऐतिहासिक पुरावा नाही. कुटुंबसंस्था, कुल, गण आणि राज्य हे घटनाक्रमही ऐतिहासिक दृष्ट्या सर्वसंमत नाहीत. कुटुंबसंस्था व राज्य यांचे काही बाबतील साम्य असले, तरी संघटना, कार्यक्षेत्र व उद्दिष्टे यांबाबत ती परस्परांपासून अगदी भिन्न असतात. कुटुंबमूलसिद्धांतामुळे समाजाच्या उत्पत्तीबाबत माहिती मिळत असली, तरी त्याच्यामुळे राज्याच्या उपपत्तीवर पुरेसा प्रकाश पडत नाही.

### ५.४.४ सामाजिक करार सिद्धांत

सामाजिक करार सिद्धांतानुसार मानव समाज एकेकाळी सर्व प्रकारच्या बंधनापासून मुक्त होता. राज्य नव्हते, शासन नव्हते, विधिनियम नव्हते. निसर्गनियमांनुसार मानव जगत होता, परंतु निसर्गनियमांचे स्वरूप निश्चित व स्पष्ट नव्हते. त्यांचा अर्थ लावून निर्णय देणारी संस्था नव्हती. मानवी स्वभावातील स्वार्थी प्रवृत्तीमुळे निसर्गावस्थेतील जीवन दु:सह झाले आणि त्यातून सुटण्यासाठी, मानवांनी एकत्रित येऊन राज्य निर्माण करण्याचे ठरविले. आपापसांत प्रत्येकाने एकमेकांशी करार करून आपल्या हितासाठी राज्याची निर्मिती केली. त्यासाठी प्रत्येक व्यक्तिला नैसर्गिक स्वातंत्र्याचा आणि हक्कांचा त्याग करावा लागला; यामुळे राज्याने निर्माण केलेले विधिनियम पाळून मर्यादित नागरी स्वातंत्र्याचा आणि हक्कांचा उपभोग घेणे शक्य झाले. यालाच सामाजिक करार सिद्धांत म्हणतात.

या सिद्धांताला ऐतिहासिक पुरावा नाही. निसर्गावस्था, ऐच्छिक करार निव्वळ अनुमाने आहेत. अधिकार, हक्क, कायदे आणि करार प्रगत समाजातच संभवतात, म्हणून निसर्गदत्त अधिकारांचे गृहीत अस्तित्व असंभवनीय ठरते. त्या दृष्टीने राज्याच्या उत्पत्तीबाबत सामाजिक कराराचा सिद्धांत असंभवनीय ठरतो. असे मानण्यात येते.

या सिद्धांताने ईश्वरी सिद्धांत खोडून काढून शासन सार्वभौम जनतेच्या संमतीवर अवलंबून असते, या तत्त्वाचा पुरस्कार केला. शासक आणि शासित यांचे संबंध कसे असावेत याचे दिग्दर्शन केले. अनियंत्रित राजसत्तेला धक्का देऊन स्वयंनिर्णयाचे स्वातंत्र्य आणि राजकीय सत्ता यांच्या योगाने लोकसत्ताक राज्याची कल्पना साकार करण्यात हातभार लावला. हे सिद्धांत राज्याच्या उत्पत्तीचे सिद्धांत म्हणून महत्त्वाचे नाहीत, तर जनसंमती हे सार्वभौमाचे अधिष्ठान असावे; सार्वभौमाला सर्वश्रेष्ठ अधिकार असावेत, शासन मर्यादित असावे इ. तत्त्वांच्या प्रतिपादनामुळे ते महत्त्वाचे ठरतात. सामाजिक कराराचा सिद्धांत



munotes.in

### ५.४.५ क्रमविकास सिद्धांत

राज्य ऐतिहासिक उत्क्रांतीतून निर्माण झाले, मानवी समाजाच्या प्रथमावस्थेतील अपरिपक्व आणि अप्रगत स्वरूपाच्या संस्थांतून हळूहळू विकसित झाले, असे क्रमविकास सिद्धांत प्रतिपादन करतो. मनुष्य समाजशील असल्यामुळे रक्तसंबंधांवर आधारित कुटुंबसंस्था निर्माण झाली. समाज निर्माण झाला आणि कालांतराने समाजातून राज्यसंस्था निर्माण झाली. एकमेकांपासून भिन्न अशा गटांचा बनलेला समाज रूढींवर अधिष्ठित असे. कुटुंबसंस्था मातृसत्ताक अथवा पितृसत्ताक पद्धतीची असे. पितृपूजेच्या पद्धतीमुळे कुटुंबप्रमुखाची सत्ता बलिष्ट झाली. नैसर्गिक शक्तींना घाबरणाऱ्या मानवाने, त्यांना तृप्त करण्यासाठी त्यांची पूजा करण्यास सुरुवात केली. कुलाचार आणि धार्मिक नियमांची निर्मिती झाली. धर्मगुरूंना प्राधान्य मिळाले. धार्मिक नियमांच्या आचरणामुळे समाजाला आज्ञापालनाची सवय लागली. ऐक्यभाव निर्माण होऊन जमातीत एकजिनसीपणा टिकू शकला.

उपजीविकेसाठी व्यक्तींना परस्परांच्या मदतीने व सहकार्याने श्रमविभागणी करून निरनिराळे व्यवसाय करावे लागत, त्यामुळे निर्माण झालेल्या आर्थिक व्यवस्थेला निश्चित नियम करावे लागले. शेतीमुळे समाज स्थायिक झाल्यावर मालमत्तेच्या संरक्षणासाठी, अंतर्गत शांतता टिकविण्यासाठी व बाह्य शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी एखाद्या प्रमुखाला नेता म्हणून निवडण्याची प्रथा पडली. अशा नेत्याला जमातीचा आणि धर्माचा पाठिंबा मिळाल्यामुळे, निर्णय देण्याचा व नियम करण्याचा अधिकार मिळाल्यामुळे त्याच्या सत्तेचे रूपांतर राजसत्तेत झाले. कोणत्याही समाजात सत्ताधारी आणि इतर असे वर्ग पडल्यावर सत्ताधारी वर्ग सत्ता टिकविण्याचा प्रयत्न करतात, रूढींचे रूपांतर विशिष्ट वर्गाच्या विशिष्ट अधिकारांत होते. पशुपालन व शेती यांतील उत्पादनवाढीमुळे संपत्तीचे आधिक्य निर्माण होऊन त्याचा सत्तासंपादनाचे साधन म्हणून उपयोग होऊ लागला. संरक्षणाचे महत्त्व वाढून योद्ध्यांचा एक वर्गच निर्माण झाला व राजकीय सत्तेची सूत्रे त्या वर्गाच्या हाती गेली. एकाच प्रदेशात स्थायिक झाल्यामुळे प्रादेशिक निष्ठा निर्माण झाली. वैयक्तिक निष्ठेची जागा प्रादेशिक निष्ठेने घेतली. रक्तसंबंध, धर्म, व्यवसाय, युद्ध या घटकांमुळे सुसंघटित झालेला समाज राजकीय भावनेने प्रेरित झाल्यावर सत्तेचे रूपांतर शासनसंस्थेत आणि रूढीचे रूपांतर कायद्यात झाले आणि राज्यसंस्था निर्माण झाली. मानवाने राज्यसंस्था जाणीवपूर्वक निर्माण केलेली संघटना नसून ती क्रमाक्रमाने विकसित झालेली संघटना आहे, असे ऐतिहासिक दृष्टीने प्रतिपादन करणारा क्रमविकास सिद्धांत सर्वमान्य ठरला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. राज्य उत्पत्ती विषयक विविध सिद्धांत सांगा.

munotes.in

## ५.५ राज्यसंस्थेचा विकासक्रम

प्राचीन समाजरचना मुख्यत्वे मातृसत्ताक होती. त्यातून तयार झालेली राजकीय संस्थाही स्त्रीप्रधान वा स्त्रीसात्तक होती. स्त्रीच्या माध्यमाद्वारे नाती ठरत, मालमत्तेचा वारसा ठरे. पुढे मात्र स्त्री कुटुंबप्रमुख नव्हती, फक्त परंपरावाहक होती. पशुपालनाच्या आणि स्थिर शेतीच्या सुरुवातीनंतर पितृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात आली. पित्याच्या कुळावरून वारसा ठरू लागला. कुटुंबप्रमुखाचे अधिकार अंतिम आणि सर्वश्रेष्ठ मानले जाऊ लागले. टोळी आणि जमातीचे व्यवहार रूढींवर आधारित असत. परंपरागत रूढींना प्रामाण्य मिळे, रूढीविरुद्ध वागल्यास व्यक्तीला जमातीतून बहिष्कृत केले जाई.

उपजीविकेसाठी जमातींतील घटकांना, परस्पर सहकार्याने श्रमविभागणीने निरनिराळे व्यवसाय करावे लागत. अंतर्गत शांतता, बाह्यशत्रूपासून संरक्षण इ. कारणांमुळे कुटुंबप्रमुखाच्या सत्तेपेक्षा मोठ्या सत्तेची आवश्यकता भासल्यावर एखादा सामर्थ्यवान कुटुंबप्रमुख जमातीचा प्रमुख नेता म्हणून निवडला जाई. प्रमुखाला जमातीसाठी नियम करण्याचा अधिकार मिळून तो जमातीचा राजा बने.

भटक्या जमाती शेतीमुळे एका प्रदेशात स्थायिक झाल्यावर, राजसत्ता प्रादेशिक मानली जाऊ लागली. राजसत्ता प्रत्यक्षात उतरत्या श्रेणीने अनेक सत्ताधिकाऱ्यांची सत्ता असे. राज्यातील रहिवाशांची सत्ताधारी आणि इतर अशी विभागणी होई. मानवी स्वभाव, बुद्धी आणि शक्ती यांच्या नैसर्गिक विषमतेमुळे काही व्यक्तींना श्रेष्ठत्व आणि वर्चस्व प्राप्त होई. ते टिकविण्यासाठी राज्यसत्ता राबविली जाई. रूढींचे रूपांतर विशिष्ट वर्गाच्या विशिष्ट अधिकारांत होऊन, तसे अधिकार कायम राखण्यासाठी राज्याची दंडशक्ती वापरली जात असे.

पशुपालन आणि शेती यांतील प्रगतीमुळे संपत्ती वाढली आणि संपत्तीच्या आधिक्याचा उपयोग सत्तासंपादनासाठी होऊ लागला. नदीकाठच्या संस्कृतींत संपत्तीच्या अधिक्यामुळे नगरांची उभारणी झाली. नागरसंस्कृती म्हणजे संपत्तीचे एकीकरण आणि संपत्तीच्या एकत्रीकरणाने सत्तासंपादन, नगरांच्या निर्मितीने रक्तसंबंधांचे महत्त्व कमी झाले. धर्माचे स्वरूप बदलून मंदिरातील देवपूजा अस्तित्वात येऊन धर्मगुरूंची संस्था निर्माण झाली. धर्माचे संघटित सामर्थ्य समाजनियंत्रणाचे साधन बनले. राजा या व्यक्तीपेक्षा राजपदाला महत्त्व आले. खडे सैन्य ठेवणाऱ्या सामर्थ्यवान राजांनी आजूबाजूचे प्रदेश जिंकले.

रंजन करणारा तो राजा अशी कल्पना भारतात प्रचलित होती. भारतीयांच्या राज्यसंस्थेत कालमानानुसार अनेक प्रकार अस्तित्वात होते. राज्य, भौज्य, वैराज्य, साम्राज्य, द्वैराज्य, गणराज्य, संयुक्तराज्य इत्यादींचे उल्लेख प्राचीन भारतीय वाङ्मयात आढळतात. मात्स्यन्यायातून मुक्त होण्यासाठी, हिंसा टाळण्यासाठी, संपत्तीच्या रक्षणासाठी, न्यायासाठी व जीवन सुखी करण्यासाठी राज्य निर्माण झाले, म्हणून सर्वांगीण कल्याण राज्याचे उद्दिष्ट मानले जाई. स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश दण्ड आणि मित्र असे राज्याचे सात घटक मानले जात. रंजन व रक्षणाबरोबर धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थांना उत्तेजन देणे, अधिभौतिक उन्नतीबरोबर प्रजेची नैतिक उन्नती करणे,

'अलब्धस्य लाभः लब्धस्य रक्षणम् रक्षितस्य वर्धनम् वृद्धस्य पात्रे निक्षेपः'- नसेल ते मिळविणे, मिळालेले असेल त्याचे रक्षण करणे, रक्षण केलेल्याचा विकास करणे व वाढविलेल्या संपत्तीचे योग्य विभाजन करणे, ही राज्यसंस्थेची कर्तव्ये मानली जात. राजा व प्रजा यांत एकात्मता असावी, राजपद विश्वस्तासारखे असावे, अशा कल्पना प्रचलित होत्या. राजा व प्रजा दोघांनाही धर्माधिष्ठित नैतिक तत्त्वे पाळावी लागे. राज्य धर्मावर अधिष्ठित नसे. धर्मवेत्ते सल्ला देत, परंतु राजकारणात हस्तक्षेप करीत नसत. राजसत्ता नियंत्रित होती. निस्पृह तपस्वी मंत्री आणि परंपरागत धर्मनियम, यांचे राजसत्तेवर नियंत्रण असे. विकेंद्रित शासनव्यवस्थेमुळे जवळजवळ स्वायत्त असलेल्या ग्रामसंस्थांचे राजसत्तेवर अप्रत्यक्ष नियंत्रण राही.

प्राचीन भारतात राजसत्ता नसलेली गण अथवा संघ म्हणून ओळखली जाणारी प्रजासत्ताक राज्ये होती. यौधेय, शाक्य, वैशाली इ. गणराज्यांतील प्रतिनिधी वर्णाधिष्ठीत असत. पक्षोपपक्ष असत. गणांचे प्रमुख कार्यकारी मंडळ गणसभेच्या नियंत्रणाखाली असे. कुल, जाती इत्यादींवरून कधी कलहदेखील होत. कार्य बहुमताने करण्याऐवजी एकमताने व्हावे अशी अपेक्षा असे. गणपती अथवा गणप्रमुखाची निवड गणसभेकडून होई. गणराज्यात मतदानाचा अधिकार सर्वांना नसला. तरी महत्त्वाच्या कामकाजासाठी एकत्रित येण्याची पद्धती होती.

प्राचीन काळी दोन टोळ्यांत, प्रांतात, राज्यात युद्ध नैसर्गिक मानले जाई. परकीय जनतेला शत्रू मानले जात. राज्याचे इतर राज्यांबाबत काही कर्तव्य असते, ही कल्पनाच त्याकाळी नव्हती. मात्र राज्याराज्यांत मैत्रीचे संबंधही असत. प्राचीन साम्राज्ये भौमिक साम्राज्ये होती. त्यांचे सामर्थ्य शेतीच्या उत्पादनावर व त्यांच्या सैन्यबळावर अवलंबून राही; पण सैन्यासाठी खर्च करावा लागे व इतके करूनही राजधानीपासून दूरच्या प्रदेशात नियंत्रण क्वचितच राही. सागरी किनाऱ्यावरील लोकांनी सागरी सत्तेच्या संपादनाने राज्यसंस्थेच्या विकासात नवीन पर्व उघडले. मोक्याच्या जागी वसाहती स्थापून, व्यापारी केंद्रे स्थापून, मोठ्या प्रमाणावर खडे सैन्य न ठेवता संपत्तीचा ओघ वाहता ठेवून त्यांनी राजकीय आणि आर्थिक सामर्थ्याची सांगड घातली.

एक वंश, एक प्रदेश, एक धर्म, समान इतिहास, परंपरा आणि हितसंबंध यांमुळे पूर्वकाळी राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली असे मानले जाते. परंतु या घटकांपैकी एकामुळे किंवा अनेकांमुळे ऐक्यभावना निर्माण झाली असली, तरी राष्ट्रीयतेबरोबर असलाच पाहिजे असा एकही घटक या घटकांत आढळून येत नाही. मानवजातीच्या कोणत्याही सामाजिक बाबीबाबत, भाषेबाबत, विशिष्ट अशा रूढी अगर प्रघाताबाबत, धार्मिक कल्पनांबाबत, प्रादेशिक संबंधांबाबत, प्रदेशाबाबत, वांशिक भावनेबाबत, आर्थिक जीवनातील व्यवहारांबाबत किंवा राजकीय क्षेत्रातील घटकांबाबत, ते राष्ट्रीयत्वापासून विभक्त करताच येत नाहीत असे म्हणता येता नाही. कोणत्याही एखाद्या राष्ट्राचा विचार केल्यास त्या राष्ट्रात, राष्ट्रीयत्व निर्मिणारे समान घटक सापडणे कठीण असते. म्हणून कोणत्याही एक किंवा अनेक निश्चित घटकांमुळे राष्ट्रीयत्व निर्माण होते असे म्हणता येत नाही. त्यामुळे राष्ट्र म्हणजे भाषिक, राजकीय किंवा प्राणिज एकता नसून

भावनात्मक एकता असते, ही स्पेंग्लरची राष्ट्रीयत्वाबाबतची कल्पना मान्य करावीशी वाटते. कोणत्याही कालखंडात अस्तित्वात असलेल्या ऐतिहासिक परिस्थितीत कोणत्याही मानवसमूहाची अस्तित्वात असलेली एकत्वाची भावना राज्याच्या एकात्मतेच्या रूपाने प्रतीत होत असलेली अथवा प्रतीत होऊ पाहाणारी भावना म्हणजे राष्ट्रीयत्व होय. राष्ट्रीयत्वाची भावना निश्चित स्वरूपाची, अतिशय समर्थ व सर्वांना भारावून टाकणारी असते.

एका विशिष्ट प्रकारची, सर्वसमावेशक, सर्वांना पटणारी, सर्वव्यापी आणि अत्यंत सामर्थ्यशाली अशी राष्ट्रीयत्वाची भावना फक्त राज्यसंस्थेमुळेच प्रत्यक्ष स्वरूपात कार्यक्षम होते, इतर कोणत्याही सामाजिक संघटनेला ती भावना पेलणारी नाही. राष्ट्रीयत्वाच्या भावनेचे प्रत्यक्षातले स्वरूप म्हणजे राज्य.

प्रबोधनाच्या काळात राष्ट्रवादी सामर्थ्यशाली राजसत्ता यूरोपात प्रस्थापित झाली.

**आपली प्रगती तपासा.**

१. राज्यसंस्थेचा विकासक्रम स्पष्ट करा.

## ५.६ हडप्पा आणि सिंधू संस्कृतीतील राज्यसंस्था

munotes.in

राज्यसंस्थेच्या बाबतीत पुढारलेली सिंधु संस्कृती (इ. स. पू. ३२०० – १५००) ही भारताच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृती आहे. ही संस्कृति प्रामुख्याने सिंधू नदी, सरस्वती नदी व सिंधूच्या उपनद्याकाठी (पंजाबातील ५ मुख्य नद्यांच्याकाठी) अस्तित्वात होती. तसेच गंगा यमुना खोरे ते उत्तर अफगणिस्तानपर्यंत ही संस्कृती बहरली. सिंधू संस्कृतीच्या अस्तित्वाचा पुरावा दयाराम सहानी यांनी इ.स.१९२१ मध्ये प्रकाशात आणला. इ. स. पू. तिसऱ्या सहस्रकामध्ये सिंध-पंजाबची मैदाने आणि त्यांच्या पश्चिमेकडच्या अफगाणिस्तान, बलुचिस्तान भागांतील डोंगराळ प्रदेशातही सध्यापेक्षा मानवी वस्तीला जास्त अनुकूल अशी नैसर्गिक परिस्थिती असावी, यात शंका नाही. बलुचिस्तानच्या डोंगराळ भागात छोटीछोटी ग्रामवस्तीची केंद्रे होती, हे आता पुरेशा पुराव्याने सिद्ध झाले आहे. बलुचिस्तान आणि उत्तर पाकिस्तान या विभागात क्वेट्टा, नाल, आमरी, झोब, कुली आणि टोगो इ. प्रादेशिक वैशिष्ट्यांच्या निरनिराळ्या ग्रामसंस्कृती अस्तित्वात होत्या, याबद्दल पुरावा मिळालेला आहे. हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये सर्वसाधारणपणे सर्वत्र सारखीच आढळतात.

नगररचना, रस्ते, घरबांधणी, सांडपाण्याची व्यवस्था, मुद्रा, भांडी, खेळणी, मृतदेह पुरण्याची पद्धत यावरून तेथील राज्याची कल्पना येऊ शकते. हडप्पा संस्कृतीचे लोक भारतात त्याचप्रमाणे भारताबाहेरील देशांशी व्यापार करत असत. मृत्पात्रे, मानवी दफने, मृत्पात्रांवरील रंगीत नक्षीकाम आणि काही स्थळी सूचित केले जाणारे संभाव्य धान्योत्पादन, यांवरुन सिंधू संस्कृतीच्या नागरी विकासाचा आणि या ग्रामीण संस्कृतींचा घनिष्ठ संबंध असावा, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## ५.७ ऋग्वेदिक कालखंडातील राज्याचे स्वरूप

ऋग्वेदिक काळातील राज्याचे स्वरूप समजण्यासाठीचे साहित्य उपलब्ध आहे. त्यात ऋग्वेद महत्वाचा आहे. यात काही राज्य संस्थाच्या आधारभूत सभा, समिती, विधत, गण अशा घटकाची माहिती मिळते. वेदिक काळातील प्रशासनातील, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनातील काही संज्ञा पुन्हा-पुन्हा विचारण्याची आयोगाची वृत्ती दिसून येते. यात जन, पंचायतन, पुरोहित, ग्रामिणी, इरीपत्ती इ. संज्ञाचा समावेश होतो.

**सभा आणि समिती**: ऋग्वेदात सभेचा उल्लेख आठ वेळा आणि समितीचा सहा वेळा आला आहे. सभेमध्ये काही निवडक लोक असत. समिती ही वैदिक काळातील सार्वभौम संस्था. प्राचीन भारतीय राजकीय विचारांमध्ये गण, विधा, सभा आणि समिती या संस्था होत्या. त्यांचे उल्लेख ऋग्वेदामध्ये आलेले आहेत. समिती ही संस्था जवळ जवळ एक हजार वर्ष अस्तित्वात होती. वैदिक काळात राजकीय जीवन आणि सार्वजनिक समूह या संस्थांच्याद्वारे घडल्याचे दिसते. समितीचा अर्थ 'सर्वांनी एकत्र येणे' असा होता. समिती जनसाधारण किंवा विशची राष्ट्रीय सभा होती. समिती राजाची प्रथम आणि त्यानंतर इतरांची निवड करत होती. समितीमध्ये सर्व लोकांचा सहभाग होता. समितीचे सर्वात महत्त्वाचे काम राजाची निवड करणे हे होते. समिती ही सर्वात पहिली संस्था होती. राज्यसंबंधी आणि मंत्र्यांसंबंधी समितीमध्ये विचार केला जात होता. राजा समितीच्या बैठकांना उपस्थित राहत होता तसेच राजाने समितीच्या सभांना उपस्थित राहणे आवश्यक मानले जात होते. समितीमध्ये उपस्थित राहणे हे राजाचे कर्तव्य होते. समितीला उपस्थित न राहणारा राजा हा कर्तव्यहीन समजला जात होता. समितीमध्ये वाद-विवाद (चिकित्सा) होत असे. समितीत राजकीय विषयांबरोबर इतर विषयांवर देखील चर्चा होत होती. समिती ही विकसित समाजातील संस्था होती. कारण समाजात बदल होत होता. विकसित समाज उदयास येत होता. विकसित समाज म्हणजे उन्नत अवस्थेतील वाद-विवाद, वादविवाद करण्याचा अधिकार, वाद-विवाद करून विजय मिळवण्याची मान्यता या गोष्टी समितीशी संबंधित होत्या. तसेच समितीचे प्रतिनिधित्व सर्वांना दिले जात होते. प्रतिनिधित्वाच्या सिद्धांताचा आदर केला जात होता. या कारणामुळे समिती ही सार्वजनिक स्वरूपाची होती. समितीला एक सभापती होता. राज्याभिषेकाच्यावेळी गावाचा प्रमुख उपस्थित राहत होता. समितीचे मुख्य आधार ग्राम (गाव) होते. ग्रामणी हा ग्रामाचा संघटक होता. समितीचा कार्यकाल खूप मोठा होता. त्यामुळे समिती निरंतर अस्तित्वात राहत होती. जातकांच्या

काळाच्या आधी समितीचा ऱ्हास झाला ( इसवी सन पूर्व ६००). समिती ही राजकीय संस्था होती. समितीमध्ये संपूर्ण कुळाला प्रतिनिधित्व दिले जात होते. (संदर्भ :- मराठी विश्वकोश,)

**आपली प्रगती तपासा**

१. ऋग्वेदिक कालखंडातील राज्याचे स्वरूप स्पष्ट करा.

## ५.८ उत्तर वैदिक कालखंडातील राज्यसंस्था

साधारणपणे इसवी सन पूर्व १००० ते इसवी सन पूर्व ६०० हा कालखंड म्हणजे वैदिक उत्तर कालखंड मानला जातो या काळात जनपदे अस्तित्वात आली. उत्तर वैदिक काळात राजकीय व्यवस्थेत महत्वपूर्ण परिवर्तन घडून आले. उत्तर वैदिक काळात जनजातीय व्यवस्था हळूहळू समाप्त झाली. या कालखंडात आदिवासी व्यवस्थेचे हळूहळू विघटन होऊन त्याचे अनेक भागात छोटी राज्ये अस्तित्वात येऊ लागली. जनांची जागा जनपदाने घेतली. आता प्रदेश ताब्यात घेण्यासाठी युद्धे सुरू झाली, अनेक जमाती आणि राज्ये एकत्र येऊन मोठी आणि शक्तिशाली राज्ये निर्माण झाली. पुरू आणि भरत यांच्या संयोगाने कुरुची निर्मिती झाली, तर तुर्वशा आणि क्रिवी यांच्या संयोगाने पांचाल राज्य निर्माण झाले. या काळात जनपरिषदांचे महत्त्व संपले. महिलांना सभेच्या सदस्यत्वापासून दूर ठेवण्यात आले. या काळात राजा अधिक शक्तिशाली होता, त्याचे राज्यावर पूर्ण अधिकार आणि नियंत्रण होते.

नंतरच्या वैदिक काळात राज्यांचे क्षेत्रफळ तुलनेने मोठे होते. या काळात प्रदेश ताब्यात घेण्याच्या उद्देशाने युद्धे सुरू झाली. राज्यांचे क्षेत्रफळ वाढल्याने राजा शक्तिशाली झाला, त्या काळात राष्ट्र या शब्दाचा वापर सुरू झाला. राजा निवडणुकीने निवडला जायचा, त्याला प्रजेकडून भेटवस्तू किंवा प्रसाद मिळत असे. या निवडलेल्या राजाला 'विसपती' असे म्हणतात. शतपथ ब्राह्मणात प्रजेच्या संपत्तीचा मनमानी उपभोग घेणाऱ्या राजाला राष्ट्र हा शब्द वापरण्यात आला आहे. त्यागाच्या व्यतिरिक्त, कर्तव्य आणि कर्तव्य नावाचा कर देखील नमूद केला आहे.

या काळात कोणत्याही राजाने कायम सैन्य ठेवले नाही. या दरम्यान स्थपती आणि शतपती नावाच्या दोन प्रांताधिकाऱ्यांची नावे आहेत. स्थपती हा सीमावर्ती प्रदेशाचा प्रशासक होता आणि सातपती १०० गावांच्या गटाचा प्रमुख होता. प्रशासनाच्या खालच्या पातळीला ग्रामीण भागाचा प्रमुख जबाबदार होता. राजाला प्रशासनात मदत करण्यासाठी विविध अधिकारी असायचे, शतपथ ब्राह्मणात त्यांना रत्नी म्हणतात. हे १२ रत्नी म्हणजे

पुरोहित, योद्धा, युवराज, महिषी (राणी), सुता (राजाचा सारथी), ग्रामणी (गावप्रमुख), प्रतिहार (द्वारपाल), खजिनदार, भागदुधा (कर संग्राहक), अक्षवापा (फासाच्या खेळात राजाचा सहकारी), पलागल (दूत) आणि गोविकर्तन (शिकारात राजाला मदत). हे सर्व अधिकारी राजाच्या थेट नियंत्रणाखाली होते.

**आपली प्रगती तपासा**

१. उत्तर वैदिक कालखंडातील राज्यसंस्था कशी होती ते सांगा.

___

___

___

___

## ५.९ महाजानापदाच्या कालखंडातील राज्य

वैदिक संहितात जनपद हा शब्द सापडत नाही. काही इतिहासकारांनी अनेक गावांच्या समूहाला जनपद ही संज्ञा वापरली आहे. या सोळा महाजनपदांमधे काही जनपदात राजतंत्र होते, तर काहींमध्ये गणतंत्र राज्यप्रणाली होती. राजतंत्र प्रकारात राजाच्या हाती सत्ता असे. अंग, काशी, चेदी येथे राजतंत्र होते, तर शाक्य, शुद्रक, मालव, वृज्जी या महाजनपदात गणतंत्र प्रणाली होती. गणतंत्र असणाऱ्या जनपदात दोन प्रकारे कारभार चाले. एकात सर्व नागरिक एकत्र येऊन आपला कारभार करत, तर दुसऱ्या प्रकारात उच्चकुलीन वर्ग कारभार करत असे. जनपदे म्हणजे छोटी छोटी राज्ये होती. हे जनपद म्हणजेच जनसमूह होय.या जनसमूहांच्या प्रमुखा मध्ये रावी नदीच्या तीरावर झालेले "दशरज्ञ युद्ध" प्रसिद्ध आहे. या वैदिक लोकांच्या जनसमुहांबरोबर "दास" किंवा "दस्यू" लोकांचे वास्तव्य होते.

भारतीय उपखंडाच्या वायव्येला असलेल्या आजच्या अफगाणिस्तानपासून ते पूर्वेला बिहार, बंगाल, ओडीसा पर्यंतच्या प्रदेशात आणि दक्षिणेत महाराष्ट्रापर्यंत ही जनपदे पसरलेली होती आजच्या महाराष्ट्राचा काही भाग तेव्हाच्या या जनपदाने व्यापलेला होता. संस्कृत, पाली आणि अर्धमागधी साहित्यात या जनपदाची नावे आढळतात ग्रीक इतिहासकारांच्या लिखाणातूनही त्यासंबंधीची माहिती मिळते त्यातील काही जण पदांमध्ये राजेशाही ही अस्तित्वा मध्ये होती तर काही जणांमध्ये मात्र गणराज्य व्यवस्था होती. त्याकाळी अशी १६ जनपदे अस्तित्वात आलेली होती. गणराज्य असलेल्या जनपदांमधील ज्येष्ठ व्यक्तीची गणपरिषद असे. परिषदेचे सदस्य एकत्रितपणे चर्चा करून राज्यकारभारास संबंधीचे निर्णय घेत असत अशा चर्चा ज्या ठिकाणी होत त्या सभागृहाला संतागार असे म्हटले जाई.

munotes.in

गौतम बुद्ध नेपाळमधील शाक्य गणराज्यातील राजपुत्र होते प्रत्येक जनपदाची स्वतंत्र नाणी प्रचलनात होते. जन पदांच्या संदर्भातला उल्लेख हा तत्कालीन प्राचीन धार्मिक साहित्यामधून येतो यामध्ये बौद्ध धर्मातील त्रिपिटक आणि जैन धर्मातील ग्रंथ यामध्ये जनपदांचा व गणराज्यांचा उल्लेख आलेला आहे. कोसल महाजनपदाचा विस्तार हिमालयाच्या पायथ्याशी नेपाळ आणि उत्तर प्रदेश या ठिकाणी झालेला होता. या राज्यातील श्रावस्ती कुशावती आणि साकेत ही नगरे प्रसिद्ध होती. श्रावस्ती हे कोसल महाजनपदाची राजधानी होती. गौतम बुद्ध श्रावस्थीमध्ये चेतवणी या प्रसिद्ध विहारात दीर्घकाळ राहिलेले होते. कोसल राजा प्रसेनजित हा वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा समकालीन होता. कोसलचे राज्य मगधामध्ये विलीन झाले. कोसलप्रमाणेच वत्स, अवंती आणि मगध हीदेखील मोठी महाजनपदे अस्तित्वात होती. मगधच्या उत्तरेस लिच्छवीचे व्रुज्जी हे गणराज्य होते. वैशाली ही त्याची राजधानी होती. मगधचा राजा अजातशत्रूने लिच्छवी राज्य जिंकून ते मगधामध्ये विलीन करून घेतले. वत्स महाजनपदाचा विस्तार हा उत्तर प्रदेशातील प्रयागच्या आसपासच्या प्रदेशात झालेला होता. कोसम म्हणजेच प्राचीन काळाचे कौशांबी होईल. हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. कौशांबीतील तीन अत्यंत श्रीमंत व्यापाऱ्यांनी गौतम बुद्ध आणि त्यांचे अनुयायी यांच्यासाठी तीन विहार बांधले होते. राजा उदयन हा गौतम बुद्धांचा समकालीन होता. राजा उदयन नंतर वत्स महाजन पदाचे स्वतंत्र अस्तित्व फार काळ टिकले नाही. ते अवंती महाजन पदाच्या राजाने जिंकून घेतले. प्राचीन भारताच्या इतिहासात पदांची स्थान हे महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. या काळातील जनपदांच्या उदयातूनच सार्वभौम सत्ता ह्या आकाराला आल्या. त्याच्या प्रदेशांमध्ये या सत्तांचा मोठा विस्तार घडून आला. अनेक वैभव संपन्न असे राज्य देशांमध्ये आकाराला आले.

## ५.१० मौर्य कालखंडातील राज्य

मौर्य साम्राज्याची स्थापना साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याने केली. चाणक्याने चंद्रगुप्त मौर्यच्या मदतीने धनानंदची जुलमी सत्ता मोडून काढली. दरम्यान, अलेक्झांडर या ग्रीक सम्राटाने बियास नदी ओलांडून भारतावर स्वारी केली होती. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्यात फूट पडली व त्याच्या क्षत्रपांनी (प्रांतशासक) आपापली अनेक वेगवेगळी विखुरलेली राज्ये तयार केली. या पार्श्वभूमीवर मौर्य साम्राज्याची माहिती घेतल्यास, ते चार प्रांतात विभागले गेल्याचे दिसते. अशोकाच्या शिलालेखांच्या अनुसार प्रांतांची नावे तोसली (पूर्वेकडील), उज्जैन (पश्चिमेकडील), सुवर्णनगरी (दक्षिणेकडील) व तक्षशिला (उत्तरेकडील) ही होती. प्रांतीय प्रशासनाचा प्रमुख हा कुमार (राजपुत्र) असे. तो राजाचा प्रतिनिधी म्हणून प्रांतावर राज्य करत असे. राजपुत्राला सहाय्यक म्हणून महाअमात्य व मंत्र्यांची समिती असे. अशीच शासनव्यवस्था साम्राज्याच्या स्तरावरदेखील असे. प्रशासनाचा प्रमुख म्हणून सम्राट तर त्यास साहाय्य करण्यासाठी मंत्रिपरिषद असे.

मौर्य साम्राज्याचे सैन्य हे त्याकाळचे सर्वांत मोठे सैन्य होते. या साम्राज्याकडे ६,००,००० पायदळ, ३०,००० घोडदळ व ९,००० लढाऊ हत्ती होते. हेरगिरीचा विभाग अंतर्गत व बाह्य सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा करत असे. अशोकाने जरी युद्ध व विस्तारास आळा घातला तरी त्याने त्याचे सैन्य शांतता व सुरक्षितता यांसाठी कायम ठेवले.

मौर्य साम्राज्याच्या आधिपत्याखाली एकछत्री शासन आल्यामुळे अंतर्गत लढायांना आळ बसला व प्रथमच संपूर्ण भारताची अशी एकत्र आर्थिक व्यवस्था उदयास आली. चंद्रगुप्ताने संपूर्ण भारतभर एकच चलन स्थापित केले. त्याने भारतात शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना न्याय व सुरक्षा मिळावी म्हणून प्रांतीय नियंत्रकांचे व प्रशासकांचे जाळे निर्माण केले. मौर्य सैन्याने अनेक गुन्हेगारी टोळ्या, प्रांतीय खाजगी सैन्यांना पराभूत केले. फुटकळ जमीनदारांची राज्ये साम्राज्यात विलीन केली. भारतात अंतर्गत व्यापार या काळात नवीन राजकीय एकात्मता व अंतर्गत सुरक्षा यांमुळे मोठ्या प्रमाणावर वाढला. याचबरोबर मौर्य साम्राज्याने आंतरराष्ट्रीय व्यापारासही प्रोत्साहन दिले.

### ५.१०.१ सप्तांग सिद्धांत

मौर्यांच्या काळात कौटिल्यानेसप्तांग सिद्धान्त आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात सांगितलेला सिद्धान्त आहे. सप्तांग सिद्धान्त म्हणजे राष्ट्र किंवा राज्याच्या सात प्रकृती असे कौटिल्याने सांगितलेले आहे. मी -राजा (डोक), अमात्य – मंत्रिमंडळ (डोळे), राष्ट्र - भूप्रदेश व सीमा (बाहू), दुर्ग–किल्ले (हात), बल – सेना (बुद्धी), कोष – खजिना (तोंड), सुहृद – मित्रराष्ट्रे कौटिल्याच्या मते हे सर्व घटक महत्त्वाचे असून त्यापैकी एखादाही घटक दुर्बल असल्यास तो राज्यविनाशाला कारणीभूत ठरतो. स्वामी म्हणजे राजा हा केंद्रस्थानी असलेला महत्त्वाचा घटक आहे. इतर घटकांना बलवान करण्याची जबाबदारी त्याचीच आहे. चंद्रगुप्ताने आपल्या प्रशासन यंत्रणेत या सप्तांगांची काळजी घेतलेली होती. कौटिल्याने राज्याची अंतर्गत शासकीय व्यवस्था आणि त्याचे परराष्ट्रसंबंध यांविषयी सर्व दृष्टिकोनांचा आढावा घेणारे खंडनमंडनात्मक असे सविस्तर विवेचन या ग्रंथात केलेले आहे. कोणत्याही राज्याची स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश. दण्ड आणि मित्र अशी सात अंगे सांगून प्रत्येकाविषयी तपशीलवार विवेचन केले आहे. प्रजेला संतुष्ट ठेवून व धाकातही ठेवून राज्यकारभार कसा करावा आणि त्याकरिता उपर्युक्त सातही अंगांचे रक्षण कसे करावे, याचे व्यावहारिक भूमिकेतून त्या काळाला योग्य असे मार्गदर्शन केले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. सप्तांग सिद्धांतावर टीप लिहा.

## ५.११ सारांश

भारतामध्ये प्राचीन काळी राज्यशास्त्र ही एक ज्ञानाची शाखा अस्तित्वात आली. बृहस्पती, शुक्र, मनू, भीष्म, कौटिल्य यांच्या प्राचीन संस्कृत साहित्यात राज्याचे निर्दिष्ट केलेले आढळतात. कौटिलीय अर्थशास्त्र, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति व महाभारत (शांतिपर्व) या ग्रंथांत राजनीतीचे विवरण विशेष रूपाने प्रतिपादिले आहेत. प्राचीन काळी ज्या विविध ज्ञानशाखा होत्या, त्यांचे वर्गीकरण होऊन त्रयी, वार्ता, दंडनीती आणि आन्वीक्षिकी अशा या चार विद्या त्या वेळच्या शिक्षणाच्या कार्यक्रमात समाविष्ट झाल्या. वार्ता म्हणजे अर्थोत्पादक व्यवसायाचे तंत्रज्ञान. दंडनीती म्हणजे राज्यशास्त्र.

स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश, दंड व मित्र असे सप्तांग राज्य भारतीय राज्यशास्त्रात आवश्यक म्हणून गृहीत धरले आहे. राज्याची ही प्रकृती म्हणजे स्वरूप होय. ही राज्याची अंगे म्हणजे मानवी देहाच्या अंगांप्रमाणे म्हणजे इंद्रियांप्रमाणेच महत्त्वाची होत. स्वामी हा प्रथम निर्दिष्ट केलेला आहे. सार्वभौम सत्तेचा प्रतीक, दंडधारी म्हणजेच राजा वा संघमुख्य होय. हा राजा वा संघमुख्य धर्मरक्षण करतो. त्रयी म्हणजे वेद हे विधिनिषेधांच्या द्वारे धर्माधर्माचा बोध करून देतात. वेद हे अपौरुषेय आहेत. धर्माधर्म हे वेदांच्या द्वारे ठरतात. स्वामी म्हणजे राजा धर्माधर्म ठरवत नाही. धर्माची अंमलबजावणी म्हणजे प्रशासन हेच मुख्य स्वामीचे कार्य होय.

भारतीय दंडनीतीत म्हणजे राज्यशास्त्रात राजसत्ताक पद्धतीच गृहीत धरून राजनीती वर्णिलेली आहे. गणराज्याची कल्पनासुद्धा भारतीय नीतिशास्त्रात आहे आणि कौटिलीय अर्थशास्त्रातही आहे; परंतु कौटिलीय अर्थशास्त्र हे विजिगिषू आणि चक्रवर्ती बनू इच्छिणाऱ्या राजाचे प्रशासनशास्त्र आहे. भारतीय दंडनीतीचे किंवा राज्यशास्त्राचे महत्त्वाचे मौलिक तत्त्वज्ञान संक्षेपाने कौटिलीय अर्थशास्त्रात प्रारंभी सूत्ररूपाने मांडले आहे. महाभारतात भीष्मसुद्धा 'गणवृत्ति अध्यायात गणराज्य कसे वर्धिष्णू व सुस्थिर होईल, यांसंबंधी उपाय सांगतो. राजसत्ता असो अथवा गणसत्ता असो, स्वामी किंवा मुख्य याच्या आज्ञा प्रमाण मानल्याच पाहिजेत, असा सिद्धांत भीष्म सांगतो.

खेडे, शहर, तालुका, जिल्हा इ. स्तरांवरील नियोजन व व्यवस्थापन करणारी यंत्रणा म्हणजे स्थानिक प्रशासन होय. स्थानिक व्यवस्थांचे नियंत्रण त्या विभागातील अगर राज्यातील कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या संस्थांपुरते मर्यादित असते. स्थानिक प्रशासनाला लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने संस्थेचा कारभार सांभाळावा लागतो. अशा संस्थेच्या कामकाजासाठी राज्य तसेच देश पातळीवर कायदे केलेले असतात. स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रशासकीय व्यवस्था सर्वसामान्य नागरिकाचे सुख-समाधान हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर केलेली असते.

भारतीय अर्थव्यवस्था समृद्ध अशा ग्रामीण भागावर, विशेषतः खेड्यांवर, आत्मनिर्भर असल्याने या अर्थव्यवस्थेच्या स्थानिक प्रशासनाचे एक अविभाज्य अंग म्हणून ग्रामपंचायत ओळखली जात होती. प्राचीन काळी गाव आणि ग्रामपंचायती स्थानिक प्रशासनाच्या दृष्टीने स्वावलंबी व स्वयंपूर्ण होत्या. महाभारताच्या शांतिपर्वात ग्रामीण



munotes.in

शासनव्यवस्थेचे वर्णन केलेले आहे. तत्कालीन ग्राम शासनव्यवस्थेची जबाबदारी एका गाव-प्रमुखावर होती. त्याला ग्रामिक म्हणत. हे ग्रामप्रमुख ग्रामपंचायतींच्या सह-कार्याने ग्रामीण प्रशासनाची सर्व प्रशासकीय व्यवस्था पार पाडत असत. भारतात बहुतेक सर्व खेड्यापाड्यांतून ग्रामप्रमुखाचे पद अस्तित्वात असले, तरी त्यांना प्रदेशपरत्वे भिन्न नावे होती. उत्तर प्रदेशात ग्रामप्रमुखास गावन्डा म्हणत, तर महाराष्ट्रात त्याला पट्टलिका किंवा ग्रामुकुटा म्हणत.

वैदिक काळात ग्रामप्रमुखास ग्रामिणी, तर मौर्य काळात ग्रामिका म्हणत. ग्राम-प्रमुखाचे पद साधारणतः क्षत्रियांकडे असे. गावातील विविध स्थानिक जबाबदाऱ्यांबरोबरच ग्राम संरक्षणाची जबाबदारीही त्याला पार पाडावी लागे. तो ग्राम संरक्षण दलाचा प्रमुख असे. लष्करी प्रशासनाचा प्रमुख या नात्याने ग्रामीण जनता व राजा यांच्या मध्यस्थाची भूमिका ग्रामप्रमुखाला पार पाडावी लागे. स्थानिक प्रशासनाचा प्रमुख या नात्याने त्याच्याकडे अन्य अनेक कामे असत. यांमध्ये प्रामुख्याने ग्रामसभेची बैठक व तिचे अध्यक्षस्थान भूषविणे, चोर, लुटारू व दरोडेखोरांपासून गावाचे संरक्षण करणे, गावातील विविध जाती-धर्माच्या लोकांमध्ये एकता प्रस्थापित करणे, स्थानिक जनता व राजा किंवा मध्यवर्ती सत्ता यांच्यात मध्यस्थाची भूमिका पार पाडणे, त्यांच्याशी पत्रव्यवहार करणे इ. प्रशासकीय कामांचा अंतर्भाव होत असे.

## ५.१२ स्वध्यायावर आधारित प्रश्न

१) प्राचीन भारतातील राज्यसंस्थेचा उदयाचा इतिहास प्रतिपादन करा.
२) प्राचीन भारतीय राज्यसंस्थाची माहिती द्या.
३) राज्य उत्पत्ती विषयक विविध सिद्धांत सांगा.
४) सप्तांग सिद्धांतावर टीप लिहा.

## ५.१३ संदर्भ - ग्रंथ


1. Alterkar, A. S. State and Government in Ancient India, Delhi, 1958.
2. Cassirer, Ernest, The Myth of the State, London, 1965,
3. Geltell, Raymond, G. History of Political Thought, London, 1951.
4. Jayaswal, K. P. Hindu Polity, Bangalore, 1967.
5. Laski, H. J. The State in Theory and Practice, London, 1935.
6. States in India, Maharshi Dayanand University, ROHTAK, 2003


❖❖❖❖

# ६

# दक्षिण भारतातील प्राचीन राज्यव्यवस्था

**घटक रचना**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ दक्षिण भारतातील प्राचीन राज्य संकल्पना

६.३ दक्षिण भारतातील काही प्राचीन राज्य व त्यांची शासनव्यवस्था

६.४ दक्षिण भारतातील अन्य प्राचीन राज्याची शासनव्यवस्था

६.५ सारांश

६.६ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

६.७ संदर्भ ग्रंथ

## ६.० उद्दिष्टे

- दक्षिण भारतातील प्राचीन राज्य संकल्पना समजून घेणे
- दक्षिण भारतातील प्राचीन राज्य व त्यांची राजकीय व्यवस्था (चेर, चोल, पंड्या) अवगत करून घेणे
- दक्षिण भारतातील प्राचीन प्रांतीय राज्य व्यवस्था समजून घेणे

## ६.१ प्रस्तावना

उत्तर भारता एवढाच दक्षिण भारताचा इतिहास प्राचीन आणि दैदिप्यमान आहे. कोणत्याही सामाजिक आणि राजकीय संस्थेच्या बाबतही हे खरे आहे. भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या बाबतही खरे आहे. कोणत्याही राज्याच्या उन्नतीसाठी भौतिक साधनाबरोबर राजकीय व्यवस्था ठीक असणे महत्वाचे असते. दक्षिण भारत सर्व प्रकारच्या भौतिक संसाधनाच्या बाबतीत प्राचीन काळापासून आघाडीवर होता. राज्य आणि त्याची व्यवस्था ठेवण्याबरोबरच धातू विज्ञान आणि त्याचा वापर या बाबतही दक्षिण भारत आघाडीवर होता. हे सर्व घडण्यासाठी मानव आणि त्याचा समाज एका प्रशासकीय यंत्रणेचा भाग होणे आवश्यक आहे. यावरून दक्षिण भारतात राजकीय व्यवस्था प्राचीन असल्याचे दिसते.

munotes.in

दक्षिण भारतात द्रविड वंशाचे व संस्कृतीचे लोक प्रामुख्याने सापडतात. द्रविड हे एकसंघ नसून त्यांच्या दोन शाखा होत्या. एक तमिळ बोलणारे आणि दुसरे मुंडारीसारख्या भाषा बोलणारे कोलेरियन समुदाय होत. दख्खन आणि दक्षिण भारतामध्ये द्रविड भाषागट प्रामुख्याने आढळून येतो. द्रविडांची प्राचीन भाषा जरी तमिळ आहे, तरी कन्नड, मल्याळम्, तेलुगू त्याचप्रमाणे कुई-गोंडी, कुई आणि ओराडम हेही द्रविड भाषेचे आविष्कार मानले जातात. प्राचीन द्रविडांत राज्यसंस्था होती. राजे भरमक्कम सुसंरक्षित वास्तूंमध्ये राहून छोट्या छोट्या विभागांवर राज्य करीत असत. दक्षिणेतील प्राचीन राजसत्तांमधील तीन राजसत्तांचा उल्लेख तत्कालीन साहित्यामध्ये येतो. चेर,पांड्या आणि चोळ या त्या राजसत्ता होत. या राजसत्ता इसवी सनापूर्वीच्या चौथ्या शतकात किंवा त्याही पूर्वीपासून अस्तित्वात होत्या असे पुराव्याधारे म्हणता येते. त्यांचा उल्लेख रामायण, महाभारत या प्राचीन महाकाव्यांमध्ये सापडतो. तमिळ भाषेतील संघम या प्राचीन साहित्यात या तीन राजसत्तांचा उल्लेख आलेला आहे. मौर्य सम्राट अशोकाच्या लेखांमध्येही त्यांचा उल्लेख आहे. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या पुस्तकात 'मुझिरीस' हे केरळच्या किनाऱ्यावरचे अत्यंत महत्त्वाचे बंदर असल्याचे म्हटले आहे. हे बंदर चेर राज्यात होते. मुझिरीस या बंदरातून मसाल्याचे पदार्थ, मोती, मौल्यवान रत्ने इत्यादी वस्तूंची इटलीमधील रोमकडे आणि पश्चिमेकडील इतर देशांकडे निर्यात होत असे. बंदर व्यवस्थापन असणे यासाठी सक्षम अशा राजकीय व्यवस्थेची उपलब्धी आवश्यक असते. या वरूनही दक्षिण भारतातील प्राचीन राज्यसंस्थेची कल्पना येऊ शकते.

पांड्य राज्याचा विस्तार आजच्या तमिळनाडूमध्ये होता. तेथील उत्कृष्ट दर्जाच्या मोत्यांना खूप मागणी होती. मदुराई ही पांड्य राज्याची राजधानी होती. प्राचीन चोळांचे राज्य तमिळनाडूतील तिरूचिरापल्लीच्या आसपासच्या प्रदेशात होते. यावरून या चेर, चोल, पंड्या राज्याची आपली एक राज्य व्यवस्था असल्याचे दिसते. प्रादेशिक, प्रांतीय आणि केंद्रीय राज्यव्यवस्था असल्याशिवाय कोणतेही राज्य तयार होत नसते. त्यात दळणवळण, चलनवलन, अंतर्गत आणि बहिर्गत व्यापार व त्याचे नियम महत्वाचे असतात.

दक्षिण भारतातील जनजीवनावर आणि राजकीय व्यवस्थेवर संगम साहित्य सर्वात जास्त प्रकाश टाकते. या संगम साहित्यात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास पाहता येतो. इसवी सन पूर्व पहिल्या शतकात दक्षिणेत सातवाहन, वाकाटक, चोल, चेर, पांड्या यांच्या राज्याचा उद्धव झाल्याचे संगम साहित्यातून स्पष्ट होते. चोल, चेर, पांड्या या तीन मोठ्या राज्यांच्या सोबतच दक्षिणेमध्ये अनेक लहान लहान राज्य सुद्धा राज्य करत असलेली आपल्याला दिसतात. त्याला 'राज्य कुल संघ' असे म्हटल्याचे दिसते. दक्षिण भारतात वंश आधारित राजकीय व्यवस्था प्रचलित असल्याचे दिसते. उत्तराधिकारासाठी युद्ध झाल्याचेही दिसते. राजा सर्वशक्तिमान होता राजा. बुद्धिमान मंत्री आणि कवी यांच्या प्रभावाने राजाचे निरंकुश अधिकार अबाधित असल्याने तो राज्य करत असलेला दिसतो. साधारणता या काळातील जनता सुखी असल्याचे समकालीन साहित्यातून दिसते. राजाची आज्ञापालन करणे जनतेचे कर्तव्य होते. राजाने आपल्या प्रजेचे स्वतःच्या मुलाप्रमाणे रक्षण करावे असे संकेत होते. राज्याचे अस्तित्व शेतीवर

आधारित होते. जनतेमध्ये अशी धारणा होती की, निसर्गातील ऋतु नियम राजा सक्षमपणे संभाळतो आहे. राजाची सर्वोच्च न्यायालय व्यवस्था 'मनरम' ही होती. याशिवाय ग्रामीण सामाजिक आणि धार्मिक समस्यांचं समाधान करण्यासाठीसुद्धा 'मनरम' अस्तित्वात होती

## ६.२ दक्षिण भारतातील प्राचीन राज्य संकल्पना

दक्षिण भारतातील प्राचीन साहित्य म्हणजे संगम साहित्य. संघम् वाङ्मय, ताम्रपट, शिलालेख इत्यादींवरून प्राचीन ऐतिहासिक काळातील दक्षिणेतील राज्यवस्था कशी होते, ह्याची बरीचशी माहिती मिळते. जुन्या तमिळमधील प्रचारातील शब्दसंहती अभ्यासल्यास राजा, राज्यसत्ता, प्रशासन व कायदेकानू त्या काळी अस्तित्वात असल्याचा पुरावा मिळतो. सक्षम राजसंस्था अस्तित्वात असल्याचा पुरावा संघम् वाङ्मयातही दिसून येतो. राजा एकतंत्री-एकछत्री असे, त्याला सल्ला देण्याकरिता एक मंत्रिमंडळही असे. राजाचा खजिना, सैन्य, जमीन-महसूल, निरनिराळ्या जकाती व युद्धांतील लूट ह्यांनी भरला जाई. अशा तऱ्हेची राज्यव्यवस्था ग्राम हे घटक धरून अंमलात आणली गेली होती. सर्वोच्च अधिकार राजाचा असला, तरी तमिळ वाङ्मयामध्ये सभामंडपांचा उल्लेख असल्याने गावकऱ्यांनी एकत्र जमण्याच्या ग्रामपरिषद अथवा पंचायती यांसारखी काही व्यवस्था असावे असे दिसते. परंतु ग्रामसभेवर एक राज्यसभा असे आणि तिला न्यायदानाचे विस्तृत अधिकार असावेत.

राज्याच्या संरक्षणात रक्षकांशिवाय सैन्याचाही वाटा मोठा असे. युद्धतंत्रही प्रगत स्वरूपाचे होते. संघम् वाङमयातील एका प्राचीन काव्यामध्ये प्राकार, खंदक, गोपुरे, बुरूज इत्यादींचे उल्लेख आलेले आहेत. सैन्यात चार दले होती, त्यांमध्ये घोडे आणि हत्ती ह्यांना बरेच महत्त्व होते. संघम् वाङ्मयातील एका महाकाव्यात एका प्रचंड सैनिकी तळाचे वर्णन आले आहे. त्यानुसार सैन्याची छावणी विविध तऱ्हेच्या तंबूंची उभारलेली असे. राजाकरिता वेगळा विभाग असून त्यावर हत्यारी स्त्रियांचासुद्धा पहारा असे. युद्धामध्ये पराजितांची जनावरे अथवा त्यांचे नगारे विजयचिन्हे म्हणून पळविले जात असत.

आधीच्या काळामध्ये जरी ग्रामसभा होती, तरी नंतरच्या काळामध्ये ही व्यवस्था बदलली असे दिसते. उत्तरेतील आर्यांच्या संपर्कामुळे नंतरच्या काळामध्ये दक्षिण भारतात ऊर, सभा आणि नगरम् अशा तीन परिषदा अस्तित्वात आल्या. यांतील 'सभा' ही फक्त ब्राह्मणांची असे. 'ऊर' गावातील सर्व भूधारकांची असे, तर 'नगरम्' ही बहुधा व्यापाऱ्यांची असे. ह्याचाच अर्थ असा, की नंतरच्या काळामध्ये व्यवसाय, जात, शेती आणि आर्थिक स्थिती ह्यांना प्राधान्य मिळाले. ते काही जरी असले, तरी ग्रामपरिषदेकडे पाणिपुरवठा, कालवे, रस्ते आणि विद्यालये व देवालये यांची बांधणी त्याचप्रमाणे कर गोळा करणे इ. महत्त्वाची कामे असत. ग्रामाशिवाय राष्ट्र, नाडू, कोट्टम, विषय, वळनाडू अथवा मंडलम् इत्यादी राज्यकाराभाराचे विविध घटक होते. ह्या सर्वांवर राजातर्फे देखभाल करण्याकरिता अधिकारी नेमलेले असत. ह्याशिवाय बेलिफ, खजिनदार, भूमापन अधिकारी इ. प्रकारचे आधिकारी नेमले जात.

munotes.in

दक्षिण भारतात ही कुटुंबापासूनच समुदाय व गट बनतात. हीच द्रविडांची कुटुंबपद्धती मातृसत्ताक होती, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. परंतु पल्लव काळापासूनच राजानंतर त्याचा थोरला मुलगा गादीवर येण्याची पद्धती अनुसरली जात असल्याचा पुरावा मिळतो. राजकन्यांचे स्थान काय असावे, याबद्दल प्राचीन द्रविड वाङ्मयात माहिती मिळत नाही. परंतु राज्यकारभारात नसले, तरी इतर क्षेत्रांमध्ये राजाइतकेच राणीलाही महत्त्व असे, असे दिसते. असे साधारणपणे प्राचीन दक्षिण राजकीय व्यवस्थेविषयी म्हणता येईल.

**आपली प्रगती तपासा**

१. दक्षिण भारतातील प्राचीन राज्य संकल्पना स्पष्ट करा.

## ६.३ दक्षिण भारतातील काही प्राचीन राज्य व त्यांची शासनव्यवस्था

**सातवाहन राजघराणे (इ. स. पू. सु. २रे शतक ते इ. स. ३रे शतक)**

मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तर भारताप्रमाणेच महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक या प्रदेशांतील स्थानिक राजे स्वतंत्र झाले. त्यांनी छोटी छोटी राज्ये स्थापन केली. त्यांपैकी एक सातवाहन घराणे होते. प्रतिष्ठान म्हणजेच पैठण ही त्यांची राजधानी होती. राजा सिमुक हा सातवाहन घराण्याचा संस्थापक होता. पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळच्या नाणेघाटातील लेण्यात असलेल्या कोरीव लेखांमध्ये या घराण्यातील महत्त्वाच्या व्यक्तींची नावे आहेत. काही सातवाहन राजे त्यांच्या नावाआधी आईचे नाव लावत असत. उदा., गौतमीपुत्र सातकर्णी. सातवाहन घराण्यातील गौतमीपुत्र सातकर्णी हा राजा विशेष प्रसिद्ध आहे. त्याच्या पराक्रमांचे वर्णन नाशिक येथील लेण्यांमधील कोरीव लेखामध्ये केलेले आहे. त्याने शक राजा नहपान याचा पराभव केला.

सातवाहन राजांनी मौर्य राजांच्या आदर्शांवर आपला कारभार चालवला. शासनाचे स्वरूप राजेशाही होते. सम्राट हा प्रशासनाचा सर्वोच्च अधिकारी होता. त्याचा त्याच्या दैवी उत्पत्तीवर विश्वास होता. नाशिकच्या शिलालेखात गौतमीपुत्र सातकर्णीची तुलना अनेक देवांशी करण्यात आली आहे.

सातवाहन राजे शकांच्या आधारे 'राजन', 'राजराज', 'महाराजा', 'स्वामीन' अशा पदव्या धारण करत. राण्यांना 'देवी' किंवा 'महादेवी' ही पदवी धारण केली जात असे.

राजांची नावे जरी मातृवंशीय असली तरी वारसाहक्क पुरुष वर्गापुरता मर्यादित होता आणि वंशपरंपरागत होता असे दिसते. काहीवेळा राजाच्या मृत्यूनंतर, जर त्याचा मुलगा अल्पवयीन असेल, तर त्याच्या भावाला राजेपद देण्यात आले. या काळातील दोन राण्या - नागनिका (शातकर्णी / ची राणी) आणि गौतमीबालाश्री (गौतमीपुत्र शतकर्णीची आई) यांनी प्रशासनात सक्रिय सहभाग घेतला. पण अशी उदाहरणे अपवाद म्हणून घेतली पाहिजेत. बादशहाला मदत करण्यासाठी 'अमात्य' नावाचा अधिकारी वर्ग होता. गौतमीपुत्र आणि त्याचा मुलगा पुलुमावी यांनी 'महासेनापती' नावाचा उच्च अधिकारी नेमला होता, परंतु त्यांच्या कार्याची माहिती तत्कालीन लेखनातून मिळत नाही.

सातवाहन काळात कदाचित काही सेनापती साम्राज्याच्या बाह्य प्रदेशांची देखरेख करण्यासाठी आणि काही केंद्र सरकारच्या खात्यांवर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त केले गेले. स्थानिक सरकार बहुतेक सरंजामदारांकडून चालवले जात असे. कार्ले आणि कान्हेरीच्या लेखनात 'महारथी' आणि 'महाभोज' यांचा उल्लेख आढळतो. हे मोठे सरंजामदार होते आणि त्यांना आपापल्या प्रदेशासाठी नाणी कोरून घेण्याचा अधिकार होता. पश्चिम घाटाच्या वरच्या भागात, उत्तर कोकणात महारथी आणि महाभोज हे सरंजामदार होते. त्यांचे पद वंशपरंपरागत होते. या सरंजामदारांचे हक्क अमात्यांपेक्षा जास्त होते आणि ते त्यांच्या हक्कातून जमीन दान करू शकत होते.

प्रशासनाच्या सोयीसाठी, साम्राज्याची अनेक विभागांमध्ये विभागणी केली गेली, ज्यांना 'अहरस' म्हणतात. प्रत्येक अहराखाली एक महामंडळ (मध्यवर्ती शहर) आणि अनेक गावे होती. लेखांमध्ये गोवर्धन, सोपारा, मामाळ, सातवाहन इत्यादी आहाराची माहिती दिली आहे. प्रत्येक आहार एका अमात्याद्वारे नियंत्रित केला जात असे.

गौतमीपुत्र शतकर्णी आणि पुलुमावी यांच्या काळात, विष्णुपालित गोवर्धन आहारावर श्यामक आणि शिवस्कंददत्त यांनी आळीपाळीने राज्य केले. राजधानीत राहून सम्राटाची सेवा करणाऱ्या अमात्यांना 'राजमात्या' असे म्हणतात.

सातवाहन खात्यांमधून प्रशासनातील इतर काही अधिकाऱ्यांची नावेही आढळतात, जसे की - भांडारीक (कोषाध्यक्ष), राजुक (महसूल विभागाचे प्रमुख), पाणीघरक (शहरांतील पाणीपुरवठा व्यवस्थापित करणारे अधिकारी), कर्मंतिका (पाणी पाहण्यासाठी). इमारतींचे बांधकाम. वाला), कमांडर इ.आहाराच्या तळाशी गावं होते. प्रत्येक गावाचे नेतृत्व एक 'ग्रामिक' करत असे जो गावाच्या कारभारासाठी जबाबदार होता. अलीकडच्या 'गाथासप्तशती'मध्ये ग्रामिक (ग्रामणी) चा उल्लेख आढळतो. त्यांच्या अधिपत्याखाली पाच ते दहा गावे होती. 'गाहपती' हा शब्द काही लेखांमध्ये आढळतो. तो बहुधा काही शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा प्रमुख होता. शहरांचा कारभार 'निगम सभे'मार्फत चालविला जात असे. भारुकच्छा (भरुच), सोपारा, कल्याण, पैठण, गोवर्धन, धनकटका इत्यादी शहरांची नावे लेखांमध्ये आढळतात. यापैकी काही प्रसिद्ध व्यापारी केंद्रे होती.

महापालिकेच्या सभेत स्थानिक लोकप्रतिनिधींचे वास्तव्य होते. गावे आणि महामंडळांना स्वराज्यासाठी पुरेसे स्वातंत्र्य दिलेले दिसते. नाशिक प्रशस्ती सातवाहनांच्या राजवटीवर काही प्रकाश टाकते. गौतमीपुत्र हा एक आदर्श शासक होता हे आपल्याला माहीत आहे."तो नेहमी इतरांना संरक्षण देण्यासाठी तत्पर असायचा, गुन्हेगारी शत्रूला मारण्यातही त्याला रस नव्हता, प्रजेच्या सुख-दु:खाला तो आपले सुख-दु:ख मानत असे, स्मृतीपुस्तकांतील नियमांचे पालन त्याने केले. त्याच्या प्रजेवर कर." या ओळींवरून हे स्पष्ट होते की सातवाहन राजा प्रजावत्सल होता आणि त्याची कारकीर्द दया आणि उदारतेने परिपूर्ण होती. त्यांनी या भागात मौर्यांचे पालन केले. सातवाहन राजांनी ब्राह्मण आणि श्रमणांना जमीन दान करण्याची प्रथा सुरू केली. अशी जमीन सर्व प्रकारच्या करांपासून मुक्त होती. काळाच्या ओघात, अशाच प्रकारच्या अनुदानांनी सरंजामशाहीच्या विकासाला हातभार लावला. यामुळे केंद्रीय नियंत्रण सैल झाले.

**चेर वंश (इसचे १ले ते १३ वे शतक)**

चेर हा दक्षिण भारतातील एक प्राचीन राज वंश होय. चेरचा केरळ या नावांनीही प्राचीन वाङ्मयात उल्लेख आढळतो. इ. सं. ३०० ते ९०० च्या दरम्यान मलबार किनाऱ्यावर चेरांचे राज्य भरभराटीत होते. चोल, पांड्य व चेर या तीन राजवंशांची सत्तास्पर्धा त्या काळी चालू होती. त्या सत्तास्पर्धेचा एक भाग म्हणून इ. स. पू. पहिले शतक ते इ. स. चे पहिले शतक या कालखंडात चोलांनी चेरांवर वर्चस्व स्थापिले होते; मात्र त्यानंतर चेर बलवान झाले.

राज्याचे कारभाराच्या सोईसाठी चेर राजांनी पाच जिल्ह्यांत (नाडुंत) भाग पाडले होते. ते अनुक्रमे पूळी, कुडम, कुड्डम, बेन व कर्क या नावांनी ओळखले जात. त्यांची राजधानी वंजी, कची किंवा करुवूर व शेवटी तिरुवरिकलमलै असावी असे उपलब्ध साहित्यावरून दिसते.

केरळचे पुत्र म्हणून ओळखले जाणारे हे राज्य, आधुनिक कोकण, मलबार किनारी प्रदेश, उत्तर त्रावणकोर आणि कोचीपर्यंत विस्तारलेले, सिंह वंशाचे प्रतीक धनुष्य होते. उदयन जेरल हे या घराण्याचे पहिले शासक होते. असे म्हणतात की त्यांनी महाभारताच्या युद्धात भाग घेतलेल्या वीरांना खाऊ घातले होते. उदयन जेरल यांनी एक मोठे स्वयंपाकघर बांधले होते. उत्तर दिशेला चढून गंगा पार करणाऱ्या सेनगुट्टुवनला लोभी असेही म्हटले जाते, याचे कवी पारनार यांनी कौतुक केले आहे. तो कौमार्य देवीच्या उपासनेशी संबंधित पॅटिनी पंथाचा संस्थापक होता. अदिग इमान नावाच्या चेरा शासकाला दक्षिणेत उसाची लागवड सुरू करण्याचे श्रेय जाते. नेदून गेरल अधनने मरांडे यांना आपली राजधानी बनवली, त्याने इमयावरंबन ही पदवी धारण केली, याचा अर्थ हिमालयाच्या सीमेवर आहे. यावरून चेर प्रशासनाची कल्पना येते. या प्रशासनाच्या धाटणीवरून राज्याच्या स्वरुपाची कल्पना येते. भक्कम अशा प्रशासनाच्या बळावरच चेर वंशाने जवळ जवळ अकराशे ते बाराशे वर्षे राज्यकारभार केला.

**वाकाटक राजघराणे (इ.स.चे ३रे ते ६वे शतक)**

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीस सातवाहनांची सत्ता क्षीण झाली. त्यानंतर उदयाला आलेल्या राजघराण्यांमध्ये वाकाटक हे एक सामर्थ्यशाली राजघराणे होते. वाकाटकाने तिसऱ्या शतकाच्या मध्यापासून सहाव्या शतकापर्यंत राज्य केले. वाकाटक राजघराण्याच्या संस्थापकाचे नाव 'विंध्यशक्ति' असे होते. विंध्यशक्तीनंतर पहिला प्रवरसेन हा राजा झाला. प्रवरसेनानंतर वाकाटकांचे राज्य विभागले गेले. त्यातील दोन शाखा प्रमुख होत्या. पहिल्या शाखेची राजधानी नंदीवर्धन (नागपूरजवळ) येथे होती. दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म म्हणजे सध्याचे वाशिम (जिल्हा वाशिम) येथे होती.

वाकाटकांच्या बाबतीत, त्यांच्या प्रशासकीय रचनेबद्दल कमी माहिती उपलब्ध आहे. वाखाटकाचे साम्राज्य देखील राष्ट्र किंवा राज्य नावाच्या प्रांतांमध्ये विभागले गेले होते, जे राज्याधिकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यपालांद्वारे प्रशासित होते.प्रांतांचे पुढे विषयांमध्ये विभाजन करण्यात आले, जे पुन्हा अहार आणि भोग/भुक्तीमध्ये विभागले गेले. सर्वाध्यक्ष नावाचा अधिकारी बहुधा कुलपुत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अधीनस्थ अधिकाऱ्यांना नियुक्त आणि निर्देशित करतो. ग्रामकुट हे गाव प्रशासनाचे प्रमुख होते.कालिदासाने विदर्भाचे वर्णन सौराज्य-रम्य (चांगल्या शासनाद्वारे आकर्षक) असे वाकाटकांच्या उत्कृष्ट प्रशासनाला आदरांजली वाहणारे म्हणून केले.अजिंठा लेणी शिलालेख स्पष्टपणे सांगतो, वाकाटकांचे मंत्री, त्यांच्या चांगल्या शासनामुळे, लोकांसाठी नेहमीच प्रिय आणि सुलभ बनले.

**चालुक्य राजघराणे (इ.सं.चे ६वे ते १२ वे शतक)**

कर्नाटकातील चालुक्य राजघराण्याची सत्ता बलशाली होती. वाकाटकानंतर प्रबळ झालेल्या सत्तांमध्ये कदंब, कलचुरी इत्यादी सत्तांचा समावेश होता. त्या सर्वांवर चालुक्य राजांनी वर्चस्व प्रस्थापित केले. पहिला पुलकेशी याने इसवी सनाच्या सहाव्या शतकात चालुक्य घराण्याची स्थापना केली. कर्नाटकातील बदामी येथे त्याची राजधानी होती. बदामीचे प्राचीन नाव 'वातापि' असे होते. चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याने सम्राट हर्षवर्धनाचे आक्रमण परतवून लावले होते. बदामी, ऐहोळे, पट्टदकल येथील प्रसिद्ध मंदिरे चालुक्य राजांच्या कारकिर्दीत बांधली गेली.

वातापीच्या चालुक्यांच्या निरंकुश राजेशाहीने आपल्या सम्राटांचे रक्षण केले. चालुक्य राजाला अनंत अधिकार असले तरी त्याचा वापर फक्त सार्वजनिक हितासाठी केला जात होता. परंतु प्रबळ अशा मंत्रिमंडळासारख्या संस्थेची माहिती चालुक्यच्या कोणत्याही अभिलेखात मिळत नाही. त्यात कोणत्याही मंत्र्याचा उल्लेख नाही, पण राजांच्या 'मनरोत्साह' या नीतीच्या वापराचे वर्णन आढळते. मंत्राच्या अधिपत्याखाली राजा वेळोवेळी अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करूनच काम करीत असे. चालुक्य राजे त्यांच्या राज्यात फिरून सरकारची स्थिती जाणून घेत याची पुरेशी माहिती मिळते. युद्धाच्या प्रसंगी ते युद्धाचे नेतृत्व करायचे. केंद्रीय सत्तेपासून दूर राहूनही ते तिथल्या शासनावर नजर ठेऊन

munotes.in

होते. सोयीसाठी त्याच्या जागी राजपुत्र वगैरे बसवत जेणेकरून केंद्र सरकार दुर्लक्षित राहू नये म्हणून ते काळजी घेत. राजा आपल्या भावाच्या किंवा इतर कोणत्याही नातेवाईकाकडे राज्यकारभार सोपवत असे.

**पल्लव राजघराणे (इ.स.चे ३रे ते ८वे शतक)**

पल्लव राजसत्ता दक्षिण भारतातील एक प्रबळ राजसत्ता होती. तमिळनाडूतील कांचीपुरम ही त्यांची राजधानी होती. महेंद्रवर्मन हा एक कर्तबगार पल्लव राजा होता. त्याने पल्लव राज्याचा विस्तार केला. तो स्वतः नाटककार होता. महेंद्रवर्मनचा मुलगा नरसिंहवर्मनने चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याचे आक्रमण परतवून लावले. पल्लव राजांचे आरमार प्रबळ आणि सुसज्ज होते. त्यांच्या काळात भारताचा आग्नेय आशियातील देशांशी जवळचा संबंध आला. देशांतर्गत आणि देशाबाहेरील व्यापार भरभराटीला आला. युआन श्वांग याने कांचीला भेट दिली होती. त्यांच्या राज्यात सर्व धर्मांच्या लोकांना सहिष्णुतेने आणि न्यायाने वागवले जाई, असे त्याने म्हटले आहे.

पल्लव शासनव्यवस्थेत राजकुमारांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात येत होती. पल्लव शासनव्यवस्थेत महामात्र महत्त्वपूर्ण अधिकारी होता. मंत्र्याशी प्रशासकीय व्यवहार करण्याचा अधिकार या अधिकाऱ्याला होता. पल्लव शासनव्यवस्थेत मंत्र्यांना महत्त्वाचे स्थान होते. राजाला सल्ला देण्यासाठी मंत्र्यांना बोलवत असत. मंत्र्याचे अर्थखाते देखील होते. महामांत्रा स्वामी प्रशासकीय व्यवहार ठेवत असत. मंत्र्याची नियुक्ती त्यांची हुशारी, कुशाग्रता, मैत्रीपूर्ण व्यवहार करणारा, गोड वाणी असणारा व वागणारा, अभ्यास व तसेच सर्व क्षेत्रात पारंगत व चांगल्या कुटुंबातील व्यक्ती पाहून होत असे. मंत्र्याच्या प्रमुखास प्रधानमंत्री ब्रह्मर्षी राज ही पदवी होती. तामीळमध्ये त्यास युवराज म्हणत असत. सैनिकी व्यवस्थेत सेनापती या अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वपूर्ण होती. वल्लभ हा गोपनीय प्रशासनाचा प्रमुख अधिकारी होता. राजाला गुप्त त्यासंबंधीची माहिती तो पुरवत असे. तर गोवल्लभा गुराखी प्रमुख होता. अरण्य आधिकृत वन विभागाचा प्रमुख होता. गुलामी हा विभाग सेनापती म्हणून काम पाहत असे.

**राष्ट्रकूट राजघराणे (इ.सं.६वे ते १३वे शतक)**

राष्ट्रकूट राजघराण्याच्या भरभराटीच्या काळात त्यांची सत्ता विंध्य पर्वतापासून ते दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत पसरलेली होती. दन्तिदुर्ग या राजाने प्रथम त्यांची सत्ता महाराष्ट्रात स्थापन केली. कृष्ण राजा पहिला याने वेरूळचे सुप्रसिद्ध कैलास मंदिर खोदवले. आतापर्यंत आपण प्रामुख्याने प्राचीन भारतातील विविध राजकीय सत्तांची माहिती घेतली. या राज्यांचा कारभार उत्तरेकडील गुप्त व हर्षा आणि दख्खनमधील चालुक्यांच्या कारभाराच्या आधारे आयोजित करण्यात आला होता.पूर्वीप्रमाणेच सम्राट शक्ती आणि सर्व क्रियाकलापांचे केंद्र होते. ते मुख्य प्रशासक तसेच लष्करप्रमुख होते. तो अतिशय आलिशान दरबारात बसायचा. दरबाराला लागून असलेल्या प्रांगणात त्याचे पायदळ आणि घोडदळाचे सैनिक राहत होते. युद्धादरम्यान पकडलेले घोडे आणि हत्ती त्याच्यासमोर कूच केले गेले. जहागीरदार सरदार, त्यांचे सरदार, राजपूत आणि अनेक

उच्च अधिकारी त्याच्या दरबारात शोभून होते आणि त्याचे पालन करण्यास तयार होते. न्यायाचे कामही राजाच्या हाती होते. न्यायालय हे केवळ राजकीय कामकाजाचे केंद्र नव्हते तर न्याय आणि सांस्कृतिक जीवनाचेही केंद्र होते. कुशल संगीतकार आणि नर्तकही दरबारात राहत. विशेष प्रसंगी मजघरातील बायकाही दरबारात येत असत. अरब लेखकांच्या मते राष्ट्रकूट साम्राज्यात अशा स्त्रिया पर्दा घालत नव्हत्या.

राजाचे स्थान सामान्यतः वंशपरंपरागत होते. परंतु काही प्रसंगी घराण्यातील राज्य करणाऱ्या सरदारांद्वारे राजा निवडला जात असे. असे मानले जाते की राजा वैयक्तिकरित्या आणि त्याचे स्थान दोन्ही दैवी आहेत. काही धर्मग्रंथानुसार राजा हा देवाचा अवतार मानला जातो आणि त्याच्यात विविध देवतांची वैशिष्ट्ये असल्याचेही मानले जात होते. या कालखंडात रचलेल्या पुराणातील एका कथेत सांगितले आहे की ब्रह्मदेवाने इंद्राचे मस्तक, अग्नीचे शौर्य, यमाचे निर्दयीपणा आणि चंद्राचे सौभाग्य घेऊन राजाचे शरीर निर्माण केले.

त्या काळातील अस्थिरता आणि असुरक्षितता हे समकालीन विचारवंतांनी राजाप्रती पूर्ण निष्ठा आणि आज्ञाधारकतेवर भर देण्याचे एक कारण असू शकते. त्या काळात राजे आणि त्यांचे सरदार यांच्यात युद्धे होत होती. राजे आपापल्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असत, परंतु त्यांच्या शक्तीचे क्षेत्र मर्यादित होते. मेधातिथी, एक समकालीन लेखक म्हणतात की त्या काळात चोर आणि डाकूंपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला शस्त्रे बाळगण्याचा अधिकार होता. अन्यायी राजाला विरोध करणे अवाजवी नाही असे त्यांचे मत होते. पुराणात सांगितल्याप्रमाणे राजाचा सर्वशक्तिमान आणि पूर्ण अधिकार सर्वांना मान्य नव्हता हे यावरून दिसून येते.

**चोल (९वे शतक ते १३वे शतक)**

राजाला सल्ला देण्यासाठी मंत्रिपरिषद होती, परंतु मंत्रिमंडळाच्या सल्ल्याचे पालन करण्यास राजा बांधील नव्हता. चोल काळात साम्राज्य सहा प्रांतांमध्ये विभागले गेले. चोल प्रांतांना मंडलम असे म्हणतात, जे व्हाईसरॉय प्रशासित होते. मंडलम अनेक कोट्टम (कमिशनरी) आणि कोट्टम अनेक बालनाडस (जिल्ह्यांमध्ये) मध्ये विभागले गेले. चोल काळातील ग्रामसमूहांना नाडू असे म्हणतात आणि हे चोल प्रशासनाचे सर्वात लहान एकक होते. 'नाडू' च्या स्थानिक सभेला नाटूर आणि शहराच्या स्थानिक सभेला नगरतार असे म्हणतात. चोल साम्राज्यात जमीन कर हा एकूण उत्पादनाचा भाग असायचा. चोलांकडे शक्तिशाली नौदल होते.

स्थानिक स्वराज्य हे चोल शासन पद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य प्रौढ होते. लोककल्याणासाठी तलाव आणि उद्याने बांधण्यासाठी गावातील जमीन संपादित करणे ही 'ऊर'चे मुख्य कार्य होते. सभा किंवा ग्रामसभा ही ब्राह्मणांची संस्था होती. बरियम सभेची ३० सदस्यीय व्यवसाय सुकाणू समिती होती. संबत्सर बरयम बरयम च्या १२ ज्ञानी पुरुषांची वार्षिक समिती होती. उद्यान समिती बरियमच्या १२ सदस्यांची समिती होती. तडग समिती वरियामच्या ६ सदस्यांची समिती नगरम व्यापाऱ्यांची सभा होती.

**पांड्या (इ.स.चे सहावे ते दहावे शतक)**

पंड्या राज्याच्या दिव्याच्या अगदी दक्षिण आणि आग्नेय भागात होता. मदुराई ही त्यांची राजधानी होती. त्यांचा बोधचिन्ह कार्प (माशाचा एक प्रकार) होता. मेगॅस्थीनिसने पांड्या राज्याचा उल्लेख मेबर या नावाने केला आहे, हे राज्य त्यांसाठी प्रसिद्ध होते. येथे महिलांचे राज्य होते. पांड्य शासक नेदींनी पहरुली नावाच्या नदीला अस्तित्व दिले आणि समुद्र पूजेलाही सुरुवात केली. पांड्या शासकांमध्ये सर्वात जास्त विद्वान नेदुंगेलियान होते, त्यांची कीर्ती थलैयालंगनमच्या युद्धातील विजयामुळे झाली, पट्टुपट्टूच्या जीवनाचा तपशील देतो. नेडुंगेलियन, रोमन सम्राट नेडुंगेलियनने आपला दूत ऑगस्टसच्या दरबारात पाठवला. संगम कवी नक्कीरर, कल्लाडनार आणि मागुडीमरोदन यांना राजाश्रय दिला.पांड्यांचे राज्य 'मिनावर', 'कबुरियार', 'पंचवार', 'तेन्नर', 'मारार', 'वालुडी' आणि 'सेलियार' या नावांनी ओळखले जाते.

पांड्या घराण्याचे नेडियोन, पलशालैमुडुकुड्मी, नेडुंजेलियन, वेरिवरशेलिय कोरकै हे शासक ठळकपणे उल्लेखनीय आहेत.संगम काळातील पंड्या सरकारचे स्वरूप राजेशाही होते. राजाचे स्थान वंशपरंपरागत आणि ज्येष्ठतेवर आधारित होते. प्रशासनाचे सर्व अधिकार राजाकडे होते, त्यामुळे त्याच्या प्रवृत्तीमध्ये स्वैराचाराचा समावेश होता. दिग्विजय जिंकणे, प्रजेला पुत्राप्रमाणे वाढवणे आणि शासनाचा कारभार नीटपणे चालवणे हा राजाचा मुख्य आदर्श होता. राजा रोज आपल्या सभेत (नलवाई) प्रजेच्या अडचणी ऐकत असे. राज्याचे सर्वोच्च न्यायालय मनरम होते, ज्यात राजा सर्वोच्च न्यायाधीश होता. राजाचा वाढदिवस दरवर्षी साजरा केला जायचा जो 'पेरुनल' म्हणूनही ओळखला जात असे. प्रतिनिधी मंडळे राजाची स्वैराचार तपासत असत, तसेच ते राजाला प्रशासनात सहकार्य करत असत. या परिषदांचे सदस्य लोकप्रतिनिधी, पुरोहित, ज्योतिषी, वैद्य आणि मंत्री होते. या परिषदेला 'पंचवरम्' किंवा 'पंचमहासभा' असेही म्हटले जात असे. यापैकी- मंत्री - अमिचार, पुजारी - पुरोहित, कमांडर - कमांडर, दूत - दूत, गुप्तहेर - ओरार हे अधिकारी महत्वाचे होते.

संगम शासकांकडे व्यावसायिक सैनिक होते. रथ, हत्ती, घोडे आणि पायदळ हे सैन्याचे महत्त्वाचे अंग होते. तलवार, धनुष्य, बाण, भाला, खरग,बाघंबर इत्यादी शस्त्रे वापरली जात. युद्धाच्या वेळी स्थापन झालेल्या छावण्यांना विशेष महत्त्व होते. पाण्याच्या घड्याळातून वेळेची माहिती मिळाली. राजाच्या महालाचे रक्षण सशस्त्र स्त्रियांनी केले होते. सैन्याच्या कप्तानला 'ईनाडी' ही पदवी देण्यात आली. सैन्याच्या पुढच्या तुकडीला 'तुसी' आणि मागच्या तुकडीला 'कुलाई' असे म्हणतात. चोल आणि पांड्यांच्या कारकिर्दीत, बेल (श्रीमंत शेतकरी) नागरी आणि लष्करी पदांवर नियुक्त केले गेले. कलवरम संगम ही तमिळांची उच्चभ्रू संस्था होती. मंत्र्यांनंतर प्रशासनात दूतांना अनन्यसाधारण महत्त्व होते. गुप्तहेरांनीही शासनात महत्त्वाची भूमिका बजावली, त्यांना 'ओरार' किंवा 'वे' असे संबोधले जात असे.

munotes.in

प्रशासकीय सोयीसाठी, राज्य किंवा मंडलमची ‘नाडू’ आणि नाडूची ‘ऊर’मध्ये विभागणी करण्यात आली. ‘पत्तीनाम’ हा समुद्रकिनारी असलेल्या शहराचा संदर्भ देत असे. मोठ्या गावाला ‘पेरूर’, लहान गावाला ‘सिरुर’ आणि जुन्या गावाला ‘मुदुर’ म्हणत. आवई ही लहान गावांची बैठक होती, जी वाद आणि व्यापार आणि नोकरी इत्यादींशी संबंधित होती. सालईला मुख्य रस्ता म्हणायचे. तेरू शहराचा प्रमुख गुराखी होता. पेडियाली सार्वजनिक ठिकाणी बोलावण्यात आली. पेडियन हे गाव प्रशासनाचे सर्वात लहान युनिट होते. मनराम यांनी ग्रामीण आणि शहरी प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावली. नगरम हा शब्द वर्णिक गावांसाठी वापरला जातो.

**आपली प्रगती तपासा**

१. दक्षिण भारतातील प्राचीन राज्य व त्यांची शासनव्यवस्था थोडक्यात सांगा.

## ६.४ दक्षिण भारतातील अन्य (कदंब आणि कलचुरी) राज्याची प्राचीन राज्याची शासनव्यवस्था

कदंब (इ.स. ४थे ते १०वे शतक) राजवंशचे राज्य कर्नाटकात होते. कदंब राजा संस्थापक मयूर शर्मन्‌ने इ.स. ३४५ मध्ये कर्नाटकात एक छोटेसे राज्य स्थापन केले होते. या राज्याची राजधानी वैजयंती किंवा बनवासी होती. या कदंबाचे प्रशासन महत्वपूर्ण होते. पंतप्रधान (प्रधान), गृहाचे व्यवस्थापक (मानेवरगडे), परिषदेचे सचिव (तंत्रपाल किंवा विधानसभेचे सचिव), विद्वान वडील (विद्या वृद्ध), डॉक्टर (देशमात्य), खाजगी सचिव (गूढवादी), मुख्य सचिव (सर्वकार्यकर्ता), मुख्य न्यायाधीश (बिशप) ज्यांच्या वर स्वतः कदंब सम्राट होता, इतर अधिकारी (भोजका आणि लोकायुक्त), महसूल अधिकारी (रज्जूक) आणि लेखक आणि लेखक हे होते. राजा आणि शेतकरी यांच्यातील मध्यस्थ करण्यासाठी गवांडूने खानदानी जमीनमालकांची स्थापना केली, जे कर गोळा करतात, महसूल नोंदी ठेवतात आणि राजघराण्याला लष्करी मदत पुरवतात. सैन्यात जगदल, दंडनायक आणि सेनापती असे अधिकारी होते. ही संघटना ‘चौरंगबाला’ या धोरणावर आधारित होती. कादंबना गुरिल्ला युद्ध ज्ञात होते. यावरून आपणाला कदंबच्या प्रशासनाची कल्पना येऊ शकते.

छत्तीसगडच्या कलचुरी राजवटीत (इ.सं.३रे ते ७वे शतक ) राजेशाही शासन पद्धती प्रचलित होती. कलचुरी शिलालेखावरून हे ज्ञात आहे की राज्य अनेक प्रशासकीय एककांमध्ये विभागले गेले होते -राष्ट्र (विभाग), विषय (जिल्हा), देश किंवा जिल्हा (सध्याच्या तहसीलप्रमाणे) आणि मंडल. मंडळाच्या अधिकाऱ्याला 'मंडलिक' आणि मोठ्याला 'महामंडलेश्वर' (एक लाख गावांचा अधिपती) म्हणत. याशिवाय कर देणाऱ्या-घेणाऱ्या सरंजामदारांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. मंत्रिमंडळात युवराज, महामंत्री, महामात्य, महासंधिविग्रहक (परराष्ट्रमंत्री), महापुरोहित (राजगुरु), जमाबंदी मंत्री (महसूल मंत्री), महाप्रतिहार, महासमंत आणि महाप्रमात्री इत्यादी प्रमुख होते.

**आपली प्रगती तपासा**

१. कदंब आणि कलचुरी राज्याची राज्याची शासनव्यवस्था कशी होती ते सांगा

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## ६.५ सारांश

दक्षिण भारतात चेर, चोल, पंड्या, सातवाहन, राष्ट्रकुट, पल्लव, वाकाटक राजे होऊन गेले. इसवी पूर्वच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापासून दक्षिणेत या राज घराण्याचे राज्य प्रस्तापित झाले. त्यांनी आपापली राज्य व्यवस्था निर्माण केली. केंद्रीय राज्य प्रशासन आणि प्रांतीय प्रशासन सक्षम करून या राजकीय व्यवस्था आकार घेत होत्या. यासाठी त्यांनी दैवी, नैसर्गिक, दमन नीतीचा वापर केल्याचे दिसते. त्यांच्या विविध प्रशासकीय संज्ञेवरून त्यांच्या राज्याचे स्वरूप स्पष्ट होते. कुटुंब, कुल, ग्राम, नगरम असे ते उत्क्रांत होत जाऊन शेवटी आताच्या सारखे या राज्याचे स्वरूप आपणाला दिसते.

संगम काळातील पंड्या सरकारचे स्वरूप राजेशाही होते. राजाचे स्थान वंशपरंपरागत आणि ज्येष्ठतेवर आधारित होते. प्रशासनाचे सर्व अधिकार राजाकडे होते, त्यामुळे त्याच्या प्रवृत्तीमध्ये स्वैराचाराचा समावेश होता. दिग्विजय जिंकणे, प्रजेला पुत्राप्रमाणे वाढवणे आणि शासनाचा कारभार नीटपणे चालवणे हा राजाचा मुख्य आदर्श होता. चोलांचे स्थानिक स्वराज्य हे शासन पद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य प्रौढ होते. लोककल्याणासाठी तलाव आणि उद्याने बांधण्यासाठी गावातील जमीन संपादित करणे ही 'ऊर'चे मुख्य कार्य होते. सभा किंवा ग्रामसभा ही ब्राह्मणांची संस्था होती. राष्ट्रकुट राजाचे स्थान सामान्यतः वंशपरंपरागत होते. परंतु काही

प्रसंगी घराण्यातील राज्य करणाऱ्या सरदारांद्वारे राजा निवडला जात असे. असे मानले जाते की राजा वैयक्तिकरित्या आणि त्याचे स्थान दोन्ही दैवी आहेत. काही धर्मग्रंथानुसार राजा हा देवाचा अवतार मानला जातो आणि त्याच्यात विविध देवतांची वैशिष्ट्ये असल्याचेही मानले जात होते. पल्लव शासनव्यवस्थेत राजकुमारांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात येत होती.

पल्लव शासनव्यवस्थेत महामात्र महत्त्वपूर्ण अधिकारी होता. मंत्र्याशी प्रशासकीय व्यवहार करण्याचा अधिकार या अधिकाऱ्याला होता. पल्लव शासनव्यवस्थेत मंत्र्यांना महत्त्वाचे स्थान होते. चालुक्य मंत्राच्या अधिपत्याखाली राजा वेळोवेळी अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करूनच काम करीत असे. चालुक्य राजे त्यांच्या राज्यात फिरून सरकारची स्थिती जाणून घेत याची पुरेशी माहिती मिळते. युद्धाच्या प्रसंगी ते युद्धाचे नेतृत्व करायचे. केंद्रीय सत्तेपासून दूर राहूनही ते तिथल्या शासनावर नजर ठेऊन होते. राज्याचे कारभाराच्या सोईसाठी चेर राजांनी पाच जिल्ह्यांत (नाडुंत) भाग पाडले होते. ते अनुक्रमे पूळी, कुडम, कुड्डम, बेन व कर्क या नावांनी ओळखले जात. त्यांची राजधानी वंजी, कची किंवा करुवूर व शेवटी तिरुवरिकलमलै असावी असे उपलब्ध साहित्यावरून दिसते. सातवाहन राजे शकांच्या आधारे ‘राजन’, ‘राजराज’, ‘महाराजा’, ‘स्वामीन’ अशा पदव्या धारण करत. राण्यांना ‘देवी’ किंवा ‘मेहादेवी’ ही पदवी धारण केली जात असे. राजांची नावे जरी मातृवंशीय असली तरी वारसाहक्क पुरुष वर्गापुरता मर्यादित होता आणि वंशपरंपरागत होता असे दिसते.

## ६.६ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१. दक्षिण भारतातील प्राचीन राज्य संकल्पनाथोडक्यात स्पष्ट करा
२. दक्षिण भारतातील प्राचीन प्रांतीय राज्य व्यवस्था कशी होती ते सांगा.

## ६.७ संदर्भ ग्रंथ


1. Chatterji, S. K., Dravidian Origins and the Beginnings of Indian Civilization : Modern Review, Dec.1924.
2. Sastri, K. A. N. A History of South India, Bombay, 1958.
3. SeshaAiyer, K. G. Cher Kings of The Sangam Period, London, 1937.


❖❖❖❖

# ७

# भारतीय सरंजामशाही: स्वरूप आणि विवाद

**घटक रचना**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ सरंजामशाही

७.३ युरोपीय सरंजामशाही

७.४ भारतीय सरंजामशाही

७.५ सरंजामशाहीची वैशिष्ट्य

७.६ सरंजामशाही वाढण्याची करणे

७.७ सरंजामशाही काळातील अर्थव्यवस्था

७.८ सरंजामशाहीवरील चर्चाविश्व

७.९ सारांश

७.१० स्वध्यायावर आधारित प्रश्न

७.११ संदर्भ ग्रंथ

## ७.० उद्दिष्टे

- सरंजामशाही म्हणजे काय ते समजून घेणे
- सरंजामशाहीचे भारतीय स्वरूप समजून घेणे
- सरंजामशाहीची वैशिष्ट्य ज्ञात करून घेणे
- सरंजामशाही वाढण्याची करणे तपासणे
- सरंजामशाहीवरील वादविवाद समजून घेणे

## ७.१ प्रस्तावना

सरंजाम प्रथा ही प्राचीन भारतातील एक व्यवस्था म्हणून आपण तिला ओळखतो. तिला राजकीय आणि पुढे आर्थिक आयाम येत गेले. या प्रथेला इंग्रजी फ्युडयालीझम तर मराठीत सामंत प्रथा किंवा सरंजामशाही असेही म्हणतात. राजा आणि त्याच्या हाताखाली काम करणारे सरदार, सैन्यातील अधिकारी, कर गोळा करणारे अधिकारी वर्ग व या सर्वात



munotes.in

खालचा कष्टकरी वर्ग यातून ही उतरंडीची व्यवस्था बनली तीच सामंतशाही अथवा सरंजामदारी होय. या प्रथेत राजाने आपल्या काही अधिकाराचे विकेंद्रीकरण केले असे मानले जाते.

प्राचीन भारतीय समाज अनेक अशा राजेशाहीच्या चढ-उताराच्या अवस्थातून चालला होता. राज्याचे अधिकार वेगवेगळ्या प्रकारे केंद्रित आणि विकेंद्रित होत होते. सामंत प्रथा ही त्यापैकीच एक विकेंद्रित राजकीय-आर्थिक व्यवस्था होय. सर्व सामाजिक व्यवस्थांप्रमाणेच सरंजामही आर्थिक, राजकीयदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मार्गक्रमण करीत विकसित झाली आहे. आर्थिक परिमाणात, सरंजाम ही प्रथा जनतेवरील करांसह प्रारंभ झाली आणि ती व्यापारातही प्रगती करती झाली; राजकारणातही सामंत प्रथा एका केंद्रीकृत राजशाहीच्या माध्यमातून विकसित होत गेली. सामाजिकदृष्ट्या ही सामंत प्रथा हळूहळू संरचित होत गेली.

या सरंजाम प्रथेचे दृश्य स्वरूप पहिल्यांदा युरोपात दिसते. या विषयीचा सुरुवातीचा शास्त्रीय अभ्यास युरोपातच झाला. ९व्या आणि १५व्या शतकादरम्यान मध्ययुगीन युरोपमध्ये तयार झालेल्या नव्या व्यवस्थेला सरंजामशाही अथवा सरंजाम व्यवस्था असे नाव देण्यात आले. त्याधारे हा अभ्यास काही मार्क्सवादी इतिहासकाराने भारताच्या बाबत सुरु केल्याचे दिसते.

युरोपात धर्म गुरु म्हणजे पाद्री आणि राज्याचे सैन्य यांच्यातील संबंध शत्रुभावी होऊ लागले. बुर्जुआ वर्ग याचेही सामंतातात रुपांतर होऊ लागले. युरोपभर मध्ययुगीन काळात जमिनीवर अधिकार धारण करणारे, लष्करी सेवा देणारे सरदारांचे वैविध्यपूर्ण प्राबल्य वाढले होते. या व्यवस्थेमध्ये शेतकऱ्याना आणि जमीनदारांना राज्याच्या सरदारांच्या संरक्षणाकरता भाडेकरू म्हणून श्रम करावे लागे. ही सामंती प्रणाली राजे आणि त्यांच्या हस्तकांना समाजातल्या संपत्ती व संसाधनांवर समाजातील मुत्सद्दीवर नियंत्रण ठेवण्याची मालकी देते.

## ७.२ सरंजामशाही

सरंजामशाही ही संज्ञा सामान्यत: युरोपच्या ५व्य शतकातील राजकीय-प्रशासकीय स्थितीला समजून घेण्यासाठी लागू केली गेली. ९व्या आणि १५व्या शतकादरम्यान मध्ययुगीन युरोपमध्ये विकसित झालेल्या कायदेशीर, आर्थिक, लष्करी आणि सांस्कृतिक घडामोडीला सरंजामशाही प्रणाली म्हणूनही ओळखले जाते. सेवा किंवा श्रमाच्या बदल्यात जमीन धारण करण्यापासून प्राप्त झालेल्या नातेसंबंधांभोवती समाजाची पुनरर्चना करण्याचा सरंजाम हा एक मार्ग होता. काही अभ्यासक आश्रय-दातेपणा या संस्थेत सरंजामशाहीचा उगम असल्याचे मत व्यक्त करतात. ५व्या शतकापासून पश्चिम युरोपवर असलेले तथाकथित राज्यांचे साम्राज्य कोसळले. पूर्व रोमन साम्राज्य आणि पश्चिम रोमन साम्राज्यात विभागलेले आहे. रोमन पुरातन काळाचे वैशिष्ट्य असलेल्या पारंपारिक गुलाम शेतात सामील होण्याऐवजी यातील बरेच दास मुक्त भाडेकरू झाले. तथापि, हॅकेन्डस

कोसळण्यापूर्वी त्यातील बरेच जण वेगवेगळ्या होल्डमध्ये पांगले होते, गुलामांना जन्म देणेहे सरंजामशाहीच्या प्रारंभापैकी एक आहे.

प्राचीन रोममध्ये, उत्पादन संबंध कोणत्याही क्षेत्रातील मालकांनी लादलेल्या कर किंवा करांच्या आधारे तयार केले जाऊ लागले. गुलामीच्या विस्ताराच्या परिणामी मध्ययुगात दासत्व व प्रभुत्व मिळवलेल्या जबरदस्त राजकीय अधिकारावर आधारीत संबंध आणि राजकीय आधारावर आधारित संबंधातून निर्माण झालेली व्यवस्था म्हणजे सामंतवाद होय. सामंत हा शब्द पाश्चिमात्य नसलेल्या भारतीय समाजांना देखील लागू केला गेला. भारतातही मध्ययुगीन युरोप सारख्या संस्था आणि वृत्ती प्रचलित असल्याचे मानले जाऊन भारताविषयीचा काही अभ्यास केला गेला.

आपणाला भारतातील सरंजामशाहीचे दृश्य स्वरूप गुप्त आणि कुशाण काळात दिसते. मध्य आशियातील कुशाण राजघराण्याने भारतावर आक्रमण केले आणि स्वतःची नवीन धोरणे आणली तेव्हा बहुधा भारतात सामंतशाहीची ओळख झाली. भारतीय सरंजामशाही इ.स.१५०० च्या दशकात मुघल राजवटीपर्यंत संदर्भ देते. भारतीय सरंजामशाही हा शब्द तालुकदार, जमीनदार, जहागीरदार, घाटवाले, मुरैयत, सरदार, मानकरी, देशमुख, चौधरी आणि सामंत यांच्या वर्णनासाठी वापरला जातो. यामुळे भारताची सामाजिक रचना बनवणाऱ्या सरंजामशाही समाजाचा अभ्यास क्रमप्राप्त आहे.


## ७.३ युरोपीय सरंजाम प्रथा

इजिप्तच्या पुरातन राज्या नंतरच्या कळला सरंजामशाही म्हंटले जाते. परंतु सर्वसाधारणपणे पाचव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंतच्या युरोपियन समाजाला सरंजामवादी म्हंटले जाते. सरंजाम प्रथा ही मध्ययुगीन पश्चिम यूरोपातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व लष्करी व्यवस्था-प्रणालीचे दिग्दर्शन करणारी एक व्यापक संज्ञा होय. मराठीत सरंजामशाही अशीही एक पर्यायी संज्ञा वापरली जाते. या व्यवस्था-प्रणालीत उच्च्भू वर्गाच्या (लॉर्ड्स) सभासदांत कंत्राटदारी (करार) पद्धतीचे आप्तसंबंध असून वरिष्ठ सत्ताधीश या पोट जहागिरदारांना मोकासा किंवा सरंजाम देत असत आणि त्या मोबदल्यात त्यांच्याकडून लष्करी व राजकीय सेवेची खात्री घेत. मध्ययुगीन यूरोपात त्यावेळी बलवान अशी एकही केंद्रसत्ता वा शासनपद्धती अस्तित्वात नव्हती. त्यांमुळे त्यांची अंतर्गत सुरक्षितताही पूर्णतः धोक्यात आली होती. त्या काळी सरंजामशाहीने न्याय व संरक्षण या मूलभूत गरजा पूर्ण करूनभागविल्याही. त्यामुळे युरोपच्या इतिहासात या नव्या व्यवस्थेची वाढ होऊ शकली. सरंजामशाही हा इंगजी फ्यूडॅलिझम याचा मराठी पर्यायी शब्द असून मूळ फ्यूडॅलिझम या शब्दाची व्युत्पत्ती फीफ (Fief) या इंग्रजी शब्दावरून व त्याच्या मूळ फिओडम (Feodum) या लॅटिन शब्दांपासून झाली आहे. त्यांचा शब्दार्थ गुरेढोरे-घोडे व जमीन ही जंगम संपत्ती असा आहे.

सरंजामशाही (फ्यूडॅलिझम) आणि बिटनमधील जहागीरदारी किंवा शेती-जमीनजुमला पद्धत (सिगनोरिॲलिझम किंवा मॅनॉरिॲलिझम) यांत सूक्ष्म फरक आहे. शेती-जमीनजुमला पद्धत ही राजा किंवा सत्ताधीश आणि त्याची प्रजा-मुख्यत्वे शेतकरीवर्ग (जो राजकीय-सामाजिक दृष्टया अत्यंत गौण होता) यांच्या संबंधांवर आधारित होती. हे संबंध आर्थिक आप्तपणाचे निदर्शक होते, मात्र सरंजामशाहीतील सत्ताधीश आणि त्यांचे पोटजहागीरदार हे एकाच अमीर-उमराव वर्गातील असून त्यांच्यातील मोकासदारी (फ्यूडल रिलेशनशिप) संबंध मुक्त आणि कंत्राटदारी पद्धतीचे होते. त्यांत प्रामुख्याने लष्करी व राजकीय सेवा अभिप्रेत होती. पुढे या दोन्ही संकल्पना समान अर्थाने प्रचलित झाल्या.

ही सामंत प्रथा मालमत्तेचे हक्क नसताना आणि जमीन ताब्यात घेण्याचे बंधन न घेता, जमीनदार जमीन वापरण्याची आणि व्यवस्थापित करण्याची शक्यता प्राप्त करते. या करारासंबंधाला युरोपमध्ये “वासॅलेज” म्हणून ओळखले जाते आणि जमिनीच्या हक्काच्या मोबदल्यात देण्यात येणाृया खंडणीला सामंत “कार्यकाळ” असे म्हणतात. सामंत्याचे संबंध आणि प्रतिनिधीत्व करणारे कार्यभार सांभाळणाऱ्या व्यक्तीला “टेन्टे” असे म्हणतात. प्रदेश शेतकऱ्यांनी (सर्फ म्हटले जाते) काम केले आहे, ज्यांना त्याच जमिनीवर राहायला भाग पाडले गेले आणि मालकास त्याला उत्पादित उत्पादनाचा एक भाग देऊन संपविले गेले.

९व्या ते १५व्या शतकादरम्यान युरोपमध्ये सरंजामशाहीचा विकास झाला. इंग्लंडमधील सरंजामशाहीने जमीन धारण करणे आणि भाडेपट्ट्याने देन्यातून निर्माण झालेल्या संबंधांभोवती समाजाची रचना निश्चित केली. इंग्लंडमध्ये, सामंती पिरॅमिड वरच्या बाजूला राजाने बनलेला होता आणि त्याच्या खाली श्रेष्ठ, शूरवीर आणि वॅसल होते. मालकाने भाडेकरूला जमीन देण्याआधी त्याला औपचारिक समारंभात मालक बनवावे लागेल. या सोहळ्याने स्वामी आणि वासल यांना करारात बांधले. मार्क्ससारख्या आधुनिक लेखकांनी सरंजामशाहीचे नकारात्मकता अधोरेखित करताना शेतकऱ्यांचे शोषण आणि सामाजिक गतिशीलतेचा अभाव पुढे आणले. तर फ्रेंच इतिहासकार मार्क ब्लॉच असे म्हणतो की, ‘शेतकरी हे सरंजामशाही संबंधांचा भाग होते; जागीरदारांनी जाळीच्या बदल्यात लष्करी सेवा केली, तर शेतकऱ्यांनी संरक्षणाच्या बदल्यात शारीरिक श्रम केले, ज्यामुळे त्यांना मर्यादित स्वातंत्र्य असूनही काही फायदा झाला’. फ्रान्समधील ११व्या शतकात इतिहासकारांनी ज्याला "सामंतवादी क्रांती" किंवा "परिवर्तन" आणि "शक्तीचे विखंडन" म्हटले आहे ते पाहिले ज्यामुळे स्थानिक शक्ती आणि स्वायत्तता वाढली. त्याची उतरंड राजा- सरदार-प्रतिष्टीत व्यक्ती-श्रमिक अशी झाली. पुढील आकृतीच्या आधारे सरंजामशाहीची रचना अधिक स्पष्ट होईल.




**आपली प्रगती तपासा**

१. युरोपीय सरंजाम प्रथेवर टीप लिहा

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ७.४ भारतीय सरंजामशाही

सरंजामशाही व्यवस्था ज्याला सामंतशाही असेही म्हणतात. सरंजामशाही ही एक प्रकारची सामाजिक आणि राजकीय व्यवस्था आहे ज्यामध्ये जमीनधारक त्यांच्या निष्ठा आणि सेवेच्या बदल्यात जमीन भाड्याने देतात. सरंजामशाही हे आधुनिक राष्ट्र-राज्याच्या जन्मापूर्वी युरोप किंवा भारतीय सरकारचे मध्ययुगीन मॉडेल होते. सामंती समाजात लष्करी उतरंड असते. डी.डी. कोसंबी आणि आर.एस. शर्मा यांनी डॅनियल थॉर्नर यांनी प्रथमच शेतकऱ्यांना भारतीय इतिहासाच्या अभ्यासात आणले. या प्रकारच्या अभ्यासानेच सरंजामशाहीच्या अभ्यासाला चालना मिळाली.

गुप्त काळापासून सामंत (जमीनदार किंवा कुलीन) ही संज्ञा ज्यांना जमीन दिली गेली. त्यांना किंवा अधीनस्थ सरंजामशाही शासकांना लागू झाली. एखाद्या राजाने जिंकलेल्या प्रदेशांवर त्या राजाच्या सत्तेच्या कमकुवत अंमलबजावणीमुळे पुन्हा काही त्रुटी राहिल्याने राजानेच काही उच्च प्रशासकीय पदे वंशपरंपरागत बनवली व ते राज्य आपल्या राज्याला जोडून घेतले. याने राजाचे काही अधिकार या नव्या उच्च प्रशासकीय

अधिकाऱ्याला मिळाले व त्यातून ही सरंजाम व्यवस्था निर्माण झाली. भारतातील सरंजामशाही व्यवस्था खरी सरंजामशाही म्हणून पात्र आहे की नाही याबद्दल इतिहासकारांमध्ये वाद आहे, कारण वरवर पाहता राजा, जमीनदार आणि दास यांच्यात आर्थिक कराराचा अभाव होता. तथापि, इतर इतिहासकारांचा असा युक्तिवाद आहे की सामंतवाद म्हणून त्याचे वर्णन करण्याइतपत दृश्य समानता आहे. या सरंजामशाहीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय. सामंतांना पगाराच्या ऐवजी जमिनी दिल्या जात होत्या आणि त्यांनी त्या क्षेत्राची मालकी ताब्यात घेऊन स्वतःला त्यांच्या शासकाचे मालक म्हणून संबोधले होते. सामंत हे राजाला महसुलाचा एक छोटासा भाग देत आणि सैन्य पुरवत असत. हे सामंत स्वतःसाठी शाही राजवाडे बांधत. आणि राजासारखेच राहत.

प्राचीन भारतात जमीन अनुदानाचे अधिक महत्त्व होते. हे अनुदान सहसा आर्थिक हितसंबंधाशी संबंधित संक्रमणांच्या आधारावर होते. साधारणतः ७ व्या शतकात भारतीय सरंजामशाहीचा उदय जमीन अनुदान प्रणालीतून झाला. ९व्या-१२व्या शतकात या जमीन अनुदान तत्वाचा अतिरेक झाला त्यामुळे सरंजामशाही राजवटीचा विस्तार अधिक वाढला. असे अभ्यासक्रमाचे म्हणणे आहे.

भारतातील सरंजामी व्यवस्थेचे स्वरूप मध्ययुगातील यूरोपीय सरंजामशाहीपेक्षा भिन्न व प्रामुख्याने जमीनजुमल्याच्या आर्थिक व्यवहारांशी निगडित होते. त्यांत कूळ व मालक किंवा वतनदार वा सरंजामदार असे दोन प्रमुख घटक होते. सरंजामदाराचे संरक्षण मिळविण्याच्या बदल्यात शेतकरी वा कुळांना आर्थिक दृष्टया सर्वस्वी मालकावर वा सरंजामदारावरच अवलंबून राहावे लागे. परिणामतः एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्याला असलेला दर्जा पूर्णत: नाहीसा होई. त्याचे भवितव्य ठरविण्याचा सर्व अधिकार सरंजामदाराकडे असे. शासनाबरोबर अशा कुळाला (शेतकऱ्याला) प्रत्यक्षात कोणताही व्यवहार करता येत नसे. त्याचे सर्व व्यवहार सरदार वा जहागिरदार वा सरंजामदार यांमार्फत चालत. सरंजामदार व कुळे यांचे संबंध वंशपरंपरगत चालत असत. प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी अथक श्रमाने जे शेतातून मिळवील, त्यातील मोठा वाटा वा खंडणी सरदारांना-जहागिरदारांना देत असे. त्यामुळे शेतकरी मात्र कायम गरिबीत राहात असे व सरदार श्रीमंत होत जात. शेतीची मालकी नसलेला शेतमजूर आणि मालक असलेला सरंजामदार यांचे आर्थिक हितसंबंध परस्पर भिन्न होते. सरंजामदार आपल्यापेक्षा मोठया सरंजामदाराला किंवा राजाला विशिष्ट खंडणी देऊन शेतकरी व शेतमजुरांवर अधिसत्ता गाजविण्याचा जणू परवानाच मिळवीत असे. या अधिसत्तेच्या मोबदल्यात तो शेतकऱ्याची आणि त्यांच्या कुटुंबाची जेमतेम उपजीविका होईल, याची मात्र काळजी घेत असे.

भारतातील सरंजामशाही वतनसंस्थेतून निर्माण झाली. वतनसंस्था भारतातील सामाजिक व्यवस्थेत निश्चितपणे केव्हा प्रविष्ट झाली, याबद्दल विद्वानांत एकमत नाही तथापि मध्ययुगीन भारतात इ. स. तेरावे ते अठरावे शतकात ही व्यवस्था असल्याचे दिसते. ती सरंजामशाहीच्या विकासाबरोबर अधिक दृढतर झाली. काही राजनैतिक व प्रशासकीय प्रवृतीमुळे मौर्योत्तर काळ आणि विशेषतः गुप्त काळापासून राज्यव्यवस्थेत सरंजामशाही रुळू लागली. या सरंजामशाहीची महत्वपूर्ण प्रवृत्ती होती ब्राह्मणांना भूमिदान देण्याची. भूमिदानाचे सर्वात प्राचीन पुरालेखीय प्रमाण इसवी सनापुर्वीच्या पहिल्या शतकाच्या सातवाहनाच्या



munotes.in

एका नोंदीत मिळते. दुसऱ्या शतकात बौद्ध भिकुंना दान केल्या गेलेल्या गावांच्या संदर्भात पहिला पुरावा मिळतो. भिक्कुंना दान केलेल्या भूमीमध्ये राजसेनेला प्रवेश वर्जित होता. तेथील जीवनक्रमात राज्याधिकारी काहीही विघ्न अनु शकत नसे, तसेच त्या क्षेत्रात जिल्हा पोलीस देखीलकाही हस्तक्षेप करू शकत नसत. पाचव्या शतकात अशा अनुदानाची प्रवृत्ती वाढली. गुप्तकाळापासून विभाग आणि जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांचे हुद्दे उत्तोरुत्तोर वंशापरंपरागत होऊ लागले. त्यामुळे एका बाजूला केंद्रीय सत्तेची पाळेमुळे खिळखिळी होत गेली तर दुसरीकडे प्रशासनाचे स्वरूप आणखीनच सरंजामवादी होत गेले. सरंजामी प्रकारची वतने मुसलमानी अंमलात (१२०६-१७०७) अस्तित्वात होती. दक्षिण हिंदुस्थानात विजयानगर साम्राज्यात (१३३६-१५६५) नायक अथवा पाळेगार हे सरंजामदारच होते. त्याच्या समकालीन बहमनी सत्ता (१३४७-१५३८) व पुढे तिचे पाच शाह्यांत विभाजन झाले तरी सरंजामी वतनसंस्थेत लक्षणीय बदल झाले नाहीत. राजसत्ता बदलली, तरी सरंजामी वृत्तीच्या स्थानिक कारभारात विशेष फरक पडला नाही.

मराठेशाहीत छ. शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात सरंजामदारांची, विशेषतः देशमुख-देशपांडे यांची अनेक वतने जप्त करून वेतनपद्धती आणण्याचा प्रयत्न केला. यामुळे रयतेला (शेतकऱ्याला) दिलासा दिला. त्यामुळे रयतेचा राजा ही उपाधी त्यांना लाभली. मात्र छ. राजारामांनी जहागिरी देऊन सरंजामशाहीला पुन्हा जीवदान दिले. छत्रपती शाहूंच्या (कार. १७०७-४९) वेळी एखादया सरदाराने नवीन प्रदेश जिंकून घेतला, की त्यालाच तो जहागीर म्हणून देण्याची प्रथा पडली. त्यामुळे पुढे पेशवाईत मराठी सामाज्याचा विस्तार होऊनही या सरंजामशाहीमुळे एकसूत्री राज्य राहिले नाही. यातून स्वतंत्र संस्थानेही उदयास आली. पुढे ब्रिटिशांनी हिंदुस्थान पादाक्रांत केल्यानंतर ती कायम ठेवली. थोडक्यात भारतात देशी संस्थाने आणि त्यांचे जहागिरदार, सरदार वगैरे वर्ग सरंजामशाहीचे फार मोठे बळकट केंद्र होते पण स्वातंत्र्यानंतर १९४८ नंतर सर्व संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली. (संदर्भ : मराठी विश्वकोश)

भारतातील सरंजामी पद्धतीचे विदारक रूप स्वातंत्र्याच्या पूर्व संध्येला हैद्राबाद संस्थानात पाहावयास मिळते. हैद्राबाद संस्थानाच्या सोळा जिल्ह्यांपैकी आठ जिल्हे तेलंगणातील होते. या तेलंगणमध्ये शेतीची रचना जमीनदारी पद्धतीची होती. मूठभर जमीनदारांच्या मालकीची हजारो हेक्टर जमीन होती. गावेच्या गावे एकेका जमीनदाराच्या मालकीची होती. बाकी त्यांचे सर्व शेतमजूर वेठबिगार अथवा कुळे होती. सरंजामी व्यवस्थेचा तोल तिन्ही विभागांत सांभाळला जावा आणि जनतेवर जबर पकड बसावी म्हणून, मराठवाडा-कर्नाटकातील रयतवारीला काटशह म्हणून या भागात मोठया प्रमाणावर जहागिरी निर्माण करण्यात आल्या. लहान-मोठया जहागिरदारांची संख्या ११६७ होती आणि ते सरकारशी एकनिष्ठ राहणे आपले परम कर्तव्यच मानीत असत. जहागिरदारांमध्ये सर्फेखास (खास निजामाची), पायगा (पागांची म्हणून), जहागीर व संस्थाने असे चार प्रकार होते. त्यांतून शेतकऱ्यांवर व कूळांवर अनन्वित अत्याचार होत, त्यांची पिळवणूक केली जाई. हैदराबादच्या जमीनदारीचा आणि जमीनदारांच्या अत्याचारांचा बोभाटा कम्युनिस्टांच्या हिंसक तेलंगण लढयाने व नंतर आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीने झाला. तोपर्यंत या मोठया संस्थानात इतरत्र कुठेही नसेल, अशा प्रकारची

बुरसटलेली सरंजामशाही असून ती कमालीच्या शोषणावर आधारलेली व पराकोटीच्या अन्यायांनी पुरेपूर भरलेली होती. भरतल स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच अशा प्रकारची शोषणाची व्यवस्था नष्ट करण्यात आली. (मराठी विश्वकोश, खंड १७)

**आपली प्रगती तपासा**

१. भारतीय सरंजामशाहीचे स्वरूप सांगा

## ७.५ सरंजामशाहीची वैशिष्ट्ये

सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पातळीवर सरंजामशाहीने आपली ऐतिहासिक गुणवैशिष्ट्ये संक्रमित केली. या सरंजामशाहीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सत्ताचे विकेंद्रीकरण: यात राजा वा राजपद, धर्मगुरू आणि नौकर यात सरंजामशाहीने भेद केला. सामाजिक वर्गात सरंजामशाहीचे भेद वा विलगीकरण हे महत्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे.

२. सरंजामशाही वाढवण्यामध्ये चर्चची प्रभावी भूमिका प्रधान राहिली आहे.

३. राजवंश आणि कुलीन पदव्याच्या बदल्यात राजाला दिलेली निष्ठा महत्वाची होती.

४. संरक्षणाच्या नात्यातून उच्चभ्रूंनी वापरलेली शक्ती होती.

५. सामाजिक स्तरावर समाज वर्गवारीत वर्गीकरणात श्रेणीबद्ध होता.

६. सरंजामशाहीत एकीकडे, विशेषाधिकार प्राप्त (रॉयल्टी, कुलीन आणि पाद्री यांच्यासह) आणि दुसरीकडे वंचित (सर्फ आणि खलनायक) असते.

७. संजामाशाहित उत्पादनाचा आधार: शेती हाच राहतो. यात कोणतेही अतिरिक्त उत्पन्न होत नाही.

८. सततची युद्धे: सरंजामशाहीच्या काळात, प्रांताची सत्ता आणि नियंत्रण युद्धाच्या संघर्षाद्वारे प्राप्त होत असल्याने त्यात जास्त संपत्ती आणि आर्थिक वाढ मिळवणे हे उद्देश प्रधान होते. विजेत्याने जमीन बळकावणे व पराभूताना नोकरांसमान ठेवले या वृत्ती वाढल्या होत्या. त्यामुळे त्यांची संपत्ती, शेती उत्पादन आणि अधिकाधिक वाढत जात होते. आता सरंजामशाहीच्या युगात कुटुंबांमध्ये-कुटुंबामध्ये लग्न ठरले जाऊ लागले व त्यातून वेगळेच हितसंबंध तयार होऊ लागले होते. परिणामीअधिक आर्थिक आणि भौतिक शक्ती मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात जटिल संबंध उद्भवले.त्यातून युद्धाचे अनेक प्रसंग उदभऊ लागले.

९. मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळात भारतीय सरंजामी समाजाच्या सामाजिक संरचनेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे जाती व्यवस्था वा तिचे दृढीकरण होय असेही मानले जाते.

**आपली प्रगती तपासा**

१. सरंजामशाहीची वैशिष्ट्य सांगा

---

## ७.६ सरंजामशाही वाढण्याची करणे

युरोपच्या संदर्भात सरंजामशाहीला जन्म देणारे मुख्य कारण म्हणजे ते रोमन साम्राज्य नष्ट होणे. या साम्राज्यावरील हिंसक आक्रमणे झाली. याने राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अस्थिरता तयार झाली. या विपरीत परिस्थितीमुळे एकाधिक युद्धासारखे संघर्ष आणि प्रांतांच्या नियंत्रणासाठी संघर्ष केले गेले. आपल्या प्रांतांचे रक्षण करण्यासाठी राजशाही अपयशी ठरत असल्याने त्याने दुसर्या एका व्यवस्थेला जन्म दिला, ती म्हणजे सामंत. रोमन साम्राज्याचा नाश झाल्यानंतर युरोपमधील बऱ्याच प्रांतांमध्ये सामंतांची निर्मिती होऊन या व्यवस्थेची अंमलबजावणीही झाली.

सरंजामशाही व्यवस्थेचा परिणाम म्हणून, या काळातील राज्यांमध्ये अशा अनेक क्षेत्रांचा समावेश होता ज्यावर पराभूत किंवा अधीनस्थ राजांचे वर्चस्व वाढले होते. यातील काही सरदार वा राजे आपले स्वातंत्र्य घोषित करण्यास उत्सुक होते. याशिवाय राज्यांतील अनेक क्षेत्रांत असे अधिकारी होते की जे गौण जमीन वडिलोपार्जित मालमत्ता मानत होते. पुढे या अधिकाऱ्यांचे पदही वंशपरंपरागत झाले. या नव्या सरंजामी व्यवस्थेत शासनातील अनेक पदे मोजक्याच अधिकाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात आली होती. या वंशपरंपरागत अधिकाऱ्यांनी हळूहळू प्रशासनाची अनेक कामे हाती घेतली. त्यांनी केवळ भाडे ठरवणे आणि वसूल करण्याचे काम केले नाही तर त्यांनी अधिकाधिक प्रशासकीय अधिकारीही आपल्या हातात घेतले आणि ते न्यायाधीशही झाले आणि अशा प्रकरणांमध्ये स्वत: च्या बळावर दंड करू लागले, जे पूर्वी राजाकडे निर्देशित होते. विशेषाधिकार म्हणून दिले होते. त्यांनी त्यांच्या प्रदेशात सापडलेल्या खजिन्यावरही आपला हक्क सांगितला, जो कायद्याने राजाचा हक्क असायला हवा होता. राजाच्या परवानगीशिवाय आपली जमीन त्याच्या समर्थकांमध्ये वाटून घेण्याचा अधिकारही त्याने स्वतः स्वीकारला होता. त्यामुळे जमिनीवर काम न करता त्यातून कमाई करणाऱ्यांची संख्या वाढली. अशा समाजव्यवस्थेला 'सामंती व्यवस्था' म्हणता येईल. यात हे सरंजाम अधिक बलवान झाले. त्याने पुढे आपले राज्यही स्थापन केले.

## ७.७ सरंजामशाही काळातील अर्थव्यवस्था

सरंजामशाही ही एक सामाजिक-राजकीय असण्याबरोबर आर्थिक व्यवस्था ही होती. सामंतवादी व्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण असण्याबरोबर आर्थिक विकेंद्रीकरण ही होते. सामंती काळातील अर्थव्यवस्था निर्वाह शेती व पशुधनावर आधारित होती. अर्थव्यवस्था स्वभावात स्वारस्यपूर्ण होती त्यामुळे तेथे व्यापार फारच कमी होता आणि हे मुख्यत्वे एक्सचेंजद्वारे होते. जागीरदारांच्या हाती असलेल्या जमीनीच्या संपत्तीचा स्रोत श्रीमंत होता. मॅन्युअल श्रम सेफांवर पडला त्यांनी जमीन काम केली आणि प्रभूला म्हणजे ईश्वराला मान दिला.

सरंजामशाही काळात कोणतीही चांगली सेवा विकत घ्यायची किंवा विक्रीची आर्थिक प्रणाली नव्हती. किंवा औद्योगिक प्रणालीही नव्हती. म्हणून शेती पशुसंवर्धन आणि कर भरण्याद्वारे अर्थव्यवस्था मध्यस्थी केली जाते.

भारतातील सरंजामशाही ही प्रामुख्याने दान-पत्रे, कर, जमीन-जुमल्याच्या आर्थिक व्यवहारांशी निगडित होते. या व्यवस्थेत कूळ (जमीन कष्ट करणारे) व मालक किंवा वतनदार वा सरंजामदार असे दोन प्रमुख घटक होते. राजाकडून सरंजामदाराना सरंक्षण होते. या सरंजामदाराचे तथाकथित संरक्षण मिळविण्याच्या बदल्यात शेतकरी, कष्टकरी वा कुळांना (वेठबिगार) आर्थिक दृष्टया सर्वस्वी जमीन मालकावर वा सरंजामदारावरच (राजाचे हस्तक) अवलंबून राहावे लागे. परिणामतः त्या प्रांताचे, राज्याचे वा देशाचे एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्या कष्टकऱ्यांला असलेला दर्जा पूर्णत: नाहीसा होई. त्याचे भवितव्य ठरविण्याचा सर्व अधिकार राज्याचे हस्तक वा सरंजामदाराकडे असे. शासनाबरोबर अशा कुळाला (शेतकऱ्याला) प्रत्यक्षात कोणताही आर्थिक व्यवहार करता येत नसे. त्याचे सर्व आर्थिक व्यवहार सरदार वा जहागिरदार वा सरंजामदार यांमार्फत चालत. हा आर्थिक व्यवहार सरंजामदार व कुळे यांचे संबंध वंशपरंपरगत चालत असत. प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी अथक श्रमाने जे शेतातून मिळवील, त्यातील मोठा वाटा वा खंडणी सरदारांना-जहागिरदारांना देत असे. त्यामुळे शेतकरी मात्र कायम गरिबीत राहात असे व सरदार श्रीमंत होत जात. शेतीची मालकी नसलेला शेतमजूर आणि मालक असलेला सरंजामदार यांचे आर्थिक हितसंबंध परस्पर भिन्न होते. सरंजामदार आपल्यापेक्षा मोठया सरंजामदाराला किंवा राजाला विशिष्ट खंडणी देऊन शेतकरी व शेतमजुरांवर अधिसत्ता गाजविण्याचा जणू परवानाच मिळवीत असे. या अधिसत्तेच्या मोबदल्यात तो शेतकऱ्याची आणि त्यांच्या कुटुंबाची जेमतेम उपजीविका होईल, याची मात्र काळजी घेत असे. (मराठी विश्वकोश, खंड १७)

भारतीय सामंतवाद भिन्नभिन्न अवस्थामधून पार पडला. गुप्तकाळ व नंतरच्या दोन शतकात देवळांना व ब्राह्मणांना भूमी-अनुदान देण्याची सुरुवात झाली. पाल प्रतीहार तसेच राष्ट्रकूटांच्या राज्यात अशा प्रकारच्या भूमी अनुदानाची अनुदानांची संख्या हळूहळू वाढत गेली. त्याच बरोबर भूमी-अनुदानाच्या स्वरूपातही मूलभूत परिवर्तने झाली. सुरुवातीच्या काळात अनुदान भोग्यांना फक्त उपयोगाचे अधिकार दिले जात होते. परंतु अठराव्या शतकापासून त्यांना मालकीचे अधिकारही दिले जाऊ लागले. अकराव्या व बाराव्या शतकात तर अनुदानाच्या या प्रथिने उच्चांक गाठला. यामुळे उत्तर भारत अनेक

छोट्या छोट्या राजकीय घटकात विभागला गेला. हे घटक मुख्यता धार्मिक तसेच दृष्ट अनुदान भोग्यांच्या हातात होते. जितक्या सत्तेनिशी युरोपियन सामंत आपल्या तालुक्याचा उपयोग घेत असत त्याहीपेक्षा काहीशा जास्तच सत्तेनिशी हे अनुदानभोगी अनुदत्त गावाचा उपयोग घेत असत. परंतु पश्चिम व मध्य भारतात वाणिज्य व्यापाराचा पुनरुद्धार, नाण्यांचे वाढते चलन व विष्टी प्रथा संपुष्टात आल्यामुळे तिथे पुरातन सामंतवाद वैभवाच्या शिखरावर पोचून नंतर रास पाहू लागला. (प्रा. रामशरण शर्मा, भारतीय सरंजामशाही,सुगावा प्रकाशन, पुणे)

**आपली प्रगती तपासा**

१. सरंजामशाही काळातील अर्थव्यवस्था कशी असते ते सांगा.

---

---

---

---

## ७.८ सरंजामशाही वरील चर्चाविश्व

भारतात सरंजामशाही व्यवस्था होती की नव्हती? यावर वाद आहेत. भारतात सरंजामशाही होती पण ती युरोपपेक्षा वेगळी होती. त्याच्या उत्तरंडित राजा, सरदार, सेनापती, कर गोळा करणारा, जमीनदार, कष्टकरी, वेठबिगार अशी रचना होती. असे काही इतिहासकार म्हणतात.

रोमन साम्राज्याचा नाश झाल्यानंतर, जंगली जमातींच्या हल्ल्याखाली, युरोपमध्ये समाजाच्या संघटनेचे एक नवीन रूप तयार होऊ लागले. गुलाम-मालकीची व्यवस्था सरंजामी संबंधांनी बदलली. राजाने मध्ययुगीन विश्वासू सेवेसाठी ज्या भूमी भूमिकेस प्रवृत्त केले होते त्यांना सरंजाम म्हणतात आणि त्यांच्या मालकीच्या लोकांना सरंजामशाही म्हणतात.

या सरंजाम व्यवस्थेचे भारतीय संदर्भात बरेच वादविवाद आहेत. त्यात तीन मुद्दे फार महत्वाचे आहेत. (१) सरंजामशाहीने एकात्मतेच्या भावनेला चालना दिली. (२) राज्ये लहान असल्यामुळे एका प्रदेशात राहणारे आणि नेहमीच परकीयांचे हल्ले होत असल्यामुळे जीवनमरणाच्या प्रश्नाने एकमेकांशी निगडित झालेले लोक, आपल्याला इतरांहून निराळे मानू लागले व त्या भावनेतून पुढे राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. (३) सरंजामशाही पद्धतीमुळे शांतता व सुव्यवस्था काही प्रमाणात तरी राखली गेली. राजा सर्व प्रदेश आपल्या मालकीचा मानीत असे. प्रमुख सरदारांना जमीन देत असे. त्यांच्याकडून ती इतरांना मिळत असे, जमिनीच्या मोबदल्यात स्वामित्व स्वीकारणे, स्वामिनिष्ठेची शपथ घेणे, शासक म्हणून काम करणे, युद्धकाळात सैन्यासह मदत करणे, ठराविक देणग्या देणे, या गोष्टी कराव्या लागत. मालकी सर्व हक्कांचा व कर्तव्यांचा आधार मानली जाई. या पद्धतीमुळे राजाला थोड्या खर्चात मोठे सैन्य ठेवता येई, नियमितपणे ठराविक रक्कम खर्चासाठी

मिळे, कायदे करता येत व शांतता राखता येई. सरंजामशाही राजकीय तत्त्वावर अधिष्ठित नव्हती. प्रचलित परिस्थितीमुळे ती पद्धती निर्माण झाली. कोणीही समर्थ माणूस नेता बनून स्वतंत्रपणे कारभार करू शके. नेता आणि अनुयायी यांचे संबंध वैयक्तिक निष्ठेवर अवलंबून असत. नेत्याशी एकनिष्ठतेची शपथ घेऊन वेळप्रसंगी सैनिक म्हणून त्याची सेवा करणाऱ्या व्यक्ती अनुयायी असत, नागरिक नसत, सरंजामदारांची सत्ता मर्यादित असे. सर्व पद्धती करारावर अवलंबून असे. सार्वभौमत्व कोणालाच नव्हते. रूढी कायद्यासमान होती. सरंजामशाहीतून राष्ट्र-राज्य निर्माण झाले असले, तरी सरंजामशाहीत राज्यसंस्थेचा विकास होण्याची शक्यता नव्हती. कारण वैयक्तिक निष्ठा, नेता व अनुयाची यांतील करार आणि त्या करारानुसार परस्परांना प्राप्त झालेले अधिकार व हक्क एवढेच सरंजामशाहीचे स्वरूप होते.

सरंजामशाहीमुळे सामंत, भूदास इ. वर्ग समाजात स्वाभाविकपणे निर्माण झाले. व्यापारवृद्धीमुळे उदयास आलेल्या नव्या शहरांत उद्योग-संघटना, व्यापारी संघटना व कारागीर संघटना (गिल्ड्स, मर्चन्ट-गिल्ड्स व क्रॉफ्ट-गिल्ड्स) निर्माण झाल्या. सांपत्तिक पुढारलेली नवी शहरे सरंजामशाहीच्या चौकटीत बसण्याजोगी नव्हती; कारण शहरांच्या समस्या नव्या स्वरूपाच्या होत्या. जीवनपद्धती भिन्न होती, त्यामुळे नवी मूल्ये आणि नव्या प्रथा निर्माण होत होत्या. या सर्वांमुळे आणि राजांच्या वाढत्या सत्तेमुळे सरंजामशाहीपद्धती मागे पडली. रोमन साम्राज्याच्या विनाशानंतर आणि राष्ट्र-राज्यांच्या निर्मितीच्या दरम्यानच्या काळात सरंजामशाहीमुळे शांतता आणि सुव्यवस्था बऱ्याच प्रमाणात शक्य झाली हेच तिचे महत्व.

राजांची वाढती सत्ता आणि पोपची सत्ता यांत मध्ययुगीन काळात संघर्ष निर्माण झाला. पोपने राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ असून सर्व राजांवर पोपची अधिसत्ता आहे, असा दावा मांडल्यामुळे आणि पोपचे आदेश न मानल्यास राजांना धर्मबहिष्कृत करण्याची धमकी दिल्यामुळे यूरोपीय राजांना आपल्या स्वाभिमानाला आणि इभ्रतीला धोका पोहोचतो असे वाटले आणि त्यामुळे संघर्ष निर्माण झाला. धर्मसंस्थेला-ख्रिश्चन चर्चला-पवित्र रोमन साम्राज्याचा अधिपती व पोप यांच्यातील परस्परसंबंध काय असावेत व कसे असावेत यांबाबत निश्चित धोरण आखता आले नाही किंवा त्यांच्यात सामंजस्य व समन्वय साधता आला नाही. अंतर्गत मतभेदांमुळे धर्मसंस्था आतून पोखरली गेली होती, भिन्न विचारप्रणालींत व विविध पंथांत एकात्मता कायम ठेवणे धर्मसंस्थेला शक्य होत नव्हते. प्रत्यक्ष पोपच्या स्थानासाठी अंतर्गत संघर्ष होता. अंतर्गत संघर्षामुळे निर्माण झालेल्या धर्मसंस्थेच्या कमकुवतपणाचा यूरोपीय राज्यकर्त्यांनी पुरेपूर फायदा उचलला. पोपशासन.

सरंजामदार सामंतवर्गावर पुरेसा वचक नसल्यामुळे, राजांना आपली सत्ता टिकविण्यासाठी, सरंजामशाहीच्या तत्त्वांपेक्षा कोणत्या तरी निराळ्या तत्त्वाची आवश्यकता होती. सामान्य जनतेला शांतता आणि सुव्यवस्था पाहिजे होती. उद्योगधंद्यांमुळे निर्माण झालेल्या सधन व्यापारी वर्गाला प्रबळ राजसत्ता पाहिजे होती. धर्मसत्तेविषयी आदर उरला नव्हता. अशावेळी राष्ट्रवादाची भावना निश्चित स्वरूपात उदय पावल्यामुळे आणि ती समाजात नवीन प्रकारचे संबंध निर्माण करणारी ठरल्यामुळे, तिच्या अधिष्ठानावर राजसत्ता प्रभुत्व मिळवू शकली.

मध्ययुगाच्या शेवटी यूरोपच्या निरनिराळ्या प्रदेशांत राष्ट्रीयत्वाला पोषक अशा समान संस्कृती, समान भाषा आणि समान जीवनपद्धती या गोष्टी अस्तित्वात होत्या. भौगोलिक परिस्थितीमुळे, इतिहासाच्या अकल्पित घटनांमुळे, भाषा आणि आचारविचार यांत प्रादेशिक फरक पडत गेल्यामुळे, एकमेकांपासून भिन्न अशा प्रदेशात राष्ट्रीयत्वाची जोपासना झाली. प्रादेशिक निष्ठा सबळ होऊन वास्तव्य असलेल्या भूमीकडे पितृभूमी अथाव मातृभूमी या दृष्टीने पाहिले जाऊ लागले. विज्ञानामुळे रूढी व प्रघात यांचे प्राबल्य कमी होऊन समाजजीवनाची नवीन दृष्टी जनतेला लाभली.

**आपली प्रगती तपासा**

१. सरंजामशाही वरील वाद आणि चर्चाविश्व यावर टीप लिहा

## ७.९ सारांश

भारतातील सरंजामी व्यवस्थेचे स्वरूप प्रामुख्याने जमीनजुमल्याच्या आर्थिक व्यवहारांशी निगडित होते. त्यांत जमिनीवर काम करणारे कूळ व जमिनीचा मालक किंवा वतनदार वा सरंजामदार असे दोन प्रमुख घटक होते. सरंजामदाराचे संरक्षण मिळविण्याच्या बदल्यात कष्टकरी-शेतकरी वा कुळांना आर्थिक दृष्टया सर्वस्वी जमीनदार मालकावर वा सरंजामदारावरच अवलंबून राहावे लागे. परिणामतः एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्याला असलेला दर्जा पूर्णत: नाहीसा होई. त्या शेतकरी-कष्टकरी असलेल्या व्यक्तीचे भवितव्य ठरविण्याचा सर्व अधिकार जमीनदाराकडे-सरंजामदाराकडे असे. शासनाबरोबर अशा कुळाला (शेतकऱ्याला) प्रत्यक्षात कोणताही व्यवहार करता येत नसे. त्याचे सर्व व्यवहार सरदार वा जहागिरदार वा सरंजामदार यांमार्फत चालत. सरंजामदार व कुळे यांचे संबंध वंशपरंपरगत चालत असत. प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी अथक श्रमाने जे शेतातून मिळवील, त्यातील मोठा वाटा वा खंडणी सरदारांना-जहागिरदारांना देत असे. त्यामुळे शेतकरी मात्र कायम गरिबीत राहात असे व सरदार श्रीमंत होत जात. शेतीची मालकी नसलेला शेतमजूर आणि मालक असलेला सरंजामदार यांचे आर्थिक हितसंबंध परस्पर भिन्न होते. सरंजामदार आपल्यापेक्षा मोठया सरंजामदाराला किंवा राजाला विशिष्ट खंडणी देऊन शेतकरी व शेतमजुरांवर अधिसत्ता गाजविण्याचा जणू परवानाच मिळवीत असे. या अधिसत्तेच्या मोबदल्यात तो शेतकऱ्याची आणि त्यांच्या कुटुंबाची जेमतेम उपजीविका होईल, याची मात्र काळजी घेत असे.(मराठी विश्वकोश, खंड १७)

साधारणतः नवव्या-दहाव्या शतकानंतर भारतीय समाजात अनेक महत्त्वाचे बदल झाले. त्यापैकी एक म्हणजे सरंजामशाही ही होय. या नव्या व्यवस्थेत सामंत, रणक किंवा

राऊत (राजपूत) इत्यादी लोकांच्या विशिष्ट वर्गाची शक्ती खूप वाढली. या वर्गांची उत्पत्ती वेगवेगळ्या प्रकारे झाली. यापैकी काही लोक सरकारी अधिकारी होते, ज्यांचे पगार रोख पैशांऐवजी महसूल म्हणून गावांमध्ये दिले जात होते, ज्यातून त्यांना कर मिळत असे. इतर पराभूत राज्याकाडूनही कर वसूल केला जात होता. या करदात्यात काही अधिक वंशपरंपरागत स्थानिक सरदार किंवा शूर सैनिक होते, ज्यांनी त्यांच्या काही सशस्त्र समर्थकांच्या मदतीने अधिकार क्षेत्र स्थापन केले होते. यापैकी काही फक्त गावांचे प्रमुख होते आणि काहींचा काही गावांवर अधिकार होता आणि काही असे होते जे संपूर्ण क्षेत्रावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास सक्षम होते. अशाप्रकारे या सरदारांच्या निश्चित श्रेणी होत्या. त्यांची कार्यकक्षा वाढवण्यासाठी ते सतत आपापसात भांडत. अशी करपात्र क्षेत्रे जी राजाने आपल्या अधिकाऱ्यांना किंवा समर्थकांना दिली होती ती तात्पुरती होती आणि जी राजा पाहिजे तेव्हा परत घेऊ शकत होता.

सरंजामशाही समाजाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यात असे सरदार लोक अधिक शक्तिशाली असतात. यांचा काम न करता जमिनीवर हक्क असतो. सरंजामदारांकडून भारतातीय समाजाच्या विकासावर दूरगामी परिणाम झाले. या व्यवस्थेमुळे राजाचे सामर्थ्य कमी झाले. राजा सरंजामदार सरदारांवर अधिक अवलंबून राहिला. यामुळे सरंजाम स्वतःचे सैण्याच्या मदतीने तो राजांना विरोध करू लागला. मोगल-तुर्कांशी झालेल्या संघर्षात भारतीय राज्यांची अंतर्गत कमजोरी आणि मतभेद नंतर घातक ठरले. या छोट्या राज्यांनी व्यापाराला परावृत्त केले आणि खेड्यांमध्ये अशा अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन दिले जेणेकरून ते अधिकाधिक स्वावलंबी होऊ शकतील. या सरंजामदारांच्या प्रभावामुळे गावातील स्वराज्यही कमकुवत झाले. असे असूनही, सरंजामशाही व्यवस्थेचे काही फायदेही होते. हिंसाचार आणि अशांततेच्या काळात, अधिक शक्तिशाली सामंत सरदारांनी शेतकरी आणि इतरांच्या जीवनाचे आणि मालमत्तेचे रक्षण केले. ज्याशिवाय दैनंदिन जीवन खूप कठीण झाले असते. काही सरंजामदारांनीही शेतीच्या विस्तारात आणि विकासात रस दाखवला.

## ७.१० स्वध्यायावर आधारित प्रश्न

१. सरंजामशाहीचे भारतीय स्वरूप स्पष्ट करा
२. सरंजामशाहीचीवैशिष्ट्य सांगा
३. सरंजामशाही काळातील अर्थव्यवस्था कशी असते ते सांगा.
४. सरंजामशाहीवरील वादविवादाची चर्चा करा.

## ७.११ संदर्भ ग्रंथ


१. प्रा.रामशरण शर्मा, भारतीय सरंजामशाही,सुगावा प्रकाशन, पुणे
२. मराठी विश्वकोश खंड नंबर १७, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.
३. Block, Marc, *Feudal Society*, London, 1962.
४. Coulbom, Rushton, *Feudalism in History*, Princeton, 1956.


❖❖❖❖

# ८

# ऋग्वेदिक धर्माची वैश्विक दृष्टी

**घटक रचना**

८.० उद्दिष्टे
८.१ प्रस्तावना
८.२ वैदिक धर्म
८.३ ऋग्वेदिक देवता
८.४ वैदिक धर्म संकल्पना व उपासना मार्ग
८.५ ऋग्वेदिक धार्मिक संकल्पनेतील देवी - देवतांचे वैशिष्ट्ये
८.६ सारांश
८.७ स्वाध्यावर आधारित प्रश्न
८.८ संदर्भ ग्रंथ

## ८.० उद्दिष्टे

- वैदिक धर्माचा आढावा घेणे.
- ऋग्वेदिक देवतांचा अभ्यास करणे.
- वैदिक धर्म संकल्पना व उपासना मार्ग यांचा आढावा घेणे.

## ८.१ प्रस्तावना

जगातील विविध धर्मांचा सगळ्यात मोठा समुदाय भारतातच आढळतो. ज्या धर्मांना उच्च दर्जाचे विश्वविषयक विशिष्ट तत्त्वज्ञान आहे, असे सात मुख्य धर्म भारतात आढळतात. हिंदू ( प्रारंभी वैदिक ) धर्म, बौद्ध धर्म व जैन धर्म हे भारतातच उदयास आले व जगभर प्रसारित झालेले धर्म आहेत. या प्रत्येकाचे विशिष्ट बौद्धिक तत्त्वज्ञान आहे. पारशी, ज्यू किंवा यहुदी ( ज्यू धर्म), ख्रिश्चन व इस्लाम हे चार विदेशातील धर्माचा प्रचार देखील भारतात झालेला आढळतो. भारतीय संस्कृतीचे आणि हिंदू धर्माचे मूलाधार मानले गेलेले ग्रंथ म्हणजे वेद. वेद ह्या शब्दाचा मूळ अर्थ ज्ञान किंवा विद्या असा आहे. विद्या व कला ह्यांनाच आरंभी वेद ही संज्ञा होती आणि विविध विद्यांचा निर्देश ‘ वेद ’ ह्या संज्ञेने केला जातो.

ऋग्वेदिक काळातील आर्यांचा धर्म व त्यांच्या धार्मिक संकल्पना, तत्वज्ञान यांची माहीती सर्वप्रथम ऋग्वेदातच आढळते. ऋग्वेदामधील प्रथम, द्वितीय व सातव्या मंडळामध्ये आर्यांच्या धार्मिक संकल्पनांची माहीती मिळते. सुष्टीगीतांच्या स्वरूपातच ऋग्वेदिक धर्माची



munotes.in

सुरवात होते. वैदिक लोकांचा किंवा वैदिक समाजाचा धर्म अग्निपूजाप्रधान आहे. यज्ञाच्या कर्मकांडात एका किंवा अनेक अग्नींची स्थापना करून इंद्र, वरुण, मित्र, सविता, आदित्य, उषा, वायू इ. देवतांना स्तोत्रांनी म्हणजे मंत्रांनी स्तवन करीत हविर्द्रव्य अग्नीमध्ये अर्पण करणे हे यज्ञाचे थोडक्यात स्वरूप होय. वैदिक लोक हे मुख्यतः अग्निपूजक होते मूर्तिपूजक नव्हते. मूर्तिपूजा त्यांनी हळूहळू स्वीकारून हिंदू धर्मांचे सर्वसमावेशक रूप निर्माण केले. ऋग्वेदिक लोकांच्या धार्मिक संकल्पनांमध्ये निसर्गशक्तींना महत्वाचे स्थान होते.

## ८.२ वैदिक धर्म

वेद हा शब्द संस्कृत मधील विद या धातूपासून तयार झाला आहे. विद चा अर्थ ज्ञान घेणे किंवा जाणणे असा होतो. वेद व वेदांमधील तत्वज्ञानावर आधारलेल्या आर्यांच्या धर्मसंकल्पनेला ' वैदिक धर्म ' असे म्हणतात. वैदिक धर्म हा भारतातील व जगातील प्राचीन धर्म आहे. जगातल्या यहुदी, कन्फ्यूशियस, व ख्रिश्चन धर्माच्या बरोबरीने वैदिक धर्माची तुलना होते. वैदिक धर्मतील विविध साहीत्य ज्यात वेद, ब्राह्मणके, उपनिषदे, षडदर्शन, गीता, सूत्रे, स्मृती व धर्मशास्त्रामधून वैदिक धर्माची माहीती मिळते. सर्वकालिकात, वैश्विकता, सहीष्णुता, भौतिकता, परिवर्तनशीलता, अध्यात्मिकता व वैचारिक स्वायत्तता ही वैदिक धर्माची वैशिष्ट्ये मानता येईल.

वैदिक धर्माचे आधुनिक भाष्यकार डॉ. राधाकृष्णन यांनी ह्या धर्माचे वर्णन हिंदू जीवनाचा राजमार्ग (Hindu Way of Life) असा केला आहे. वैदिक धर्माने भारतीय समाज व राष्ट्राचा राजनैतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक विकासाचा मार्ग अधोरेखित केला. साधारणपणे ई.स. पूर्व १५०० - ५०० हा वैदिक संस्कृतीचा कालखंड मानला जातो. याच कालखंडात वैदिक धर्माचा उदय व विकास झालेला दिसून येतो.

## ८.३ ऋग्वेदिक देवता

प्राचीन भारतात आर्यांना निसर्ग शक्तीची व्यापकता, भीषणता व निसर्गातील घडणाऱ्या विविध घडामोडी याविषयी कुतूहल, जिज्ञासा व आदरयुक्त भीती वाटत होती. आर्य समाज प्राचीन काळी ज्या ज्या निसर्ग शक्तींच्या सानिध्यात जीवन जगत होते किंवा ज्या निसर्ग शक्तींमध्ये त्यांना मानव सदृश्य शक्तींचा भास होत होता. अशा शक्तिंनाच त्यांनी देवता माणून त्यांची पूजा चालू केली. प्राचीन काळी निसर्ग शक्ती अनेक होत्या त्यामुळे देवी देवता देखील अनेक मानल्या गेल्या. तसेच या देवतांना प्रसन्न करण्यासाठी स्तुती, प्रार्थना व विविध मंत्रांची देखील निर्मिती केली गेली. या प्रमुख वैदिक देवता पुढील प्रमाणे होत्या.

**१) वरुण :**

वरुण ही वैदिक काळातील एक सर्वशक्तिमान देवता होती. वरुण नीतिसंरक्षक असून निसर्गाच्या कायद्याची अंमलबजावणी करतो. वरुण देवतेचे स्वरूप हे स्वात्विक व नैतिक आहे. वरुण हा आकाश व पृथीचा निर्माता व पृथ्वीचा राजा आहे. वरुणाने पृथ्वीला स्थिर केले, सूर्याला तेज दिले, नद्यांना पाणी दिले व सागराला व्यापकता दिली. थोडक्यात,

वरुण ही ऋताची देवता आहे. ऋत हे नैतिकतेशी संबंधित आहे. वरुण हा न्यायाधीशाप्रमाणे कार्य करतो, जर कोणी व्रताचा भंग केला असेल तर त्यांना तो शासन ही करतो. ऋग्वेदामध्ये वरुणाचा स्वरूप स्पष्ट करण्यासाठी १० - १२ सूक्त आहे. उत्तरवैदिक काळानंतर वरुण देवतेचे महत्व कमी होऊन हा केवळ जलाधिपती द्विकाल्प प्रजन्याची व सागराची देवता बनली.

**२) इंद्र :**

इंद्र ही आर्यांची दुसरी सर्वश्रेष्ठ देवता होती. इंद्र यादेवताला वज्रदेही किंवा वज्रबाहू असे देखील म्हटले आहे. ऋग्वेदामध्ये ज्या देवतांची स्तुती केली आहे त्यामध्ये इंद्र देवाला विशेष महत्व आहे, कारण इंद्र देवतांच्या स्तुती साठी २५० सूक्तांची रचना केलेली आढळते. इंद्र हा देवांचा सम्राट मानला गेला व तो पराक्रमी योद्धा होता. त्याने सूर्य, उषा, उदक, अश्व, गायी व रथ निर्माण केले. ऋग्वेदात इंद्राचे वर्णन ऋषींनी पुढील प्रमाणे केले आहे, “ज्याने अहीला मारून सप्तसिंधूंना मुक्त केले, ज्याने बलाच्या अटकेत असलेल्या गाईंना सोडवून घेतले, ज्याने मेघात अग्नी उत्पन्न केला आणि जो युद्धात क्षत्रूंचा नाश करतो, तो इंद्र होय." ( ऋग्वेद २.१३.३ ) क्षत्रूंची पुरे उध्वस्त केल्यामुळे इंद्रास पुरंदर ही पदवी देण्यात आली होती.

थोडक्यात, इंद्र हा सुष्टीचालक व पराक्रमी युद्ध देवता होती. परंतु नंतर पुराणांमध्ये इंद्र हा स्वर्गात राहणारा, अमृतपान करणारा, अप्सरांच्या नृत्यामध्ये रंगणारा आणि निष्क्रिय कारस्थानी सुखलोलुप, स्त्रीलंपट व भ्रष्टचारी देवता असे त्याचे वर्णन केले आहे. (जोशी पी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. ३४५)

**३) अग्नी :**

ऋग्वेदामध्ये इंद्रा खालोखाल अग्नी देवतेला विशेष महत्व होते. ही एक महत्वाची भूदेवता होती. देव व मानव यांच्यातील प्रमुख दुवा म्हणून आर्यांनी अग्नी आधारतभूत मानलाआहे. उत्तर वैदिक काळात यज्ञविधी व कर्मकांडाचा विस्तार झाल्याने यज्ञ कुंडातील अग्निदेवतेचे महत्व वाढले. ऋग्वेदामध्ये अग्निसाठी खास २०० सूक्त आहे. अग्नी ही गृहस्थीचा गृहपती, देवाचा सारथी, दात्यांचा अतिथीआणि मनुष्याचा हीतचिंतक मित्र, नातेवाईक व सरंक्षक आहे. अग्नी हा विश्वातील सर्व मानवाचा मित्र असल्याने त्याला ‘अग्नीवैश्वानर’ किंवा ‘वैश्वानर’ या नावानेही ओळखले जाते. यज्ञ कर्मात व नित्य कर्मात अग्नीचे महत्वपूर्ण स्थान असल्याने ती आर्यांची महत्वपूर्ण देवता होती.

**४) अश्विनीकुमार :**

सूर्य, चंद्र, अग्नी, इंद्र, वरुण, वायू इत्यादी ३३ मुख्य देवतांपैकी ऋग्वेदातील एक महत्त्वाची युग्मदेवता. ते कायम परस्परांसोबत राहतात. दोन अश्विन देवतांचा समूह म्हणजे अश्विनी होय. देवतांचे वैद्य आणि शल्यविशारद या अनुषंगाने वैदिक साहीत्यात त्यांचा उल्लेख आहे. शरीरपालन करणे, रोग नष्ट करणे, दीर्घायुष्य प्रदान करणे यांसारखी कामे हे करतात. वेदांतील ५० सूक्ते त्यांवर आहेत. म्हणून त्यांना सूक्तांची देवता म्हणतात. ऐतरेय ब्राह्मणात ‘अश्विनौ वै देवानां भिषजौ’ (१.१८) असा उल्लेख आला आहे. त्यावरून ते देवांचे वैद्य होते, हे स्पष्ट होते. परंतु वेदात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यात त्यांनी मनुष्यांवर चिकित्सा आणि शल्यक्रिया केल्याचे आढळते.

### ५) सोम :

सोम ही वनस्पतीची भूदेवता होती. ऋग्वेदामध्ये सोम या देवतेचा उल्लेख संस्कार देवता म्हणून केलेला आढळतो. ऋग्वेदात सोम देवतेसाठी १२० सूक्त आलेली आहेत. पर्वतांमधील सोमवेलीपासून तयार केलेल्या सोमरस पाणी व दुधात मिसळून यज्ञ प्रसाद म्हणून ते प्राशान करीत. विविध देवता, इंद्र व यज्ञातील ब्राह्मण तसेच यजमान सोमरसपान करीत. आर्यांच्या मते, सोमरसामुळे मनुष्य हा अजरामर होतो व बुद्धीची वाढ होते. सोम हा औषधांचा राजा व जीवनदाता मानलागेला. सर्व सोम सूत्रे एकत्र करून ऋग्वेदाचे नववे मंडळ बनविले गेले. सोमरसाला मधू अथवा इंदू देखील म्हटले जाते. सोम हा वाचा देतो म्हणून त्याला वाचस्पती देखील म्हटले गेले.

### ६) अपां नपात् :

अप् म्हणजे जल. अपां नपात् ही एक वैदिक देवता आहे. या देवतेच्या नावाचा अर्थ 'जलाचा पुत्र' असा आहे. यालाच अग्नीचे विद्युतरूप असे सुद्धा म्हणतात. ही अंतरिक्ष स्थानातील देवता आहे. ऋग्वेदातील २.३५ हे सूत्र या देवतेची स्तुती करते. ही एक तेजस्वी आणि दीप्तिमान देवता आहे. कोणत्याही इंधनाशिवाय ही देवता आपले तेज प्रकट करते. असीम तेजाने ही देवता पुष्ट असून या देवतेचा रंग विजेसारखा सुवर्णमयी आहे. घृत हे या देवतेचे खाद्य आहे आणि तिच्याजवळ स्वतःची गाय असून ती उत्तम दुधाचा पुरवठा करते. 'आशुहेमन' या विशेषणाचा उल्लेख या देवतेसाठी केला आहे. म्हणूनच या देवतेला अग्नीचे प्रतीक मानले जाते. मेघांच्या आत असलेली वीज असेच या देवतेचे वर्णन येते.

### ७) उषा :

उषा म्हणजे अरुणोदय. ही प्रातःकाळाची देवता म्हणून वैदिक साहीत्यात उल्लेख आढळतो. ऋग्वेदातील २० सूक्ते उषा देवतेची असून ही सर्व सूक्ते अतिशय आलंकारिक, प्रभावशाली आणि प्रतिभासंपन्न शैलीमध्ये रचलेली आहेत. या देवतेच्या वर्णनप्रसंगी तिचे भौतिक स्वरूप मंत्रद्रष्टारांच्या दृष्टीतून निसटून जात नाही. उषःकाल या नैसर्गिक कालचक्रातील एका घटनेला ऋषींनी विलक्षण दैवी स्वरूप काव्यमय शैलीत दिलेले दिसून येते. वैदिक ग्रंथात उषाचा उल्लेख हा आकाशाची मुलगी, रात्रीची बहीण, अश्विनीची मैत्रीण, सूर्याची प्रिया, व जगाची तेजस्वी सम्राज्ञी असून ती सुवर्ण रथातून येते असा आहे.

ऋग्वेदामध्ये उषा या देवतेचा उल्लेख रेवती, सुभगा, प्रचेता, विश्ववारा, पुराणवती, मधुवती, ऋतावरी, सुम्नावरी, आरुषी:, अमर्त्या, हीरण्यवर्णा, मघोनी इत्यादी विशेषणांनी केला गेला आहे. त्याचप्रमाणे 'पुराणी युवति:' (ऋग्वेद ४,५१,६) असाही उल्लेख केलेला आढळून येतो. कारण ती प्राचीनतम, आदिम असूनही दररोज नव्या रूपाने प्रकट होते. ती अमरत्वाचे प्रतीक असल्याने तिला अमर्त्या हे विशेषण मिळाले आहे. ती दानशूर या अर्थी मघोनी या विशेषणाने तिचे वर्णन केले आहे. (ऋग्वेद.४.५१.३). त्याचप्रमाणे ती निसर्गनियमांचे यथायोग्य पालन करून वेळेवर प्रकट होते. म्हणून ऋतावरी हे विशेषण तिला सुयोग्य वाटते.

### ८) सूर्य :

सूर्य ही तेज व बलाची देवता होती. पुषण, रवी, मित्र, विष्णू, दिनकर, आदित्य, सविता, प्रभाकर व दिवाकर ही सूर्याची नावे होती. ही विश्वाचे पालन पोषण करणारी देवता

होती. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच अज्ञान अंधकाराचा नाश करून ज्ञानाचा प्रकाश निर्माण करणारी देवता म्हणजे सूर्य देवता होय. सूर्य हे अग्निचेच रूप असून देवांनी सूर्याला आकाशात ठेवले अशी कल्पना ऋग्वेदात मांडण्यात आली आहे. मानवी जीवनाला दीर्घ आयुष्य, निरोगी जीवन, शक्ती, संपत्ती ही सूर्याच्याच कृपेने लाभते.

**९) यम :**

ऋग्वेदात यमासाठी तीन सूक्ते आढळतात. यम हा मृत्यूचा अधिपती, आदिमानव, सर्वप्रथम मृत झालेला मानव आणि पितृलोकाचा अध्यक्ष आहे. तो सर्वांचे पापपुण्य जाणत असल्याने पुण्यवान लोकांना तो श्रेष्ठ स्थळी नेतो. यम जी मृत्यूची देवता होती व तिचे स्थान दक्षिणेकडे होते. रेड्यावर रौद्र रूपात स्वर झालेला यम 'मृत्यूचा सम्राट' आहे. त्याचा सहकारी चित्रगुप्त हा पाप - पुण्याचा हीशोब ठेवतो.

**१०) ब्रह्मा - विष्णू - महेश :**

उत्तर वैदिक काळात ऋग्वेदकालीन निसर्ग देवतांचे महत्व कमी झाले व यज्ञ विधी व कर्मकांडामुळे ब्रह्मा - विष्णू - महेश ह्या तीन देवतांचा प्रभाव वाढला. सृष्टीचा निर्माता कोण असावा ह्या जिज्ञेसेमधून 'ब्रह्म' देवतेचा उदय झाला. सूर्य व अग्नीचे रूप असलेली विष्णू ही विश्वाचे पालन पोषण करणारी देवता होती. तर जगात अनीती व अनाचार माजल्यानंतर प्रलय होऊन सुष्टी संहार होतो व पुन्हां ब्रह्मदेव सुष्टी निर्माण करतो त्या दृष्टीने रुद्र किंवा शिव ही तिसरी सुष्टी संहारक प्रलयाची देवता होती.

**आपली प्रगती तपासा.**

१. वैदिक काळातील विविध देवतांची माहीती द्या.

## ८.४ वैदिक धर्म संकल्पना व उपासना मार्ग

हजार वर्षाच्या वैदिक परंपरेत विविध धर्मसंकल्पनेचा व उपासना पद्धतींचा विकास झालेला होता. ते पुढील प्रमाणे :

**१) वैदिक धर्मतील कर्म व ज्ञान पद्धती :**

वैदिक धर्मात कर्म व ज्ञान हे उपासनेचे महत्वाचे मार्ग होते. आर्यांनी आपले अनेक प्रकारचे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी व विविध देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञाचा अंगीकार केलेला दिसून येतो. हा कर्म प्रकारचा प्रमुख मार्ग होता. याव्यतिरिक्त व्रत, पूजा, तपाचरण, योगसाधना, संस्कारविधी, मंत्रपठण, अध्ययन, प्रार्थना, सदाचरण व वर्णाश्रमधर्म हे अन्य उपासनेचे मार्ग होते.

पुढील काळात वैदिक कर्मकांडाचा अतिरेक झाल्यामुळे उपनिषदांमध्ये ज्ञान, चिंतन व तपाचरण यावर आधारित 'ज्ञानमार्ग' विकसित झाला. आत्मा, ब्रह्म, माया, मोक्ष व सृष्टीच्या उत्पत्तीचे आकलन झाल्याने ब्रह्मज्ञान व मोक्ष मिळतो. असे उपनिषेदत म्हटले गेले. गीतेमध्ये पूर्वीच्या काम व ज्ञान मार्गाबरोबर भक्तिमार्गाची ही त्यात भर घातली. वैदिक काळातील हा ज्ञान मार्ग क्लिष्ट व खडतर असल्याने सर्वसामान्य लोक याकडे फारसे वळले नाही.

**२) कर्मविपाका सिद्धांत ( कर्म व पुर्नजन्म ) :**

वैदिक तत्वज्ञानातील कर्मविपाक हा सिद्धांत मनुष्याच्या भौतिक व परलौकिक जीवनाशी संबंधित आहे. येथे कर्म म्हणजे कृती व विपाक म्हणजे परिणाम असा अर्थ होतो. जेंव्हा या जन्मातील बरी - वाईट कृत्ये व या जन्मातील भोगावी लागणारी सुखदु:खे यांचा सुसंगत मेळ जमवता येत नाही तेंव्हा असे मत मांडले गेले की, मागे या माणसाचा जन्म होता व त्यावेळी त्याने केलेल्या चांगल्या कृत्यांची चांगली फळे त्याला आज मिळत आहेत मग भले तो आज वाईट वागेना का ! आज सज्जन असणाऱ्या माणसाने मागील जन्मी पाप केले असेल तर त्याला त्याचे फळ आज भोगलेच पाहीजे. मागचा जन्म म्हटले की पुनर्जन्म आला व कर्माची फळे चुकत नाहीत हा कर्मविपाक सिद्धांत आला.

मनुष्य आयुष्यभर शारीरिक, मानसिक, बौद्धिक, व भावनिक कर्म आपल्या ज्ञानाद्वारे करत असतो त्यामुळे मनुष्याला सुख दुःखे प्राप्त होत असतात. त्याला अनुकूल कर्माचे इष्टफल व प्रतिकूल कर्माचे अनिष्ट फळ प्राप्त होत असते. उदा. शरीराच्या आरोग्याकडे दुर्लक्षकेल्यास तो आजारी पडतो. किंवा विद्यर्थ्याने अभ्यास न केल्यास तो अनुत्तीर्ण होतो.

**३) चार पुरुषार्थ :**

वैदिक काळात मानलेली धर्म, अर्थ, काम व मोक्ष ही मानवी जीवनाची मूलभूत उद्दिष्टे म्हणजे चार पुरुषार्थ होत. या भारतीय मूलभूत संकल्पनेचा अर्थ असा : 'पुरुष' या संज्ञेचा मूळ अर्थ 'शरीरात राहणारा आत्मा' वा केवळ 'आत्मा'असा असल्यामुळे त्या संज्ञेच्या अर्थात पुरुषाप्रमाणेच स्त्रीचाही समावेश विवक्षित आहे. 'अर्थ' म्हणजे इष्ट (इच्छिलेली गोष्ट) किंवा उद्दिष्ट होय. स्त्री-पुरुषांना इष्ट वाटणाऱ्या सर्व गोष्टी चार पुरुषार्थांत अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. हे चार पुरुषार्थ पुढीलप्रमाणे :

**१) धर्म :**

सामान्यतः यज्ञादी शास्त्रविहीत कर्मांचे आचरण आणि सत्य, अहिंसा इत्यादींनी युक्त असे शुद्ध नैतिक वर्तन म्हणजे धर्म होय. धर्मकृत्यात मानवाच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक आचरणाचा समावेश होतो. धर्म माणसाला सुसंस्कृतबनवतो, मानवतावादाचे रक्षण करतो व त्याचा आध्यात्मिक दर्जा वाढवितो.

**२) अर्थ :**

अर्थ म्हणजे योग्य मार्गाने संपत्ती मिळवून तिचा योग्य मार्गानेच विनियोग करावा.

**३) काम :**

इच्छा, तृष्णा, वासना, भोगेच्या, सुखलोलुपता व लैंगिक भूक म्हणजे काम. शारीरिक, बौद्धिक, मानसिक व भावनिक वासना नैसर्गिक असल्यातरी त्यावर निर्बंध असावे. विवाहाच्या मार्गाने स्त्रीसुख घ्यावे व संतती ( प्रजोत्पादन ) करावे.

**४) मोक्ष :**

मोक्ष म्हणजे मुक्ती, आत्माचि कर्मापासून मुक्ती, ही मोक्षाची विविध रूपे आहेत. मनुष्याची जन्म - मृत्यूच्या चक्रातून मुक्ती आणि जीवाला ब्रह्मज्ञानामुळे मिळालेली मुक्ती ही मोक्षाची विविध रूपे आहेत.

हे सर्व पुरुषार्थ परस्परसापेक्ष आहेत. अर्थ-काम धर्माधिष्ठित असले तरच सुख देतात.कामोपभोगाच्या वस्तू आणि यज्ञ, दान, तीर्थयात्रा इ. धर्म यांच्यासाठी अर्थाची गरज असल्यामुळे अर्थ हा काम व धर्म यांचे साधन होय.

पुरुषार्थ कल्पनेचा स्पष्ट उल्लेख वेदांतामध्येनाही. सर्वांत प्राचीन उल्लेख आपस्तंबधर्मसूत्रात सापडतो. नंतरचे सूत्रग्रंथ, स्मृती, पुराणे, महाभारत, भाष्ये, धर्मनिबंध इ. ग्रंथांतून ह्या संकल्पनेची विस्तृतचर्चा आहे. धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र, व मोक्षशास्त्र, अशी प्रत्येक पुरुषार्थाशी संबंधित शास्त्रेही तयार झाली असून जैमिनीची धर्मसूत्रे, कौटिल्याचे अर्थशास्त्र, वात्स्यायनाची कामसूत्रे व बादरायणाची ब्रह्मसूत्रे हे त्यांवरील प्रमुख ग्रंथ होत. पुरुषार्थ ही भारतीयांची संकल्पना असली तरी नैतिक आचरण, आर्थिक समृद्धी, सुखोपभोग आणि पारमार्थिक कल्याणाची अभिलाषा ही शाश्वत ध्येये सर्व उच्च संस्कृतीमध्ये असतात आणि त्यांची व्यवस्था प्रत्येक सुसंस्कृत समाजात कोणत्या ना कोणत्या रूपात आढळतेच.

**४) संस्कार व पाच ऋणे :**

संस्कार म्हणजे सदाचरण. मानवी जीवनातील कर्म ज्याला नैतिकतेची जोड आहे. संस्कार हा कर्माचा एक असा भाग आहे जो संस्कृती मधून जन्माला येतो. वैदिक धर्मात एकूण १०८ व प्रमुख १६ संस्कार आहेत. व्यक्तीच्या जन्मपूर्व काळापासून मृत्युत्तर काळापर्यंत हे संस्कार केले जातात, संस्काराने मानवाची रानटी अवस्था समाप्त होऊन तो सुसंकृत बनतो. या १६ संस्कारात नामकरण, उपनयन, सामावर्तन, विवाह व अंत्यविधी हे प्रमुख संस्कार आज देखील भारतीय समाजात प्रचलित आहे.

मनुष्याच्या उन्नतीसाठी माता, पिता, गुरु, समाज व ईश्वराचे अनंत उपकार कारणीभूत असतात. ह्या उपकाराची परतफेड करण्यासाठी व त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पांच ऋणे सांगितली आहे. मात्यापित्यांची सेवा करून व संतती निर्माण करून मातृपितृऋण, अध्ययन व अध्यापन करून गुरु ऋण, दानधर्म, परोपकार व इतरांची सेवा करून समाज ऋण व धर्मकृत्ये व ईश्वरोपासना करून देव ऋणाची पूर्तता करता येते.

**५) वर्णश्रम धर्म :**

आश्रमव्यवस्था आणि वर्णव्यवस्था ही वैदिक काळातील दोन मुख्य वैशिष्टये आहेत. हिंदूंची पारंपरिक समाजरचना म्हणजे वर्णाश्रमव्यवस्था असे म्हटले जाते.

वर्णव्यवस्थेत व्यक्तीची कर्तव्यकर्मे त्या व्यक्तीच्या वर्णाची द्योतक बनतात. आश्रमव्यवस्थेत वयानुसार व्यक्तीच्या आश्रमांची विभागणी होते व कर्तव्यकर्मे ठरतात. आश्रम म्हणजे विशिष्ट ऋणे फेडण्यास आवश्यक व योग्य अशी कर्तव्यकर्मपद्धती व ती पार पाडण्याकरिता ठरविलेली वयोवस्था किंवा जीवनातील टप्पा किंवा अशा विशिष्ट कर्तव्यकर्मापद्धतीचा अंगीकार करण्याचे वसतिस्थान. आश्रम चार आहेत : ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास.

ब्रह्मचर्य आश्रमात ज्ञान, गृहस्थाश्रमात अर्थ व कामपूर्ती, वानप्रस्थ व संन्यासी आश्रमात धर्माचरण आणि मोक्षप्राप्ती करणे ही त्या त्या आश्रमाची कर्तव्ये आहे.

**६) नीती कल्पना व आध्यत्मिक वाद :**

आर्यांचा वैदिक धर्म हा कर्म व तत्वज्ञानावर आधारलेला असला तरी त्यात नीती कल्पना व सदाचरणाला प्राधान्य होते. ऋग्वेदामध्ये ऋत, ऋजुता, सत्य, इष्ट देवता, पुण्य, स्वर्ग, शुचिता व सदाचरण ह्या नीतिमूल्यांचे विवेचन आढळते. उपनिषदामध्ये ज्ञान, त्याग, सेवा, समर्पण, सदाचरण, संयम या नीतिमूल्याची महती आढळते.

**आपली प्रगती तपासा.**

१) वैदिक धर्म संकल्पना व उपासनामार्ग यांची माहीती द्या.

___

___

___

___

___

## ८.५ ऋग्वेदिक धार्मिक संकल्पनेतील देवी - देवतांचे वैशिष्ट्ये

१) ऋग्वेदिक देवता ह्या निसर्ग शक्तीमधून किंवा चैतन्यातून निर्माण झाल्या होत्या.

२) पुढील काळात पशूंना देखील देवतांचे स्वरूप दिले गेले.

३) देवतांना मानवाप्रमाणेच भाव - भावना आहे असे मानले गेले.

४) श्रेष्ठ व कनिष्ठ असे देवतांचे प्रकार न पाडता सर्व देवता एकाच श्रेष्ठत्वाची किंवा परमेश्वराची रूपे आहे असे मानले गेले.

५) मूर्तिपूजा व मंदिरांचा कुठेही उल्लेख आढळत नाही.

६) या देवतांमध्ये पुरुष देवतेला उच्च स्थान होते, याकाळात स्त्री देवतांचा स्वीकार केला गेला परंतु पुरुषांच्या तुलनेने त्यांचे स्थान कमी होते. पृथ्वी, उषा, अदिती, सरस्वती इ. स्त्री देवता होत्या.

**आपली प्रगती तपासा.**

१. ऋग्वेदिक देवी देवतांचे मुख्य वैशिट्ये सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ८.६ सारांश

वैदिक धर्म हा जगातील एक प्राचीन धर्म म्हणून ओळखला जातो या धर्माची माहीती आपणास वेद, ब्राह्मणके, उपनिषदे, षडदर्शन, गीता, सूत्रे, स्मृती व धर्मशास्त्रातून वैदिक धर्माची माहीती मिळते. वैदिक काळात असंख्य निसर्ग देवतांचा उदय झाला. पुढील काळात त्यामध्ये अनेक नवनवीन देवतांची भर पडली. व त्या देवतांचे स्वरूप देखील बदलत गेले. काळाच्या ओघात देवतांप्रमाणेच त्यांच्या उपासना पद्धतीत देखील बदल झाला. ऋग्वेदिक काळात मंत्रोच्चारण, प्रार्थना व स्तुती गायन हे देवतांच्या उपासनेचे प्रमुख मार्ग होते तर उत्तर वैदिक काळात धार्मिक विधी, पूजा अर्चा व यज्ञ हे उपासनेचे प्रमुख मार्ग बनले.

## ८.७ स्वाध्यावर आधारित प्रश्न

१) वैदिक धर्मातील विविध देवी - देवतांचा आढावा घ्या.
२) ऋग्वेदिक धर्म संकल्पना व उपासनामार्ग पद्धतीचा आढावा घ्या.
३) वैदिक देवीदेवतांची विशिष्ट वैशिष्ट्ये सांगा.
४) वैदिक काळात विकसित झालेल्या धर्माचा आढावा घ्या.

## ८.८ संदर्भ - ग्रंथ

१. डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती (प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत), विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

२. जोशी पी. जी. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०1३

३. श्रीवास्तव के.सि. - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, युनायटेड बुक डेपो, इलाहाबाद, ग्यारावी आवृत्ती २००९.

munotes.in

४. त्रिपाठी रामशंकर, प्राचीन भारत का इतिहास, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, पंचम संस्करण, १९६८

५. विद्यालंकार सत्यकेतू, प्राचीन भारत का धार्मिक, सामाजिक व आर्थिक जीवन, सरस्वती सदन, नई दिल्ली, १९७८

६. मिश्र जयशंकर, प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, बिहार हिंदी ग्रंथ आकदमी, पटना, २०१३

७. Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.

८. Singh Upinder, A History of Ancient and Early Medieval India, From the Stone Age to the 12th century, Pearson education India.

९. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ / विकासपीडिया / मराठीविश्व् कोष

❖❖❖❖

munotes.in

# ९

# उपनिषदे

**घटक रचना**

९.० उद्दिष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ उपनिषदांचा अर्थ

९.३ प्रमुख उपनिषदे

९.४ उपनिषदातील तत्वज्ञान

९.५ सारांश

९.६ स्वाध्यावरील प्रश्न

९.७ संदर्भ - ग्रंथ

## ९.० उद्दिष्टे

- उपनिषदांचा अर्थ समजून घेणे.
- प्रमुख उपनिषदांचा सविस्तर आढावा घेणे.
- उपनिषदातील तत्वज्ञान अभ्यासणे.

## ९.१ प्रस्तावना

विविध धार्मिक चिंतनातून भारतात, भारतीय तत्वज्ञानाचा उदय झाला. प्रारंभी वेद, ब्राह्मणके व अरण्यकातून धार्मिक विचार प्रकट झालेले दिसून येतात. वेदवाङ्मय ही जगातील सर्वांत प्राचीन ज्ञानसंपदा आहे. चार वेद आणि सहा शास्त्रांचा अभ्यास हा प्राचीन गुरुकुल परंपरेत हजारो वर्षे चालत आलेला आहे. तो पूर्ण करणारी व्यक्ती 'दशग्रंथी विद्वान' म्हणून मान्यता पावत होती. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या प्रत्येक वेदाचे संहीता, ब्राह्मण, आरण्यक आणि उपनिषद असे चार भाग आहेत. विश्वातील मानवी जीवनाचे सर्वोच्च तत्वज्ञान उपनिषदात आढळते.

उत्तर वैदिक काळात कर्मकांडाच्या उपासनेचे स्तोत मजल्याने ऋषी मुनी व विचारवंतांनी आरण्यातजाऊन आध्यात्मिक तत्वचिंतानाला प्रारंभ केला. यामधून ज्या विचारांची निर्मिती झाली त्यांना 'अरण्यके' असे म्हणतात. हीच अरण्यके पुढील काळात उपनिषदीक तत्त्वज्ञानाच्या रूपाने अस्तित्वात आली. उपनिषद ही वेदांचाअंतिम भाग असल्यामुळे त्याला वेदान्त असेही म्हणतात. या उपनिषदनांमध्ये मोक्षमार्ग व अध्यात्मशास्त्राची शुद्ध तात्वीक चर्चा आहे.शंकराचार्य, रामानुजाचार्य, माधवाचार्य इत्यादि आचार्यांनी उपनिषदांतील तत्वज्ञानाच्यापायावर आपल्या अद्वैत, विशिष्टाद्वैत व द्वैत



munotes.in

तत्वज्ञानाची मांडणी केली. या कारणामुळे उपनिषदांना भारतीय इतिहासांत अतिशय उच्च दर्जाचे स्थान प्राप्त झाले आहे.

## ९.२ उपनिषदांचा अर्थ

'उपनिषद्' हा शब्द सद् या धातूला उप आणि नि ही उपपदे लागून तयार झाला आहे. सद् याचा अर्थ बसणेअसा आहे.म्हणजेच, उपनिषद् याचा अर्थ जवळ बसणे असा होतो. अत्यंत भक्ति भावाने गुरूजवळ बसणे असा या 'उपनिषद्' शब्दाचा भावार्थहोतो. पण उपनिषद् या शब्दाचा रूढार्थ थोडासा वेगळा आहे. अत्यंत भक्तिभावाने गुरूजवळ बसून गुरूकडून जी पारमार्थिक विद्या शिष्य संपादन करतो, त्या विद्येला उपनिषद् हा शब्द लावण्यांत येतो. थोडक्यात, मानवाला सर्व बंधनातून मुक्त करणारे, ब्रह्म साक्षत्कार घडवणारे आत्मानंदाचे ज्ञानशास्त्र म्हणजे 'उपनिषदे' होय.

उपनिषदांचा नक्की काळ ठरविता येणे अवघड आहे. एवढे मात्र खरे की, ब्राह्मणग्रंथांनंतर उपनिषदांची रचना झाली असावी, पण याच्या पलीकडे निश्चित असे विधान करता येत नाही. स्थूलमानाने ई. स. पूर्व ७०० - ३०० च्या दरम्यान उपनिषेदाची रचना झाली असावी. याज्ञवल्क, शांडिल्य, श्वेतकेतु, भारद्वाज, उद्दालक, मैत्रीयी, व सत्यकामजाबल इ. विचारवंत किंवा ऋषी उपनिषदांचे निर्माते मानले जातात. प्रत्येक वेदांची निरनिराळीं उपनिषदे आहेत व ती आरण्यकाच्या शेवटचे भाग या नात्याने ब्राह्मण ग्रंथांत आले आहेत. उपनिषदांची एकूण संख्या याबाबत विद्वानांमध्ये एकमत आढळत नाही. उपनिषद्वाक्या माहाकोशात २२३ उपनिषदांचा उल्लेख, जॅकोबिन यांनी २३५ उपनिषदांची संख्या दिली आहे, मद्रासच्या ग्रंथालयात २०० उपनिषदांचे भाषांतर आढळते, तर दारा शुकोह याने ५० उपनिषदांचे भाषांतर केले होते. एकूण उपनिषेदाची संख्या ही १०८ मानली जाते. यामध्ये ऋग्वेदाची १०, शुल्क यजुर्वेदाच्या १९, कृष्ण यजुर्वेदाची ३२, सामवेदाची १६ व अथर्ववेदाची ३१ अशी संख्या आहे. मुक्तिकोउपनिषदामध्ये प्रमुख १० उपनिषदांचा उल्लेख आहे. व तीच उपनिषदे प्राचीन व विश्वसनीय मानली गेली आहे. उपनिषदांचा नक्की काळनिश्चित करणे जरी अशक्य असले, तरी जी जुनी व महत्त्वाची अशीउपनिषदे आहेत त्यांच्यामध्ये अगोदरची कोणती व नंतरची कोणती हे अंतर्गत पुराव्यावरून, ठरविता येते. या उपनिषदांचे डायसेनने चार विभाग पाडलेले आहेत, ते

(१) प्राचीन गद्यात्मकउपनिषदे: बृहदारण्यक, छांदोग्य, तैत्तिरीय, ऐतेरेय, कौषीतकी केन

(२) पद्यात्मकउपनिषदे:काठक, ईश, श्वेताश्वतर, मुंडक, महानारायण

(३) नंतरची गद्योपनिषदे : प्रश्न, मैत्रायणीय, मांडूक्य

(४) नंतरची अथर्वोपनिषदे : गर्भ, पिंड, आत्मबोध इत्यादि. या चौथ्या प्रकारच्या उपनिषदांची संख्या बरीच मोठी आहे.

जगातील विविध भाषांमध्ये उपनिषदांचे भाषांतर झालेले दिसून येते. शहाजनचा पुत्र शाहजादा दारा शुकोह याने फारशी भाषेत 'सीर्रर - ए – अकबर' ( महारहस्य ) या नावाने ५० उपनिषदांचे भाषांतर केले आहे. १८०२ मध्ये लॅटिन भाषेत 'औपनिखत' हे भाषांतर झाले. मॅक्समुल्लर याने सेक्रेड बुक्स ऑफ द ईस्ट' या ग्रंथ मालिकेत १२

उपनिषदांचा इंग्रजी भाषेत अनुवाद केला. पॉल ड्युसेनने जर्मनीत व इतर पाश्च्यात भाषेत उपनिषदांचे अनुवाद केल्याचे आढळून येते.

**आपली प्रगती तपासा.**

१. उपनिषद म्हणजे काय हे थोडक्यात सांगा.

___

___

___

___

___

## ९.३ प्रमुख उपनिषदे

**१) ईशोपनिषद :**

ईशोपनिषद किंवा ईशावास्योपनिषद हे महत्त्वाच्या व विश्वसनीय मानल्या गेलेल्या दशोपनिषदांपैकी सर्वाधिक प्राचीन उपनिषद म्हणून ओळखले जाते. शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहीतेचा चाळिसावा अध्याय म्हणजेच ईशोपनिषदहोय. त्यामुळे वैदिक संहीतेमध्ये अंतर्भूत होणारे हे एकमेव उपनिषद ठरते. हे वाजसनेयी उपनिषद, संहीतोपनिषद, मंत्रोपनिषद इ. नावांनीही ओळखले जाते. याज्ञवल्क्य या उपनिषदाचा ऋषी असून 'ईशा वास्यमिदं सर्वम्' या प्रथम मंत्रामुळे प्रस्तुत उपनिषदाला हे नाव मिळाले. केवळ अठरा मंत्र असलेल्या या लहान उपनिषदाचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने फार मोठे महत्त्व आहे. कर्म आणि ज्ञान यांचा समन्वय हा या उपनिषदाचा मुख्य विषय आहे. आत्म्याचे स्वरूप, माहीती असलेले स्वरूप, ज्ञानकर्मसमुच्चय, व्यक्त आणि अव्यक्ताच्या उपासनेचे फळहे यातील विषय म्हणता येतील. केनोपनिषदाप्रमाणेच जीवनावरील भाष्य, प्रश्न, विविध अवयव व त्यांचे इत्सित कार्य ह्यात चर्चिले गेले आहेत.

**२) ऐतरेय उपनिषद :**

हे ऋग्वेद व ऐतरीय ब्राह्मण ग्रंथावर आधारलेले उपनिषद आहे.ऋग्वेदाच्या ऐतरेय आरण्यकाच्या दुसऱ्या विभागातील तत्त्वज्ञानात्मक अथवा ज्ञानकांडात्मक असलेल्या चार ते सहा अध्यायांना ऐतरेयोपनिषद म्हटले जाते. या उपनिषदाचा कर्ता महीदास ऐतरेय आहे. त्यानेच ४० अध्यायांचा ऐतरेय ब्राह्मण हा ग्रंथही लिहीला. या उपनिषदाचा रचनाकाळ इ.स.पू. ६०० पूर्वीचा मानला जातो. या उपनिषदात तीन अध्याय व  पाच खण्ड आहेत. ऋग्वेदाच्या पुरुषसूक्ताच्या आधारे सृष्टीच्या निर्मितीची चर्चा यामध्ये आढळते. या उपनिषदाच्या पहील्या अध्यायात सृष्टीची उत्पत्ती सांगितलेली आहे. दुसऱ्या अध्यायात पुनर्जन्माची निश्चितता आणि शरीराची अनित्यता यांचे निरूपण केले आहे. तिसऱ्या अध्यायात उपास्य देवाचे वर्णन आले आहे. थोडक्यात, जन्म, जीवन व मृत्यूची चर्चा या उपनिषदात आढळते.

**३) बृहदारण्यकोपनिषद :**

हे उपनिषद शुल्क यजुर्वेदाच्या शतपथ ब्राह्मण ग्रंथावर आधारित आहे. याचे तीन भाग व सहा अध्याय आहे. यामध्ये गर्ग ऋषींनी राजा अजातशत्रूला आत्मा व ब्रह्मस्वरूपाचा उपदेश केलेला आहे. राजा जनकाच्या दरबारात याज्ञवल्क व ब्रम्हवृदांच्या झालेल्या चर्चेचे विवेचन ह्याच उपनिषेदातआहे. याउपनिषदामध्ये ब्रह्मप्रजापती, गायत्री, प्राण, परलोक पुनर्जन्म, मंत्रविद्या व संततीउत्पत्ती विज्ञानाची मौलिक चर्चा येथे आढळते. हे सर्वात मोठे उपनिषद आहे.

**४) तैत्तिरीय उपनिषद :**

कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे हे उपनिषद आहे. या उपनिषदाचे तीन भाग आहेत. त्यांना 'वल्ली' असे म्हटले जाते. त्यांपैकी पहील्या शिक्षावल्लीत बारा अनुवाक (पोटभाग), दुसऱ्या ब्रह्मानंदवल्लीत नऊ, तर तिसऱ्या भृगुवल्लीत दहा अनुवाक आहेत. वल्लीनुसार या उपनिषदातील महत्त्वाचे विषय पुढीलप्रमाणे : शिक्षावल्लीत निरनिराळ्या शिक्षा (वर्णोच्चारांचे प्रकार) वर्णिल्या आहेत. थोडक्यात, शिक्षा म्हणजे वर्णोच्चारशास्त्र. शिक्षावल्लीतील दुसरा अनुवाक नावाप्रमाणेच वर्णोच्चारशास्त्रविषयक आहे. तिसऱ्या अनुवाकात वेदांच्या अर्थाचे विवेचन, अधिलोक (अधिभौतिक), अधिज्योतिष (ज्योतिषविषयक), अधिविद्य (अध्ययन-अध्यापनविषयक), अधिप्रज (जीवविज्ञानविषयक), अध्यात्म (आत्मविषयक) या पाच दृष्टिकोनांतून केले असून या पाच अधिकरणांना मिळून 'महासंहीता' असे म्हटले आहे. चौथ्या अनुवाकात, कीर्ती, यश:प्राप्ती, आत्मज्ञानप्राप्ती यांसाठी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याची प्रार्थना केली आहे. पाचव्या अनुवाकात, भु:, भुव, स्व: आणि मह: या चार व्याहृतींची लोकात्मक, देवात्मक, वेदात्मक, प्राणात्मक व्याख्या केली आहे. यांपैकी 'मह:' ही व्याहृती म्हणजे ब्रह्म असे विवेचन केले आहे. सहाव्या अनुवाकात, शरीरातील अमृतशक्तीचे स्थान सांगितले आहे. सातव्या अनुवाकात, पंचसंख्यात्मक विश्वाचे विवरण केले आहे. आठव्या अनुवाकात ब्रह्मविद्येतील ओंकाराचे माहात्म्य वर्णन केले आहे. 'ओमिति ब्रह्म। ओमिति इदं सर्वम्।' (ओम् हेच ब्रह्म आहे. ओम् हेच सर्व काही आहे) अशी ओंकाराची स्तुती केली आहे. (दाबके वैशाली, तैत्तिरीयोपनिषद, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ )

**५) कठोपनिषद :**

कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेच्या अंतर्गत येणारे हे उपनिषद आहे. हे उपनिषद काठकोपनिषद म्हणूनही ओळखले जाते. हे दशोपनिषदांमधील अतिशय महत्त्वाचे उपनिषद मानले जात असून मुक्तिकोपनिषदामध्ये निर्दिष्ट केलेल्या १०८ उपनिषदांमध्ये हे तृतीय क्रमांकाचे म्हणून गौरविले आहे. हे उपनिषद आशयगर्भ आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने संपन्न आहे. वैशंपायन हे कृष्ण यजुर्वेदाचे आद्य प्रवर्तक ऋषी, त्यांच्या प्रमुख आणि कर्तृत्ववान शिष्यांपैकी एक कठऋषी मानले जातात. त्यांच्या नावानेच प्रस्तुत उपनिषद ओळखले जाते. कृष्णयजुर्वेदात यमराजाने नचिकेताला सांगितलेली ही ब्रह्मविद्या आहे. दोन अध्याय आणि एकूण सहा वल्लींमध्ये (प्रकरणे) ती विशद केलेली आहे.भग्वद्गीतेमधील बराचसा भाग ह्या उपनिषदाशी मिळता जुळता आहे.

munotes.in

**६) छांदोग्योपनिषद :**

सामवेद व छांदोग्य ब्राह्मणाचा मिलाफ होऊन हे उपनिषद तयार झाले आहे.छांदोग्योपनिषद हे सामवेदाच्या तलवकार शाखेच्या छांदोग्य ब्राह्मणावर रचलेले आहे. या उपनिषदाचे आठ अध्याय आहे. आठ अध्यायांच्या या उपनिषदातील पाच अध्याय उपासनाकाण्डसदृश् असून उर्वरित तीन तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. सहाव्या अध्यायामधील श्वेतकेतू आणि उद्दालक आरुणी यांचा संवाद तत्त्वज्ञानाचे रहस्य उलगडून दाखवणारा म्हणून प्रसिद्ध आहे. तत्त्वमसि (तू ब्रह्मच आहेस) हे चार अक्षरी महावाक्य याच उपनिषदातील आहे. ओमची उत्पत्ती, ब्रह्मचर्य, गृहस्थी, व संन्यासी आश्रमाची कर्तव्ये, सामवेदीय मंत्राची गूढता, सुर्यउपासना, गायत्री मंत्र, इंद्रिय व सुष्टी ह्या विषयांची चर्चा येथे आढळते. उच्च स्वरात सामान मंत्र गाण्याच्या ३६ पद्धती येथे सांगितल्या आहे. ॐ मंत्राचा महात्मा ह्यात वर्णन केलेला आहे. कर्माचे फल व पुनर्जन्मावरील भाष्य देखील ह्यात आढळते. मानव धर्म, त्याचे साध्य, ध्यानधारणा व ध्यानाचे रोजच्या जीवनातील महत्व ह्यावर विवेचन ह्या उपनिषदात आहे.

**७) केनोपनिषद :**

केन म्हणजे कोण? ह्या सर्वसृष्टी पाठीमागे कोण आहे. केनोपनिषदात ब्रह्मज्ञान कसे प्राप्त करावे ह्याचे विवेचन आहे. सामवेदाच्या तलवकार शाखेचे उपनिषद म्हणून हे उपनिषद ओळखले जाते. हे प्राचीन उपनिषदांपैकी एक असून जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणाचा हा एक भाग आहे. याचा प्रारंभ 'केन' या प्रश्नार्थक सर्वनामाने होत असल्याने या उपनिषदाला केन असे नाव आहे. हे उपनिषद तलवकार ब्राह्मणाचा नववा अध्याय आहे. याला 'तलवकार' किंवा 'ब्राह्मणोपनिषद' अशीही नावे आहेत. या उपनिषदाचा काळ व कर्ता यांसंबंधी निश्चित माहीती उपलब्ध नाही; परंतु गीतेतील एका वचनावरून केनोपनिषद हे गीतेच्या पूर्वीचे असावे, असे दिसते. केनोपनिषदाचे एकूण चार खंड असून पहीले दोन पद्यात्मक व पुढील दोन गद्यात्मक आहेत. या उपनिषदाच्या प्रारंभीच्या श्लोकात शिष्याने गुरूला पुढील चार प्रश्न विचारले आहेत.

१. मनाला प्रेरणा कोण देतो?
२. कोणाच्या प्रेरणेने प्राण कार्य करतो?
३. कोणाच्या प्रेरणेने वाणी कार्य करते?
४. डोळे व कान यांना आपापल्या कार्यासाठी कोण नियुक्त करतो?

गुरूने या प्रश्नांचे उत्तर दिले ते असे — वाणी, चक्षु, मन, श्रोत्र, प्राण यांना परब्रह्म प्रेरणा देते. दुसऱ्या खंडात ब्रह्मज्ञान आणि त्याचे फल सांगितले आहे. तिसऱ्या व चौथ्या खंडांत इंद्र आणि उमा हैमवतीची कथा आहे. ब्रह्मस्वरूपवर्णन आणि ब्रह्मज्ञानमहत्त्व हे या उपनिषदाचे मुख्य विषय आहेत.

**८) प्रश्नोपनिषद :**

हे उपनिषद अथर्ववेदाच्या पैप्पलाद शाखेचे आहे. या उपनिषदाचे स्वरूप प्रश्नोत्तररूपी असल्याने याचे नाव 'प्रश्नोपनिषद' असे आहे. भारद्वाजपुत्र सुकेश, शिबीपुत्र सत्यकाम, सूर्याचा नातू गार्ग्य, अश्वलापुत्र भार्गव, कात्यपुत्र कंबंधी हे पिप्पलादाकडून ज्ञानप्राप्त करुन घेतात. विविध तत्वज्ञानसंबंधी प्रश्न व त्याचे उत्तर म्हणजेच

प्रश्नोपनिषदहोय.यातील खंडांनाही 'प्रश्न' असेच नाव आहे. हे संपूर्ण उपनिषद गद्यात्मक असून यात एकूण ६७ वाक्ये आहेत. आद्य शंकराचार्यांनी ज्या प्राचीन उपनिषदांवर भाष्य लिहीले, ती उपनिषदे महत्त्वाची मानली जातात. महत्त्वाच्या प्राचीन नव्य उपनिषदांपैकी प्रश्नोपनिषदाचा अर्वाचीन गटात समावेश असून त्याचा कालखंड गीतेपूर्वीचा मानला जातो. या उपनिषदात पिप्पलाद ऋषी आणि सहा ब्रह्मनिष्ठ शिष्यांचा संवाद आहे. या शिष्यांनी पिप्पलादांना विचारलेले प्रश्न आणि पिप्पलादांनी त्यांना दिलेली समर्पक आणि मार्मिक उत्तरे हे याचे वैशिष्ट्य असून प्रस्तूत लेखात व संक्षेपाने दिले आहे.

या उपनिषदामध्ये पिप्पलाद ऋषींनी सहा प्रश्नांची उत्तरे दिली आहे.

१) प्रजेची उत्पत्ती केव्हा व कशी होते ? (कास्तायन)

२) देवता किती व सर्वश्रेष्ठ देवता कोणती ? (भार्गव)

३) प्राणाची उत्पत्ती कशी होते ? त्याचे आगमन कसे होते ? (अश्वलायन)

४) आत्म्याच्या तीन अवस्थांचे गूढ कोणते ? (गार्म्य )

५) ओमच्या उपासनेचे महत्व कोणते ? व त्याची फलप्राप्ती काय ? (सत्यकाम)

६) षोडशकाला संपन्न पुरुषाची लक्षणे कोणती ? (सुकेशा)

ह्या सहा प्रश्नाच्या उत्तरांमधून आध्यात्माची तर्कसंगत चर्चा करून त्यास 'आध्यत्मशास्त्राचा' दर्जा प्रश्नोपनिषदाने प्राप्त करून दिला आहे.

**९) मुण्डकोपनिषद :**

अथर्ववेदाशी संबंधित असलेले अतिशय महत्त्वाचे असे हे उपनिषद आहे. कालदृष्ट्या तसेच आशयाच्या दृष्टीने हे उपनिषद कठोपनिषदाशी तसेच श्वेताश्वेतरोपनिषदाशी अधिक जवळचे आहे, तसेच या ग्रंथामध्ये आलेल्या काही संकल्पनांचे छांदोग्योपनिषदातील काही तत्त्वांशी साधर्म्य दिसते. मुण्डकोपनिषदाच्या नावाविषयी दोन व्युत्पत्ती आहेत. एका व्युत्पत्तीनुसार मुण्डन हे संन्यासाचे चिन्ह असल्याने संन्यासधर्माचा पुरस्कार करणारे उपनिषद म्हणून या उपनिषदाला संन्यासोपनिषद असेही म्हटले जाते. तर दुसऱ्या व्युत्पत्तीनुसार देहाचा सर्वाधिक महत्त्वाचा अवयव असलेले मुण्ड अथवा मुण्डक म्हणजे मस्तक, उत्तमाङ्ग यावरून हे नाव पडले असावे. ब्रह्मविद्येची ओळख पटवून देणारे सर्वांत महत्त्वाचे उपनिषद, आत्मानुभवाविषयी वाचकांच्या मनात तीव्र जिज्ञासा निर्माण करणारा अद्वितीय ग्रंथ असेही याच्याविषयी म्हटले जाते. या उपनिषदाचा कर्ता शौनक महाशाल आहे.

अथर्ववेदातील या उपनिषदात तीन अध्याय, प्रत्येकात दोन खंड आणि एकूण ६४ श्लोक आहेत. पिंपळ वृक्षावरील दोन पक्षांच्या कथेमधून भोग घेणारा पक्षी व दुसरा साक्षीरूपी परआत्मा पक्षी असे द्वैतवादाचे वर्णन यात केलेले आहे.

**१०) माण्डूक्योपनिषद :**

दशोपनिषदातील आकाराने लहान पण अतिशय आशयघन असलेले माण्डूक्योपनिषद हे अथर्ववेदाचे उपनिषद आहे. या उपनिषदाचा कर्ता अज्ञात असून याचा काळ इ.स.पू. ११०० ते १००० मानला जातो. यामध्ये केवळ बारा गद्यमय मंत्र आहेत. या उपनिषदामधून विद्यार्थ्याला ॐ काराच्या उपासनेविषयी अतिशय उपयुक्त मार्गदर्शन प्राप्त

होते.मांडूक्य उपनिषदाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे अयम् आत्मा ब्रह्म हे वेदातील चार महावाक्यांपैकी एक महावाक्य या छोट्याशा उपनिषदात आहे.

**११) श्वेताश्वतर उपनिषद –**

ह्या उपनिषदाचा उदगाता खुद्द शिव आहे असे मानले गेले पण त्यावचेळी श्वेताश्वतर नावाचे ऋषी पण आहेत त्यांनीही हे लिहीले असेही मानले जाते. मनुष्यात असलेल्या ईश्वराबद्दलचे चिंतन ह्याउपनिषदात आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. उपनिषदांचा आढावा घ्या.

## ९.४ उपनिषेदातील तत्वज्ञान

ब्रह्म किंवा परमात्मा हा उपनिषदांचा मुख्य विषय आहे. उपनिषदांतील तत्त्वज्ञानात्मक विचारांची पद्धती दोन प्रकारची आहे. एक उपदेशात्मक व दुसरी युक्तिवादात्मक. युक्तिवाद व उपदेश हे काही ठिकाणी एकमेकांत मिसळले आहेत. छांदोग्य उपनिषदात सहाव्या व आठव्या अध्यायांत आणि बृहदारण्यकातील याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवादात उपदेशाबरोबरच युक्तिवादही सांगितला आहे; परंतु कठोपनिषदात आत्मज्ञान तर्काने म्हणजे युक्तिवादाने प्राप्त होत नाही, असे स्पष्टपणे सांगितले आहे. आत्मा किंवा ब्रह्म स्वयंप्रकाश आहे, त्याचा साक्षात्कार होतो, असे बृहदारण्यकात म्हटले आहे.

**१) उपनिषदामधील ब्रह्म संकल्पना :**

उपनिषदामध्ये आत्मा व ब्रह्म यांचे ऐक्य सांगितले आहे. आत्म्याचे ज्ञान झाले म्हणजे सर्व ज्ञान होते याचे कारण हे सर्व ब्रह्म आहे आणि आत्मा ही ब्रह्म आहे. 'गूढ ब्रह्मविद्या शास्त्र' असे उपनिषदांचे वर्णन केलेले आढळते. उपनिषदात सगुणसाकार व निर्गुण निराकार अशा दोन प्रकारच्या ब्रह्माचे स्वरूप वर्णन केले आहे. सर्व सुष्टीचा निर्माता, चालक व पलायकर्ता ब्रह्मच आहे. सर्व वस्तुमात्रांवर त्याचीच सत्ता चालते व त्यांच्यामुळे सर्वांना चेतना मिळते. उपनिषदामध्ये अनेक ठिकाणी ब्रह्म एकच आहे, असा उल्लेख आढळतो. 'ते एकाच आहे 'व' ते अद्वितीय आहे' अशी विधाने उपनिषेदात आढळतात. हे ब्रह्म जाणून घेण्याचा सर्व व्यक्तींनी प्रयन्त करावा व ब्रहम जाणून घेतल्याने व्यक्तीला सर्व काही प्राप्त होते असे उपनिषेदात म्हटले आहे.

**२) उपनिषेदातील आत्मा विषयक विचार :**

उपनिषदातील दुसरी महत्वाची संकल्पना ती म्हणजे आत्मा होय. जीव, जीवात्मा, प्राण, प्राणवायू या अर्थाने आत्म्याचे वर्णन उपनिषेदात केलेले आढळते. अनेक ठिकाणी आत्मा व ब्रह्म हे एकच असल्याची वर्णने आहेत. छांदोग्यो उपनिषदामध्ये आत्म्याचे वर्णन सर्वकर्म : सर्वकाम : सर्वगंध असे केले आहे. उपनिषदांमध्ये आत्मज्ञानावर भर दिल्याचे जाणवते. जो आत्म्याला जाणतो, तो सर्व काही जाणतो, आत्म्याचे ज्ञान झाल्यानंतर कोणत्याही इच्छा उरत नाही. तसेच जो आत्म्याला जाणतो त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. आत्मा हा मनाहून व बुद्धीहून भिन्न आहे यावर उपनिषदांमध्ये भर दिला आहे.

**३) उपनिषेदातील जागविषयीची संकल्पना :**

उपनिषदांच्या मते, जग हे ब्रह्मावर आधारित आहे, ब्रह्माहून स्वतंत्र असे अस्तित्व त्याला नाही, जीव आणि विश्व् हे ब्रह्माचे वास्तव परिणाम मानले आहे. या जागतिक सर्वच घटक मानव आणि इतर सर्व सजीव निर्जीव ब्रह्माचाच अंश आहे. किंवा वास्तविक ब्रह्मच आहे. जगातील विविधतेत एकता आहे म्हणजेच एकच ब्रह्म आहे. श्वेताश्वेतर उपनिषदेनुसार, 'ब्रहम अनादी आहे, सर्व जगात धरून राहीलेला विभू आहे, व याच्यापासूनच विश्वाची उत्पत्ती झाली आहे. (श्वेताश्वेतर ४ - ४) या ब्रह्मापासून सर्वप्रथम आकाश निर्माण झाले, आकाशापासून वायू, वायूपासून अग्नी, अग्नीपासून जल व जलपासून पृथी उत्पन्न झाली. नंतर या पृथीपासून औषधी, औषधापासून अन्न, अन्नापासून पुरुष, व नंतर त्या शक्ती पासून सर्व सुष्टी उत्पन्न झाली.' (तैत्तरीय २ -१)

थोडक्यात, सर्व जगताच्या मुळाशी एकच ब्रह्म आहे. या ब्रह्मापासून जगाची निर्मिती झाली पण ब्रह्म त्यापासून वेगळा नाही तर तो अंतरात्मा आहे. ब्रह्म व जगाचे ऐक्य हे उपनिषदात वर्णन केले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. उपनिषदांचे तत्वज्ञान थोडक्यात सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ९.५ सारांश

धार्मिक चिंतनातून भारतात तत्वज्ञानाचा उदय झालेला दिसून येतो. उपनिषद ही वैदिक वाङमयाचा अंतिम भाग आहे. उपनिषदांनी वैदिक धार्मिक विचारणा तत्वज्ञानाचा दर्जा प्राप्त करून दिला. जगामधील अंतिम सत्य कोणते? सर्वोच सुखाचे स्वरूप कोणते? या मूलभूत प्रश्नाची सर्वप्रथम चिकित्सा उपनिषदांमध्ये आढळते. विश्वातील मानवी जीवनाचे

munotes.in

सर्वोच तत्वज्ञान उपनिषदात आढळते. उपनिषदांचे विविध भाषेमध्ये भाषांतर झल्याने त्याला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले आहे. उपनिषदांमध्ये मोक्षमार्गाची व आध्यात्मशास्त्राची शुद्ध तात्विक चर्चा आहे.

## ९.६ स्वाध्यावरील प्रश्न

१) उपनिषदांचा अर्थ स्पष्ट करून प्रमुख उपनिषदांची माहीती द्या.
२) उपनिषदांमधील तत्वज्ञानाचा आढावा घ्या.

## ९.७ संदर्भ ग्रंथ


१) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती (प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत ), विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

२) जोशी पी. जी. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१३

३) श्रीवास्तव के.सि. - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, युनायटेड बुक डेपो, इलाहाबाद, ग्यारावी आवृत्ती २००९.

४) त्रिपाठी रामशंकर, प्राचीन भारत का इतिहास, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, पंचम संस्करण, १९६८

५) विद्यालंकार सत्यकेतू, प्राचीन भारत का धार्मिक, सामाजिक व आर्थिक जीवन, सरस्वती सदन, नई दिल्ली, १९७८

६) मिश्र जयशंकर, प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, बिहार हिंदी ग्रंथ आकदमी, पटना, २०१३

७) Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.

८) Singh Upinder, A History of Ancient and Early Medieval India, From the Stone Age to the 12th century, Pearson education India.

९) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ / विकासपीडिया / मराठीविश्व् कोष


❖❖❖❖

munotes.in

# १०

# बौद्ध धर्म

**घटक रचना**


१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ गौतम बुद्ध यांचे चरित्र

१०.३ गौतम बुद्धांची शिकवण

१) चार आर्यसत्य

२) अष्टांगिक मार्ग

१०.४ बौद्ध धर्मातील तत्वज्ञान

१) प्रत्युत्य समुत्पाद सिद्धांत

२) कर्मसिद्धांत

३) पुनर्जन्म

४) अनात्मवाद

५) अंतिम सत्य व निर्वाण प्राप्ती

१०.५ सारांश

१०.६ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१०.७ संदर्भ ग्रंथ


## १०.० उद्दिष्टे

- गौतम बुद्ध यांच्या जीवनचरित्राचा आढावा घेणे.
- गौतम बुद्धांची शिकवण अभ्यासणे.
- बौद्ध तत्वज्ञान तपासणे.
- बौद्ध धर्माची भारतीय संस्कृतीला मिळालेल्या देणगीचा अभ्यास करणे.

## १०.१ प्रस्तावना

ई. स. पूर्व सहाव्या शतकाचे भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. कारण या शतकात भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात महत्वाचे बदल घडून आले. त्याकाळातील धार्मिक परिवर्तनामुळे याकाळाला बैद्धिक व धार्मिक परिवर्तनाचे युग मानले जाते. भारतातील या क्रांतीचे केंद्र मगध होते. या क्रांती काळात भारतात अनेक



munotes.in

नवीन धर्माची स्थापना झाली. याकाळात अनेक नवीन धार्मिक विचारधारा या उदयास आल्या पण त्यामध्ये जैन व बौद्ध धर्मालाविशेष महत्व होते.

## १०.२ गौतम बुद्ध यांचे चरित्र

ई. स. पूर्व सहाव्या शतकात भारतातील राजकीय व्यवस्थेमध्ये राजेशाही, गणराज्य व संघराज्य अशी विविध राजकीय प्रणाली अस्तित्वात होती. उत्तर भारतातील वायव्य प्रांत व हीमालयाच्या पायथ्याशी अनेक गणराज्ये व संघराज्ये होती. यामध्ये कुशीनारा, पावा, कपिलवस्तू, मल्ल, वैशाली जिल्यातीलमिथिला, विदेह, रामग्राम, कोलीय इ. संघराज्य व गणराज्ये ही प्रमुख होती. नेपाळच्या दक्षिण सरहद्दीवर असलेल्या रोहीणी नदीच्या काठी कपिलवस्तू नावाचे शहर होते. कपिलवस्तूचा राज्यकारभार शुद्धोधन यांच्याकडे होता. शुद्धोधन हे जयसेनच्या वंशातील सिहनू यांचा मुलगा होता. शुद्धोधन यांचा विवाह कोलीय वंशातील महामायाशी झाला होता. बौद्ध परंपरेनुसार गौतम बुद्ध यांचा जन्म ई.स. पूर्व ५६३ मध्ये (काही ठिकाणी ई. स. पूर्व ५६७ आढळते) लुम्बिनी वनात झाला. हेनसेंगचे प्रवासवर्णन व अशोकाचा रुम्मिनदेई या शिलालेखामधून गौतम बुद्धांच्या जन्मस्थान विषयी माहीती आढळते. सिद्धार्थाच्या जन्मानंतर माता मायादेवीचे निधन झाले. त्यामुळे त्यांचे पालन पोषण महाप्रजापती गौतमी यांनी केले. कदाचित या ऋणामुळे नंतर सिद्धार्थ यांनी गौतम हे नाव धारण केले असावे. बालपणापासूनच सिद्धार्थ अतिशय शांत, सवेंदनशील व गूढ चिंतनात असल्याने विरक्त वृत्तीने राहत असे. शुद्धोधन राजाने राजपुत्रास आवश्यक्य असणारे युद्ध कला व विविध शास्त्रांचे शिक्षण दिले. शुद्धोधन यांनी तीन ऋतू करीतातीन महाल बांधले. त्यात नृत्य - संगीतादी सुख चैनीची व्यवस्था केली. आपल्या राजपुत्रास राहण्याकरिता त्यांना सांसारिक जीवनात गुंतवण्याकरिता शुद्धोधन यांनी सिद्धार्थाचा विवाह दंडपाणी नावाच्या राजाच्या 'यशोधरा' नावाच्या मुलीशी विवाह संपन्न केला. कालांतराने या दांपत्यांना 'राहुल' नावाचे आपत्य झाले.

**गृहत्याग :**

सिद्धार्थाला आपल्या राज्याची कल्पना यावी म्हणून एके दिवशी छंदक सारथ्यास बरोबर घेऊन नगर पाहण्यासाठी बाहेर पडला. रस्ताने जात असताना महारोगाने ग्रस्त झालेला रोगी, वार्धक्याने जर्जर झालेला एक म्हातारा, व प्रेताच्या मागे रडत जाणारे लोक अशी तीन दृशे सिद्धार्थाच्या नजरेस पडली. या तिन्ही दृश्यांमुळे त्यांचे मन दुःखी झाले. जगात दुःख आहे व या दुःखातून मुक्त कसे व्हावे याचा विचार ते करू लागले. पुढे त्यांना संन्याशी भेटला. हा संन्याशी निर्भय, चिंतामुक्त व आनंदी असल्याने तोच सत्याचा मार्ग असावा असे मानून त्यांनी गृहत्याग करण्याचा निर्णय घेतला. एके रात्री संसार सुखाचा त्याग करून सिद्धार्थ छंदकासह घराबाहेर पडले व जीवनातील अंतिम ध्येय मिळवण्यासाठी त्यांनी गृहत्याग केला. या घटनेला बौद्ध परंपरेत 'महाभिनिष्क्रम' असे म्हटले गेले.

**ज्ञानप्राप्ती**

जीवनातलेअंतिम सत्य शोधण्यासाठी सिद्धार्थ यांनी वैशाली नगरातील 'आलारकालाम' यांची भेट घेतली. व त्यांच्याकडून त्यांनी ज्ञानमार्गाचे तंत्र आत्मसात केले. त्यानंतर त्यांनी राजगृह येथील 'उदक रामपुत्र' या सिद्ध पुरुषाचे शिष्यत्व स्वीकारले. या

आचार्याकडून त्यांनी ध्यानविधीचे ज्ञान प्राप्त केले. पण या मार्गानेही त्यांचे समाधान झाले नाही. शेवटी मगध राज्यातील पटण्याजवळील गया (उरुवेला) येथे निरंजना नदीच्या तीरावर त्यांनी तपस्चर्या सुरु केली. शरीर अस्थिपंजर झाल्याने तपाचरणाचात्याग करून अन्नग्रहण केले. अंतिमतः बोधी वृक्षाखाली (पिंपळ किंवा स्याल वृक्ष) त्यांनी सात आठवडे एकाग्र चित्तने समाधी अवस्थेत चिंतन केले. व वयाच्या पस्तिसाव्या वर्षी वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी त्यांना ज्ञान प्राप्त झाले. व त्यानंतर त्यांना बुद्ध (ज्ञानी) म्हणून ओळखले जाऊ लागले.

सिद्धार्थाला सर्वोच ज्ञान प्राप्त झाल्याने दिव्यज्ञानाच्या प्रसाराला त्यांनी प्रारंभ केला. वाराणसी येथील सारनाथच्यामृगवनात पूर्वीच्या तपात सहभागी असलेले कोडिण्य, वास्प, भद्रिक, अश्वजीत, व महानाम या पाच ब्राह्मणांना त्यांनी नवीन धर्माचा उपदेश करून दीक्षा दिली. या घटनेस 'धर्मचक्र परिवर्तन ' असे म्हटले गेले. गौतम बुद्धांनी आपल्या धर्माचे उपदेश संपूर्ण उत्तर भारतात दिले. व धम्म प्रसाराचे कार्य करत असताना वयाच्या ८०व्या वर्षी ई. स. पर्व ४८७ मध्ये मल्लांची राजधानी कुशीनगर येथे त्यांचा मृत्यू झाला. या घटनेला बौद्ध ग्रंथात 'महापरिनिर्वाण' म्हटले गेले.

**आपली प्रगती तपासा.**

१. गौतम बुद्धांच्या जीवनाचा सविस्तर आढावा घ्या.

## १०.३ गौतम बुद्धांची शिकवण

जगातील सर्व दुःखापासून मानवाची सुटका करावयाची हा हेतू बुद्धाच्या मनात होता. तो हेतू साध्य करण्यासाठी त्यांना जो मार्ग सापडला त्याचा त्यांनी उपदेश दिला. व वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांमधूनच बौद्ध धर्माचे तत्वज्ञान विकसित झाले. बौद्ध धर्माने तत्वज्ञानापेक्षा शिकवणुकीवर जास्त भर दिला. त्यामुळे हा धर्म समाजातील सर्व स्थरात लोकप्रिय झाला. त्रिपिटक व धम्मपदातून बौद्ध विचारांची माहीती मिळते. गौतम बुद्धांनी प्रतिपादित केलेल्या शिकवणुकीमध्ये चार आर्यसत्ये, अष्टांग मार्ग, दशपरिमिता यांचा समावेश होतो. तर तत्वज्ञानामध्ये कार्याचे कार्यकारणभाव, प्रत्युत्य समुत्पाद सिद्धांत, अनात्मवाद, कर्मसिद्धांत, पंचस्कंध, पुनर्जन्म सिद्धांत याचा समावेश होतो.

**चार आर्यसत्ये**

गौतम बुद्धांना गया येथील पिंपळवृक्षाखाली चार महान सत्याचे ज्ञान झाले होते. ही चार आर्य सत्ये मानवाच्या जीवनातील समस्यांचे मूळ शोधण्यात यशस्वी ठरतात.



munotes.in

**१) दुःख :**

मानवी जीवन हे दुःखाने भरलेले आहे. जन्म, जरा, मरण, व्याधी ही सगळी दुःख आहे. प्रियजनांचा विरोध, अपेक्षांची अप्राप्ती यासारखी भौतिक दुःख देखील आहे. अशा दुःखाच्या उत्पत्तीचा किंवा कारणांचा शोध म्हणजे द्वितीय आर्यसत्य होय.

**२) दुःख समुदाय :**

हे दुसरे आर्यसत्य आहे. यामध्ये दुःखाच्या कारणांचा शोध घेण्यात आला आहे. दुःख हे मानवी जीवनापासून विभक्त नाही तो मानवी जीवनाचाच एक भाग आहे. या दुःखाचे मूळ कारण तृष्णा किंवा इच्छा हे आहे. तृष्णेचे तीन प्रकार आहे.

१) काम तृष्णा : सुख उपभोगण्याची वासना

२) भव तृष्णा : अस्तित्वासाठी लागणारी हाव

३) विभव तृष्णा : भवतृष्णा नष्ट करण्याची भावना किंवा जन्म - मृत्यू

ह्या तीन प्रकारच्या तृष्णा गौतम बुद्धांनी सांगितल्या आहे.

**३) दुःख निरोध :**

तिसऱ्या आर्य सत्येमध्ये दुःख नाशाचे कारण सांगितले आहे. तृष्णा हे दुःखाचे मूळ कारण आहे त्यामुळे तृष्णाचा नाश झाल्यास मनुष्य सर्व दुःखातून मुक्त होतो. सर्व आर्य सत्यामध्ये दुःख निरोध हे महत्वाचे आर्यसत्य आहे.

**४) दुःख निरोध गामिनी ( मार्ग ) :**

मानवी जीवनातील दुःख व दुःखाचे कारण समजल्यानंतर ते दुःख नाहीशे करण्यासाठी गौतम बुद्धांनी जो मार्ग सांगितला आहे त्यास 'अष्टांगिक मार्ग' असे म्हणतात. हा मार्ग सदाचाराचा मार्ग होता. त्यासाठी कोणतीही खडतर तपश्चर्या व कर्मकांडाची आवश्यक्यता नव्हती.

**अष्टांगिक मार्ग :**

गौतम बुद्धांनी मानवी जीवनातील दुःख नाहीशे करण्यासाठी जी मध्यममार्गी शिकवण सांगितली होती ती अष्टांगिक मार्ग या नावाने ओळखली जाते. यामध्ये बुद्धांनी एकूण आठ मार्ग सांगितले होते.

**१) सम्यक दृष्टी :**

बुद्धांनी सांगितलेल्या चार आर्यसत्याचे संपूर्ण ज्ञान म्हणजेच सम्यक दृष्टी होय.

**२) सम्यक संकल्प :**

कोणालाही दुःख होईल किंवा वाईट वाटेल असे विचार ठेवू नये.

**३) सम्यक वाणी :**

कोणालाही वाईट वाटेल असे बोलू नये किंवा असत्य बोलू नये.

**४) सम्यक कर्मांत :**

नेहमी सत्कर्म करावी.

**५) सम्यक आजीव :**

चांगल्या रीतीने आपला व्यवसाय करावा.

**६) सम्यक स्मृती :**

चित्त शुद्ध ठेवून आत्मसंयमाद्वारे इंद्रिय ताब्यात ठेवून निर्वाण प्राप्तीचा प्रयत्न करणे.

**७) सम्यक चिंत्तन :**

कृतीप्रमाणे मनुष्याने आपले विचार देखील शुद्ध ठेवावे.

**८) सम्यक समाधी :**

संसार हा दुःखपूर्ण आहे याची जाणीव ठेवून चार आर्य सत्यांवर आपले लक्ष केंद्रित करून व्यक्तीने आपले आचरण करावे.

**दहा पारमिता**

दहा पारमिता ह्या शील मार्ग आहेत..

१) शील : शील म्हणजे नीतिमत्ता, वाईट गोष्टी न करण्याकडे असलेला मनाचा कल.

२) दान : स्वार्थाची किंवा परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याच्या भल्यासाठी स्वतःची मालमत्ता, रक्त, देह अर्पण करणे.

३) उपेक्षा : निरपेक्षतेने सतत प्रयत्न करीत राहणे.

४) नैष्काम्य : ऐहीक सुखाचा त्याग करणे.

५) वीर्य : हाती घेतलेले काम यत्किंचितही माघार न घेता अंगी असलेल्या सर्व सामर्थ्यानिशी पूर्ण करणे.

६) शांती : शांति म्हणजे क्षमाशीलता, द्वेषाने द्वेषाला उत्तर न देणे.

७) सत्य : सत्य म्हणजे खरे, माणसाने कधीही खोटे बोलता कामा नये.

८) अधिष्ठान : ध्येय गाठण्याचा दृढ निश्चय.

९) करुणा : मानवासकट सर्व प्राणिमात्रांविषयी प्रेमपूर्ण दयाशीलता.

१०) मैत्री :मैत्री म्हणजे सर्व प्राणी, मित्र, शत्रू याविषयीच नव्हे तर सर्व जीवनमात्रांविषयी बंधुभाव बाळगणे.

**आपली प्रगती तपासा.**

१. गौतम बुद्धांची शिकवण सांगा.

munotes.in

## १०.४ बौद्ध धर्मातील तत्वज्ञान

गौतम बुद्धांनी सर्वसामान्य लोकांना समजेल असे मानवतावादी व वैज्ञानिक दृष्टिकोनातून आपले विचार समाजासमोर मांडले. बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश दिला. संसारचक्रातून मुक्ती, बोधीप्राप्ती हे त्यांच्या तत्वाचे ध्येय होते. बुद्ध तत्वज्ञानात प्रत्युत्य समुत्पाद, अनात्मवाद, पुनर्जन्म व पंचस्कंध यांचा समावेश होता.

**१) प्रत्युत्य समुत्पाद सिद्धांत :**

हा सिद्धांत म्हणजे बौद्ध दर्शनाने भारतीय तवज्ञानाला दिलेली महत्वाची देणगी आहे. येथे प्रत्युत्य म्हणजे बोध घेणे व समुत्पाद म्हणजे उत्पत्ती असा अर्थ होतो. अर्थात प्रत्युत्य समुत्पाद म्हणजे उत्पत्ती विषयीचा परिचय किंवा कार्यकारण परंपरा दर्शवणारा सिद्धांत होय. थोडक्यात वस्तूचा, प्रसंगाचा अथवा मानवी जीवनाच्या दुःखाच्या समस्यांच्या मागील कारणांच्या उत्पत्तीचा शोध घेणे अथवा जाणणे असा होतो. एखाद्या वस्तूच्या अस्तित्वाचे स्वरूप समजून घेताना त्यांचा कार्यकारण भाव लक्षात घेणे आवश्यक्य आहे तो दर्शवण्यासाठी हा सिद्धांत मांडला आहे.

विश्वातील प्रत्येक घटना का व कशी घडते किंवा घडत नाही हे स्पष्ट करण्यासाठी त्यामागील कार्यकारण संबंध समजून घेणे गरजेचे असते. मानवी जीवनातील दुःखाची उत्पत्ती कशी झाली हे स्पष्ट करण्यासाठी बुद्धांनी बारा कारणे सांगितले आहे ती पुढील प्रमाणे : अविद्या (अज्ञान) संस्कार (कर्म) विज्ञान (सत्याचा पुनर्जन्म) नामरूप (पंचमहाभुताचा देह) स्पर्श (सहा इंद्रियाचे कार्य), वेदना (दुःखे), तृष्णा (दुःखाचे कारण), उपादान (तृष्णेची आसक्ती), जाती (विविध योनीतील जन्म), शडा येताना (पाच ज्ञानेंद्रिय व मन) भव (जन्म, मृत्यू व कर्माचे कारण) आणि जरामराणादिक दुःखे (वार्धक्य, आजरा व मृत्यू इ.) ही बारा कारणांची मालिका मानवी दुःख निर्मितीस जबाबदार असून ती दुःखाचे व्यापक स्वरूप स्पष्ट करणारी आहे.

या सिद्धांतामध्ये प्रत्येक संज्ञा ही दुसऱ्या घटकांशी संबधित असून अधिकचा घटक पुढील येणाऱ्या घटकाचा कारण असतो, तर पुढील येणार घटक हा त्याचा कार्य असतो. कार्याशिवाय कोणतेच कार्य संभवत नाही. हा विचार या सिद्धांतामध्ये मांडलेला आहे. या सिद्धांतामध्ये चार आर्यसत्याच्या अज्ञानास अविद्या असे मानून या अविद्यामुळेच कार्यकारण हे एकमेकांशी संबधित आहे. अविद्येमुळे संस्कार, संस्कारातून विज्ञान, विज्ञानामुळे नामरूप, नामरूपातून षडयताना, षडयातनेतून स्पर्श, स्पर्शतून वेदना, वेदनेमुळे तृष्णा, तृष्णेतून उपादान, उपादनयोगे भव, भावातून जाती किंवा जन्म, जन्मामुळे जरामरान ही शृंखला तयार होते, ही शृंखला जर तयार होऊ द्यायची नसेल तर भविष्याचा नाश करावा.

**२) कर्मसिद्धांत :**

गौतम बुद्धांनी प्रत्युत्य समुत्पाद सिद्धांताची मांडणी करत असताना कर्म सिद्धांत मांडला आहे. बौद्ध धर्मात कर्म सिद्धांत हा महत्वाचा आहे, परंतु बौद्ध धर्मातील कर्म सिद्धांत व हिंदू धर्मातीलकर्म सिद्धांत यात फरक आहे. कर्मनियमाचा अभिप्राय असा की, ज्याप्रमाणे दिवसामागून रात्र येते त्याचप्रमाणे कर्मामागून त्याचे परिणाम पण येत असतो. चांगल्या

कर्माचे परिणाम हे चांगले तर वाईट कर्माचे परिणाम हे वाईट असतात. बौद्ध धर्मातकर्माचे तीन प्रकार सांगितले आहे, १) तात्काळ फळ देणारे कर्म २) परिणाम व फळ कालांतराने देणारे कर्म ३) अनिश्चित काळात फळ देणारे कर्म

अंगुत्तर निकाय या बौद्ध ग्रंथात, कर्म माणसाची मालकी, वारसा, वांशिक व आश्रयस्थान आहेत असे वर्णन केले आहे. (ओल्डेनबर्ग एच. बुद्ध हीझ लाईफ, पृ. क्र.२४३)

**३) पुनर्जन्म :**

बौद्ध धर्माची पुर्नजन्माची कल्पना ही पारंपरिक वैदिक धर्मापेक्षा वेगळी आढळते. बौद्ध परंपरेतील मद्ययान पंचानुसार जातक कथेत गौतम बुद्धांनी विविध जन्म घेतल्याच्या कथा आहे. बुद्धांच्या मते, माणसाच्या अस्तित्वाचे चार घटक पदार्थ आहे, १) पृथ्वी २) आप ३) तेज ४) वायू . मानवाच्या मृत्यूनंतर हे चारही भौतिक घटक पदार्थ आकाशात सामूहीक रूपाने मिळून जातात. जेव्हा हे चार घटक आकाशाला तरंगण्याच्या समूहाला मिळतात तेव्हा एक नवीन जन्म घडतो. थोडक्यात बौद्ध धर्मात भौतिक घटकामुळेच पुनर्जन्म होतो.

**४) अनात्मवाद :**

बौद्ध धर्मात बुद्धांनी आत्म्याचे अस्तित्व नाकारले आहे. दीर्घ निकायमध्ये आत्म्याचे अस्तित्व, त्याचे रूप, स्वरूप, मानवाच्या मृत्यूनंतचे स्थान, त्याच्या अस्तित्वाचे अनुभवजन्य पुरावे नसल्याचा उल्लेख आहे. निर्वाण प्राप्तीसाठी आत्म्याचे अस्तित्व स्वीकारणे ही सर्वात मोठी अडचण बुद्धांनी मानली. मज्जिम निकाय मध्ये 'सब्बे धम्मा अनत्त्या' असे वचन आहे.

बौद्ध धर्मात बुद्धांनी आत्म्याचे अस्तित्व नाकारले आहे. दीर्घ निकायमध्ये आत्म्याचे अस्तित्व, त्याचे रूप, स्वरूप, मानवाच्या मृत्यूनंतचे स्थान, त्याच्या अस्तित्वाचे अनुभवजन्य पुरावे नसल्याचा उल्लेख आहे. निर्वाण प्राप्तीसाठी आत्म्याचे अस्तित्व स्वीकारणे ही सर्वात मोठी अडचण बुद्धांनी मानली. बुद्धांनी मानवाच्या उत्पत्तीचे मुख्य कारण हे पंचस्कंध मानले. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान हे सत्वाचे पंचस्कंध आहे. 'रूप' हे जडदेह व बाकीचे चार घटक अजड स्कंद आहे. यामध्ये विज्ञान म्हणजे जाणीव किंवा ज्ञान जेव्हा मानवाचा मृत्यू होतो. तेव्हा हे पाच स्कंध विस्कळीत होतात. यामधील कुठल्याही स्कंदामधून मानवाचा पुनर्जन्म होत नाही. जेव्हा मानवाचा जन्म होतो तेव्हा पुन्हा नव्या पंचस्कंधातून त्याची निर्मिती होती. स्कंध असे पर्यंत मानव जगतो ते भरून येताच मानवाचा मृत्यू होतो.

**५) अंतिम सत्य व निर्वाण प्राप्ती :**

बौद्ध धर्मातील एक श्रेष्ठ संकल्पना म्हणजे 'निर्वाण' प्राप्ती होय. चार आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग, पंचशील तत्वे, त्रिरत्ने व सदाचार संपन्न आचरणाने निर्वाण प्राप्ती होते असे बुद्धांनी सांगितले. ह्या मार्गाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे कर्मकांड, यज्ञ विधी, खडतर तपाचरण, कठोर देहदंड, इंद्रिय दमण यापैकी कुठल्याही अवघड साधन मार्गाचा अवलंब न करता निर्वाणपद मिळवता येते. निर्वाण प्राप्तीसाठी व्यक्तीने शुद्धचरण करावे.

munotes.in

**आपली प्रगती तपासा.**

१. बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाचा आढावा घ्या.

## १०.५ बौद्ध धर्माची देणगी

गौतम बुद्धांच्या विचारसरणीत शिकवणुकिच्या आचारधर्मावर भर होता. निर्वाण प्राप्ती व अंतिम सत्याचा शोध हे गौतम बुद्धांचे प्रमुख उद्दिष्टे होते. चार आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग, पंचशील तत्वे, प्रत्युत्य समुत्पाद ही बौद्ध धर्मची भारताला मिळालेली प्रमुख देणगी होती. अहिंसावाद, सदाचरण व मध्यम मार्ग ही बौद्ध धर्माची प्रमुख वैशिष्ट्ये होती. वैदिक साहीत्याप्रमाणेच मोठ्या प्रमाणात बौद्ध साहीत्याची निर्मिती झाली. हे ग्रंथ पाली व संस्कृत भाषेत होते. विनयपिटक, सुत्तपिटक व अधिधम्म पिटक या ग्रंथात गौतम बुद्धांची शिकवण, उपदेश व बौद्ध धर्माचे तत्वज्ञान आढळते. याव्यतिरिक्त जातक कथा, धम्मपद, मिलिंदपन्हो, बुद्धचरित्र, दीपवंश, महावंश इ. ग्रंथाना  बौद्ध साहीत्यात महत्वाचे स्थान आहे.

लेण्या व विहार पद्धतीमधून बौद्ध विद्यापीठांचा जन्म झाला. यामध्ये तक्षशिला, नालंदा, व विक्रमशिला विद्यापीठ प्रमुख होते ज्यांनी त्यावेळीस आंतरराष्टीय ख्याती प्राप्त केली होती. बौद्ध धर्मात धर्माचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांमधून स्थापत्य व शिल्पकलेचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. या स्थापत्यशिल्पात विहार, स्तूप, चैत्य, लेण्या, बुद्ध मूर्ती प्रमुख होत्या. लेण्यांमध्ये वेरूळ, अजंठा, कार्ले, भाजे, नाशिक, कान्हेरी व धारापुरी येथील लेण्या प्रसिद्ध आहे. मुर्त्यांमध्ये सारनाथ व सुल्तानगंज येथील बौद्ध मुर्त्या उल्लेखनीय आहे. तर स्तूप मध्ये सांची स्तूप महत्वाचा आहे. बौद्ध धर्म हा फक्त भारतापुरताच मर्यादित न राहता सिलोन, चीन, ब्राह्मदेश, जपान, तिबेट, नेपाळ, कोरिया, सिरीया, जावा, सुमात्रा व कंबोडिया इ. देशात बौद्ध धर्माचा विस्तार झालेला दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा.**

१. बौद्ध धर्माद्वारे  भारतीय संस्कृतीला मिळालेल्या देणगीची माहीती द्या.

## १०.५ सारांश

ऐतिहासिक दृष्टिकोनातून बौद्ध धर्म हा भारतातील एक अतिप्राचीन धर्म आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून हा जगातील सर्वात महान धर्म आहे. कारण बौद्ध तत्त्वज्ञान हे मानवतावादी आणि विज्ञानवादी धर्म आहे. हा भारतीय धर्म असून भारताच्या इतिहासात आणि परंपरेच्या घडणीत बौद्ध धर्माच्या उदयाला तत्त्वज्ञानाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धर्माचा सर्वाधिक विकास इ.स.पू. ६ वे शतक ते इ.स. ६ वे शतक ह्या कालावधीत झाला. बौद्ध संस्कृतीचे सर्वात मोठे योगदान मौर्य कला, गांधार कला व मथुरा कला यात आढळते. तर बौद्ध धर्माचा व तत्त्वांचा प्रसार भारताबरोबरच शेजारील अनेक देशांमध्येही झालेला आहे. त्रिपिटकाच्या स्वरूपातील साहीत्य व विविध पंथीय साहीत्य हे बौद्ध संस्कृतीच्या रूपाने भारतीय संस्कृतीचा जगातील अनेक देशांमध्ये प्रसार झाला. बौद्ध संस्कृतीचा ठसा हा विहार, स्तूप, मठ, व (लेणी) ह्या मौर्य कलेच्या प्रतीकांच्या रूपाने स्पष्ट दिसतो. त्याच्या विकासाला जवळजवळ ११०० वर्षे लागली. जगाच्या आणि भारतीय जीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि विशेषतः धार्मिक बाजूंवर बौद्ध धर्माची खोलवर व न पुसणारी अशी छाप पडलेली आहे.

munotes.in

## १०.६ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१. गौतम बुद्धांचे चरित्र सांगून शिकवण सविस्तर लिहा.

२. बौद्ध तत्त्वज्ञानावर टीप लिहा.

३. वैश्विक दृष्टीकोनातून बौद्ध धर्माचे महत्त्व विशद करा.

## १०.७ संदर्भ ग्रंथ

१) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती ( प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत ), विद्या बुक प्रकाशन , औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

२) जोशी पी. जी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर , प्रथम आवृत्ती २०१३

३) त्रिपाठी रामशंकर, प्राचीन भारत का इतिहास, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, पंचम संस्करण, १९६८

४) विद्यालंकार सत्यकेतू, प्राचीन भारत का धार्मिक, सामाजिक व आर्थिक जीवन, सरस्वती सदन, नई दिल्ली, १९७८

५) मुखर्जी राधाकुमूद, प्राचीन भारत, राजकमल प्रकाशन, दिल्ली, १९६२

६) मिश्र जयशंकर, प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, बिहार हिंदी ग्रंथ आकदमी, पटना, २०१३

७) Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.

८) Singh Upinder, A History of Ancient and Early Medieval India, From the Stone Age to the 12th century, Pearson education India.

९) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ / विकासपीडिया / मराठीविश्व् कोष

१०) प्राचीन भारत ( प्रारंभ ते यादव काळ ),यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, (Study Material) नाशिक

❖❖❖❖

munotes.in

# ११

## जैन धर्म

**घटक रचना**

११.० उद्दिष्टे
११.१ प्रस्तावना
११.२ जैन धर्माची प्राचीनता किंवा पूर्वइतिहास
११.३ जैन धर्माचे २३ वे तीर्थनकार : पार्श्वनाथ
११.४ महावीर स्वामी
११.५ जैन धर्माचे तत्वज्ञान
११.६ जैन धर्माचे भारतीय संस्कृतीमधील योगदान
११.७ सारांश
११.८ स्वाध्यावर आधारित प्रश्न
११.९ संदर्भ ग्रंथ

### ११.१ प्रस्तावना

- जैन धर्माची प्राचीनता याचा अभ्यास करणे.
- पार्श्वनाथ व महावीर स्वामी यांच्या कार्याचा आढावा घेणे.
- जैन धर्माच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.
- जैन धर्माचे भारतीय संस्कृतीमधील योगदान तपासणे.

### ११.१ प्रस्तावना

जैन धर्माची प्राचीन पूर्वपरंपरा असल्याने हा धर्म बौद्ध धर्माच्या तुलनेने अधिक प्राचीन मानलाजातो. परंतु जैन विचारला धर्माचे स्वरूप प्राप्त करून देण्याचे महत्वाचे कार्य महावीर स्वामींनी केले. जैन धर्माची आधारशीला ही भौतिक विषयावर नसून ती आध्यात्मिक विषयावर आहे. जैन धर्माने खडतर तपाचरण, चिंत्तन, साधुवृत्ती, निःस्वार्थीपणा, नयसिद्धांत व साद्यवादाच्या रूपाने शिकवणूक व तत्वज्ञानाचा फार मोठा वारसा भारतीय संस्कृतीला बहाल केला आहे.

munotes.in

## ११.२ जैन धर्माची प्राचीनता किंवा पूर्वइतिहास

जैन धर्माचे संस्थापक कोण ? या प्रश्नाचे उत्तर शोधणे हे अतिशय कठीण काम आहे. कारण जैन धर्माची प्राचीनता हडप्पा संस्कृती मध्ये आढळते. हडप्पा संस्कृतीमध्ये ज्या नग्न मुर्त्या सापडल्या आहे तसेच वृषभ बैल यांची काही शिल्प सापडली आहे, त्यावरून विद्वानांचे असे मत आहे की, हा धर्म हडप्पा संस्कृती मध्ये अस्तित्वात असावा. तसेच आर्यांच्या वैदिक साहीत्यामध्येही जैन तीर्थंकरांची नावे आढळतात. ऋग्वेदातील केशी सूक्तात वर्णन केलेल्या तपस्वी आणि श्रमणांचा संबध हा जैन तीर्थनकाराशी जोडला आहे. जैन धर्मात एकूण २४ तीर्थनकारझाले. तीर्थ म्हणजे धर्म. धर्माचे प्रकटीकरण, प्रवर्तक करणारे महापुरुष म्हणजे तिर्थांकर होय. जैन धर्मात २४ तीर्थनकारझाल्याची माहीती मिळते. ते पुढीलप्रमाणे :

१) ऋषभदेव २) अजितनाथ ३) संभवनाथ ४) अभिनंदननाथ ५) सुमितीनाथ ६) सुपदनाथ ७) सुपार्श्वनाथ ८) चंद्रप्रभू ९) पुष्पदंत १०) शीतलनाथ ११) श्रेयांसनाथ १२) वासुपद्य १३) विमलनाथ १४) अनंतनाथ १५) धर्मनाथ १६) संतनाथ १७) कुंमनाथ १८) अरनाथ १९) मविनाथ २०) मुनीसव्रथनाथ २१) नृमीनाथ २२) नेमिनाथ २३) पार्श्वनाथ २४) वर्धमान महावीर

या २४ तीर्थनकारांचा उल्लेख हा जैन साहीत्यात आढळतो. थोडक्यात, महावीरांच्या पूर्वी जैन परंपरा ही अस्तित्वात होती. महावीरांनी जैन परंपरेमधील विचार सुसूत्र करून त्यात आपल्या तत्वज्ञानाची भर घालून जैन विचारला धर्माचाआकार प्राप्त करून दिला. व धर्म प्रसाराची जबाबदारी देखील मोठ्या प्रमाणावर पार पडली.

**आपली प्रगती तपासा.**
१. जैनधर्माचा पूर्व इतिहास सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ११.३ जैन धर्माचे २३ वे तीर्थनकार : पार्श्वनाथ

पार्श्वनाथ हे जैन धर्माचे २३वे तीर्थनकार म्हणून ओळखले जातात. यांचा जन्म महावीर स्वामींच्या पूर्वी सुमारे २५० वर्ष अगोदर बनारसच्या राजा अश्वसेन यांच्या घरी झाला. त्यांचा विवाह कुशस्थल राजा नरवर्मा यांची कन्या प्रभावती हीच्याशी झाला. सांसारिक जीवनात त्यांचे मन रमत नसल्याने वयाच्या ३० व्या वर्षी संसाराचा त्याग करून



munotes.in

'समवेत' पर्वतावर ८४ दिवसांच्या घोर तपश्चर्येनंतरनंतर त्यांना कैवल्य ज्ञान प्राप्त झाले. यानंतर ७० वर्ष ते भ्रमण करून ज्ञान प्रसार करत होते. उत्तर प्रदेश, बंगाल व बिहार मध्ये त्यांनी आपल्या विचारांचा प्रचार घडवून आणला. तसेच भिक्षु - भिक्षुणी हे त्यांच्या विचारांचा प्रचार करत, त्यांचे संघ होते. आठ गणधार ही संघ व्यवस्था चालवीत. त्यांनी अहिंसा, सत्य, अस्त्येय व अपरिग्रह या चार प्रमुख जैन तत्वांचा उपदेश दिला. पार्श्वनाथ यांनी आपल्या अनुयायांस श्वेत वस्त्र धारण करण्याची परवानगी दिली, यामधूनच पुढे श्वेतांबर पंथ अस्तित्वात आला. वयाच्या १००व्या वर्षी पारसनाथ पर्वतावर ( ओरिसा ) पार्श्वनाथांची प्राणज्योत माळवली.

## ११.४ महावीर स्वामी

जैन धर्मातील चोवीस तीर्थंकरांपैकी अखेरचे तीर्थनकारम्हणून महावीर स्वामींना ओळखले जाते. बौद्ध परंपरेत महावीरांच्या उल्लेख निर्गंठ किंवा निगठ नागपुत्त असा केला आहे. इ. स. पू. सहावे शतक हे सांस्कृतिक दृष्ट्या उलथापालथीचे शतक होते. या शतकात मगध देशातील (सध्याच्या द. बिहारमधील) वैशाली नगरीचे उपनगर असलेल्या कुंडग्रामात वा कौंडिण्यपुरात महावीरांचा जन्म झाला. त्यांचे वडील सिद्धार्थ हे या उपनगराचे प्रमुख होते. त्यांची आई त्रिशला ही वैशालीच्या लिच्छविवंशीय राजाची मुलगी होती. विदेहदिन्ना व प्रियकारिणी या नावांनी ही ती ओळखली जात असे. महावीरांची प्रवृत्ती लहानपणापासूनच चिंतनशील व वैराग्यशील होती. आईवडिलांच्या मृत्यूनंतरही नंदिवर्धन या थोरल्या भावाच्या विनंतीवरून ते काही काळ घरी थांबले आणि वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी गृहत्याग केला.

सतत बारा वर्ष आत्मक्लेश व इंद्रियदमनाच्या माध्यमातून खडतर तपश्चर्या त्यांनी सुरु केली शेवटी अन्न, पाणी व वस्त्राचा त्याग केला, व 'जिम्ब्रीका' गावाजवळील ऋजूपालिका नदीच्या काठावर शाल वृक्षाखाली महावीरास आत्मसाक्षत्कार होऊन कैवल्यज्ञान प्राप्त झाले. तेव्हापासून वर्धमान हे महावीर, अहर्त, जीन, कैवल्य ज्ञानी किंवा निर्गंथ म्हणून ओळखले जाऊ लागले. ज्ञान प्राप्ती नंतर त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार हा वैशाली, चंपा, राजगृह, व श्रावस्ती या ठिकाणी केला. त्यांनी धर्माचा प्रचार करण्यासाठी 'जैन संघाची' स्थापना केली. उपसंघ प्रमुखास गणधर म्हणत, असे अकरा गणधर महावीर स्वामींनी नेमले होते. यामध्ये आनंद, कामदेव, सूरदेव, कुंडकोलीय, संध्यालपुत्र, नंदिनीपिया व सल्लीपिया प्रमुख होते. आयुष्यभर धर्मप्रसाराचे पवित्र कार्य करत असतांना ई. स. पूर्व ४८८ मध्ये मज्जीपावा येथे महाविरांचे देहावसान झाले.

अशा प्रकारे महावीर स्वामींनी एका नवीन धर्माला जन्म देऊन एका नवीन तत्वज्ञानाची भारतीय धर्म परंपरेत भर घातली.

munotes.in

**आपली प्रगती तपासा.**

१) पार्श्वनाथ यांच्या बद्दल माहीती सांगा.

२) महावीर स्वामी यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घ्या.

## ११.५ जैन धर्माचे तत्वज्ञान

आगम ग्रंथामधून आपणास जैन तत्वज्ञानाची माहीती मिळते. महावीर स्वामी व त्यांच्या पूर्वीच्या तेवीस तीर्थंकरांनी जैन धर्माचे तत्वज्ञान सांगितले आहे. जैन धर्माची जी तात्विक बैठक आहे त्यामध्ये जैन तत्वज्ञानाचा समावेश होतो. जैन धर्माचे तत्वज्ञान हे पुढील प्रमाणे :

**जैन धर्मातील त्रिरत्ने :**

जैन त्रिरत्नांना जैन धर्मात महत्वाचे स्थान आहे. उमास्वामिकृत तत्त्वार्थाधिगमसूत्र या ग्रंथातील पहील्या सूत्राचा अर्थ असा, की सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र या तीन गोष्टी मिळून मोक्षमार्ग होतो. जैनांचे सर्व मोक्षशास्त्रच यांवर आधारलेले असून त्यांना 'त्रिरत्न' किंवा 'रत्नत्रय' म्हणतात.

**सम्यकदर्शन :**

सम्यग्दर्शन म्हणजे महावीराचे सर्वज्ञत्व आणि तीर्थंकरांनी सांगितलेली तत्त्वे यांवर नितांत श्रद्धा किवा भक्ती ठेवणे होय.

सम्यकज्ञान :

सम्यकज्ञानम्हणजे जैनांच्या नऊ तत्त्वांचे (दिगंबरांच्या मते सात तत्त्वांचे) संपूर्ण ज्ञान वा साक्षात्कार होय. ज्ञानाचे पाच प्रकार सांगितले आहे, १) मातीज्ञान : जीव - अजीवांचे ज्ञान. २) श्रुतज्ञान : श्रावण, वाचनाने मिळणारे ज्ञान. ३) अवधीज्ञान : स्थलकालविषयक ज्ञान ४) मन : पर्याय ज्ञान : इतरांच्या भावना व विचाराचे ज्ञान ५) केवलज्ञान : स्थलकालीन विशेष ज्ञान

**३) सम्यक्चरित्र :**

सम्यक्चरित्रम्हणजे साधूने साधुधर्म किंवा यतिधर्म पाळणे व श्रावकाने श्रावकधर्म किंवा गृहस्थधर्म पाळणे.

ही त्रिरत्ने जैनधर्मीय मुक्तीसाठी आवश्यक असून त्याची परस्परांशी सांगड घातलेली आहे.

munotes.in

**पंचमहाव्रते :**

जैन धर्मामध्ये पाच महाव्रत सांगितले आहे, त्याचे पालन करणे जैन श्रमणासाठी आवश्यक्य आहे ती महाव्रते पुढीलप्रमाणे :

**१) अहिंसा :**

अहिंसा हे जैन धर्मतील महत्वाचे तत्वज्ञान असून मन. शरीर व वचनाने कोणत्याही वस्तूंची हत्या करू नये.

**२) सत्य :**

असत्याचा त्याग. खरे बोलणे व मृदवाणी म्हणजे 'सत्यव्रत' होय. यासाठी विचार न करता बोलणे, क्रोध व अहंकार अवस्थेत बोलणे, भयभीत होऊन असत्य बोलणे, फाजील बोलणे टाळावे.

**३) अस्तेय ( अचौर्य ) :**

इतरांच्या परवानगीशिवाय वस्तूंचा स्वीकार न करणे म्हणजे अस्तेय होय.

**४) अपरिग्रह :**

संपत्तीचा संग्रह करू नये, वस्तूंचा मोह टाळावा.

**५) ब्रह्मचर्य :**

पार्श्वनाथ यांनी अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह हे चार तत्वे सांगितली. ब्रह्मचर्य हे शेवटचे व महत्वाचे तत्वज्ञान महावीर स्वामींनी जोडले. यात नैसर्गिक लैंगिक वासनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक्य होते. कोणत्याही स्त्रीशी संभाषण करू नये, स्त्रीकडे पाहू नये, स्त्री असलेल्या घरात राहू नये. अशे अनेक सूक्ष्म बंधने ब्रह्मचर्य व्रतामध्ये होती.

**आपली प्रगती तपासा.**

१. जैन धर्माच्या तत्वज्ञानाचा आढावा घ्या.

## ११.६ जैन धर्माचे भारतीय संस्कृतीमधील योगदान

जैन धर्माने भारतीय साहीत्यातमोठी भर घातली. अर्धमागधी, संस्कृत व अपभ्रंशी लोकभाषेत जैन वाड्मय निर्माण झाले. जैन साहीत्यात बारा अंग, बारा उपांगे, दहा प्रकीर्ण, सहा छेदसूत्रे याशिवाय विविध साहीत्याची रचना झाली. जैन धर्मातील साद्यवाद व अनेकात्मवाद या सिद्धांतास एक विशिष्ट स्थान आहे. साद्यवाद सिद्धांतानुसार प्रत्येक कथन किंवा दृष्टिकोनात आंशिक सत्य असते. अनेकात्मवाद या सिद्धांतानुसार जीवन हे भिन्न -

munotes.in

भिन्न प्रकारचे असू शकते. आत्मा जोपर्यंत राहील तोपर्यंत तो पुनर्जन्माच्या अधीन राहतो. स्थापत्याच्या विकासात जैन धर्मियांचे मोठे योगदान आहे. भारताच्या विविध भागात जैन स्थापत्य व शिल्पांचा विकास झाला. ओरिसामधील हत्तीगुम्फा व वेरूळच्या जैन लेण्या, राजस्थानच्या अबू पर्वतावरील जैन मंदिरे, खजुराओची जैन मंदिरे, उदयगिरी व खंडगिरी येथील जैन लेण्या तसेच पावापुरी, राजगृह, बडवानी, जोधपूर व पारसनाथनगर येथील मंदिरे जैन स्थापत्य कलेची उत्तम प्रतीके आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१. जैन धर्माचे भारतीय संस्कृतीमधील योगदानाचा आढाव घ्या.

## ११.७ सारांश

इ. स. पूर्व सहावे शतक हे एक क्रांतिकारी शतक असून विविध कारणांनी शतकात भारतात धार्मिक क्रांती घडून आली. जैन धर्माची परंपराही हडप्पा संस्कृतीमध्ये आढळते. महावीर स्वामी यांनी जैन धर्माच्या प्रसारात महत्वाचे योगदान दिले. जैन धर्माने भारतीय तत्वज्ञानात मोठी भर घातली. आगम ग्रंथामधून जैन धर्माच्या शिकवणुकीची व तत्वज्ञानाची माहीती मिळते. भारताच्या विविध भागात जैन स्थापत्य व शिल्पांचा विकास झाला. जैन मंदिरे, गुहा व मूर्ती शिल्पाद्वारे धर्म प्रसाराला चालना मिळाली.

## ११.८ स्वाध्यावर आधारित प्रश्न

१. जैन धर्माचा पूर्व इतिहास सांगून पार्श्वनाथ व महावीर स्वामी यांच्या कार्याचा आढावा घ्या.

२. जैन धर्माची शिकवण व तत्वज्ञानाचा आढावा घ्या.

३. बौद्ध व जैन धर्माची भारतीय संस्कृतीला मिळालेल्या देणगीचा आढावा घ्या.

munotes.in

## ११.९ संदर्भ ग्रंथ


१) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती ( प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत ), विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

२) जोशी पी. जी. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१३

३) त्रिपाठी रामशंकर, प्राचीन भारत का इतिहास, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, पंचम संस्करण, १९६८

४) विद्यालंकार सत्यकेतू, प्राचीन भारत का धार्मिक, सामाजिक व आर्थिक जीवन, सरस्वती सदन, नई दिल्ली, १९७८

५) मुखर्जी राधाकुमूद, प्राचीन भारत, राजकमल प्रकाशन, दिल्ली, १९६२

६) मिश्र जयशंकर, प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, बिहार हिंदी ग्रंथ आकदमी, पटना, २०१३

७) Jha D.N. – Ancient India – In Historical Outline, Manohar Publication, 1999.

८) Singh Upinder, A History of Ancient and Early Medieval India, From the Stone Age to the 12th century, Pearson education India.

९) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ / विकासपीडिया / मराठीविश्व् कोष

१०) प्राचीन भारत ( प्रारंभ ते यादव काळ ), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, (Study Material) नाशिक


❖❖❖❖

munotes.in

# १२

# तांत्रिक संप्रदाय - उदय, स्वरूप व शिकवण

**घटक रचना**


१२.० उद्दिष्टे

१२.१ तांत्रिक संप्रदाय

१२.२ तंत्र साहीत्य

१२.३ शाक्त पंथ

१२.४ शाक्त संप्रदायातील पंथ

१२.५ शाक्त संप्रदायाची विचारसरणी

१२.६ सारांश

१२.७ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१२.८ संदर्भ ग्रंथ


## १२.० उद्दिष्टे

- तांत्रिक साहीत्याचा आढावा घेणे.
- तंत्र साहीत्य अभ्यासणे.
- शाक्त पंथाचा अभ्यास करणे.
- शाक्त पंथाची विचारसरणीचा आढावा घेणे.

## १२.१ तांत्रिक संप्रदाय

बौद्ध धर्मात ज्या प्रवृत्तींद्वारे वज्रयान पंथाचा विकास झाला, त्यातून वैदिक धर्माच्या परंपरेत तांत्रिक पंथाचा उदय झालेला दिसून येतो. भारतात, देवी शक्तीची उपासना अनादी काळापासून प्रचलित होती आणि तिची उपासना सौम्य स्वरुपात, उग्र रूपात आणि कामप्रधान रूपात केली जात होती. तांत्रिक पंथाचे लोक देवीची फक्त तिच्या कामप्रधान रूपात पूजा करत असत. या पंथाचे स्वतःचे स्वतंत्र साहीत्य देखील आहे ज्याला तंत्र म्हणतात. तंत्रसाहीत्यही खूप प्राचीन आहे. नेपाळमध्ये ७ व्या ते ९ व्या शतकातील हस्तलिखित तंत्र ग्रंथ उपलब्ध आहेत आणि कंबोडियातील एका अभिलेखाच्या नोंदीवरून असे दिसून येते की भारतातील तंत्रग्रंथी नवव्या शतकात तेथे नेण्यात आले होते. बौद्ध तंत्राचे चिनी भाषेत भाषांतर सहाव्या शतकात आणि तिबेटी भाषेतून दहाव्या शतकात



munotes.in

झाले. यासर्व बाबी लक्षात घेऊन सहाव्या शतकाच्या आसपास तंत्रसाहीत्याचा विकास सुरू झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हा तो काळ होता जेव्हा बौद्धांमध्ये वज्रयान या पंथाचा तर वैदिक परंपरेत तांत्रिक पंथाचा उदय झाला.

## १२.२ तंत्र साहीत्य

तंत्र परंपरेशी संबंधित आगम ग्रंथ आहेत. तंत्र या शब्दाचा अर्थ खूप विस्तृत आहे. तंत्र-परंपरा ही हिंदू आणि बौद्ध परंपरा आहे, परंतु जैन, शीख धर्म तिबेटच्या बोन परंपरा, दाओ-परंपरा आणि जपानच्या शिंटो परंपरेत आढळतात. भारतीय परंपरेत, कोणताही पद्धतशीर मजकूर, तत्त्व, पद्धत, तंत्र किंवा कार्यपद्धती यांना तंत्र असेही म्हणतात. बौद्ध धर्मातील वज्रयान संप्रदाय त्याच्या तंत्र-संबंधित कल्पना, विधी आणि साहीत्यासाठी प्रसिद्ध आहे. तंत्राचा शाब्दिक उगम पुढीलप्रमाणे मानला जातो - "तनोति त्रयति तंत्र". ज्याद्वारे याचा अर्थ होतो – ताणाने, विस्तार व प्रसारित करणे अशा प्रकारे ते त्यातून मुक्त होण्याची एक प्रणाली आहे. हिंदू, बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानात तंत्र परंपरा आढळतात.

तंत्र ही वेदांची नंतरची निर्मिती मानली जाते, जी पहील्या शतकाच्या मध्यकाळात विकसित झाली. साहीत्यिक स्वरूपात, पुराण ग्रंथांमध्ये मध्ययुगीन काळातील तात्विक-धार्मिक रचना, कथा इत्यादींचा समावेश आहे. विषयाच्या दृष्टिकोनातून या धर्मांना तत्त्वज्ञान, सृष्टी, विज्ञान, प्राचीन विज्ञान इत्यादींचे विश्वकोशही म्हणता येईल. युरोपीय विद्वानांनी त्यांची वसाहतवादी ध्येये लक्षात घेऊन तंत्राला ‘गूढ प्रथा’ किंवा ‘सांप्रदायिक कर्मकांड’ असे म्हटले आहे.तंत्र साहीत्याची एकूण संख्या ही हजारा पेक्ष्या जास्त आहे, परंतु मुख्य तंत्र साहीत्य हे ६४ मानले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१. तंत्र साहीत्याचा आढावा घ्या.

## १२.३ शाक्त पंथ

भारतीय तंत्रमार्गातील एक पंथ म्हणून शाक्त पंथ ओळखला जातो. पारंपरिक ग्रंथांमध्ये तंत्रमार्गातील विविध शाखांच्या उद्‌गमासंबंधी उल्लेख सापडतात. शक्त तंत्रे शिवाच्या ऊर्ध्व मुखातून प्रसृत झाली असल्याने त्यांना ‘ऊर्ध्वम्नाय’ असे समजले जाते. शाक्त पंथ हा एकूण शैव संप्रदायाचा एक भाग असला, तरी त्याचे वेगळेपण दिसून येते. शैव पंथ हा शिवप्रधान असून शाक्त पंथ हा शक्तिप्रधान आहे. बऱ्याचशा ग्रंथांची रचना शिव व



munotes.in

शक्ती यांच्या संवादाच्या रूपात केलेली आहे. ज्या ग्रंथात शक्ती किंवा पार्वती ही पृच्छा करणारी असून शिव हा उत्तर देणारा असतो, तो शैव संप्रदायातील ग्रंथ होय. शाक्त ग्रंथांमध्ये त्याच्या उलट स्थिती दिसून येते. शाक्त ग्रंथांमध्ये सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्य व भासा अशा पाच परा शक्ती मानलेल्या आहेत. त्यांचे विवेचन काही शाक्तागमांमध्ये वेगळ्या पद्धतीने केलेले आढळते. शैव संप्रदायाच्या प्राचीनतेसंबंधी विवेचन करताना संशोधकांनी शिवाची उपासना सिंधू संस्कृतीइतकी प्राचीन असल्याचे मत व्यक्त केले आहे. महाभारतात शैव व शाक्त पंथांचे अस्तित्व सूचित करणारे उल्लेख आढळतात. ८४ सिद्धांपैकी मत्स्येन्द्रनाथ किंवा मच्छिंद्रनाथ (सुमारे दहावे शतक) हे नाथपंथाचे तसेच कौलतंत्राचे प्रवर्तक मानले जातात. (नाथ संप्रदाय) कौलमार्ग हा शाक्तांमधील एक उपपंथ आहे. कुब्जिकामत, कुब्जिकोपनिषद मतोत्तर, चिद्‌गगनचंद्रिका इ. ग्रंथ शाक्त परंपरेचे आधारभूत ग्रंथ आहेत.

शाक्त संप्रदायात शक्ती हे परमदैवत मानले जाते. तर शैव संप्रदायात शिव हे परमदैवत शक्तीला गुरुस्थानी असते. प्रत्येक संप्रदायाच्या परंपरेत विशद केलेला साधनेचा मार्ग म्हणजे 'तंत्रमार्ग'. शैव तंत्र, शाक्त तंत्र, गाणपत्य तंत्र, सौर्य तंत्र, वैष्णव तंत्र आणि बौद्ध तंत्र असे तंत्रमार्गाच्या परंपरेची विभागणी केली जाते. शाक्त तंत्रमार्गात शक्ती ही विश्वाचे आदिकारण मानलेली आहे आणि त्या अधिकारात तिची दहा गुणरूपे आणि त्यांची साधना याला महत्त्व आहे. या दहा गुणरूपांना महाविद्या असे म्हटले जाते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : काली, तारा, शोडषी, भुवनेश्वरी, भरवी, छिन्नमस्ता, धूमवती, बगलामुखी, मातंगी आणि कमला. या सर्वांचे सविस्तर वर्णन देवीमाहात्म्य, देवीभागवत या ग्रंथांमध्ये मिळते. काळाच्या ओघात तांत्रिक आणि शाक्त या संज्ञा बऱ्याचदा समानार्थी म्हणून वापरल्या गेल्या, असे दिसते.

शाक्त पंथात शक्ती ही उपास्य देवता असून तिची परमतत्त्व या स्वरूपात उपासना केली जाते. ही संवित्स्वरूपा भगवती आपल्या अंतर्गत असलेल्या सृष्टीस बाह्य स्वरूपात प्रकट करते. ह्या शाक्त पंथामध्ये काली व त्रिपुरा असे त्या त्या देवतांचे संप्रदाय आहेत. ह्या पंथामध्ये शक्ती व शक्तिमान ह्यांची एकात्मता (अद्वैत) प्रस्थापित केलेली आहे. शुद्ध परब्रह्म ते आदिवर्ण अकार रूपात प्रकट होते. या आकारासशाक्त पंथात 'अनुत्तर अकार' असे म्हणतात. ह्या अकाराच्या चार कला असून जया, विजया, अजिता आणि अपराजिता अशा परब्रह्माच्या चार शक्ती त्या चार कलांच्या रूपात प्रकट होतात. परब्रह्माच्या चार परा शक्ती, चार परंपरा शक्ती व चार अपरा शक्ती मानल्या आहेत. जया इ. चार गुह्य शक्ती ह्या चार अपरा शक्ती होत. योगवासिष्ठात ह्या चार शक्तींसमवेत सिद्धा, रक्ता, अलम्बुषा व उत्पला अशी आणखी चार शक्तींची नावे येतात. ह्या आठ शक्ती मातृकांमध्ये श्रेष्ठ असून त्यांचा स्वभाव रौद्र आहे. त्या तुंबरू नामक रुद्राच्या आश्रित आहेत. नित्या नामक शाक्त संप्रदायात त्या शक्तीचे नाव नित्या असे आहे. नित्या, त्रिक, क्रम, कुल इ. शाक्त पंथ हे अद्वैतवादी असून त्यांमध्ये शक्ती ही परम शक्ती मानली जाते. शिवादी सर्व तत्त्वांची उत्पत्ती भगवती अंबेपासून झाली आहे. सर्व विश्व हे मूलत: शक्तीमध्ये आस्थित असून ती त्यास बाह्य स्वरूपात प्रकट करते. ह्या सिद्धांतास शक्तिपारम्यवाद असे नाव आहे. पुढील काळात शैव व शाक्त दर्शन मिळून 'शांभव दर्शन' निर्माण झाले. त्यामध्ये शिव व शक्ती यांची समानता प्रस्थापित केली गेली.

**आपली प्रगती तपासा.**

१. शाक्त पंथाचा आढावा घ्या.

## १२.४ शाक्त संप्रदायातील पंथ

शाक्त संप्रदायामधील विविध पंथ हे पुढीलप्रमाणे होते

**१) क्रम संप्रदाय :**

काश्मीरमध्ये प्रस्थापित झालेला क्रम संप्रदाय हा ह्या शक्तिपारम्यवादाचा प्रमुख पुरस्कर्ता आहे. त्या संप्रदायाच्या मतानुसार काली पाच प्रकारची कृत्ये करते. क्षेप, ज्ञान, प्रसंख्यान, गती आणि नाद ही ती पाच कृत्ये होत. स्वात्म्याचे भेदन म्हणजे क्षेप. त्याची निर्विकल्प स्थिती म्हणजे ज्ञान, सविकल्प रूप हे प्रसंख्यान, प्रतिबिंबाच्या रूपात प्रकट होणे ही गती आणि आत्मस्वरूपात पुन्हा विलीन होणे हा नाद. अशा प्रकारे ही पाच कृत्ये करणारी – कलनांना करणारी – देवी काली होय. सृष्टी, स्थिती, संहार व अनाख्या असा चार तत्त्वांचा क्रम मानणारा संप्रदाय क्रम या नावाने प्रसिद्ध आहे. काही आचार्य भासा हे पाचवे तत्त्वही मानतात. महेश्वरानंदविरचित महार्थमंजरी व त्या ग्रंथातील परिमल टीका क्रमदर्शनाचे विस्ताराने विवेचन करतात.

**२) त्रिपुरा संप्रदाय :**

त्रिपुरा हाही संप्रदाय क्रमदर्शनाप्रमाणेच कौल संप्रदायाचे अनुकरण करतो. त्रिपुरा संप्रदायात तीन शक्ती, तीन चक्रे, तीन धाम, तीन बीजे, तीन तत्त्वे इ. तीन पदार्थांची जननी 'त्रिपुरा' आहे, असे मानले जाते. शिव, शक्ती व नर या तीन स्वरूपांचे विशेष विवेचन या संप्रदायात आढळते. अशा व इतर कारणांमुळे यास 'त्रिक दर्शन' असे म्हणतात. त्रिपुरा दर्शनाचा प्रसार काश्मीरमध्ये झाला. राजा अवंतिवर्मन् (इ.स. ८५५–८३) हा राज्य करीत असताना कौल आणि क्रम हे संप्रदाय प्रतिष्ठित झालेले होते. त्रिपुरा दर्शनाचा प्रसार ह्या सुमारास होऊ लागला. ह्या दर्शनाचा काश्मीरप्रमाणे बंगाल व केरळातही प्रसार झालेला दिसतो. त्रिपुरा संप्रदायात वामकेश्वर दर्शन हे एक महत्त्वाचे शास्त्र आहे. त्या मतानुसार परमतत्त्वास संविच्छक्ती म्हणतात. तिच्यापासूनच सर्व सृष्टी निर्माण होते. शिव व शक्ती अशी दोन तत्त्वेही तिच्यापासून निर्माण होतात. हीस महात्रिपुरसुंदरी असेही नाव आहे. तिच्या उपासनेचे अंतर्याग व बहीर्याग असे दोन प्रकार आहेत. या प्रकारे उपासना करणाऱ्या साधकास भोग आणि मोक्ष ह्या दोहोंचीही प्राप्ती होते. या संप्रदायातील ग्रंथांमध्ये मातृका, मंत्र व मुद्रा ह्यांच्या साह्याने केल्या जाणाऱ्या उपासनेचे विस्ताराने वर्णन आढळते. नित्याषोडशिकार्णव अथवा वामकेश्वर तंत्र हा संप्रदायातील एक प्रमुख ग्रंथ होय. सौंदर्यलहरी हे प्रसिद्ध स्तोत्रही या संप्रदायाचे प्रतिपादन करते.

munotes.in

**३) सौभाग्यसंप्रदाय :**

त्रिपुरसुंदरी हे परमोच्च शक्तीचेच स्वरूप आहे. ती सुंदर युवतीच्या रूपात प्रकट होते. तिच्या संप्रदायास सौभाग्यसंप्रदाय असे नाव आहे. श्रीचक्र आणि श्रीविद्या ह्यांची उपासना ह्या संप्रदायाची महत्त्वाची अंगे आहेत. श्रीचक्र किंवा श्रीयंत्र ही नऊ त्रिकोणांनी बनलेली रेखाकृती आहे. श्रीविद्या ही १५ संस्कृत वर्णांची मालिका असून लौकिक भाषेच्या दृष्टिकोणातून अर्थहीन आहे. ती वाग्भव, कामराज व शक्ती अशा तीन विभागांनी युक्त आहे. अमृतानंद, शिवानंद, लक्ष्मीधर, भास्करराव इ. आचार्यांनी नित्याषोडशिकार्णव, योगिनीहृदय इ. ग्रंथांवर लिहीलेल्या टीकांमध्ये या संप्रदायाचे तत्त्वज्ञान विस्तृत स्वरूपात सापडते.

शाक्त संप्रदायातील ग्रंथ संस्कृतप्रमाणे बंगाली, मैथिली, हिंदी, राजस्थानी, ब्रज, पंजाबी अशा भाषांमधूनही निर्माण झाले. या संप्रदायातील चंडीमंगल, कालिकामंगल इ. गीते व स्तोत्रे या भाषांमध्ये रचली गेली. प्राचीन काळापासून चालत आलेल्या ह्या संप्रदायाने अठराव्या शतकात नवे स्वरूप धारण केले. शक्तीची उपासना व भक्तिसंप्रदायाचे मिश्रण असलेल्या ह्या संप्रदायातील महान साधक रामकृष्ण परमहंस हे होत. त्यांच्या उपदेशात ह्या नवशाक्त पंथाचे सार सापडते.

**आपली प्रगती तपासा.**

१. शाक्त संप्रदायामधील विविध पंथांचा आढावा घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १२.५ शाक्त संप्रदायाची विचारसरणी

शाक्त संप्रदायात शक्ती हे परमदैवत मानले जाते. तर शैव संप्रदायात शिव हे परमदैवत शक्तीला गुरुस्थानी असते. प्रत्येक संप्रदायाच्या परंपरेत विशद केलेला साधनेचा मार्ग म्हणजे 'तंत्रमार्ग'. शैव तंत्र, शाक्त तंत्र, गाणपत्य तंत्र, सौर्य तंत्र, वैष्णव तंत्र आणि बौद्ध तंत्र असे तंत्रमार्गाच्या परंपरेची विभागणी केली जाते. शाक्त तंत्रमार्गात शक्ती ही विश्वाचे आदिकारण मानलेली आहे आणि त्या अधिकारात तिची दहा गुणरूपे आणि त्यांची साधना याला महत्त्व आहे. या दहा गुणरूपांना महाविद्या असे म्हटले जाते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : काली, तारा, शोडषी, भुवनेश्वरी, भरवी, छिन्नमस्ता, धूमवती, बगलामुखी, मातंगी आणि कमला. या सर्वांचे सविस्तर वर्णन देवीमाहात्म्य, देवीभागवत या ग्रंथांमध्ये मिळते. काळाच्या ओघात तांत्रिक आणि शाक्त या संज्ञा बऱ्याचदा समानार्थी म्हणून वापरल्या गेल्या, असे दिसते.

munotes.in

देवी भागवताच्या नवव्या स्कंधात देवी आणि प्रकृती या संकल्पनांची सांगड घातलेली आहे. सर्व देवांचे अंश एकवटून त्यापासून देवी निर्माण झाली, अशी कथाही त्यात आहे. मात्र तरीही ती पूर्णत स्वतंत्र, कोणत्याही देवाच्या आधिपत्याखाली नसलेली, अशी आहे. किंबहुना देव हे देवीचे कृपाभिलाषी आहेत. देवी म्हणजेच आदिम आणि अंतिम सत्य-परब्रह्म या विचारावर शाक्त संप्रदायांची सद्धान्तिक पीठिका आधारलेली आहे. देवी स्वतच म्हणते की, जेव्हा प्रलय होतो तेव्हा तिचे स्वरूप ना स्त्रीचे, ना पुरुषाचे; ती केवळ ब्रह्मरूपाने उरते. माये सहीत ब्रह्म असे तिचे अस्तित्व आहे. शाक्त परंपरेत माया मिथ्यारूप नसून ती सर्जनशील शक्ती आहे. माये मुळेच शक्तितत्त्वाला देवीरूपे धारण करणे शक्य होते. शाक्तमतामध्ये देवीरूपाप्रति उत्कट भक्तीचे, संपूर्ण शरणागतीचे माहात्म्य आहे. ब्रह्मस्वरूपातील शक्तितत्त्वाचे दोन पलू आहेत. एक दोन मायाशक्ती आणि चित्शक्ती. मायाशक्तीच्या आधारे ती तीन गुणरूपांमधून ती प्रकट होते, सात्त्विक स्वरूपातील महालक्ष्मी, राजसिक स्वरूपातील महासरस्वती आणि तामसिक स्वरूपातील काली. चित्शक्तीच्या स्वरूपातील तिचे अस्तित्व मात्र निर्गुण असते. शाक्त तंत्रमार्गाचे अंतिम ध्येय सगुणाकडून निर्गुणाकडे जाणे हेच आहे.

शक्ती आणि शिव या दैवतांच्या उपासनेची परंपरा खूप प्राचीन असल्याचे, तसेच ती वेदपूर्व असल्याचे मानले जाते. नंतरच्या काळातील त्यांचे संप्रदायविशिष्ट स्वरूप मात्र वैदिक आणि अवैदिक या दोन्ही परंपरांना सामावून घेत स्वतंत्रपणे विकसित होत गेले. शाक्त आणि शैव संप्रदायांमध्ये तत्त्वभेदांना आणि त्यानुसार असणाऱ्या आचारविधींना अनुसरून अनेकपंथ निर्माण झाले हे खरे असले तरी हठयोगाशी त्या सर्वांचेच नाते आहे. योगिक परिभाषेमध्ये 'ह' म्हणजे स्त्रीतत्त्व आणि 'ठ' म्हणजे पुरुषतत्त्व. या दोन तत्त्वांच्या, म्हणजेच शक्ती आणि शिव यांच्या एकात्मिकतेचा अनुभव प्राप्त करण्याचा मार्ग म्हणजे हठयोग. मानवी शरीर हे वैश्विक रचनेची प्रतिकृती आहे; स्त्रीतत्त्व आणि पुरुषतत्त्व दोन्हीही प्रत्येकाच्या शरीरात असतात, हे योगमार्गातील प्रमुख तत्त्व आहे. त्या दोन्हींच्या एकत्व पावण्यातून परमानंदाची अनुभूती प्राप्त होते. शिवतत्त्व म्हणजेच परमतत्त्व सहस्रारचक्रामध्ये वसते आणि शक्तीचा म्हणजेच वैश्विक सृजनशीलतेचा वास सर्परूपी कुंडलिनीच्या रूपात मूलाधार चक्रात असतो. ती तिथे सुप्त स्वरूपात असते. सुप्त स्वरूपातील कुंडलिनी जागृत करून, शिव आणि शक्तीचे एकत्व साधणे, हे तांत्रिक हठयोगाचे अंतिम साध्य मानले जाते. हठयोगामध्ये शरीर आणि शरीरधर्माला परमार्थाच्या मार्गातील अडथळा न मानता, शिव आणि शक्तीचे एकत्व साधण्याचे साधन मानलेले आहे. योगासने हा हठयोगावर आधारलेल्या साधनेची प्राथमिक पायरी होय. हठयोगाच्या साधकांना योगी असे म्हटले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१. शाक्त संप्रदायामधील विचारसरणीचा आढावा घ्या.

## १२.६ सारांश

बौद्ध धर्मात ज्या प्रवृत्तींद्वारे वज्रयान पंथाचा विकास झाला, त्यातून वैदिक धर्माच्या परंपरेत तांत्रिक पंथाचा उदय झालेला दिसून येतो. भारतात, देवी शक्तीची उपासना अनादी काळापासून प्रचलित होती आणि तिची उपासना सौम्य स्वरुपात, उग्र रूपात आणि कामप्रधान रूपात केली जात होती. तांत्रिक पंथाचे लोक देवीची फक्त तिच्या कामप्रधान रूपात पूजा करत असत.

तांत्रिक संप्रदायात शाक्त पंथाला विशेष महत्व आहे. संपूर्ण विश्वाची प्रेरणा म्हणजे शिव असून शक्तीच्या साहाय्याने तो विश्वाची निर्मिती करतो. ही आदिशक्ती शिवाची अर्धांगिनी असून उमा, हेमावती, महादेवी, गिरीजा, पार्वती, गौरी, अन्नपूर्णा, सती व दक्षमित्रा ही तिची विविध रूपे होती. गुप्त काळात ह्या स्त्री शक्ती देवतेची उपासना करणारा शाक्त पंथ लोकप्रिय झाला.

## १२.७ स्वाध्यावर आधारित प्रश्न

१) तांत्रिक पंथाच्या साहीत्याचा आढावा घ्या ?
२) शाक्त संप्रदायाची थोडक्यात माहीती द्या ?
३) शाक्त संप्रदायातील विविध पंथाचा आढावा घ्या ?
४) शाक्त संप्रदायामधील विचारसरणीचा आढावा घ्या ?

## १२.८ संदर्भ - ग्रंथ


१) अत्रे शुभांगना - शाक्त तंत्रमार्ग आणि चौसष्ठ योगिनी, (संशोधन लेख) लोकप्रभा, ३० सप्टेंबर २०१६
२) त्रिपाठी रामशंकर, प्राचीन भारत का इतिहास, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, पंचम संस्करण, १९६८
३) विद्यालंकार सत्यकेतू, प्राचीन भारत का धार्मिक, सामाजिक व आर्थिक जीवन, सरस्वती सदन, नई दिल्ली, १९७८
४) शाक्त पंथ - मराठी विश्वकोश
५) तंत्र – विकिपीडिया


❖❖❖❖

munotes.in

# १३

# लोह तंत्रज्ञान, शेतीचे स्थिरीकरण व नागरीकीकरण

**घटक रचना**


१३.० उद्दिष्टे

१३.१ प्रस्तावना

१३.२ भारतातील लोखंडाचे प्राचीनत्व

१३.३ लोखंडाच्या प्रयोगाचे साहीत्यिक पुरावे

१३.४ लोखंडाच्या वापराचे भौतिक पुरावे

१३.५ लोहतंत्रज्ञान किंवा लोहक्रांतीचे महत्व

१३.६ शेतीचे स्थिरीकरण

१३.७ नागरीकरण

१३.८ नागरीकरणाचा अर्थ

१३.९ शहरीकरणाची व्याख्या

१३.१० नागरीकरणाच्या उद्याची कारणे

१३.११ सारांश

१३.१२ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१३.१३ संदर्भ ग्रंथ


## १३.० उद्दिष्टे

- भारतीय उपखंडातील सुरवातीच्या लोह संस्कृतीचा अभ्यास करणे.
- लोह तंत्रज्ञाच्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
- शेतीतील स्थिरीकरण अभ्यास करणे.
- प्राचीन भारतातील नागरीकरणांचा उदय व विकासाचा अभ्यास करणे.

## १३.१ प्रस्तावना

मानवाने लावलेल्या लोखंड धातूचा शोध हा सर्वच क्षेत्रासाठी क्रांतिकारी स्वरूपाचा होता. प्राचीन काळातील मानवाने शोधलेल्या लोखंड या धातूचा वापर हा त्या काळापासून ते आजतायगत विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत आहे. लोह या धातूची उपकरणे व शस्त्रास्त्रे जेव्हा प्रामुख्याने प्रचारात व वापरात आली, त्या युगाला पुरातत्त्वविद्या विद्वानांनी 'लोहयुग' अशी संज्ञा दिली. पुरातत्वीय साधनांच्या आधारे भारतात लोखंडाचा



munotes.in


वापर हा चित्रित धूसर मृदभांड संस्कृती (Painted Grey Ware) पासूनच होत असल्याचे पुरावे आढळतात. चित्रित धूसर मृदभांड या संस्कृती मधील लोक गेरू रंगाच्या मातीच्या भांड्यावर चित्र काढत व ती भांडी वापरात आणत. हरियाणा, पंजाब व भगवानपुर येथील उत्खननांमधून असे कळते की , हडप्पा संस्कृतीच्या पतनानंतर भारतात चित्रित धूसर मृदभांड संस्कृती विकसित झाली. या संस्कृती मधील लोक लोखंडाचा वापर करत असत.

## १३.२ भारतातील लोखंडाचे प्राचीनत्व

धातूचा शोध आणि वापर ही मानवाच्या सांस्कृतिक जीवनातील क्रांतिकारक घटना असून त्यामुळे मानवाला वेगवेगळी शस्त्रे बनविणे शक्य झाले. ज्या जमातींना धातूंचा वापर ज्ञात झाला, त्यांनी साहजिकच आपले वर्चस्व सर्व क्षेत्रांत झपाट्याने प्रस्तापित केले. लोहयुगाची सुरुवात निरनिराळ्या भूप्रदेशांत भिन्न काळात झाली, मात्र नैसर्गिक लोहाचा वापर आणि तयार केलेले लोह यांबद्दल सुरुवातीच्या काळात अज्ञान दिसून येते. भारतातील लोखंडाच्या वापराच्या प्राचीनतेबद्दल विविध इतिहासकारांमध्ये मतभेद आढळतात. साहीत्यिक व पुरातत्वीय पुराव्यांच्या आधारे असे म्हणता येते की, मध्य आशियातील हीत्ती संस्कृतीत (इ.स. पूर्व १८००-१२००) लोखंडाचा वापर सर्वप्रथम केला असावा. लोखंडाचा वापर हा सर्वप्रथम युद्धामधील हत्यार बनवण्यासाठी झाला असल्याने प्रारंभी त्याचा शोध हा गुप्त ठेवला गेला. इ.स. पूर्व १२०० मध्ये हीत्ती संस्कृतीचे पतन झाल्याने लोखंडाच्या तंत्रज्ञाचा प्रसार हा इतर प्रदेशांमध्ये झाला. परंतु नवीन संशोधनानुसार हे सिद्ध होते की, भारतातील नोह (राजस्थान) येथील दुवाबच्या प्रदेशात लोखंडाचा वापर हा काळ्या व लाल मृदभाण्ड संस्कृती मध्ये (Black and Red ware pottery Culture) होत होता.

(इ.स.पूर्व १४००) उत्खननांमध्ये भगवानपूर, मांडा, दाघेरी, आलमगीरपूर, रोपड इ. ठिकाणी चित्रीत धूसर मृदभांड संस्कृतीच्या ह्रासानंतर लोखंडाच्या प्रयोगाचे पुरावे आढळतात. ग्रीक साहीत्याच्या आधारे माहीती मिळते की, " सिकंदरच्या आक्रमणापूर्वी भारतात लोखंडाचा वापर केला जात असे." ऋग्वेदा मध्ये भाला व बाणांचा उल्लेख आहे. ऋग्वेद मध्ये एका ठिकाणी शत्रूपासून सुरक्षतेसाठी लोखंडाचा किल्ला बनविण्याचे आव्हान सोम देवाने केले होते. ऋग्वेदा मध्येच ' गालव ' नावाच्या ऋषींचा उल्लेख आढळतो, ज्याने पांचालचा राजा दिवोदास याला दशराज युद्धामध्ये लोखंडाची तलवार देऊन या युद्धात मदत केली. तसेच कन्नोजचा राजा अष्टकचा उल्लेख आहे, ज्याने आपल्या मुलाचे नाव ' लौही ' ठेवले होते. उत्तर वैदिक ग्रंथामध्ये देखील लोखंडाच्या वापराचे अनेक पुरावे आढळतात. ए. आर. बॅनर्जी यांच्या मते, " चित्रित धूसर मृदभाण्ड संकृतीपासूनच भारतात लोखंडाचा वापर झाला असावा " ( डॉ. जेभा इस्लाम, द्वितीय नागरीकरण के संदर्भ में लोहे कि भूमिका, पृ. क्र. ७२४ )

अशाप्रकारे साहीत्यिक व पुरातात्विक पुराव्याच्या आधारे कळते की, भारतात लोखंडाचा वापर हा चित्रीत धूसर मृदभांड संस्कृती पासूनच झाला.




**(स्रोत : Indian Journal of History of Science, 46.3 (2011) 381-410 [Ancient Indian Iron and Steel: An Archaeometallurgical Study by B Prakash]**

**आपली प्रगती तपासा:**

१ भारतातील लोखंडाचे प्राचीनत्व सांगा.

___

___

___

___

## १३.३ लोखंडाच्या प्रयोगाचे साहीत्यिक पुरावे

वैदिक ग्रंथामध्ये लोखंडाच्या वापराचे अनेक पुरावे आढळतात. वैदिक कालीन ग्रंथ ऋग्वेद हे ' कांस्य युगाचे ' तर यजुर्वेद हे ' लोहयुगाचे ' प्रतिनिधित्व करतात. उत्तर वैदिक काळातील ग्रंथामध्ये 'लोहीत अय्यस' हा शब्द तांबा या धातुसाठी तर 'कृष्ण अय्यस' हा लोखंड धातुसाठी वापरला आहे. कृष्ण यजुर्वेदच्या तैत्तरीय संहीतांमध्ये, ' नांगर

munotes.in

ओढण्यासाठी सहा किंवा बारा बैलांचा वापर होत असे.' असा उल्लेख आढळतो. ( पांडेय व्ही.के. , प्राचीन भारतीय कला, वास्तू ऍव्ह पुरातत्व, पृ. क्र. ३६४ ) निश्चितच या नांगराचे फाळ हे लोखंडाचे बनले जात असावे. पाणिनीच्या अष्टध्यायी मध्ये लोखंडाचे नांगर व फाळ यासाठी 'अमीविकारकुशी' हा शब्द आढळतो. अथर्ववेदामध्ये लोखंडापासून बनलेले ताबीज व लोखंडाच्या फाळचा उल्लेख आहे. या व्यतिरिक्त बौद्ध धर्म ग्रंथ 'सुत्त निप्पात ' मध्ये नांगराच्या लोखंडाचा फाळ बनवण्यासाठी लोखंडाला वितळविण्याच्या प्रक्रियेची माहीती आढळते. ( श्रीवास्तव के. सि., प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, पृ. क्र. ७६ ) डी. डी. कोशम्बी यांनी देखील ' सुत्त निप्पात ' च्या आधारे लोखंडा पासून फाळ बनवत असल्याची माहीती दिली आहे. छांदोग्य उपनिषद मध्ये देखील लोखंडाचा उल्लेख आढळतो.

वैदिक व बौद्ध धर्मग्रंथाच्या आधारे, भारतात लोखंडाचा व त्याद्वारे बनविल्याजाणाऱ्या उपकरणांचा प्रयोग हा साधारणपणे इ. स. पूर्व ८०० किंवा इ. स. पूर्व. ७६० मध्ये केला जात असावा.

**आपली प्रगती तपासा:**

१. लोखंडाच्या साहीत्यिक पुराव्याचा आढावा घ्या.

## १३.४ लोखंडाच्या वापराचे भौतिक पुरावे

साहीत्यिक साधनांच्या व्यतिरिक्त भारतात लोखंडाचा वापर होत असल्याचे अनेक भौतिक पुरावे देखील आढळतात. अहीछत्र, अंतरंजीखेडा, आलमगीरपूर, मथुरा, रोपड, श्रावस्ती, काम्पिल्या इ. ठिकाणी झालेल्या उत्खननांमध्ये लोहयुगीन संस्कृतीचे पुरावे आढळतात. या काळातील लोक एका विशिष्ट प्रकारच्या भांड्यांचा प्रयोग करीत, ज्याला चित्रित धूसर मृदभाण्ड म्हटले जाते. ( Painted Grey ware ) या संस्कृतीमधून अनेक लोखंडी साधने व औजारे मिळाली आहे. या संस्कृतीमधील लोकांना लोखंडाचे ज्ञान तर अवगत होतेच शिवाय लोखंडाच्या विविध प्रकारच्या वस्तु देखील ते बनवीत. पुरशास्त्रज्ञांनी या संस्कृतीचा कालखंड हा इ. स. पूर्व १००० निश्चित केला आहे. पूर्व भारतातील सोनापूर, चिरंद व मध्य भारतातील ऐरण, नागदा, उज्जैन, कायथा इ. ठिकाणी झालेल्या उत्खननांमध्ये वृहतपाषाणकालीन (Magaliths) समाध्या मिळाल्या आहे. या समाध्यांमधून लोखंडाची विविध औजारे, हत्यारे व उपकरणे मिळाली आहे.

munotes.in

## १३.५ लोहतंत्रज्ञान किंवा लोहक्रांतीचे महत्व

भारतात लोखंडाचा वापर हा इ.स. पूर्व १००० पासून सुरु झाला असावा. इतिहासकारांच्या मते, सर्वप्रथम दक्षिण भारतात लोखंडाचा वापर झाला. दक्षिण भारतात पाषाणयुगीन संस्कृती नंतर लगेच लोहयुगीन संस्कृती ही उदयास आली. उत्तर भारतात मात्र पाषाण संस्कृती नंतर ताम्र, कांस्य व त्याच्या अनेक वर्षानंतर लोहयुगीन संस्कृती उदयास आली. लोखंडाच्या वापराने मानवी जीवनात अनेक आमूलाग्र बदल घडून आले ते पुढीलप्रमाणे :

१) लोखंडाच्या वापरामुळे शेतीच्या उपकरणांमध्ये वाढ झाली. ज्यामुळे शेतीत अतिरिक्त उत्पादन होऊन नगरातील लोकांच्या गरजा पूर्ण झाल्या. त्याचा परिणाम म्हणजे गंगा नदीच्या प्रदेशामध्ये अनेक नवीन नगरांचा उद्य झाला.

२) लोखंडाच्या कुऱ्हाडीने घनदाट जंगले सपाट करून ती जमीन कृषियोग्य बनविणे सहज शक्य झाले.

३) जमिनीचे क्षेत्र वाढल्यामुळे व त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे जीवन स्थिर व सुखकर झाले.

४) उत्पादनांच्या उपकरणांवर वैयक्तीक मालकी निर्माण झाल्याने खाजगी संपत्ती वाढीस लागून तिचे महत्व वाढले.

५) तांबा या धातूच्या तुलनेने लोखंड हे अधिक स्वस्त असल्याने शेतकरी व विविध व्यावसायिक लोखंडापासून बनवलेले वस्तू, उपकरणे व औजारे सहज खरेदी करू शकत होते. ज्यामुळे लोखंडाच्या उपकरणांची व हत्यारांची मागणी वाढली.

६) धातुव्यवसाय करणाऱ्यांची प्रतिष्ठा समाजामध्ये वाढली.

७) इ.स. पूर्व सहाव्या शतकात महाजनपदांचा झालेला उदय व पुढील काळात मगध साम्राज्याचा उदय हा लोहक्रांतीमुळेच घडून आला. कारण मगध व त्याच्या शेजारील प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोखंडाचे साठे होते.

अशाप्रकारे लोहतंत्रज्ञामुळे मानवी जीवनात क्रांतिकारी परिवर्तन घडून आले.

**आपली प्रगती तपासा:**

१. लोहक्रांतीचे महत्व स्पष्ट करा.

munotes.in

## १३.६ शेतीचे स्थेर्यीकरण

वैदिक काळातील आर्यांचे टोळीसमूह, भटकंती व पशुपालक जीवन उत्तर वैदिक काळात बदलू लागले. उत्तर वैदिक काळात झालेल्या य बदलासाठी अनेक कारणे कारणीभूत होती. या काळात आर्य - अनार्य संघर्ष कमी होऊन समन्वयात्मक जीवन पद्धती सुरु झाल्याचे दिसते. अनार्यांच्या संपर्कातून आर्य लोक शेतीकडे आकर्षित झालेले दिसून येतात. हे परिवर्तन फक्त अनार्यांच्या संपर्कातून न होता या काळात लोखंडाचा लागलेला शोध व वापर हे देखील महत्वाचे करण होते. अनार्यांची शेती करण्याची पद्धत स्थलांतरीत स्वरूपाची होती, या मध्ये जंगलांना आग लावून ती जमीन शेतीयोग्य बनविणे व कालांतराने याच पद्धतीचा वापर करून दुसऱ्या ठिकाणी शेतीयोग्य जमीन बनविणे या पद्धतीचा प्रयोग केला जात असे. या प्रयोगाद्वारे गंगा- यमुनेच्या नद्यांच्या दरम्यान आलेल्या मोठ्या बुंद्याच्या घनदाट जंगलात शेतीचा विस्तार करणे अशक्य होते. परंतु या काळात लागलेल्या लोखंडाच्या शोधामुळे जमिनीचे क्षेत्र वाढविणे शक्य झाले. गंगा - यमुनेच्या नद्यांच्या दोवाबात जंगलांना सर्वप्रथम आग लावून नंतर लोखंडाचं कुऱ्हाडीचा साहाय्याने घनदाट जंगल तोडणे व लोखंडाच्या  नांगराचा फाळ बनवून त्या काळातील काळी कसदार जमीन नांगरणे सहज शक्य झाले. या लोखंडाच्या वापरामुळेच मानवी जीवनात स्थेर्यीकरणाला सुरवात झाली.

उत्तर वैदिक काळात जमिनीचे क्षेत्र वाढू लागल्याने बहुसंख्य लोक हे शेती करू लागले. व शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे मानवी जीवन हे स्थिर व सुखकर होऊ लागले. या काळात जमिनीचे महत्व वाढू लागल्याने जमिनीच्या क्षेत्रवाढीसाठी युद्धे होऊ लागली. या संदर्भात महाभारतातील दुर्योधनाने जमिनीच्या मुद्या वरून घेतलेली कठोर भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. तो पांडवाना जमिनीचा तुकडा देण्यास तयार न झाल्याने संपूर्ण आर्यव्रतातील राजे महाभारत युद्धात ओढली गेली. पुढील काळात आर्य व अनार्यांच्या राज्यांचा विस्तार हा सप्तसिंधू प्रदेशातून गंगा - यमुना नद्यांच्या दोवाबात व नंतर बंगाल पर्यंत झालेला दिसून येतो, या साम्राज्य  विस्तारामध्ये लोहक्रांतीची भूमिका ही महत्वाची ठरते. उत्खननांमधून हस्तिनापूर, आलमगीरपूर, नोह, अंतरंजीखेडा, बटेसर इ. ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोखंडाच्या वस्तू सापडल्या आहे. या लोखंडाच्या वस्तूंमध्ये शेती - औजारांपेक्षा युद्धासाठी व शिकारीसाठी लागणाऱ्या शस्त्रांची संख्या जास्त आहे. या संदर्भात रामशरण शर्मा लिहतात, " लोखंडाचा उपयोग सुरवातीला शस्त्रांच्या निर्मितीसाठी केलेला दिसतो व नंतर तो शेती व इतर आर्थिक हालचालींसाठी झाला असावा " (कदम सतीश, प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, पृ. क्र. १०२ ) परंतु साहीत्यिक व पुरातत्वीय साधनांच्या आधारे असे आढळते की, लोखंडाच्या धातुक्रांतीने शेतीविस्तार, राज्यविस्तार व इतर हालचालीने विकास एकाच काळात कमी - अधिक प्रमाणात वेगवेगळ्या राज्यात झालेला दिसतो.

उत्तर वैदिक काळातील मानवी जीवन हे कृषिप्रधान अर्थव्यवस्थेकडे मोठया प्रमाणावर झुकलेले दिसते. या काळातील शतपथ ब्राह्मण ग्रंथामधून चार ते चोवीस बैलांद्वारे ओढल्या जाणाऱ्या नांगराचा उल्लेख आढळतो. तसेच पीक लावणी, कापणी, मळणी इ. शेती व्यवसायांसाठी संबंधित कामांचे उल्लेख शतपथ ग्रंथात आहेत. त्यामुळे या काळातील

लोक वस्ती करून जीवन जगू लागले व कालांतराने प्रत्येक कार्याची विभागणी वर्ण व्यवस्थेमध्ये होऊन टोळी समूह जीवनाचा ह्रास झाला. लोहक्रांतीमुळे शेतीतून अतिरिक्त उत्पन्न मिळू लागले व त्यातून स्थिर ग्रामीण जीवनाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा:**

१. शेतीचे स्थिरीकरण ही संकल्पना स्पष्ट करा.

## १३.७ नागरीकरण

प्राचीन भारतात नगरांचा किंवा शहरांचा झालेला उदय व विकास या प्रक्रियेला 'नागरीकरण' किंवा 'शहरीकरण' असे संबोधले गेले. भारतातील प्राचीन नगरांचा अभ्यास केल्यावर असे आढळते की, भारतात सर्वप्रथम नगरांचा उदय हा हडप्पा संस्कृती मध्ये झाला. उत्खननांत या संस्कृतीमधील अनेक शहरे ज्यात हडप्पा, मोहोंजोदडो, ढोलीवारा, कालिबंगा, लोथल इ. शहरांचे अस्तित्व आढळते. या संस्कृतीमधील शहरे ही जवळपास इ. स. पूर्व १८०० पर्यन्त भारतात अस्तित्वात होती. यानंतर पुन्हां इ. स. पूर्व सहाव्या शतकात गंगा नदीच्या प्रदेशांमध्ये भारतात शहरांचे अस्तित्व दिसतात. यालाच ' द्वितीय नागरीकरण किंवा 'शहरीकरण' म्हंटले गेले.

प्राचीन भारताच्या इतिहासात दुसरे नागरीकरण ही महत्वाची घटना मानली जाते. इ. स. पूर्व सहाव्या शतकात झालेले दुसरे नागरीकरण ही एकाकी घटना नव्हती, तर हडप्पा संस्कृतीच्या पतनानंतर वैदिक काळापर्यंत आर्थिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात झालेल्या बदलांचा तो एकत्रित परिणाम होता. आर.एस.शर्मा यांच्या मते, " भारतात शहरीकरणाची सुरवात ही इ. स. पूर्व ५००च्या पूर्वी झाली व इ. स. पूर्व २०० ते इ. स. ३०० पर्यंत शहरीकरणाची प्रक्रिया पूर्णपणे विकसित झाली " (शर्मा. आर.एस. , प्राचीन भारत का आर्थिक व सामाजिक इतिहास, पृ. क्र. १८५ ) इ. स. पूर्व सहाव्या शतकातील अनेक साहीत्यिक ग्रंथामध्ये विशाल, समृद्ध व आर्थिक दृष्टीने संपन्न शहरांचा उल्लेख आढळतो. पाली साहीत्यांमध्ये बुद्धकाळातील ६० मोठ्या शहरांचा उल्लेख आहे. ज्यामध्ये कोशंबी, श्रावस्ती, अयोध्या, कपिलवस्तू, वाराणसी, वैशाली, राजगृह, चंपा, तक्षशिला इ. मुख्य शहरे होती. पुरातात्विक अवशेषांवरून देखील शहरांच्या अस्तित्वाची पुष्टी होते.

munotes.in

**आपली प्रगती तपासा:**

१. नागरीकरण ही संकल्पना स्पष्ट करा .

## १३.८ नागरीकरणाचा अर्थ

' नगर ' हा शब्द ' नागर ' या शब्दापासून बनला आहे. शहरीकरण म्हणजे एक मोठी लोकसंख्या ती ज्या ठिकाणी निवास करते व त्या लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचा मुख्य स्रोत हा व्यापार व विविध उद्योगधंद्यावर अवलंबून असतो. शहरीकरणाची विशिष्ट वैशिष्ट्ये असतात, ज्यात पक्के रस्ते, विशाल व सुव्यवस्थित घरे, व्यापारी शिल्पकार, प्रशासकीय व्यवस्था, सैनिक, विविध दुकानें व दळणवळणाच्या सुविधा इ. आढळून येतात. उदय नारायण राय यांच्या मते, "शहरीकरण म्हणजे एक असा विशिष्ट प्रदेश जो आपल्या उदरनिर्वाहासाठी व्यापार व उद्योगधंदयान्वर अवलंबून असतो व जो अन्नधान्य हे खेड्यांमधून प्राप्त करतो." (राय उदय नारायण, प्राचीन भारत में नगर तथा नगर जीवन, पृ.क्र. ११ )

पाली साहीत्यांमध्ये शहरांसाठी 'नगर' किंवा 'निगम' या शब्दांचा उल्लेख आढळतो. निगम याचा शब्दश : अर्थ ' बाहेर जाण्याचे ठिकाण ' असा होतो जो व्यापारासाठी प्रयुक्त केला गेला. हा शब्द व्यापारातील समृद्धी दर्शवितो. जैन ग्रंथ आचारंगसूत्र व कल्पसूत्र मध्ये नगरांसाठी करमुक्त, मातीचे तटबंदी असलेले, छोटी तटबंदी असलेले, समुद्रकिनाऱ्यावर वसलेले इ. उल्लेख आढळतो.

**आपली प्रगती तपासा:**

१. नागरीकरण यावर टिप लिहा.

## १३.९ शहरीकरणाची व्याख्या

पूर्व मौर्यकाळातील आर्थिक जीवनाची प्रमुख विशेषता म्हणजे या काळात झालेले दुसरे नागरीकरण होय. या नागरीकरणाचा उदय व विकासाबाद्ल इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडली आहे. गार्डन चाईल्ड यांच्या मते, "शहरीकरणाच्या प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये विशाल भवन, तसेच दाट लोकसंख्या असलेल्या विशाल मानवी वस्त्या असणे आवश्यक आहे. अशा शहरांमध्ये गैर कृषी वर्ग ज्यात शासक वर्ग, शिल्पी, कलाकार वैज्ञानिक व लेखक इ. निवास करतात." गार्डन चाईल्ड यांनी शाहीरीकरणामध्ये गैर कृषक वर्गाची भूमिका ही महत्वाची मानली आहे. डॉ. आर.एस. शर्मा यांच्या मते, "नागरीकरणासाठी ग्रामीण अर्थव्यस्थेमधून अतिरिक्त उत्पादन निर्माण होणे आवश्यक आहे. तसेच तिथे विविध व्यावसायिकांचा उदय व विकास आणि नाण्यांचे विनिमयाचे साधन म्हणून प्रयोग असावा." डॉ. एन.एन. घोष यांनी, "ग्रामीण लोकसंख्या ही शहरांकडे स्थालांतरित होणे हे नागरीकरणाचे मुख्य कारणं सांगितले आहे." डॉ. एन.एन. घोष यांनी विविध शहरांचा अभ्यास करून हे स्पष्ट केले कि, विविध व्यवसायिक व व्यापारी जेथे राहतात ते नगर म्हणून विकसित होतात.

**आपली प्रगती तपासा:**

१. शहीकरणाच्या विविध व्याख्या सांगा.

## १३.१० नागरीकरणाच्या उदयाची कारणे

प्राचीन भारतात दुसरे नागरीकरण हे पूर्वमौर्य काळात घडून आले. ज्याचा सर्वसाधारण काळ हा इ.स. पूर्व ६०० ते ई.स ३०० मनाला जातो. प्राचीन भारतात शहरीकरणामुळे आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठा बदल घडून आला. भारतात दुसऱ्या नागरीकरणाच्या विकासामध्ये अनेक कारणे होती. ती पुढीलप्रमाणे

**१) लोखंडाचा वापर :**

इ.स. पूर्व सहाव्या शतकात शहरांच्या उदय व विकासामध्ये तत्कालीन समाजामध्ये लोखंडाचे असलेले ज्ञान ही एक महत्वाची घटना होती. वैदिक काळापासून आर्य संस्कृती मधील लोकांना लोखंडाचे ज्ञान होते. उत्तर वैदिक साहीत्यामध्ये लोखंडासाठी कृष्ण अयस् या शब्दाचा उल्लेख आढळतो. इ. स. पूर्व १००० च्या नंतर उत्तर आणि पूर्व भारतातील अनेक ठिकाणी उत्खननांत लोखंडाचे बनवलेले साहीत्य



munotes.in

आढळते. उदा. आलमगीरपूर, अंतरंजीखेडा, अहीच्छत्र, हस्तिनापूर, नोह, चिरंद, महीषदल इ. या काळातील लोखंडाची अनेक उपकरणे भारताच्या विविध भागात आढळली आहे, ज्यात लोखंडी नांगराचा फाळ, फावडा, कुदळ, खुरचनी, अनुकुचीदार भाले, कुऱ्हाडी, चाकू, छेनी इ. या काळात लोखंडी उपकरणांचा प्रयोग हा युद्धाच्या व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणावर जंगले साफ करण्यासाठी व ती जमीन शेतीयोग्य करण्यासाठी झाला. ज्यामुळे तेथील लोकसंख्याचा विस्तार होऊन शहरांचा विस्तार झाला. लोखंडाच्या वापरामुळे शेतीमधून अतिरिक्त उत्पादन घेणे शक्य झाल्याने शहरीकरणाचा विस्तार झाला.

इ. स. पूर्व १००० च्या दरम्यान भारतीय लोकांना लोखंडाला वितळून हत्यारे बनविण्याची कला अवगत झाली होती. डी. डी. कोसंबी व आर.एस.शर्मा यांनी देखील शहरीकरणाच्या विकासात लोखंडाचा व त्यादवारे निर्माण झालेल्या तंत्रज्ञानाच्या वापराचे महत्व अधोरेखित केले.

**२) अतिरिक्त उत्पादन :**

लोहक्रांतीचा प्रत्यक्ष परिणाम हा तत्कालीन अर्थव्यवस्थेवर पडला. लोखंडाच्या उपकरणांचा प्रयोग हा शेतीत झाल्याने अतिरिक्त उत्पादनाच्या सोबत शेतीमध्ये विविध पिके घेतली जाऊ लागली. पाणिनीच्या अष्टध्यायी मध्ये नांगरासाठी ' हल ' या शब्दाचा वापर झाला आहे. तसेच वर्षातून दोन किंवा तीन पिके घेतली असे सांगताना विविध पिकांचे वर्गीकरण पाणिनींनी केले आहे. सुरवातीच्या बौद्ध ग्रंथामध्ये उत्कृष्ट, मध्यम व निकृष्ट अशी शेतीची वर्गवारी केली आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकात विविध पिकांचे ज्यात गहु, ज्वारी, कापूस, ऊस यांचं पीक होत असल्याचा उल्लेख आढळतो. शेतीतील अतिरिक्त उत्पादनामुळे अर्थव्यवस्थेत अनेक बदल घडून आले.

या काळात घडलेल्या लोहक्रांतीमुळे शेतीचा विस्तार हा गंगा नदीच्या परिसरामध्ये झाला. या प्रदेशात लोखंडापासून बनविलेल्या नांगराच्या फाळाने जमीन नांगरून ती सुपीक बनल्यामुळे शेतीतून अतिरिक्त उत्पादन मिळू लागले. शेतीशी संबंधित अनेक उद्योगांची निर्मिती या काळात झाली. शेतीतील अतिरिक्त उत्पादनाच्या आधारावर शहरांमध्ये अनेक उदयोगांची सुरवात होऊन त्याचा विकास झाला व शहरीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली.

**३) उद्योगधंद्यांचा विकास :**

शेतीमधून झालेले अतिरिक्त उत्पादन विकण्यासाठी बाजारपेठांची आवश्यक्यता होती. यामुळे खेडी ही मोठ्या बाजारपेठांत परिवर्तित झाली. व त्या ठिकाणी विविध व्यवसाय - उद्योगधंद्यांचा विकास होऊन तेथील लोकसंख्या वाढीस लागली. शेतीतील अतिरिक्त उत्पादनामुळे उद्योगधंदे वाढीस लागले. जातक ग्रंथामध्ये १८ प्रकारच्या उद्योगांचा उल्लेख आढळतो. ज्यामध्ये लोहार, सुतार, कुंभार, चित्रकार इ. प्रमुख उद्योगधंदे होते. या व्यतिरिक्त काही असे व्यवसाय विकसित झाले जे दुसऱ्यांची सेवा करून आपली उपजीविका चालवत. उदा. नाव्ही, धोबी, कपडे शिवणारे (टेलर) इ. या व्यतिरिक्त इतर व्यवसायिकांनी जेथे ते आपला माल विकत होते तीच जागा मोठी खेडी किंवा शहरात परिवर्तित झाली. कारण त्यांच्या द्वारे निर्माण केलेला माल हा तिथेच विकला जाई. या व्यवसायीकांनी आपल्या व्यवसायामध्ये विशेषता प्राप्त केली. हे व्यवसायी कच्च्या मालाच्या

उप्लब्धतेजवळ आणि व्यापारी मार्ग व बाजारपेठांशी संलग्न होती. त्यामुळे अशा प्रकारची केंद्रे ही शहरांमध्ये परिवर्तित झाली.

**४) व्यापार - व्यवसायातील वाढ :**

इ. स. पूर्व सहाव्या शतकात गंगा नदीच्या प्रदेशात झालेल्या शहरीकरणामुळे समृद्धशाली व्यापारी वर्गाचा जन्म झाला. साहीत्यिक व पुरातात्विक साधनांच्या आधारे या काळातील विकसित अंतर्गत व बाह्य व्यापाराची माहीती मिळते. या काळातील व्यापारी आपला माल गाड्यांवर टाकून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संघटित स्वरूपात आपला व्यापार करीत. ज्याला ' सार्थ ' म्हटले जात. या सार्थ मधील व्यापाऱ्यांचा एक प्रमुख असे ज्याला ' सार्थवाहक ' किंवा ' जेठ्ठक ' म्हटले जात. व्यापाराच्या दरम्यान त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांची जबाबदारी ही सार्थवाहकावर असे. जातक ग्रंथामध्ये ५०० - १००० गाड्यांमध्ये माल घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्यांचा उल्लेख आढळतो. बौद्ध व जैनधर्माने अप्रत्यक्षरीत्या व्यापार व व्यवसायाला प्रोत्साहन आणि संरक्षण दिल्याने व्यापाराचा विकास झाला. व्यापाराच्या विकासामुळे विविध व्यापारी मार्ग विकसित झाले. ज्यामुळे शहरीकरणला गती मिळाली.

**५) नाण्याचें प्रचलन :**

इ. स. पूर्व सहाव्या शतकात व्यापार - व्यवसायाच्या वाढीमुळे भारतात नाण्यांचा वापर सुरु झाला. वैदिक साहीत्यामध्ये निष्क, शतमान इ. सारख्या शब्दांचा उल्लेख आढळतो. परंतु त्यांच्या वापराबद्दल संधिग्धता आहे. इ. स. पूर्व सहाव्या शतकाच्या अगोदर भारतात नाण्यांचे प्रचलन होत याचा कोठलाही पुरावा आढळत नाही. इ. स. पूर्व सहाव्या शतकात विविध व्यापारी श्रेणींनी आहत नाणी (Punch Marked Coine) चलनात आणल्या होत्या. पाली बौद्ध ग्रंथामध्ये सोने, चांदी व तांब्याच्या नाण्यांचा उल्लेख आढळतो. सोन्यांच्या नाण्यांसाठी निष्क, सुवर्ण किंवा स्वर्ण, मासक व हीरण्य शब्दांचा उल्लेख आहे. परंतु ही सोन्याची नाणी चलनात होती याचा कुठलाही पुरावा आढळत नाही. कार्षापण (आहत नाणी) ही चांदी व तांबा दोघांची बनत. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात फक्त चांदिचीच नाणी असत.

या काळात नाण्यांचा वापर होऊ लागल्याने वस्तूंच्या देवाण - घेवनाची पद्धत (Barter System) बंद पडली व नाण्यांवर आधारित एक नवीन मौद्रिक अर्थव्यवस्था विकसित झाली. ज्यामुळे व्यापार - व्यवसायामध्ये वाढ झाली ज्याचा प्रत्यक्ष परिणाम हा शहरीकरणावर झाला.

**६) राजकीय कारण :**

इ. स. पूर्व सहाव्या शतकात झालेल्या शहीकरणाच्या विकासाचा प्रभाव हा तत्कालीन राजकीय व्यवस्थेवर देखील पडला. महाजनपदांच्या उदया बरोबर अनेक शहरे ही प्रमुख सत्ता केंद्रे म्हणून विकसित झाली. उदा. राजगृह, पाटलीपुत्र, वाराणसी, श्रावस्ती, तक्षशिला इ. ही सर्व शहरे भौगोलिक व व्यापारी दृष्टिकोनातून विकसित झाली. या शहरांमध्ये राजाच्या व्यतिरिक्त त्याचा प्रशासकीय वर्ग, सैनिक, व्यवसायिक, कारागीर व

व्यापारी देखील निवास करू लागले. अशा प्रकारे अनेक शहरे ही राजकीय सत्ता केंद्राच्या व्यतिरिक्त उद्योग, व्यापार, शिक्षण, धार्मिक केंद्रामध्ये परिवर्तित झाली.

महाजनपदांच्या उदयांमुळे राज्यविस्ताराच्या धोरणामुळे या काळात अनेक युद्धे झाली. युद्धांमुळे नवीन शहरे विकसित होण्यामध्ये मदत झाली. कारण आपल्या साम्राज्याच्या सुरक्षितेसाठी सीमावर्ती भागात चारही बाजुंनी तटबंदी व किल्ले बांधले गेले. जेथे मोठ्या प्रमाणावर सैनिक, अधिकारी व राजांसाठी घरे बांधण्यात आली. अशा ठिकाण्याला 'स्कंधावर' म्हटले गेले. जे पुढे शहरांमध्ये विकसित झाली. काही वेळेस राजांच्या व्यक्तिगत प्रयन्तांमुळे देखील शहरे ही विकसित झाली. उदा. सिकंदर याने दोन नवीन शहरे बांधली. एक नगर विकेय तर दुसरे झेलम नदीच्या किनारी आपल्या प्रिय घोड्याच्या नावाने बुकफेला. सम्राट अशोक याने श्रीनगर तर कुशाण राजा कनिष्क याने कनिष्कपूर व हुविष्क याने हुविष्कपूर ही शहरे वसवली.

**७) नवीन धर्मांचा उदय :**

वैदिक काळातील ब्राह्मणी धर्म हा ग्रामीण जीवनप्रणालीचा समर्थक होता. तर इ. स. पूर्व सहाव्या शतकात उदयास आलेल्या जैन व बौद्ध धर्माचा दृष्टिकोन हा शहरी जीवनाच्या प्रति उदार होता. या दोन्ही धर्मांचा उदय हा तत्कालीन ब्राह्मण धर्माच्या विरुद्ध एक प्रतिकिया होती. या दोन्ही धर्मानी पशूंची सुरक्षा जी नवीन अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक होती त्याचे समर्थन केले. जैन व बौद्ध या दोन्ही धर्मानी व्यक्तिगत संपत्ती, व्याज घेणे व व्याज देणे तसेच गणिकांच्या (वैश्यांच्या) प्रति उदार दृष्टिकोन ठेवून ब्राह्माणी धर्माच्या विरुद्ध व धर्मसूत्रांच्या विरुद्ध मत मांडले. आपस्तंभ धर्मसूत्र व बौधायन यांनी शहरी जीवनाला विरोध केला होता, तर व्याजाने पैसे घेणे जे व्यापाराच्या विकासाठी आवश्यक होते याला त्यांनी निषिद्ध मानले. त्यामुळे विविध व्यवसायिक व समाजातील निन्म वर्ग यांनी नवीन धर्माचे समर्थन केले. दोन्ही समाजाच्या प्रवर्तकांनी आपल्या धर्ममतांचा प्रसार हा नगरांमध्ये केल्याने शहरांचा विकास झाला.

munotes.in

**८) शिक्षण केंद्राचा उदय :**

शिक्षणाच्या प्रसारामुळे प्राचीन काळात अनेक शिक्षण केंद्र निर्माण झाली, जी पुढील काळात शहरांमध्ये विकसित झाली. बौद्ध, जैन व ब्राह्मण धर्मग्रंथा मध्ये त्या काळातील प्रमुख शैक्षणिक केंद्राची माहीती भेटते. ज्यामध्ये तक्षशिला, वाराणसी, व उज्जेन हे तेथिल शिक्षण पद्धतीमुळे शहरांमध्ये रूपांतरित झाली. पाटलीपुत्रचा निवासी जीवक याने तक्षशिला विद्यापीठातून अध्ययन केले. जो पुढे आयुर्वेदाचा महान वैद्य झाला. कोशलचा राजा प्रसेनजीत, सम्राट चंद्रगुप्त मौर्य, कौटिल्य, पाणिनी व पतंजली इ. येथूनच शिक्षण घेतले. शिक्षणाच्या ह्या केंद्रांनी तत्कालीन समाजातील नवयुवकांना सैन्यातील, राज्याच्या प्रशासनातील नोकरीसाठी आकर्षित केले. व कालांतराने ही ठिकाणे शहरांमध्ये परिवर्तित झाली.

**आपली प्रगती तपासा:**

१. नागरीकरणाच्या उदयाची कारणे सांगा.

## १३.११ सारांश

इ. स. पूर्व सहाव्या शतकात जे दुसरे शहरीकरण झाले त्यासाठी आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक इ. सारखे अनेक कारणे कारणीभूत होती. शहरीकरणाचा सिद्धांत सर्वप्रथम गार्डन चाईल्ड यांनी मांडला. त्यांच्या मते " या काळात शेतीमधील नवीन तंत्रज्ञानाचा वापर व शेतीमधील अतिरिक्त उत्पादन हे शहरीकरांच्या विकासात महत्वाचे ठरले. (चाईल्ड गार्डन, द अर्बन रेव्होल्यूशन, पृ. क्र. १२-१७) आर.एस. शर्मा व डी. डी. कोशंबी हे शहरीकरणाच्या विकासासाठी आर्थिक कारण महत्वाचे मानतात. भारतात शहरीकरणाची सुरवात ही इ. स. पूर्व सहाव्या शतकात सुरु झाली. मौर्य, मौर्यत्तर काळ व कुशाण काळात शहरांची संख्या ही वाढतच गेली. परंतु गुप्त व गुप्ततेर काळात परकीय व्यापारातील ऱ्हास व नाण्यांवर आधारित अर्थव्यवस्थेचे पतन यामुळे शहरीकरणांचा ऱ्हास झाला.

## १३.१२ स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१) भारतातील लोखंडाचे प्राचीनत्व स्पष्ट करून त्याचे साहीत्यिक व पुरातात्विक साधनांचा आढावा घ्या.

२) लोहतंत्रज्ञान व शेतीचे स्थेर्यीकरणाचा आढावा घ्या .

३) नागरीकरणाची व्याख्या स्पष्ट करून द्वितीय नागरीकरणाचा आढावा घ्या.

४) नागरीकरणाच्या उदयाची विविध कारणे सांगा.

munotes.in

## १३.१३ संदर्भ - ग्रंथ


१) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती ( प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत ), विद्या बुक प्रकाशन , औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४.

२) डॉ. पाण्डेय वी. के. , - प्राचीन भारतीय कला, वास्तू एंव पुरात्तव, शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद, २०११

३) श्रीवास्तव के.सि. - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, युनायटेड बुक डेपो, इलाहाबाद , ग्यारावी आवृत्ती २००९.

४) कदम सतीश, डॉ. सोनावणे गौतम, - प्राचीन काळातील भारतीय मानवाचा विकास, न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी, प्रथम आवृत्ती, २०१७

५) प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत - प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, चौथा संस्करण, २०१७

६) Thapar Romila, The Penguin histoy of Erly India : From the origins to AD 1300, Penguin Publication, First Edition, 2003


❖❖❖❖

munotes.in

# १४

## श्रेणी संघ

**घटक रचना**

१४.० उद्दिष्टे
१४.१ प्रस्तावना
१४.२ श्रेणी किंवा वृत्तिसंघ (Guilds)
१४.३ प्राचीन भारतात श्रेणी संघटनांचा उदय व विकास
१४.४ श्रेणी संघटनाचे स्वरूप
१४.५ श्रेणींचे नियम व कायदे
१४.६ श्रेणीसंघाच्या उत्पनाची साधने
१४.७ श्रेणींचे कार्य
१४.८ सारांश
१४.९ स्वाध्यायावर आधारित प्रश्न
१४.१० संदर्भ ग्रंथ

### १४.० उद्दिष्टे

- प्राचीन भारतातील व्यवसायिक संघटनांचा अभ्यास करणे.
- श्रेणी संघटनाचे स्वरूप नियम व कायद्यांचा अभ्यास करणे.
- श्रेणींच्या विविध कार्यांचा आढावा घेणे.
- प्राचीन भारतातील श्रेणींचे इतिहासातील महत्व अधोरेखित करणे.

### १४.१ प्रस्तावना

इ. स . पूर्व सहाव्या शतकात लोखंडाचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढल्याने उद्योग व व्यापाराचा विकास झाला. यामधून उद्योगधंदे व व्यापाराची उन्नती साधण्यासाठी भारतात औदयोगिक - व्यापारी संघटनांचा उदय झाला. या व्यापारी संघटनानां प्राचीन भारतात "वृत्तिसंघ" किंवा "श्रेणी" असे म्हटले गेले. श्रेणी  या शब्दाचा अर्थ " व्यापारी संघ " किंवा " निरनिराळ्या कारागिरांचा समूह " असा आहे. श्रेणींमध्ये सर्व कारागीर अथवा व्यापारी एकत्र येऊन सामूहीक रीतीने व्यापार - उदयोग करीत होते. या विविध संघटनांनी किंवा श्रेणींनी प्राचीन भारताच्या आर्थिक विकास व समृद्धीमध्ये महत्वाचे योगदान दिले. या श्रेणींची माहीती अनेक बौद्ध, जैन, व हिंदू धर्मग्रंथात तसेच शिलालेखात आढळते.

## १४.२ श्रेणी किंवा वृत्तिसंघ (Guilds)

प्राचीन भारतात अनेक व्यावसायिक, व्यापारी, व कारागीर हे इ. स. पूर्व ६ व्या शतकापासून ते इ. स. ७ व्या शतकापर्यंत विविध श्रेणींमध्ये संघटित होऊन व्यापारिक कार्य करतांना दिसतात. श्रेणी किंवा वृत्तिसंघ यांना इंग्रजीमध्ये गिल्ड (Guild) असे म्हटले जाते. 'गिल्ड' ही संज्ञा सर्व आधुनिक उत्तर युरोपियन भाषांमध्ये आढळते. 'गेल्ड', 'गेलात' या मूळ प्राचीन जर्मन शब्दापासून 'गिल्ड' हा शब्द बनला आहे, ज्याचा अर्थ 'मेहनताना देणे', 'अर्पण केलेली वस्तू' किंवा 'देऊ करण्याची कृती' असा आहे. गिल्ड या शब्दाचा मराठी पर्यायी किंवा प्रतिशब्द 'श्रेणी' असा होतो व त्याचा शब्दकोशीय अर्थ 'व्यापारी संघ', 'अधिकार युक्त', 'महाजन मंडळ', 'पेढी' असा आहे. प्राचीन भारतातील या श्रेणींना युरोपच्या गिल्ड सारखी संस्था म्हटले गेले परंतु श्रेणींचे स्वरूप व त्यांची कार्यपद्धती ही युरोपियन गिल्ड पेक्ष्या भिन्न स्वरूपाची होती, तसेच युरोपियन गिल्ड यांचा तेथील राजकारणात हस्तक्षेप आढळतो जो भारतीय श्रेणींचा नव्हता. या श्रेणी अश्या व्यवसायिक लोकांच्या, व्यापाराच्या, कारागिरांच्या संघटना होत्या ज्या कुठलाही सामाजिक, जातीय, धार्मिक भेदभाव न करता व्यापारातील विकासासाठी संघटित होऊन कार्य करीत असे. श्रेणींच्या विविध संघटनांमुळे व्यापारासाठी आवश्यक त्या उत्पादनाची वाढ झाली.

प्राचीन भारतात व्यापार व उद्योगधंद्यांच्या स्वतंत्र संघटना होत्या. स्थूलमानाने या व्यवसायिक संघटनानां 'श्रेणी', व्यापारी संघाना 'पुग', आणि नगरातील संघाना 'नगर निगम' म्हणतं. कौटिल्य, पाणिनी, महाभारत, बौद्धग्रंथ, बृहत संहीता, हरिवंश व मनुकात्यायन स्मृतीत विविध प्रकारच्या वृत्तिसंघाचे नावे आढळतात. त्यात पणी, पुग, श्रेणी, कुल, जाती, संघ, समुदाय, सार्थ, निगम, परिषद, क्षेत्रीय श्रेणी, आयुधजीविसंघ, शास्त्रोपजीवीन, श्रेणिबल, व सम्मुय समुत्थान या संघाचे उल्लेख आहेत. प्राचीन भारतात या व्यापारी संघटनांचे अनेक संघ निर्माण झालेले होते ज्याला साधारणतः चार भागांमध्ये विभागात येईल.

१) स्वतःच भांडवल गुंतवणूक करून स्थापन केलेले व्यापारी संघ.
२) सावकाराकडून कर्जाऊ रक्कम घेऊन कारागिरांनी स्थापन केलेले संघ.
३) कनिष्ठ वर्गीय शिल्पी व्यावसायिकांचे संघ.
४) विविध ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांनी स्थापन केलेले संघ.

या व्यतिरिक्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वस्तू पुरवठा करणाऱ्या सार्थवाहकांचे संघ होते. उदा. विजयसेनच्या शिलालेखात वीरेंद्र येथील शूलपाणीच्या शिल्पीसंघाचा उल्लेख. (पी. जोशी, प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. ३१२)

**आपली प्रगती तपासा :**

१. ' श्रेणी ' म्हणजे काय ते सांगा.

## १४.३ प्राचीन भारतात श्रेणी संघटनांचा उदय व विकास

प्राचीन भारतात श्रेणी किंवा व्यापारी संघटनांचा उदय हा ऋग्वेदिक काळापासून मानला जातो. ऋग्वेद मध्ये श्रेणींसाठी "या हंसा सारख्या समूहामध्ये कार्य करत" असे म्हटले आहे. (ऋग्वेद १.१६३.१०, हंसा इस श्रेयीशोयतंते) ऋग्वेदमध्ये पणी नावाच्या व्यापाऱ्याचा उल्लेख आढळतो, जे व्यापाराच्या सुरक्षेसाठी समूहामध्ये व्यापार करीत असत. या व्यतिरिक्त ' श्रेष्टी ' ' गण ' या सारख्या शब्दांचा उल्लेख वैदिक साहीत्यात आढळतो. जो क्रमश: ' श्रेणीचा प्रमुख ' किंवा ' नगर प्रमुख ' या अर्थाने वापरला जात असे. (के. सी. श्रीवास्तव, प्राचीन भारत का सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. ५२८) उत्तर वैदिक काळात व्यापार व उद्योगधंद्यांचे स्थानीयकरणं झाल्याने एक व्यवसाय किंवा उद्योग करणारे लोक हे एकाच प्रदेशात राहू लागले. ज्यामुळे या संघटनाचा विकास घडून आला. बौद्ध धर्मग्रंथात विविध श्रेणी संघटनांचा उल्लेख आढळतो. ज्यात जातक कथा १८, दीर्घनिकाय २४, महावस्तू ३६, व मिलिंदपन्हो मध्ये ७२ वृत्तिसंघाची संख्या दिली आहे. ज्यामध्ये मुख्य करून १८ प्रकारच्या संघटना होत्या त्यांची नावे पुढीलप्रमाणे :

१) वार्धकी - लाकडाचे काम करणारे सुतार, (जातक कथा )
२) सुवर्णकार - - सोने-चांदी व धातूंचे काम करणारे (जातक कथा)
३) दगडाचे काम करणारे
४) चर्मकार - चामड्याच्या वस्तूंचे काम करणारे (जातक कथा)
५) दंतकार
६) औद्यन्तरिक (नाशिक अभिलेख)
७) वंशकर - बुरुड
८) रत्नपारखी (जवाहीऱ्या)
९) कर्मकार (लोहार )
१०) कुलाल (कुंभार)
११) रंगारी
१२) चित्रकार
१३) शेतकरी
१४) नापित (नाव्ही)
१५) रजक (धोबी)
१६) निषाद (नावाडी)
१७) तंतुवाय (विणकर)
१८) सार्थ व्यापारी

बौद्ध साहीत्याप्रमाणे जैनसाहीत्यामध्ये देखील १८ प्रकारच्या श्रेणींची माहीती आढळते. उदा. भरत चक्रवर्ती याने चक्ररत्नाची पूजा करण्यासाठी १८ श्रेणी संघटनांना बोलविण्याचा उल्लेख आहे. (ओम प्रकाश प्रसाद/ प्रशांत गौरव, प्राचीन भारत का सामाजिक व आर्थिक इतिहास, पृ. क्र. २९४) मौर्य व मौर्यत्तर काळात श्रेणी ह्या प्रभावशाली व शक्तिशाली बनल्या होत्या. कौटिल्याचे अर्थशास्त्र व विविध स्मृतींमध्ये (मनुस्मृती, याज्ञवल्क स्मृती, विष्णू स्मृती) श्रेणींचा उल्लेख आढळतो. उदा. याज्ञवल्कस्मृती मध्ये, जर

munotes.in

श्रेणींमधील एखाद्या सदस्याने श्रेणीतील पैसे किंवा धन चोरले तर त्याचे सद्सत्व रद्द करून त्याला राज्यातून हद्दपार करण्यात येत असल्याचा उल्लेख आढळतो. गुप्तकाळात व्यापार व व्यवसाय वाढल्याने श्रेणींना विशेष स्वतंत्र्य अधिकार दिले गेले. कुमारगुप्त पहीला याच्या मंदसौर आलेखामध्ये रेशमी वस्त्र बनविणाऱ्या कारागिरांची श्रेणी व स्कंदगुप्त याच्या इंदौर येथील आलेखामध्ये तैलिक श्रेणी (तेल बनविणारे) यांचा उल्लेख आढळतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. ' श्रेणी ' संघटनांच्या विकासाचा आढावा घ्या.

## १४.४ श्रेणी संघटनाचे स्वरूप

एकाच व्यवसायातील कामगार, कारागीर, शिल्पी, व्यापारी व धनिक लोक नगरात किंवा इतरत्र एकत्र येऊन व्यवसाय किंवा व्यापारी संघटना स्थापित करीत. प्रभावशाली श्रेष्ठी, विशिष्ट स्थान व अनुवांशिक कारागीर सदस्य ह्या तीन बाबी संघटनेच्या स्थापनेसाठी आवश्यक होत्या. सर्व व्यापारी व व्यावसायिक विविध श्रेणी संघटनांचे सदस्य असत. प्रत्येक श्रेणी किंवा निगम यांचा एक प्रधान / अध्यक्ष असे ज्याला बौद्ध साहीत्यामध्ये पंमुख (प्रमुख) अथवा जेष्ठ (जेठक) म्हटले जात. प्रत्येक वृत्तिसंघ / श्रेणीचा एक मुख्य असे, ज्याला श्रेष्ठी, जेष्ठक, अध्यक्ष, माहसेठी, अनुसेठी, व जनपद सेठी म्हणत. ईशानदास, मातृदास, गोस्वामी, घोष, जिवन्त, शूलपाणी व अनाथ पिण्डक हे प्राचीन भारतातील प्रसिद्ध श्रेष्ठीन होते. श्रेणींमधील सदस्य हे आपल्यामधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करीत. सामान्यतः श्रीमंत व्यापारी, साहुकार, धनिक, उच्चकुलीन, तज्ज्ञशिल्पकार किंवा वयोवृद्ध व्यक्तीची श्रेष्ठी/जेष्ठक म्हणून नियुक्ती करीत. याज्ञवक्ल स्मृतीच्या (२.१८६.१९२) मते, श्रेणी अध्यक्षाला मदत करण्यासाठी दोन, तीन किंवा पाच अधिकाऱ्यांची कार्यकारी मंडळ असे. संघांच्या श्रेष्ठीना व कार्यकारी मंडळाच्या सभासदांना नगर सभा, महत्तर सभा, ग्राम सभा, धर्म संस्था, मंत्रिमंडळ व प्रशासनात महत्वाचे स्थान होते. या सर्व संस्थांचे त्यांना सभासदत्व मिळत असे. समाजात त्यांना विशिष्ट मान - सन्मान होता.

याज्ञवक्ल स्मृतीच्या मते, हा अधिकारी योग्य, ईमानदार, आत्मसंयमी, वेदांचे पूर्ण ज्ञान असणारा असावा. बृहस्पती स्मृतीच्या मते, (१७.११) प्रत्येक श्रेणी संघाची एक भव्य कार्यालय किंवा इमारत असे. ज्यामध्ये भांडगारिक, हीरण्यक (कोशाध्यक्ष ), नांव - कार्मिक (पर्यवेक्षक) व लेखक हा अधिकारी व कर्मचारी वर्ग संघाचा दैनंदिक कारभार चालवीत. प्रशासन, धोरणे, न्यायदान, नफा व उन्नती ह्या विषयांवर चर्चा करण्यासाठी कार्यालयात वेळोवेळी बैठका होत. श्रेष्ठी हा या सभांचा अध्यक्ष असे. या बैठकांमध्ये सभासदांचे वाद मिटवले जात व नवीन व्यक्तींना सभासदत्व दिले जाई. या सभांमध्ये सर्व निर्णय हा

बहुमताद्वारे घेतला जात व सर्व सभासदांना आपले मत मांडण्याचा अधिकार होता. श्रेणींमधील जुन्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यावर त्यांना श्रेणीं मधून मुक्त करणे व नवीन सदस्यांची नियुक्ती करणे हा निर्णय सभांमध्ये घेतला जात. संघाचा कारभार चालविणे, न्यायदान करणे, विधिनियम तयार करणे आणि सभासद व व्यवसायाच्या उन्नतीसाठी प्रयन्त करणे ही श्रेणीं संघाची प्रमुख कामे होती.

**आपली प्रगती तपासा :**

१. ' श्रेणी ' संघटनांचे स्वरूप स्पष्ट करा.

## १४.५ श्रेणींचे नियम व कायदे

प्रत्येक व्यापारी श्रेणी किंवा संघ यांचे वेगवेगळे नियम असत व प्रत्येक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे हे श्रेणींमधील प्रत्येक सदस्यास बंधनकारक असे. प्रत्येक श्रेणींचे स्वतंत्र कार्यालय, बोधचिन्ह, ध्वजपताका, देवता, न्यायालय व कार्यकारी मंडळ असे. संघाचे कार्यकारी मंडळ उत्पादन विक्री, किंमती, वेतन, नफा व सदस्यांचे वर्तन ह्या बाबींवर करडी नजर ठेवून असत. श्रेणी संघ नवीन सदस्यांना सभासदत्व देत. सदस्यत्व देतांना नवीन सभासदांची कसून चौकशी करीत आणि त्या सदस्यांची खात्री पटल्यावर त्यांना प्रवेश मिळत. सदस्यत्व देतांना काही बाबींचे कडक पालन केले जात. जसे सभासद हा प्रामाणिक, विश्वासू, सदवर्तनी व सहकारी वृत्तीचा असणे आवश्यक होते. कार्यकारी मंडळ संघाची सभा आयोजित करून प्रारंभी नवीन सभासदांच्या सभासदत्वाची चर्चा करून निर्णय घेत. नंतर त्यांच्या कडून विविध प्रकारची दिव्ये करवून घेतली जात. कागदपत्रावर प्रतिज्ञा लिहलेले शपथ दिव्य, नियमांचे पालन करावयाचे करारपत्र आणि विशिष्ट दैवताचे तीर्थ प्राशन केलेले कोशदिव्य ह्या सद्सत्वाच्या परीक्षा होत्या.

श्रेणी सघंटनेचे कठोर नियम व कायदे होते. राजादेखील त्यांच्या नियंमामध्ये सहसा हस्तक्षेप करीत नव्हता. फक्त श्रेष्ठींवर गंभीर आरोप झाल्यास किंवा संघाने दिलेल्या निर्ययाविरुद्ध एखाद्याने अपील केल्यास राजा संघाच्या कार्यात हस्तक्षेप करत. या उलट अर्थशात्र व स्मृतींमध्ये, राजाने संघाच्या पारंपरिक नियामांचा आदर करावा व त्यात ढवळाढवळ करू नये असे मत व्यक्त केलेले होते. श्रेणीच्या संघांचे नियम व तंट्यात दिलेले निर्णय सभासदांना बंधनकारक असली तरी अन्यायकारक निकालाविरुद्ध त्याला राजाकडे न्याय मागण्याची परवानगी होती. यामध्ये राजाचा निर्णय हा अंतिम असे. श्रेणी हे एक संघटन असल्याने आपल्या सदस्यांच्या हीतासाठी ते नेहमी तत्पर असत. व राजाने दिलेल्या काही निर्णयांविरुद्ध ते संघटित होऊन निर्णय बदलण्यासाठी विनंती करत. उदा. राजकुमार मल्लद्दीन याने राणी मल्लिकुमारी हीचे चित्र काढल्यामुळे त्या चित्रकाराला आपल्या राज्यामधून हद्दपार केले होते. तेव्हा चित्रकारांची श्रेणी राजकुमाराला भेटून हा

निर्यण बदल्यांसाठी विनंती केल्याची व राजकुमार मल्लद्दीन याने हा निर्णय वापस घेतल्याचा उल्लेख आढळतो. (प्रसाद ओमप्रकाश/ गौरव प्रशांत, प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, पृ.क्र. २९४)

श्रेणीच्या प्रत्येक सदस्यांना श्रेणींच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक होते. सदस्याने संघटनेच्या विधिनियमांचा भंग केल्यास किंवा संघविरोधी कारवाया केल्यास अशा सभासदांना शिक्षा करण्याचा अधिकार हा श्रेठींना होता. ही शिक्षा कधी कधी साधारण स्वरूपात तर गंभीर गुन्ह्यात सदस्यांच्या संपत्तीवर टाच आणणे किंवा सदस्यांना नगरातून हद्दपार केले जात. सामूहीक सहकार्य, परस्परांविषयी विश्वास व संघाच्या उन्नतीची तळमळ ही श्रेणीची पायाभूत तत्वे होती.

**आपली प्रगती तपासा :**

१. ' श्रेणी ' संघटनांच्या विविध नियमांचा आढावा घ्या.

## १४.६ श्रेणीसंघाच्या उत्पन्नाची साधने

श्रेणींच्या उत्पन्नाची विविध साधने होती. सदस्यांचे भाग भांडवल, श्रेष्ठीचे भांडवल, सभासदांकडून वसूल केलेला जुर्माना, संघटनेला प्राप्त झालेला नफा आणि राजाने दिलेले अनुदान ह्या मार्गांनी सघंटनेकडे संपत्ती जमा होत असे. संकट प्रसंगी राजाला व प्रजेला अर्थसहाय्य करणे, धार्मिक सोहळ्याला मदत करणे, जनकल्याणाची कामे पार पाडणे आणि कलेस प्रोत्साहन देणे व लेण्या, मंदिरे, विहार निर्मितीस साहाय्य करणे, सभासदांना संकटकाळी मदत करणे, संघटना आर्थिक अडचणीत असताना तिचे रक्षण करणे, सार्थवाह तांड्याना प्रवासात संरक्षण देणे आणि राजाला आणीबाणीच्या प्रसंगी (आक्रमण, दुष्काळ ) लष्करी व अर्थसाह्य करणे ह्या संघाच्या खर्चाच्या बाबी होत्या.

## १४.७ श्रेणींचे कार्य

प्राचीन भारतात अनेक व्यापारी संघाचा उदय व विकास झालेला आढळतो. श्रेणींचे मुख्य कार्य हे आपल्या उद्योग व व्यवसाय यांना संघटित करून त्यांचा विकास घडवून आणणे, हा जरी असला तरी श्रेणी संघटनांनी आर्थिक व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली. आपल्या उद्योग व व्यवसायाच्या व्यतिरिक्त श्रेणी संघटनांनी अनेक कार्य केले ते पुढीलप्रमाणे :

### १) धार्मिक कार्य

व्यापार व व्यवसायातील प्रगतीमुळे श्रेणी संघटना ह्या आर्थिक दृष्टीने समृद्ध होत्या. बौद्ध, जैन व अनेक हिंदू धर्मग्रंथामध्ये तसेच अनेक आलेखांमध्ये श्रेणी व

व्यापाऱ्यांनी व्यक्तिगत व संयुक्त रूपाने अनेक मंदिरे व देवी - देवतांची मूर्ती बनवल्याचे उल्लेख आढळतात. जुन्नर येथिक आलेखामध्ये धान्यांच्या व्यापाराने एक गुफा व कुण्ड दान दिल्याचा उल्लेख आढळतो. मंदसौर आलेखामध्ये रेशमी कापड बनविणाऱ्या संघाचा उल्लेख आहे, ज्यांनी ई. स. ४३६ मध्ये सूर्य मंदिर बांधल्याचा व काही काळानंतर त्या मंदिराचा भाग जीर्ण झाल्याने तो भाग पुन्हा बांधल्याचा उल्लेख आहे (इ. स. ४७२). सांची स्तूप येथील शिलालेलखात महाजन व शिल्पकारांनी ई.स. पूर्व तिसरे शतक ते पहील्या शतकापर्यन्त अनेक प्रकारच्या भेटवस्तू दिल्याचे उल्लेख आढळतो. इ. स. ८७७ मधील ग्वाल्हेर येथील आलेखात मंदिरासाठी तैलिक श्रेणींनी व माळा बनविणाऱ्या श्रेणीने मंदिरासाठी तेल व फुलांच्या माळा मंदिराला दान देण्याचा उल्लेख आहे. अनेक आलेखांमध्ये श्रेणींद्वारा विविध धार्मिक संस्थाना रोख स्वरूपात तर कधी विविध भेट वस्तूंच्या स्वरूपात दान दिल्याचा उल्लेख आढळतो. अजिंठ्याच्या लेण्यात अनेक दानशूरांची व संघाची नावे आढळतात. असंख्य आलेखात संघ व श्रेष्टींच्या धर्माचे पुरावे मिळतात.

**२) आर्थिक कार्य :**

प्राचीन भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात श्रेणींची भूमिका ही महत्वाची होती. श्रेणी संघटना ह्या देशातील व्यापार - व्यवसाय व उद्योगधंद्यांचे संचालन करीत. अंतर्गत व बाह्य व्यापारावर त्यांचेच नियंत्रण असे. वस्तूंच्या किमती निर्धारित करणे व त्यांच्या खरेदी - विक्रीवर वर नियंत्रण प्रस्तापित करीत. श्रेणींमधील अनेक व्यापारी हे श्रीमंत असत. उदा. श्रावस्तीमधील अनाथपिंडक व कोशंबीचा घोषित हा शेट्टी हे करोडपती होते.

प्राचीन भारतात या श्रेणी ह्या स्वतःची नाणी काढत. प्राचीन काळी नाणी बनविणे व ती नाणी चलनात आणणे हे राज्याच्या अधिकारात नसे. या काळात अनेक आहतनाणी (Punch Marked Coine) या विविध श्रेणी संघटनांनी चलनात आणल्या होत्या. तक्षशिला येथे झालेल्या उत्खनात इ.स. पूर्व तिसऱ्या शतकातील काही नाणी आढळल्या आहे. ज्यावर " नैगम " अशी माहीती आहे.

**३) लोक - कल्याणाची कामे :**

प्राचीन काळी श्रेणींनी अनेक जन- कल्याणाची कार्य केली. बृहस्पतीच्या मते, "श्रेणी अनेक लोकउपयोगी कार्य करीत असत" श्रेणी संघटनांनी असंख्य पाणपोया, अन्नछत्रे, रुग्णालये, धर्मशाळा, अनाथाश्रम, तलाव, रस्ते व उपवनाची ठिकठिकाणी निर्मिती केली. स्थापत्य, शिल्प, मूर्तिशिल्प, अलंकरण व विविध कलांच्या विकासात श्रेणींची भूमिका ही महत्वाची होती. अनेक कलावंत, कारागीर, शिल्पकार, साहीत्यिक, शास्त्रकार व विद्वान ब्राह्मणांना आश्रय देऊन दानधर्म करून संघानी त्यांचा यथोचित सन्मान केला. मंदसौर आलेखात अन्न विक्रेते श्रेणींद्वारा पाण्याचा हौदचे निर्माण केल्याचा उल्लेख आढळतो.

**४) सैनिकी कार्य :**

आर्थिक दृष्टिकोनातून श्रेणी ह्या समृद्ध व शक्तीशाली बनल्यानंतर श्रेणी संघटनांनी सैन्य ठेवण्याची देखील अनुमती देण्यात आली. अर्थशास्त्रात 'श्रेणीबळ' चा उल्लेख हा त्यांच्या सैनिकी शक्तीची साक्ष देतो. कौटिल्य यांनी कंबोज व सौराष्ट्र प्रदेशातील क्षत्रिय

श्रेणींची चर्चा केली जी शेती, व्यापार व युद्धांच्या मार्फत आपली उपजीविका चालवीत असे. रामायण व महाभारतांमध्ये देखील श्रेणीबळ म्हणजेच श्रेणीद्वारे सैनिक ठेवल्याचे उल्लेख आढळतात. मंदसौर आलेखामध्ये देखील श्रेणीद्वारे सैनिक ठेवल्याचे स्पष्ट उल्लेख आहे ज्यामध्ये विणकरांची श्रेणीतील सदस्य हे धनुर्विद्यामध्ये पारंगत होऊन ते योग्य सैनिक झाल्याचा उल्लेख आहे, हे सैनिक रक्षणासाठी व गरज पडल्यास आक्रमांसाठी ठेवले जात.

**५) न्यायिक कार्य :**

श्रेणी संघटनांना न्याय निवाड्याचा अधिकार प्राप्त होता. नारद स्मृतीच्या मते, "न्याय देण्याच्या सामान्य प्रक्रियेत श्रेणींचे दुसरे स्थान होते" (नारद स्मृती १.७) या न्याय देणाऱ्या चार संस्था क्रमश: कुल, श्रेणी, गण, राजा ह्या होत्या. याव्यतिरिक्त बृहस्पती व याज्ञवल्क स्मृतींमध्येही श्रेणीद्वारे न्यायदानाच्या उल्लेख आढळतो. श्रेणींद्वार न्यायिक कार्य करण्याचे पुरावा हा दामोदर ताम्रपत्र मध्ये (इ.स.४३३ व इ.स.४३८) देखील आढळते. (मजुमदार आर.सि. - प्राचीन भारत का संघटित जीवन पृ. क्र. ६२) श्रेणीच्या संघाचे नियम कार्यकारी मंडळ तयार करीत व त्याचे पालन करणे सर्व सदस्यांना बांधनकारक होते. या श्रेणींची स्वतंत्र न्यायालय असत. ज्यामध्ये संघ व सभासदांतील तंटे, सभासदाचे आपापसातील तंटे, दोन संघामधील वादविवाद किंवा सभासदांचे कौटंबिक तंटे सोडविण्याचे कार्य श्रेणी पार पडत. गुप्त कालखंडात कुमारगुप्त पहीला याच्या काळात कुमारामात्य, वेजवर्मा, नगरश्रेष्टि, धृतपाल, सार्थवाह, बंधुमित्र, प्रथम कुलिक, धृतीमित्र, प्रथम कायस्थ, संभपाल यांच्या द्वारे न्यायिक कार्य केल्याचे उल्लेख आढळतो.

**६) बँकिंगचे कार्य :**

श्रेणी ह्या बँकेच्या देखील भूमिका पार पाडत असत. पैशाचे अनेक मोठे व्यवहार या संघटना करीत. विविध व्यक्तींकडून वस्तू व पैशाच्या रूपाने ठेवी घेणे (Deposite) आणि गरजू लोकांनां कर्ज देणे ही दोन कामे श्रेणी संघटन पार पाडत. श्रेणी ह्या ठेवीवर व्याज देत व व्याजाने कर्ज देत. कर्ज घेणाऱ्यांना तारण म्हणून वस्तू, पशु किंवा जमिनी संघाकडे ठेवाव्या लागत. तसेच प्रतिष्ठत लोक जमिनी देत. दुसऱ्या शतकातील एक अभिलेखानुसार, शक राजा नहपान याचा जावई उषावदत्त गोवर्धनच्या विणकर संघाकडून व्याजावर रकमा घेतल्याचा उल्लेख आहे. उषावदत्त याने २००० कार्षापण हे १२ % व्याजाने व १००० कार्षापण हे ९ % व्याजाने श्रेणी मध्ये जमा केले. व श्रेणी संघटनांनी या व्याजाच्या पैशावर बौद्ध भिक्षुंसाठी वस्त्र घेतल्याचा उल्लेख आहे. (प्रसाद ओमप्रकाश / गुर्राव प्रशांत, प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, पृ. क्र. ३००) तिसऱ्या शतकातील एक अभिलेख भेटला आहे ज्यात, नाशिकच्या एका श्रेणींनी पैसे जमवून संघराम मध्ये राहणाऱ्या भिक्षूंच्या आरोग्य व्यवस्तेवर खर्च केल्याचा उल्लेख आहे. (एपिग्राफिक इंडिका, भाग ८, पृ. क्र. ६२ -८६) एका ब्रह्माणाने सूर्यमंदिराच्या नंदादीपसाठी तिलापिक संघाकडे ठेवी ठेवलेली होती. तसेच एका विदेशी व्यक्तीने ब्राह्मण भोजनसाठी घेतलेल्या पैशाचा संदर्भ कुशाण आलेखात आढळतो. गुप्त राजांनी देखील विविध श्रेणी संघटनाकाकडून कर्जाऊ रक्कम घेतल्याचे पुरावे आलेखात मिळतात. उदा. द्वितीय चंद्रगुप्त्याने भिक्षागृह चालविण्यासाठी ठराविक रक्कम संघाकडे ठेवलेले होते.

कर्जाच्या रूपात अर्थसाहाय्य करणे व ठेवी स्वीकारून व्याज देणे ही सावकारी बँकिंग कार्य करीत असे.

**७) स्वतंत्र वैधानिक कार्य :**

श्रेणी ह्या आर्थिक दृष्ट्या संप्पन व समृद्ध झाल्याने समाजात त्यांचा प्रभाव व प्रतिष्ठा वाढली व समाजात त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले. त्यांनी आपल्या परंपरा व पद्धती नुसार आपले वेगळे नियम व कायदे बनवले. गौतम धर्मसूत्राच्या आधारे (११.२०), जर श्रेणींचे नियम हे धर्माच्या विरुद्ध नसतील तर ते मान्य असतील. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार, लेखाध्यक्षला नियमित पणे श्रेणींच्या नियमांना व प्रथांना आपल्या नोंद वहीत नोंदणी करावी. मनूच्या मते, राजाने श्रेणींच्या नियमांचा आदर करावा. तर नारद, याज्ञवल्क व अन्य स्मृतींच्या मते, राजाने श्रेणींच्या नियम लोकांवर लादले पाहीजे.

**८) प्रशासकीय कार्य :**

बसाड येथून भेटलेल्या नाण्यावरून श्रेणींच्या प्रशासकीय कार्याची माहीती मिळते. या नाण्यांवर काही लेख आढळतात ज्यात

१) श्रेणी सार्थवाह कुलिक निगम

२) श्रेणी कुलिक निगम

३) श्रेणी निगम

४) कुलिक निगम

या लेखांवरील निगम या शब्दाबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आढळतात. डॉ. भांडारकर हे ' निगम ' हा शब्द नगर या अर्थाने वापरतात. तर डॉ. मजुमदार यांनी देखील हा शब्द नगर अर्थाने वापरला. जर निगम हा शब्द नगर या अर्थाने घेतला तर हे सिद्ध होते की, श्रेणींद्वारें नगरांचे प्रशासन चालवले जात. तसेच दक्षिण भारतातदेखील अनेक पुरावे आढळतात, ज्यामध्ये मोठ्या व्यवसायिंकाद्वारे नगरांचे प्रशासन चालवले जात असल्याची माहीती मिळते. इ. स. ८७७ मधील ग्वाल्हेर मधून प्राप्त आलेखावरून, श्रेष्ठी किंवा सार्थवाहकाद्वारे एक मंडळ नगराचे शासन चालवले जात.

अशाप्रकारे श्रेणी ह्या राज्याच्या आर्थिक विकासाबरोबर सामाजिक, राजनैतिक व सांस्कृतिक विकासात महत्वाची भूमिका बजावीत.

**आपली प्रगती तपासा :**

१. ' श्रेणी ' संघटनांचे विविध कार्य सांगा.

## १४.८ सारांश

प्राचीन भारतात व्यापाऱ्यांच्या संघटित समूहाला " श्रेणी " व शिल्प समूह (Guild) म्हटले जात. प्राचीन भारतात वेगवेगळ्या व्यावसायिकांच्या विविध संघटना होत्या. ज्या



munotes.in

आपल्या व्यवसायाचं प्रतिनिधित्व करीत. या संघटना साठी कुल, संघ, पुग, निकाय, समुदाय इ. उल्लेख आढळतो. या संघटनेचे कार्य व्यवस्थित चालविण्यासाठी श्रेणींचे एक कार्यालय असे. जिथे विविध विषयांवर चर्चा होत. श्रेणी ह्या आर्थिक दृष्टीने समृद्ध व संपन्न असल्याने ते अनेक सामाजिक - धार्मिक कार्य पार पाडीत. तसेच समाजातील सांस्कृतिक व राजनैतिक क्षेत्रात देखील त्यांचे योगदान महत्वाचे होते. स्वतंत्र व संघटित व्यापारी संस्था या नात्याने श्रेणींनी प्राचीन भारताच्या आर्थिक जीवन समृद्ध करण्यात महत्वाची भूमिका बजावली.

## १४.१० स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१) प्राचीन भारतातील श्रेणी संघटनेचा उदय व विकासाचा आढावा घ्या.
२) श्रेणी संघटनांचे स्वरूप व उत्पादन साधनांचा आढावा घ्या.
३) श्रेणी संघटनांचे विविध कार्य सांगा .
४) प्राचीन भारतातील अर्थव्यवस्थेतील श्रेणी संघटनेचे महत्व स्पष्ट करा.

## १४.१० संदर्भ ग्रंथ


१) जोशी पी.जी. , प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नांदेड, २००३

२) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती (प्रारंभ ते इ.स. ६५० पर्यंत), विद्या बुक प्रकाशन , नांदेड, दुसरी आवृत्ती २०१४.

३) श्रीवास्तव के.सि. - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, युनायटेड बुक डेपो, इलाहाबाद , ग्यारावी आवृत्ती २००९.

४ ) प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत - प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, चौथा संस्करण, २०१७

५ ) Thapar Romila, The Penguin histoy of Erly India : From the origins to AD 1300, Penguin Publication, First Edition, 2003


❖❖❖❖

munotes.in

# १५

# रोमन व्यापार

**घटक रचना**

१५.० उद्दिष्टे
१५.१ प्रस्तावना
१५.२ प्राचीन रोमन साम्राज्य व भारत
१५.३ मौर्यत्तर काळातील रोम व्यापार
१५.४ दक्षिणेकडील राज्य व रोम व्यापार
१५.५ रोमन व्यापारातील वस्तू
१५.६ भारत - रोम व्यापारातील प्रमुख बंदरे
१५.७ रोमन व्यापाराचा प्रभाव
१५.८ रोमन व्यापाराचे पतन
१५.९ सारांश
१५.१० स्वाध्यायावर आधारित प्रश्न
१५.११ संदर्भ ग्रंथ

## १५.० उद्दिष्टे

- प्राचीन भारतातील रोम व्यापाराचा आढावा घेणे.
- रोमन व्यापारातील प्रमुख बंदराचा आढावा घेणे.
- रोमन व्यापाराचा प्रभाव व ऱ्हासाचा अभ्यास करणे.

## १५.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून भारतात ' वाणिज्य ' हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य घटक होता. अंतर्गत व विदेशी व्यापाराच्या माध्यमातून प्राचीन भारताची आर्थिक समृद्धी घडून आली. भारतात व्यापाराची सुरवात ही हडप्पा संस्कृतीपासून झाली पुढील काळात मौर्य, सातवाहन, कुशाण, चालुक्य, चोल, पल्लव, पांड्य व गुप्तकाळात देशाअंतर्गत व परकीय व्यापाराचा मोठा विकास घडून आला. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासूनच भारताचे मध्य आशिया, चीन, दक्षिण- पूर्व आशियाई देशांशी सांस्कृतिक संबंध प्रस्तापित झाले होते. यामध्ये भारताचा रोमन साम्राज्याशी असलेला व्यापार आर्थिक व व्यापारिक दृष्टिकोनातून महत्वाचा मनाला जातो.



munotes.in

भारत - रोम व्यापाराची माहीती ही बौद्ध ग्रंथ मिलिंदपन्हो, दिव्यावदान, महावस्तू, ललित विस्तार, अवदान शतक, सौदारानंद, जैन ग्रंथ अंग - विज्जा तसेच मनुस्मृती, विष्णुस्मृती, याज्ञवल्य स्मृती, संगम, साहीत्य, पेरिप्लस ऑफ दि एरियन सी, प्लिनी, जस्टिन व टॉलमी यांचे विवरण व परकीय/ विदेशी राजांचे शिलालेख, नाणी इ. आढळते.

## १५.२ प्राचीन रोमन साम्राज्य व भारत

प्राचीन काळापासूनच भारताचे पाश्चिमात्य देशांशी घनिष्ट व्यापारी संबंध होते. पण या पाश्चिमात्य देशांमध्ये रोमन साम्राज्याशी भारताचे व्यापारिक संबंध हे प्राचीन भारताच्या व्यापाराच्या दृष्टीने महत्वाचे ठरले. या व्यापारिक संबंधामध्ये ई.स.च्या पहील्या शतकापासून मोठी वाढ झाली. इ. स. च्या पहील्या शतकाच्या उत्तराधार्त रोमन साम्राज्यांच्या सीमांमध्ये वाढ होऊन हे साम्राज्य शक्तिशाली व समृद्ध बनले. या साम्राज्याच्या अंतर्गत सीरिया, ईराण व इजिप्त इ. देश आले. रोम मधील सम्राटांनी समुद्र मार्गांनी होणाऱ्या चाचेगिरीला आळा घालून समुद्री व्यापाराला प्रोत्साहन दिले.

भारत - रोम व्यापाराची सुरवात ही रोम सम्राट आगस्टसच्या काळात झाली. (इ. स. पूर्व ३१-१४) स्ट्रेबोच्या मते, " एका भारतीय राजाने आगस्टसच्या दरबारात एक शिष्टमंडळ पाठवले होते " (श्रीवास्तव के.सि., प्राचीन भारत का सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. ९०५) इतिहासकारांच्या मते हा राजा पोरस असावा. पुढे ट्रोजन, हैदरीयन, कॉन्स्टटाईन, ज्युलियस व जस्टिनियन या सम्राटांनाही भारतीय राजदूत भेटले असल्याचा उल्लेख आहे. पांड्य व चेर राज्याच्या सम्राटानेही आपले शिष्टमंडळ हे रोम साम्राज्यामध्ये पाठवले होते. पांड्य राजाच्या वकिलाने रोमच्या सम्राटासाठी बहुमूल्य मोती व हत्ती पाठवला होता. हे शिष्टमंडळ निश्चितच व्यापारी सवलती व रोमन व्यापाऱ्यांना भारतात व्यापार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पाठवले असावे. या राजकीय व व्यापारी संबंधाचा परिणाम होऊन रोमन व भारतीय व्यापारी परस्परांच्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर ये- जा करू लागले. भारतीय व्यापाऱ्यांची एक वसाहतच अलेक्सझेन्ड्रिया मध्ये होती. कौन्सिल सेव्हर्सकडे काही ब्राम्हण पंडित अलेक्सझेन्ड्रिया येथे कौन्सिलचे अथिति म्हणून राहील्याची माहीती आहे. इ. स. ४५ मध्ये ग्रीक खलाशी हीप्पलसने अरबी समुद्रावरील व्यापारी वाऱ्यांचा शोध लावल्याने तांबड्या समुद्रातून थेट भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोहचण्याचा सागरी मार्ग सुलभ झाला. त्यामुळे भारताचा रोमन साम्राज्याशी व्यापार वाढला.




भारत रोम व्यापारी मार्ग

( स्रोत :: https://en.wikipedia.org/wiki/Indo-Roman_trade_relations )

आपली प्रगती तपासा :

१) प्राचीन भारत - रोम साम्राज्याचे व्यापारिक संबंध स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १५.३ मौर्यत्तर काळातील रोम व्यापार

इ.स. पूर्व ३२१ ते इ.स.पूर्व १८५ या काळात संपूर्ण भारतीय उपखंडात मौर्यांची सत्ता होती. मौर्य साम्राज्याअंतर्गत एकतंत्री प्रशासन व्यवस्था व मौर्य शासकांनी निर्माण केलेल्या अनेक व्यापारी मार्गांनी त्या काळात व्यापाराला प्रोत्साहन मिळाले. मौर्यत्तर काळात भारतात शुंग, सातवाहन, इंडो- ग्रीक, शक, कुशाण, चेर, चोल व पांड्य इ. घराण्यांनी आपली सत्ता प्रस्तापित केली. इ. स. पूर्व १५० ते इ. स. १५०च्या दरम्यान सुमारे ३०० वर्षांच्या कालखंडात पश्चिमेत्तर भारतावर अभारतीय (इंडो- ग्रीक, कुशाण, शक, इ.) सत्तांचे अधिपत्त्य भारतीय व्यापाऱ्यांसाठी फायद्याचे ठरले कारण अभारतीय सत्ताधीशांच्या राज्यांच्या सीमा मध्यआशियायातील राज्यांशी जोडल्या गेल्या होत्या. त्यामुळे रोमन व्यापार हा अधिकच वृद्धिंगत झाला.

munotes.in

**१) सातवाहन काळातील रोमन व्यापार :**

सातवाहन काळातील रोमन व्यापाराची माहीती ही पेरिप्लस ऑफ दि एरियन सी, टॉलमीचा भूगोल व सातवाहन काळातील अभिलेख व नाण्यांच्या आधारे कळते. पेरिप्लस ऑफ दि एरियन सी या ग्रंथाच्या अज्ञान लेखकाने पश्चिमी भारतातील एक प्रमुख व्यापारी शहर म्हणून भडोचचा उल्लेख केला आहे. सातवाहन काळात रोमन व्यापाराचे प्रमुख शहर प्रतिष्ठान होते. टॉलमीने या काळातील प्रमुख व्यापारिक बंदरांचा उल्लेख केला आहे. ज्यात पूर्वी दक्खन मधील काण्टकोस्सीला, कोद्दूर, अल्लीसिंगे इ. तर पश्चिमी दख्खन मध्ये बेरीगाजा (भडोच), सोपारा व कल्याण इ. प्रसिद्ध बंदरे होती. हीप्पलस याच्या व्यापारी मार्गाच्या शोधामुळे या काळातील व्यापार हा वाढला. सातवाहनांच्या काही नाण्यांवर जहाजाचे चित्र आढळतात, जे या काळातील विकसित समुद्री व्यापाराचा पुरावा आहे.

सातवाहन राजा पूलवमीच्या काळात दक्षिण भारतातून रोमन व्यापाराला सुरवात झाली. जी यज्ञश्री सातकर्णीच्या काळात पूर्ण विकसित झाली. यज्ञश्री सातकर्णी कडे मोठे व्यापारी जहाज असल्याचा उल्लेख आढळतो. रोममधील रहीवाशी सातवाहन साम्राज्यामधून आपल्यासाठी रत्ने, मलमल व विलासी वस्तू मागवीत असत, त्याच्या मोहबदल्यात ते मोठ्या प्रमाणावर सोने - चांदी भारतातील व्यापाऱ्यांना देत. या काळात भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये रेशमी, मलमल, साखर, मसाल्याचे पदार्थ, हीरे, रत्न, मोती इ. वस्तू होत्या. तर आयात वस्तूंमध्ये रोमचे मद्य, तांबा, शिसे, औषधी , रत्न, मोती इ. वस्तू होत्या. हा व्यापार भारतीयांसाठी फारच फायदेशीर ठरला व सातवाहन साम्राज्यं या व्यापारातून आर्थिकदृष्ट्या संपन्न बनले.

**२) कुशाण काळातील रोमन व्यापार :**

भारतात आर्थिक दृष्टिकोनातून सर्वाधिक समृद्ध साम्राज्य म्हणून कुशाण साम्राज्याला ओळखले जाते. कुशाण सम्राट कनिष्काच्या काळात हे साम्राज्य एक आंतरराष्ट्रीय साम्राज्य बनले. या काळात भारताचे पश्चिम आशिया व मध्य आशियायी देशांशी घनिष्ट व्यापारिक संबंध प्रस्तापित झाले. मध्य आशियातील रेशम मार्ग (Silk Route) जो चीन मधून ईराण व पुढे पश्चिम आशियाकडे जात असे, या स्थलमार्गावर भारतीय व्यापाऱ्यांनी आपले नियंत्रण प्रस्तापित केले. कारण हा मार्ग कुशाण साम्रज्यामधून जात होता. या व्यापारी मार्गावर भारतीय व्यापारी मध्यस्थाचे (दलालीचे) काम करीत. कुशाण काळात या रेशम मार्गावर सम्राट कनिष्कच्या अधिपत्त्यामुळे भारतीय व्यापाऱ्यांनी व्यापाराबरोबर दलालीच्या माध्यमातून देखील मोठी संपत्ती मिळवली. याच काळात विशाल रोमन साम्राज्य उभे राहीले होते. परंतु मध्यआशियायी पर्शियन साम्राज्याशी रोमन साम्राज्याचा संघर्ष सुरु झाल्याने चीन सोबत व्यापारी संबंध टिकवून ठेवण्यासाठी त्यांना भारतीय व्यापाऱ्यांवरच अवलंबून राहावे लागत असे. या काळात भारतीय व्यापारी चीनमधून रेशम विकत घेऊन ते रोमच्या व्यापाऱ्यांना विकत व त्या बदल्यात मोठा नफा मिळवीत. या काळातील भारतीय व्यापार हा निर्यात जास्त व आयात कमी अशा स्वरूपाचा असल्याने हा व्यापार एकतर्फी व भारताच्या फायद्याचा होता. प्लिनीच्या मते, "रोमन साम्राज्याशी होणाऱ्या व्यापारातून भारतामध्ये रोमन साम्राज्यामधून दरवर्षी दहा करोड सेस्टर्स (Sesostress) येत होते." (श्रीवास्तव के.सि. प्राचीन भारत का सांस्कृतिक इतिहास, पृ. क्र. ३४९) भारतामधून येणाऱ्या या रोमन संम्पत्तीच्या ओघामुळे प्लिनीनें आपल्या लिखाणातून दुःख व्यक्त केले आहे.

पेरिप्लसच्या मते, भारतीय व्यापारी रोमन व्यापाऱ्यांकडून मद्य, तांबे, टिन, जस्त, पुखराज, सोने चांदी व विविध औषधीयुक्त वस्तूंची खरेदी करत. त्याबदल्यात रोमन व्यापाऱ्यांकडून सोने मिळवीत. रोममधील साहीत्यावरून कळते की, त्या काळातील रोमन तरुणींना भारतीय मोती व हीऱ्यांचे तर स्त्रियांना मलमलच्या साडीचे विशेष आकर्षण होते. सुरवातीच्या काळातील कुशाण - रोम व्यापार हा भूमार्गाने होत असे. इ.स. पहील्या शतकात हीपल्लस याने मान्सून वाऱ्यांचे रहस्य उलगडून दाखवल्याने पुढील काळात हा व्यापार समुद्र मार्गाने देखील होऊ लागला. मौर्य पूर्व काळ व मौर्यत्तर काळात शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेले तक्षशिला हे शहर कुशाण काळात वेगवेगळ्या भागातून येणाऱ्या मालाच्या साठवणुकीचे केंद्र बनले.

**आपली प्रगती तपासा :**

टिपा लिहा :

१) सातवाहन काळातील भारत - रोम व्यापार.

२) कुशाण काळातील भारत - रोम व्यापार.

## १५.४ दक्षिणेकडील राज्य व रोम व्यापार

संगम साहीत्य व भौतिक अवशेषांमधून दक्षिण भारतातील रोमन व्यापाराची माहीती आढळते. इ.स.च्या पहील्या शतकात दक्षिणेकडील तामिळनाडू तेथे चोल व पांड्य हे राज्य तर केरळ मध्ये चेरांची सत्ता होती. या तिन्ही साम्रज्यामध्ये एक विशाल नाविक दल होते, ज्यांनी समुद्री व्यापाराला प्रोत्साहन दिले. तामिळनाडू मधील अरिकमडू, कावेरीपट्टम, (तंजावर जिल्हा), नायमेड (किल्लोर जिल्हा), कोररक्के (तिरुनवेलही जिल्हा) उरेयूर, कांचीपुरम (चिंगलपूर जिल्हा) व केरळमधील मुजरीक नगर येथील उत्खननांमध्ये रोमन व्यापाऱ्यांचे कार्यालय व अन्नाचं भांडार सापडले आहे. कोकाई हे मोती शोधण्याचे मोठे बंदर होते. मुशिरी, बुहार, तोंडी इ. ठिकाणी पश्चिमेकडील व्यापाऱ्यांच्या अनेक वस्त्या आढळल्या आहे. भौतिक पुराव्याच्या आधारे कळते कि, मुशिरी बंदरात रोमन व्यापाराचे सोन्याने भरलेले जहाज येत व त्याच्या मोहबदल्यात ते भारतातून मसाल्याचे पदार्थ व समुद्रातील रत्न घेऊन जात.

रोमन व्यापाऱ्यांनी सर्वात अगोदर भारताच्या अति दक्षिणेकडील भागांमध्ये व्यापार करण्यास सुरवात केली. अतिदक्षिणीकडील अनेक भागांमध्ये रोमन सम्राट ऑगस्टस, निरो, टायबेरीस इ. ची सोन्याची नाणी तर कोरोमंडल समुद्रतटाच्या जवळील आरिकमेंडु या

ठिकाणी रोमन व्यापाऱ्यांची एक वसाहत (Roman Colony) आढळली आहे. उत्तर भारताच्या तुलनेने दक्षिण भारतातील रोमन व्यापार हा अधिक विकसित होता. कारण ज्या वस्तूंची मागणी रोमन साम्राज्यात जास्त होती त्याच वस्तू ह्या दक्षिणी राज्यांमध्ये बनवल्या जात. सर्वात जास्त फायदेशीर विदेशी व्यापार हा दक्षिण भारतातून समुद्रमार्गे चालणारा रोमन व्यापार होता.

**आपली प्रगती तपासा :**

१. दक्षिणीकडे रोम व्यापाराचा आढावा घ्या.

---

## १५.५ रोमन व्यापारातील वस्तू

भारत - रोमन साम्राज्यातील व्यापारात आयात कमी व निर्यात जास्त होती. भारतामधून निर्यात होणाऱ्या वस्तुंमध्ये मलमल, रेशम, हस्तिदंतावरील कलाकौसरीच्या वस्तू, मसाल्यांचे पदार्थ, सुगन्धित द्रव्ये, काच निर्माती, मणी - माणिक्य निर्मितीच्या वस्तू, शिप किंवा शिल्प, मातीच्या सुंदर मुर्त्या इ. वस्तू प्रमुख होत्या. भारतामधून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये मसाल्याचे पदार्थ व सुगन्धित द्रव्यांना विशेष महत्व होते. मसाल्यांच्या पदार्थांचा उपयोग हा जेवण रुचकर बनविण्यासाठी, औषधी बनविण्यासाठी तसेच अंत्यसंस्कारासाठी देखील होत असे. रोमन सम्राट निरो याने इ.स.६६ मध्ये पोप्पोईय्या ( Poppoea) यांच्या चितेमध्ये गरम मसाले व सुगन्धित द्रव्ये टाकले होते. या काळात मसाल्यांच्या पदार्थांची मागणी वाढल्याने भारतीय व्यापारी दक्षिण - पूर्वी आशियामधून ते विकत घेत व रोमन व्यापाऱ्यांना विकत असे. रोमन साम्राज्यं तसेच इतर पश्चिमी देशांमध्ये काळीमिरीची मागणी जस्त होती त्यामुळे या देशांना यवनप्रिय (यवन म्हणजे युनानी, रोमा व इतर पश्चिमी देशांतील लोकांची प्रिय असणारी) असे म्हटले. भारतातील सुती कपडे विशेषतः रेशम व मलमल यांना रोमन साम्राज्यात विशेष मागणी होती. एरियन याने भारतातील सुती कपड्यांची प्रशंसा केली. रोमन सम्राट भारतामधून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये रत्नांना विशेष महत्व देत. प्लिनीनें भारताला रत्न उत्पादक देश म्हटले आहे. भारतामधून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये हस्तिदंत निर्मित वस्तूंची देखील मागणी होती. रोमन सम्राट निरोच्या काळात ही मागणी अधिकच वाढली.

रोमन साम्राज्यातून भारतात आयात होणाऱ्या वस्तूंमध्ये रोमन मदिरा (मद्य), तांबे, टिन, जस्त, पोखराज, सोने, चांदीची नाणी व औषधी युक्त वस्तू येत. भारतातील राजपरिवारात व संपन्न - श्रीमंत लोकांमधून रोमच्या मद्याची विशेष मागणी होती. इटली

मधील सर्वकृष्ट मद्य हे बरबरिकाम, बेरीगाजा, नेलकिडा मुजरीस येथील बंदरात येत. अरिकमेडू येथील उत्खननांत अंफोरा (Amphora), अरिटाईन (Arretine), व रौलेटेड (Roulated) नावाची मातीची भांडी आढळली आहे, ज्याचा वापर हा मद्य ठेवण्यासाठी व मद्य पिण्यासाठी केलं जात असे. रोमन साम्राज्याशी असलेला व्यापार हा भारतीयांसाठी लाभदायक ठरला.

**आपली प्रगती तपासा :**

१. रोमन व्यापारातील विविध आयात - निर्यात वस्तूची माहिती द्या.

## १५.६ भारत - रोम व्यापारातील प्रमुख बंदरे

**१) शूपरिक ( सोपारा ) :**

सोपारा हे बंदर आधुनिक महाराष्ट्रातील ठाणे जिल्हात आहे. प्राचीन भारतातील हे एक प्रमुख व्यापारी बंदर होते. पेरिप्लस ने देखील सोपारा बंदराचा उल्लेख केला आहे. महावंशच्या आधारे ताम्रपर्णी (श्रीलंका) चा राजा प्रथम विजय याने सोपारा ताम्रपर्णी असा प्रवास केला होता. यावरून कळते की, सोपारा या बंदरातून पश्चिमी देशांबरोबरच श्रीलंके सोबत देखील व्यापार चालत असे.

टॉलेमीच्या लिखाणावरून कळते की, सोपारा बंदरातून परकीय देशांशी व्यापार हा सुरु होता परंतु ई.स. च्या पहील्या शतकात हीप्पीलसने व्यापारी मार्गाचा शोध लावल्याने तांबड्या समुद्रातून थेट भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापारी जहाज येऊ लागले. ज्यामुळे मुजरीस बंदराचे महत्व वाढले व सोपाऱ्यामधील विदेशी व्यापार कमी होऊन सोपाऱ्याचे महत्व कमी झाले. सातवाहन काळात सोपाऱ्यामधून घोड्याचा व्यापार होत असे. पेरिप्लसच्या मते, बेरीगाजाच्या नंतर सोपारा हे सर्वात महत्वाचे व्यापारी बंदर होते.

**२) भरूकच्छ :**

भरूकच्छ हे आज आधुनिक नर्मदा नदी वर आहे, जे भडोच या नावाने ओळखले जाते. एक प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून पेरिप्लसने भरूकच्छचा उल्लेख केला. उज्जेन व प्रतिष्ठान मधून येणारे अनेक व्यापारी मार्ग हे भरूकच्छ राज्याशी जोडले गेल्याने हे एक प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून विकसित झाले. पेरिप्लसच्या ग्रंथामधून कळते की, बाहेरील देशांमधून या बंदरा मध्ये मद्य, शिशा,स्वर्ण व चांदीची नाणी येत. तर या बंदरामधून बाहेर जाणाऱ्या वस्तूंमध्ये हस्तिदंताच्या वस्तू, रेशमी व सुती वस्त्र / मलमल, मिरची इ. वस्तू

होत्या.सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान वरून भरूकच्छ ला एक विशेष मार्ग जात असे. हा व्यापारी मार्ग भरूकच्छ वरून नगर, पैठण (प्रतिष्ठान) व दौलताबाद व मारकिंडला जात असे. सातवाहनांच्या काळात हा एक विशेष मार्ग होता जो संभवत कल्याणला संपत असेल. प्लिनीच्या मते, भरूकच्छ या बंदरातून भारतीय व्यापारी रोम मध्ये अनेक विलासी वस्तू पाठवत. भरूकच्छ या बंदरातील व्यापारामुळे सातवाहन साम्राज्याला प्रतिवर्ष एक करोड रुपयाचा नफा मिळत असे.

**३) कल्याण :**

सातवाहन साम्राज्याच्या पश्चिमेला असलेले कल्याण हे एक प्रमुख व्यापारी बंदर होते. सातवाहनांच्या काळात त्यांच्या अंतर्गत व्यापाराचे हे एक प्रमुख केंद्र होते. सातवाहन साम्राज्याचा विविध भागातून येथे माल आणला जात असे व तो पुढे हैद्राबाद वरून दौलताबादला पाठवला जात. पेरिप्लसच्या मते, दक्षिणापथ मधील हे एक प्रमुख व्यापारी नगर होते, त्याने जेव्हा या नगराला भेट दिली तेव्हा या शहरामध्ये विदेशी व्यापारावर बंदी होती. कान्हेरी व जुन्नर येथील गुहालेखांवरून या शहराचे व्यापारिक महत्व कळते.

पेरिप्लसच्या भेटीच्या दरम्यान कल्याणला विदेशी व्यापारावर बंदी होती, कारण त्या अगोदर हे बंदर सातवाहन साम्राजातील परकीय व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. त्यामुळे त्यांच्या व्यापाराला क्षती पोहचवण्याचा दृष्टीने शकांनी त्यांची जहाजे लुटीत किंवा ती जहाजे भडोचला आणली जात, कारण भडोचवर शंकांचे अधिपत्य होते. ज्या मुळे कल्याणचा विदेशी व्यापार बंद होऊन व्यापारी केंद्र म्हणून कल्याणचे महत्व दुसरया शतकापर्यंत कमी झाले. टॉलेमीच्या विवारणामध्ये देखील पश्चिमी किनाऱ्यावरील बंदरा मध्ये कल्याणचा उल्लेख आढळत नाही. कार्ले येथील लेखांवरून देखील कल्याणच्या ऐवजी धान्यकट्चे महत्व आहे. दुसऱ्या शतकाच्या उत्तार्धारतात सातवाहनांनी कोंकण जिंकल्याने कल्याणचे महत्व पुन्हा वाढले.

munotes.in

**४) सिमिलिया:**

पेरिप्लसने / सिमिलिया या नगराचा 'बाजाराचे शहर' म्हणून उल्लेख केला आहे. टॉलेमीने या शहराला चोल म्हंटले तर कान्हेरी अभिलेखामध्ये या शहराचा उल्लेख चमूला असा आहे, जे मुंबई पासून दक्षिणेला २० मील लांब होते. तसेच या लेखांमध्ये सिमिलियाला कल्याण व सोपारा बंदरासारखे महत्व दिले आहे. टॉलेमी हा या शहरामध्ये काही दिवस राहीला असल्याने त्याने या शहराबद्दल केलेले ऐतिहासिक वर्णन महत्वाचे आहे. प्लिनीने या शहराला मोती उत्पादक केंद्र म्हणून उल्लेख केला आहे तर पेरिप्लसच्या मते, इ. स. दुसऱ्या शतकात हे सुती व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. या शरमधून इतर देशांमध्ये सुती वस्त्र हे निर्यात केले जात.

**५) कोट्टापटणम :**

कोट्टापटणम हे आज आंध्रप्रदेश मधील नेल्लोर जिल्ह्यातील वकाडू येथील समुद्रकिनाऱ्यावर वसलेलं आहे. या नगरामधून इ.स.पूर्व दुसऱ्या शतकामध्ये भूमध्य सागरीदेश व चीन मध्ये होणाऱ्या व्यापाराचे अनेक पुरावे आढळतात. टॉलमीने या शहराला कोट्टीस नाव दिले जे सातवाहन काळातील प्रमुख व्यापारी शहर होते. कोट्टापटणम येथून

काही मातीची भांडी आढळली आहे जी अरिकेमडू येथील उत्खननमध्ये मध्ये देखील भेटली आहेत. व्हीलर यांच्या मते, हे बंदर सातवाहन व कुशाण काळातील प्रमुख बंदर होते.

**६) कंटकशीला :**

सातवाहन साम्राज्याच्या किनारपट्टीवर वसलेल्या या शहराचा उल्लेख अमरावती अभिलेखा मध्ये आढळतो. हा अभिलेख उत्तरा नावाच्या एका व्यक्तीद्वारा लिहला गेला आहे. हे शहर निश्चितच टॉलमीने वर्णनं केलेले कंटाकसायाला असावे. वर्तमान मध्ये हे शहर घंटाशाला म्हणून ओळखले जाते. हे शहर मसलीपट्टण पासून पश्चिमेला १३ मील लांब आहे. टॉलमीने कंटकशीलाला प्रमुख व्यापार - व्यवसायाचे शहर म्हणून उल्लेख केला आहे. हे शहर नदी व समुद्र मार्गाने जोडले गेले असल्याने अंतर्गत व परकीय व्यापार येथून होत.

**आपली प्रगती तपासा :**

१. रोमन व्यापारातील प्रमुख बंदरांची माहीती द्या.

## १५.७ रोमन व्यापाराचा प्रभाव

भारत व रोम यांच्यातील व्यापार हा इ. स. पहील्या शतकात सुरु झाला. व तो इ. स. पाचव्या शतकापर्यन्त कायम होता. या व्यापाराचा भारतातील विविध क्षेत्रांमध्ये प्रभाव पडलेला दिसून येतो. तो पुढील प्रमाणे :

१) भारतामधील लोककथा व आख्यायिकांना पश्चिमीकडे साहीत्यामध्ये स्थान देण्यात मिळाले. तसेच अनेक रोम साम्राज्यातील लेखकांनी स्ट्रेबो, एरियन, प्लिनी इ. भारताविषयी वर्णन आपली ग्रंथात केले.

२) रोमन साम्राज्याचा सर्वात जास्त प्रभाव हा कला व स्थापत्यामध्ये दिसून येतो. भारतातील गांधार स्थापत्य शैलीवर ग्रीक - रोमन शैलीचा प्रभाव आढळतो.

३) भारत व रोमन साम्रज्यातील काही धार्मिक व तत्वज्ञातील विचारांमध्ये समानता आढळते. रोमन देवता ज्युपिटर हा भारतीय देवता दौसच्या सामान आहे.

४) भारतीय भाषांमधील अनेक शब्द हे रोमन भाषेमध्ये आढळतात. उदा. साखर व कापूर या शब्दाला रोम मध्ये / अनुक्रमे, सकरुम व कैम्पर असे बोलले जाते.

५) भारतामधील गणित, खगोलशास्त्र व औषधी ज्ञानाचा प्रभाव हा रोम संस्कृतीवर पडलेला दिसतो.

६) रोमन सम्राटाप्रमाणे भारतातील कुशाण राजांनी देखील मृतक सम्राटांच्या स्मृतीतीर्थ मंदिरे व मूर्ती ( देवकुल ) बांधण्याची प्रथा सुरु केली.

## १५.८ रोमन व्यापाराचे पतन

भारत - रोम व्यापार हा इ.स. पाचव्या शतकापर्यंत कायम होता. पण मध्यंतरीच्या काळात रोमन साम्राज्याने भारताबरोबर होणाऱ्या व्यापारावर बंदी घातल्याने हा व्यपाराचा ह्रास होऊ लागला. हर्षवर्धनाच्या काळात आलेल्या चिनी प्रवासी हेनसंगच्या लिखाणावरून कळते की, या काळात अनेक विकसित व संपन्न शहरांचे पतन झाले होते. या काळात विशाल व समृद्ध अशा  रोमन साम्राज्याचा ऱ्हास झाल्याने पश्चिमीकडील देशांशी असलेला भारताचा व्यापार हा संपुष्टात आला. पूर्वमध्ययुगीन काळात (६५० -१०० इ.स.) भारतात राजपूत सत्तेच्या उदयामुळे अनेक छोटी - छोटी राज्य स्थापित झाली, ज्यांच्या आप - आपसातील संघर्षामुळे व्यापाऱ्याचा पूर्ण ऱ्हास झाला. भारतातील अनेक विकसित नगरे ही नगरवासियांच्या गरज पूर्ण करण्यात असमर्थ ठरल्याने या नगरातील बहुतांश जनता ह्या ग्रामीण वस्त्यांमध्ये स्थायिक झाल्या. व इ.स. सातव्या शतकात पुन्हा ग्रामिणी कारणांची सुरवात झाल्याने भारत - रोम व्यापार संपुष्ठात आला.

**आपली प्रगती तपासा :**

१. भारत रोमन व्यापाराच्या ह्रासाची कारणे सांगा .

## १५.९ सारांश

भारत व रोम साम्राज्य यांच्यातील व्यापारिक संबंध हे प्राचीन काळापासून होते पण हा व्यापार इ. स. पहील्या शतकामध्ये जास्त विकसित झाला. कारण हीप्पलस याने भूमध्य सागरात लावलेल्या व्यापारी मार्गांचा शोध व भारतात उभे राहीलेले आंतरराष्टीय साम्राज्य. हा रोम व्यापार मौर्यत्तर काळात अधिकच विकसित झाला. हा व्यापार प्रारंभी स्थळ मार्गाने व कालान्तराने समुद्री मार्गाने होऊ लागला. या व्यापाराचे स्वरूप हे आयात जास्त व निर्यात कमी अशा स्वरूपाचं होते. रोम व्यापारातून भारतीय व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर नफा मिळवला. व आर्थिक दृष्टीने भारत हा समृद्ध झाला.

munotes.in

## १५.१० स्वाध्यायावर आधारित प्रश्न

१) भारत - रोम व्यापाराचा आढावा घ्या .
२) मौर्योत्तर काळातील भारत - रोम व्यापाऱ्याचा आढावा घ्या .
३) दक्षिणेकडील भारत - रोम व्यापार सांगा .
४) भारत रोम व्यापारातील प्रमुख बंदरांचा आढावा घ्या .
५) रोमन व्यापाऱ्याच्या ह्रासाची करणे स्पष्ट करा .

## १५.११ संदर्भ ग्रंथ


१. Singh Upinder, A History of Ancient and Early Medieval India, From the Stone Age to the 12th century, Pearson.

२) डॉ. पाण्डेय वी. के. , - प्राचीन भारतीय कला, वास्तू एंव पुरात्तव, शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद, २०११

३) श्रीवास्तव के.सि. - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, युनायटेड बुक डेपो, इलाहाबाद , ग्यारावी आवृत्ती २००९.

४) प्रसाद ओमप्रकाश / गौरव प्रशांत - प्राचीन भारत का सामाजिक एंव आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, चौथा संस्करण, २०१७

५) कुमार मनोज, सातवाहन साम्राज्य के तटीय व्यापारी केंद्र, ( संशोधन लेख - IJRAR, पृ. क्र. २२० -२२३ )


❖❖❖❖

munotes.in